म. ग्रं. सं. ठाणें

विषय: इतिहास

संग्रहालय क्रमांक

लेखक: गो. ह. देशमुख लोकहितवादी

पुस्तकाचें नांव: ऐतिहासिक गोष्टी भाग ३ व उपयुक्त माहिती

सन: १८८०

( हें पुस्तक मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीनें पसंत केलें आहे. )

( लोकहितवादिसंग्रहित. )

# ऐतिहासिक गोष्टी भाग २ रा,

व

# उपयुक्त माहिती.

: oxo :

मालकाकरितां

नासिक येथें

हरि त्र्यंबक काळे यांच्या

" नासिकवृत्त " छापखान्यांत छापिलें.

आषाढमास, शके १८०२.

जुलई, सन १८८०

किंमत एक रुपया.

( हें पुस्तक मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीनें पसंत केलें आहे ).

( लोकहितवादिसंग्रहित. )

# ऐतिहासिक गोष्टी भाग ३ रा,

व

# उपयुक्त माहिती.

: oxo :

मालकाकरितां

नासिक येथें

हरि त्र्यंबक काळे यांच्या

" नासिकवृत्त " छापखान्यांत छापिलें.

आषाढमास, शके १८०२.

जूलई, सन १८८०

किंमत एक रुपया.

| गोष्ट. | विषय. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| | ...दाबादचा गुजराथी | |
| | ...द वेगडा | १९. |
| | ऐतिहासिक गोष्ट. | २०. |
| ६४. | प्रतिनिधि .... .... | २९. |
| ६५. | दक्षिणचे सुभे.... .... | ३०. |
| ६६. | पुणें शहर .... ... | ,, |
| ६७. | चार धर्म....... .... | ३२. |
| | ...त्याचा आग्रह... | ,, |
| | ...गे....... | ,, |
| | | ३३. |
| | | ,, |

के सांगितलें पाहिजे कीं, यांत ... ली आहे त्या प्रकरणाची विस्तारपूर्वक हकीक... जिज्ञासा उत्पन्न होऊन त्या त्या गोष्टीविषयीं ते ... करतील. प्रत्येक पदार्थास व मनुष्यास इतिहास व आयुष्य ... तच. त्यांत जे पदार्थ व जीं मनुष्यें चांगलीं त्यांचा इतिहास ज... ण्यापासून आपलें ज्ञान व आपले सद्गुण वृद्धिगत होतात. प... आपल्या या देशांत बहुत काळापासून सर्व उत्तम व उपयुक्त गोष्टींविषयीं अत्यंत औदासिन्य असलेलें दिसतें व त्यापासून अल्पज्ञता, आलस्य व अविचार ह्या दुर्गुणांचें मनस्वी प्राबल्य झालें आहे तें अंशतः हटवून देशबांधवांस कांहीं तरी उपयोग व्हावा या हेतूनें या अल्प माहितीच्या गोष्टी लिहिण्याचा आमचा यत्न आहे. त्याचें साफल्य होण्यास ईश्वरकृपा समर्थ आहे.

ज्ञान हें सर्व सन्मानाचें, पराक्रमाचें, बलाचें व ऐश्वर्याचें मूळ आहे. त्याचा जेथें अभाव तेथें सर्वथैव ग्लानि दृष्टीस पडते. हत्तीस त्याचा यःकश्चित् महावत अंकुशानें टोंचितो, गुरांचे मोठमोठे कळप आठ वर्षांचें पोर वळवून आणितें, व मारवाडी कुळंब्यांस छळीतच असतो; हे सर्व प्रकार अज्ञानजन्य होत. ही या देशाची ग्लानि दूर होऊन ज्ञानाची वृद्धि होणें आवश्य आहे. त्याशिवाय दुसरा उपाय नाहीं. आजपर्यंत अन्नछत्रें, सदावर्तें, दक्षिणा व ब्राह्मणभोजनें बहुत खर्चानें चालत आलीं. परंतु त्यांपासून देशांत विशेष सुखोत्पत्ति झाल्याचें दिसत नसून उलट सर्व गोष्टींविषयीं प्रारंभीं लिहिल्याप्रमाणें औदासिन्य व आलस्य हीं वाढून हा सर्व देश अज्ञानव्यापित झाला व परदेशांतील ज्ञान कोट्यावधी रुपये खर्च करून उसनें घेण्याची गरज पडली आहे. ही गरज ज्ञानवृद्धीवांचून सरणार नाहीं. व या हेतूस्तव हा अल्प प्रयत्न जिज्ञासू लोकांस नजर केला आहे.

लोकहितवादी.

## उपयुक्त माहिती.

———oxo———


| गोष्ट. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| | मराठयांचा भगवा झेंडा. | १. |
| | निरनिराळ्या लोकांच्या रामराम नमस्कार वगैरे करण्याच्या रीती. .... .... | ,, |
| ३. | चिरंजीव ........ .... | २. |
| ४. | लालाभगत. .... .... | ,, |
| ५. | हेमाडपंती इमारती .... | ,, |
| ६. | मुंबईची वस्ती .... .... | ३. |
| ७. | पाटील कुळकर्णी .... | ,, |
| ८. | शेणव्यांचे स्वामी .... | ४. |
| ९. | मराठी ग्रंथकार ........ | ,, |
| १०. | माधवगिरीचा पंथ .... | ,, |
| ११. | गुजराथेंतील कुळंबी .... | ५. |
| १२. | परशुराम भाऊ व बापू गोखले .... .... .... | ६. |
| १३. | भिकोबा जोशी साष्टीकर | ,, |
| १४. | त्रागा व त्रासा ........ | ७. |
| १५. | मुताळे .... ... .... | ,, |
| १६. | गिरनार पर्वत .... .... | ७. |
| १७. | द्वारका व छाप .... .... | ८. |
| १८. | मुद्रा ... .... .... | १०. |
| १९. | पालिठाण्याचा डोंगर व देवळें .... .... | १०. |
| २०. | मणिरामपारखजींचीं मंदिरें | ,, |
| २१ | जयस्तंभ .... .... | ११. |
| २२. | डोंगरांतील लेणीं .... | ,, |
| २३. | सुरजमल्ल जाट ........ | ,, |
| २४. | विजापूर .... .... .... | १२. |
| २५. | सोन्याचें नाणें .... .... | ,, |
| २६. | यशवंतराव होळकराचा शिक्का .... .... .... | १३. |
| २७. | रास्त यांचा वंश ........ | ,, |
| २८. | पटवर्धनांचा वंश .... | १४. |
| २९. | सावनूरचे नवाबांचा वंश | ,, |
| ३०. | शाहूमहाराज छत्रपति | १५. |
| ३१. | छत्रपति यांचे सेनापती .... | ,, |
| ३२. | भोंसले यांचीं गांवें .... | १६. |
| ३३. | सर लष्कर व सेनाकर्ते .... | ,, |
| ३४ | ब्राह्मणांस आवश्य माहिती | ,, |
| ३५. | सह्याद्रिपर्वत ... .... | ,, |
| ३६. | सुधारलेले मागें हटले! | १७. |
| ३७. | किती एक गोष्टी व त्यांच्या तारखा .... .... .... | ,, |

| गोष्ट. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ३८. | अमदाबादचा गुजराथी बादशहा महंमद बेगडा | १९. |
| ३९. | नवरत्नें व पाषाण.... | २०. |
| ४०. | पाहण्यासारखीं स्थलें.... | ,, |
| ४१. | वार्षिक झरे व उन्हाळीं | २१. |
| ४२. | अमदाबाद प्रांतांतील पाहण्याचीं ठिकाणें.... .... | ,, |
| ४३. | अधिकमास.... .... | २२. |
| ४४. | शिवाजीस राज्याभिषेक .... | ,, |
| ४५. | बाराराव.... .. .... | ,, |
| ४६. | अंग्रे व त्यांचा शिक्का | २३. |
| ४७. | हिंगणे वंश.... .... .... | ,, |
| ४८. | वेदोक्त जलप्रलयाची गोष्ट | ,, |
| ४९ | पुराणें.... .... .... | २४. |
| ५० | स्मृती.... .... .... | ,, |
| ५१ | सूत्रें.... .... .... | २५ |
| ५२ | संहिता.. . .... .... | ,, |
| ५३. | ज्योतिषग्रंथ.... .... | ,, |
| ५४. | चंद्रचूडाचें घराणें .... | ,, |
| ५५. | लिंगाईत .... .... | २६. |
| ५६. | रानभाज्या .... .... | ,, |
| ५७. | त्रयोदश पुत्र.... .... | ,, |
| ५८. | भ्रष्ट क्षत्रिय .... .... | ,, |
| ५९. | ब्राह्मणांचीं षट्कर्मे... | २७. |
| ६०. | आठ प्रकारचे विवाह.... | ,, |
| ६१. | स्त्रियांची योग्यता.... .... | ,, |
| ६२. | वेदांचें महत्व.... .... | ,, |
| ६३ | शिक्के.... .... .... | २८. |
| ६४. | प्रतिनिधि .... .... | २९. |
| ६५. | दक्षिणचे सुभे.... .... | ३०. |
| ६६. | पुणें शहर .... .... | ,, |
| ६७. | चार धर्म........ .... | ३२. |
| ६८. | दुर्योधनाचा आग्रह... | ,, |
| ६९. | टीका व भाष्यें........ | ,, |
| ७०. | सूपशास्त्रादि ग्रंथ .... | ३३. |
| ७१. | बोध करण्याच्या रीती.... | ,, |
| ७२. | वेदभाष्यें .... .... | ३४. |
| ७३. | पौरूष ग्रंथ.... .... | ,, |
| ७४ | सप्तऋषी .... .... | ,, |
| ७५. | धान्यें.... .... .... | ३५. |
| ७६. | नरगुंदकरांविषयीं माहिती | ,, |
| ७७. | होळकर .... .... | ३६. |
| ७८. | पेशवे कुळाची माहिती... | ,, |
| ७९. | ऋषी.... .... ... | ३७. |
| ८०. | मखलाशी व किरकोळ शिक्के.... .... .... | ३८. |
| ८१. | ताराऊसाहेब.. . .... | ३९. |
| ८२. | गाइकवाड .... .... | ,, |
| ८३. | विजापूरचे बादशहा . . | ,, |
| ८४ | नगरचे बादशहा ... | ४०. |
| ८५. | जलूस शक.... .... .... | ,, |
| ८६. | वेद.... .... .... .... | ,, |
| ८७. | ब्राह्मणें........ ... .... | ,, |
| ८८. | गायनांतील राग .... | ४१. |
| ८९. | सातारचे राजे .... | ४२. |
| ९०. | राजाज्ञा... .. . .... . | ,, |

| गोष्ट. | विषय. | पृष्ठ. | गोष्ट. | विषय. | पृ. |
|---|---|---|---|---|---|
| ९१. | थोरले बाजीराव.... | ४२. | १००. | साडेतीन पीठें.... ....... | ,, |
| ९२. | गड........ .... ....... | ,, | १०१. | देव व त्यांजवरील ग्रंथ | ५९. |
| ९३. | शंकराचार्यांचे मठ.... | ४३. | १०२. | धातु व पाषाणांच्या खाणी | ६०. |
| ९४. | यात्रास्थानें.... ....... | ,, | १०३. | फार्बस साहेब........... | ,, |
| ९५. | ज्योतिर्लिंगें........... | ४५. | १०४. | म्यारिअट साहेब.... | ६१. |
| | (१) सोमनाथ .... .... | ,, | १०५. | नानाफडणवीस........... | ,, |
| | (२) श्रीशैलमल्लिकार्जुन | ४६. | १०६. | राज्याचें मूळ........... | ,, |
| | (३) महाकाल......... .. | ,, | १०७. | धर्मापासून अनर्थ ...... | ,, |
| | (४) ओंकारमांधाता ........ | ,, | १०८. | शालिग्राम....... .... | ६२. |
| | (५) बदरीकेदार.... ....... | ,, | १०९ | महानद्या............... | ,, |
| | (६) भीमाशंकर........ | ४७. | ११०. | सारस्वती नदी...... .. | ६३. |
| | (७) काशीविश्वेश्वर...... ... | ,, | १११. | अग्निहोत्री........... | ६४. |
| | (८) त्र्यंबकेश्वर........ | ४८ | ११२. | गणित. ........ ..... | ६५. |
| | (९) वैजनाथ.... . ....... | ,, | ११३. | ब्रह्मक्षत्रिय. ......... | ,, |
| | (१०) अंबह्यानागनाथ. . | ,, | ११४. | पुजारी... ........... | ६६. |
| | (११) रामेश्वर........... | ४९ | ११५. | वाममार्गी.............. . | ,, |
| | (१२) घृष्णेश्वर..... ... . | ,, | ११६. | भास्करराव शाक्त. ...... | ,, |
| ९६. | सप्त पुऱ्या.......  .. | ५०. | ११७. | रजपूत. .. ........ | ६७. |
| | (१) अयोध्या............ | ,, | ११८. | माहात्म्य... .... .... | ६८. |
| | (२) मथुरा. . ....... .. | ,, | ११९. | जैन ब्राह्मणांचे वेद.... | ,, |
| | (३) मायापुरी—हरिद्वार | ५२. | १२०. | धर्मसंस्थापक आचार्य | ६९. |
| | (४) काशी....... ....... | ,, | १२१. | रणजितसिंग........... | ,, |
| | (५) कांची ........ .. | ५३. | १२२. | वाईट चाली. ......... | ,, |
| | (६) अवंतिका—उज्जनी | ,, | १२३. | अल्प वयांत लग्नें.... | ७०. |
| | (७) द्वारावती—द्वारका.... | ,, | १२४. | घोड्यांचे रंग........... | ,, |
| ९७. | चारधाम ...... . | ५६. | १२५. | बाजीरायी... .... ....... | ,, |
| ९८. | पंचप्रयाग.. .... ... | ५७. | १२६. | त्रावणकोर. .... ....... | ,, |
| ९९ | पंच सरोवरें.... ... | ५८. | १२७. | पोकळ ग्रंथ ... .... | ७१. |

| गोष्ट. | विषय. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| १२८. | शिवाजीस राज्याभिषेक | ७१. |
| १२९. | शिवाजीचे अष्टप्रधान | ,, |
| १३०. | अष्टगणपती | ७२. |
| १३१. | नासिक | ,, |
| १३२. | गोरा कुंभार | ,, |
| १३३. | नासिकचे घारपुरे | ,, |
| १३४. | तोतये | ७३. |
| १३५. | झिंझुवाडा व पावागड | ७४. |
| १३६. | आपय्या दीक्षित | ,, |
| १३७. | मराठेशाही—सातारचे राजे | ७५. |
| १३८. | प्राकृत ग्रंथकार | ,, |
| १३९. | नारायण शब्दाचा उपयोग | ७७. |
| १४०. | पंजाबांतील यात्रेचीं ठिकाणें | ,, |
| १४१. | क्षेत्रें | ,, |
| १४२. | जैन | ,, |
| १४३. | हिंसा व बळी | ,, |
| १४४. | जुन्या इमारती | ,, |
| १४५. | पुनर्विवाहप्रतिपादक | ७८. |
| १४६. | स्त्रिया | ,, |
| १४७. | पिरान् पीर | ७९. |
| १४८. | अकबर व एक पंडित | ,, |
| १४९. | अलीबागचे बिवलकर | ८०. |
| १५०. | अंबा शंकर | ,, |
| १५१. | उपाध्याय | ८१ |
| १५२. | तांदुळांच्या जाती | ,, |
| १५३ | सापांच्या जाती | ८१. |
| १५४. | पिशाच्चें | ,, |
| १५५. | गायकवाडांचे दिवाण | ८२. |
| १५६. | अमदाबादचे सुभे | ,, |
| १५७. | गुजराथेंतील काळ | ,, |
| १५८. | बंडखोर लोक | ८३. |
| १५९. | पवित्र पदार्थ | ,, |
| १६०. | अष्टादश पुराणसंख्या | ८४ |
| १६१ | सुमत | ,, |
| १६२. | रामशास्त्री | ,, |
| १६३. | कृष्णंभट पुराणिक | ,, |
| १६४. | दगड | ८५. |
| १६५. | रामानुजस्वामी | ,, |
| १६६. | एकनाथांचा वंश | ,, |
| १६७. | नौका व त्यांचे भेद | ८६. |
| १६८. | त्र्यंबकराव मामा पेठे | ,, |
| १६९. | हसबनीस | ,, |
| १७०. | मुजूमदार | ८७. |
| १७१ | बाळाजीपंत नातु | ,, |
| १७२ | द्वादशपुत्र | ,, |
| १७३ | अष्टविवाह | ,, |
| १७४ | लुगडीं | ,, |
| १७५ | मापें | ८८. |
| १७६ | कऱ्हाडकर मुतालीक | ,, |
| १७७ | पटवर्धन वंश | ,, |
| १७८. | पाटणकर दीक्षित | ,, |
| १७९. | प्रांताचे भाग | ८९ |
| १८०. | नागपूरचे भोंसले | ,, |

इतिहास १८


| गोष्ट. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १८१. | नवग्रह........ .... | ८९. |
| १८२. | खा० ब० खर्शेटजी सर न्यायाधीश बडोदें | ९०. |
| १८३. | राम व हनुमान यांच्या मूर्तींचे प्रकार........ | ,, |
| १८४. | मध्वाचार्य............... | ,, |
| १८५. | रामानंद........ .... .... | ,, |
| १८६. | कबीराचे शिष्य व त्यांचे ग्रंथ........... .... | ९१. |
| १८७. | नेम्भाचार्य .... .... .... | ,, |
| १८८. | रामानुजाचे मठ .... .... | ,, |
| १८९. | पंचबदरी........ .... | ९२. |
| १९०. | आखाडे व गोसावी ..... | ,, |
| १९१. | वाद.................. | ,, |
| १९२. | गुजराथ........ .... .... | ,, |
| १९३. | अहम्मदचतुष्टय........ | ९४. |
| १९४ | अमदाबादच्या इमारती .... | ,, |
| १९५. | भाट........ .... | ९५. |
| १९६. | कोळ्यांची नांवें.... .... | ,, |
| १९७ | त्र्यंबकजी डेंगळे.... .... | ,, |
| १९८. | गायकवाडांच्या सनदेंतील शिक्का.... .. .... | ,, |
| १९९. | शिख............. .. | ,, |
| २००. | बाहेरवटे.... .... .... | ९६. |
| २०१. | लष्ठित............... | ९८. |
| २०२. | लोखंडाच्या जाती.... .... | ,, |
| २०३. | कापसाच्या जाती.... .... | ,, |
| २०४ | मुली मारून टाकण्याची रीति. .. .. .... | ,, |
| २०५. | सती.... .... .... | ९९. |
| २०६. | दासी व दास....... | १००. |
| २०७. | मेरिया........ .... .... | ,, |
| २०८. | पेंढारी........ .... | १०१. |
| २०९ | अविद्या............ | १०२. |
| २१०. | चांगले राजे........ | १०३. |
| २११. | मराठींतील प्रसिद्ध सरदार | ,, |
| २१२. | जुलूम.... ........ | १०४. |
| २१३. | मल्हारराव गायकवाडांचे स्नेही.............. | ,, |
| २१४. | पुणें............... | १०५ |
| २१५. | मराठी कारकीर्दींतील मिरच्या.... .... .... | १०७. |
| २१६. | मराठींतील किताब | १०९. |
| २१७ | दक्षिणचे सुभे........... | ,, |
| २१८. | शिवाजीच्या कारकीर्दींतील टिपण .... .... | ,, |
| २१९. | कावसजी पाटील पार्शी | १११. |
| २२०. | खंडेराव गायकवाडांचा विद्येविषयीं अभिप्राय | ,, |
| २२१. | इंग्रजसरकारचा विद्यावृद्धीविषयीं प्रयत्न.... | ११२ |
| २२२ | बडोद्याविषयीं व्यवस्था.... | ,, |


## पुरवणी.


१ मुंबईचे गव्हर्नर.... .... १.

२. गायकवाड........ .... ४.

३ शिंदे. ...... .... .... ७.

| गोष्ट. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ४. | अमदाबाद सर केलें | ७. |
| ५. | नवविधा भक्ति | ८. |
| ६. | चोवीस अवतार | ,, |
| ७. | पुण्यास विद्याखातें | ९. |
| ८ | विद्याखात्याचा उपक्रम | १०. |
| ९. | हिंदुधर्माचा विस्तार | ११. |
| १०. | सिदाजीराव निंबाळकर | ,, |
| ११. | पूर्वींच्या लोकांचा प्रामाणिकपणा | १२. |
| १२. | देवमामलेदार | १३. |
| १३. | अक्कलकोटचे स्वामी | ,, |
| १४. | माणिकप्रभु | ,, |
| १५. | नारायण बावा पिंपोडेकर | ,, |
| १६ | भक्तिपंथ व त्यास वेदाचा आधार | ,, |
| १७. | जोंधळ्याच्या जाती | १४. |
| १८. | लोकांचा अभिमान आणि शौर्य | ,, |
| १९. | नारायणराव वैद्य वाईकर | १५ |
| २०. | सदाशिव नाईक वानवळे | ,, |
| २१. | व्याख्याते व उपदेशक | १६ |
| २२. | ईश्वरप्रार्थना हेंच औषध | १७. |
| २३. | गोंवें व साष्टी | ,, |
| २४. | पार्शी लोक | १८. |
| २५. | भडोच | ,, |
| २६. | अमदाबाद | १९. |
| २७. | हिंदूंचे सण | २०. |
| २८. | पेशव्यांची वहीण | २१. |
| २९ | वैद्यक | २१. |
| ३०. | ईस्ट इंडिया कंपनी | ,, |
| ३१. | लांचेची बंदी | ,, |
| ३२. | दिल्लीचे बादशहा | ,, |
| ३३. | सुगुणचंद | २२. |
| ३४. | हिंदूंच्या गैर चाली | ,, |
| ३५. | टालमी व त्याणें काढलेला नकाशा | २४. |
| ३६. | ईश्वरी शक्ति | २५. |
| ३७. | गायन | ,, |
| ३८. | जैन व रोमनक्याथलिकपंथ | ,, |
| ३९. | बुंदेलखंड व तेथील राजे | २६. |
| ४०. | मच्छलीबंदरचे नबाब | २८. |
| ४१. | झांशी व जालवणप्रांत | २९. |
| ४२. | भुयारें | ,, |
| ४३. | त्रिनमूर्तींचीं देवळें | ३०. |
| ४४. | जगांतील स्त्रीपुरुषमर्यादा | ,, |
| ४५. | सारस्वत, राजगिरे व औदीच्य ब्राह्मण | ३१. |
| ४६. | पुराणांतील भेद | ,, |
| ४७. | उपपुराणें | ३७. |
| ४८. | विक्रमसभेंतील नवरत्नें | ,, |
| ४९. | व्यास | ३८. |
| ५०. | तामस पुराणें व स्मृती | ३९. |
| ५१. | शैव–वैष्णव मतें | ,, |
| ५२. | चार सांप्रदाय | ,, |
| ५३. | तुळशीदास | ४०. |
| ५४. | रामानुज | ,, |

| गोष्ट. | विषय | पृष्ठ. |
|---|---|---|
| ५५. | सूरदास | ४१. |
| ५६. | जयदेव | ,, |
| ५७. | कबीरपंथ | ४२. |
| ५८. | निंबार्क | ४३. |
| ५९ | बंगाल्यांतील वैष्णव | ४४. |
| ६०. | राधावल्लभी पंथ | ४५ |
| ६१. | जोगी पंथ | ,, |
| ६२. | मलूकदासी पंथ | ४६. |
| ६३. | दादूपंथ | ,, |
| ६४. | वल्लभी पंथ | ४६. |
| ६५. | पिरम्याई | ४७. |
| ६६. | ढोंगी लोक | ,, |
| ६७. | राजगड व रायगड | ४९. |
| ६८. | अघटित कल्पना | ,, |
| ६९. | अकबर बादशहा | ५०. |
| ७०. | तंजावरचे राजघराणें | ५३. |
| ७१. | इंग्लंडचे प्रधान | ५५. |

# ऐतिहासिक गोष्टी भाग ३ व उपयुक्त माहिती.

## या पुस्तकाचें

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ४ | १ | तैलंग व शंणवी होते. | तैलंग होते |
| ५ | ९ | उझागा | उझा |
| १० | १६ | महाराज | महाजन |
| १२ | १४ | जसार | आसार |
| १३ | १० | १७६८ | १७२० |
| ,, | १७ | शहाजी. | शामजी |
| [illegible] | १ | १५६२. | इ. स. १७६२ |
| १४ | ३ | सरदाचे | सरदाराचे |
| १५ | १२ | दलेलखास | दलेलखान |
| १६ | २४ | भामन हेरे | भाम मेहेर |
| [illegible] | १३ | १५६६ | १५१६ |
| ,, | १५ | २१५ | १७४ |
| २७ | २८ | भतं | भूतं |
| ४० | १७ | ५१ | ३०. |
| ,, | १८ | १. | ५१. |
| ५६ | ९ | प्रेमण | मेमण |
| ५९ | १० | उत्कट | उत्कंठ |
| ६१ | ४ | दादाभाई | दाद्याभाई |
| ,, | ८ | वहिवंचे | वाहिवंचे |
| ६४ | १ | प्राचीन | प्राची |
| ६५ | २३ | फट | फूट |
| ७१ | ११ | सवास | सर्वांस |
| ७२ | ४ | वेण्याद्री | लेण्याद्री |
| ७३ | १२ | खणलींत | खणाऽऽळींत |
| ७४ | ८ | वडा | वाडा |
| ७९ | १० | कुतबरावनी | कुतब रनानी |
| ८० | ३ | क्षवय | क्षवणाय |
| ८५ | २८ | त्याचा | त्याचा १छाया बोबा, त्याचा ११ कुशाबा, त्याचा १२ रामचंद्रबोवा, |
| ८७ | १३ | हजार | बारा हजार |
| ८९ | १५ | अण्णा | अप्पा |
| ९० | १६ | वासुदेवाचा | वायुदेवाचा |

## पुरवणी.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ११ | ३ | सवाई विग्रेची | विग्रेची |
| १५ | ३ | शेवच्या | शेवटच्या |
| १९ | १६ | ५०।६० | ५।६ |
| ३२ | १७ | आदिसीर | आदि किंवा सीर |
| ४७ | ६ | मर्यादित | मर्यादी |
| ,, | १६ | (जोधपूरपांत) | (जोधपूरप्रांत) |
| ५४ | २६ | अमीरासिंस | अमीरसिंग |

**सूचना:**—वाचकांनीं प्रथमतः शुद्धिपत्राप्रमाणें पुस्तक शुद्ध करून नंतर वाचावें.

९८०

# ऐतिहासिक गोष्टी, भाग ३

# व

# उपयुक्त माहिती.

—oo—

१. शिवाजी महाराज यांनीं रामदास स्वामी यांस आपले गुरू केले होते, व त्यांचें वस्त्र मागून घेऊन त्या वस्त्राचें निशाण केलें होतें. स्वामी हे सर्वदां भगवें वस्त्र धारण करीत होते हें सर्वांस माहितच आहे. आणि ह्यामुळें तेव्हांपासून मराठयांचें निशाण भगव्या रंगाचें झालें; त्यास **भगवा झेंडा** असें ह्मणत. ह्या भगव्या झेंड्यालगत जरिपटकाही असे. हीं निशाणें हत्तींवर लावीत व तीं शत्रूंकडे जाऊं नयेत असा ठराव असल्यामुळें त्या निशाणांच्या हत्तींचे सभोंवतीं नामांकित असे *नामजाद सरदार चालत.

२. वाण्यांनीं वैष्णव धर्म घेतल्यापासून ते '**जय गोपाळ**' म्हणतात; वैरागी '**जय सीताराम**' ह्यणतात; सिख लोक '**वागुरू**' म्हणतात; स्वामी नारायणाचे पंथांतील सत्संगी लोक '**जय स्वामी नारायण**' असें म्हणतात; कबीर पंथी जे आहेत ते '**सत्साहेब**' म्हणतात; गोसावी व संन्याशी हे '**नमो नारायण**' म्हणतात; ब्राम्हण हे ब्राम्हणांस '**नमस्कार**' म्हणतात, व ब्राम्हणांखेरीज लोकांस '**आशीर्वाद**' म्हणतात; आणि वैष्णव हे '**जयश्रीकृष्ण**' असें म्हणतात. पूर्वीं मराठे लोकांत '**जोहार ( जयहर )**' व '**दंडवत**' म्हणण्याची चाल होती, परंतु **रामदास**स्वामींनीं **शिवाजीस** सांगितलें कीं, तूं '**रामराम**' ह्मणत जा. तेव्हांपासून मराठयांनीं '**रामराम**' करण्याची चाल पाडिली व ती तशीच पुढें चालली आहे. महाराष्ट्र देशांत महार लोक मात्र 'जोहार' असें म्हणतात; परंतु इतर देशांत श्रावक वाणी वगैरे अद्यापही '**जोहार**' असेंच कागदोपत्रीं लिहितात. मुसलमान लोक 'कुरनिसात' 'बंदगी,'

---

* **नामजाद** हा मराठी शाहींतील अष्ट प्रधानांच्या **पंडित** या सारखा किताब होता.

'सलाम' असे शब्द ह्मणतात. ते आपसांत, एक '**सलाम अलेकुम**' व दुसरा '**अलेकुम सलाम**' ह्मणतो. आणि हिंदुस्थानांत शूद्र वगैरे लोक '**पावलगी**' असें ह्मणतात.

३. पूर्वींचे कितीएक पुरुष मेले नसून चिरंजीव आहेत असें मानतात. ते चिरंजीव आठ असून खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत:—

१ **श्री दत्तात्रय योगी, कोल्हापुरास,**

२ **श्री** व्यास, **श्री काशी** क्षेत्रीं.

३ **अश्वत्थामा, असिरीचे** किल्ल्यावर.

४ **श्री मारुती, कर्नाटकांत.**

५ **परशुराम, चिपळूणास.**

६ **बिभीषण, लंकेस ( सिलोन )** येथें.

७ **बलीराजा पाताळीं ( अमेरिकेंत );** आणि

८ **श्री कार्त्तिक स्वामी, शेषाद्रि**पर्वतावर. आतां हे अष्टचिरंजीव कीर्त्तीनें जविमान आहेत किंवा देहानें जीवंत आहेत याचा विचार वाचकांनींच करावा.

४. गुजराथेंत * **लाला भगत** ह्मणून एक साधू होऊन गेला. याचें मूळ ठिकाण वढवाणाजवळ सायला ह्मणून गांव आहे तेथें आहे. गुजराथ प्रांतांत ठिकठिकाणीं याचीं मंदिरें आहेत. ज्याप्रमाणें पैठणाकडे **नाथाचीं** मंदिरें व अन्नदानाचा संप्रदाय आहे त्याचप्रमाणें गुजराथेंत **लालाचा** प्रकार होता, व तोच सांप्रदाय अद्यापि त्याचे शिष्य चालवितात.

५. कल्याणाजवळ अंबरनाथ या गांवाचे सीमेंत **अंबरनाथ** नामक महादेवाचें देऊळ आहे. हें फार चमत्कारिक असून चुन्यावांचून दगडावर दगड रचून बांधिलें आहे. त्यांत कारागिरी व कोरणीचें काम फारच चांगलें आहे. हें देऊळ शके ९८० मध्यें बांधलें असें म्हणतात. याचप्रमाणें पुण्यापासून १२ कोसांवर येवत गांवचे डोंगरावर माळ-

---

* हा मूळचा श्रावक ( जैन ) होता, परंतु पुढें तो वैष्णव बनला.

शिरसचे सीमेंत बोलेश्वराचें देऊळ आहे. कसबे सिंनर येथें गांवाबाहे-र असेंच एक देऊळ आहे. व याचप्रमाणें पुरंदराखालीं नारायण-पुर म्हणून गांव आहे तेथेंही एक देऊळ आहे. हीं सर्व देवळें हेमाड-पंतांचे कारकीर्दींतील आहेत. पावागडावर चंपावती राणीचे महाल आहेत तेही याचप्रमाणें डोंगरांत जिने करून कोरून काढिले आहेत. यावरून त्या काळीं चुना लावण्याचें ठाऊक असेल असें दिसत नाहीं. परंतु पुढें मुसलमानांच्या कारकीर्दींस ज्या इमारती झाल्या त्यांस चुना लावण्याचा प्रकार सुरू झाला असें दिसतें.

६. शेणवी ब्राम्हणांची वस्ती मुळीं सांवतवाडीकडे होती. पुढें गोव्या-स फिरंगी यांचा अंमल झाला तेव्हां त्या कारभारांत हे मुत्सद्दगिरी करूं लागले. पुढें फिरंग्यांचा अंमल मुंबईस झाला तेव्हां त्यांजबरोबर ते मुंबईंत व अष्टागर प्रांतांत आले. याजमुळें मुंबईंतील भुलेश्वर वगैरे जीं मुख्य मुख्य ठिकाणें आहेत तीं व त्यांचा अधिकार हीं शेणवी यांजकडेच आहेत. त्यांचे मागून मुंबईंत गुजराथेंतील वाणी आले. आणि त्यानंतर परभू व त्यांमागून भाटे, लव्हाणे, खोजे हे कांठेवाड व कच्छ प्रांतांतू-न व्यापाराकरितां आले. परंतु कायस्थ परभु मात्र फारसे तिकडे गेले नाहींत. बाकी पाताणे परभू साष्टी प्रांतांत राहात होते ते, आणि पांच-कळशी, भंडारी, खत्री वगैरेही बहुतेक मुंबईंत जाऊन वसले.

७. कोंकणस्थ हे मूळचे देशस्थ असून ते परशुरामाचे आज्ञेनें घांटा-खालीं आले. कुळंबी हे मुळीं किष्किंधेस जेथें सुग्रीव व वालीचें राज्य होतें तिकडे राहात असतां श्रीरामाज्ञेनें दंडकारण्यांत आले. ही दंडकार-ण्यांत वसती करण्याची आज्ञा प्रथमतः मारुतीस झाली; ह्याचें दर्शक प्रतिगांवीं मारुतीची स्थापना असते. याप्रमाणें सर्व अरण्य वसविल्यावर मागाहून उत्तरेकडून आर्य लोक जोशी, कुळकरणी व भट या रूपांनीं येऊन गांवांत वस्ती करूं लागले. परंतु मूळचे वस्ती करणारे पाटील हे शुद्र असतांही तेच वरिष्ठ राहिले ते राहिले. याप्रमाणें पाटील कुळकरणी यांची स्थापना व वसतीच्या कालाचें मान होतें. असेंच, हल्लीं दक्षिणेंत आपणास जे यजुर्वेदी ब्राम्हण दिसतात ते सर्व गुजराथेंतील ब्राह्मण असून

ते दक्षिणेंत वस्तीस आले; तसेंच देशस्थ हे मुळचे तैलंग शेणवी होते असें ह्मणतात. व किरवंत हे प्रथमतः शेणवी लोकांबरोबर गौड्याकडून भट ह्मणून आले असा शोध लागतो.

८. जगद्गुरु शंकराचार्य यांचे दोन भेद आहेत: एक पंच द्राविडांचे शंकराचार्य आणि दुसरे पंचगौडांचे शंकराचार्य. यांची परंपरा अशी सांगतात: शेणवी हे गौडब्राह्मण असून त्यांचे ज्ञातींत **गौडपादाचार्य** ह्मणून मोठे स्वामी झाले. त्यांचे शिष्य गोविंद व गोविंदांचे शिष्य शंकराचार्य झाले. आणि ह्मणूनच **गोविंदपादपूज्य**, असें शंकराचार्यांस विशेषण लिहितात. ही द्रविड शंकराचार्यांची परंपरा झाली. अशीच गौड परंपराही आहे. ते शेणव्यांचे शंकराचार्य ह्मणतात. शेणवी ज्ञातींत पूर्वीं रामाजी कामथ ह्मणून मुंबईच्या गव्हरनराचे कौन्सिलदार होते. व चतुर साबाजी ह्मणून विजापुरास मोठे मुत्सदी होते तेही शेणवीच होते. सारांश,शेणवी हे ब्राह्मणांसारखेच चतुर, बुद्धिवान् व राजकारस्थानी आहेत.

९. इंग्रजी ग्रंथांतून मराठी तर्जुमे करण्याचें काम प्रथम सदाशिव काशीनाथ ऊर्फ बापू छत्रे यांनीं केलें. त्यांचे इसापनीति, बाळमित्र हे ग्रंथ फार प्रसिद्ध व लोकप्रिय आहेत. पुढें बापूजोशी साष्टीकर यांनीं निघंट ह्मणून वैद्यशास्त्राचा ग्रंथ केला. पुढें छत्रे यांनीं बाळशास्त्री जांभेकर यांस आपलें काम शिकविलें व बाळशास्त्री यांनीं दादोबा पांडुरंग वगैरे मंडळी तयार केली. तशीच प्रथमतःइकडे ज्यार्विस साहेब यांनीं सर्वेची पाहणी करण्याची विद्या शिकविली, व गणिताचीं बुकेंही प्रसिद्ध केलीं. पुढें डाक्टर तयार करण्याकरितां बुकें झालीं. आणि त्यानंतर हरी केशवजी, गोविंद नारायण वगैरे पुष्कळ ग्रंथकार झाले व होत आहेत. परंतु हें ग्रंथकर्तृत्वाचें काम अद्यापि बहुत शिलक आहे,व लोकांस अजून त्याबद्दलची असावी तशी रुचिही नसून ज्ञानवृद्धीस आपले लोक फार पराङ्मुख व उदासीन आहेत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे!

१०. माधवगिरी या नांवाचा मनुष्य गुजराथेंत असून त्याचे शिष्य ही बहुत आहेत. त्याचें वेदांत मत असून त्याचे शिष्य परस्परांस ' **सच्चिदानंद** ' असें ह्मणून भेटतात.

§ ११. गुजराथेंत दोन प्रकारचे * कुळंबी फार आहेत. एक कडवे व दुसरे लेवे. कडवे ह्मणण्याचें कारण असें आहे कीं, ते लोक कुडी प्रांतांत वसले ह्मणून त्यांस कडवे असें ह्मणतात. व नर्मदातीरीं वसलेले लोकांस लेवे ( रेवे-रलयोरभेदात्! ) असें ह्मणतात. त्याचप्रमाणें तिसरे आंजणे ह्मणून लोक आहेत, त्यांत दक्षिणचे कुळंबीही धरतात. लेवे व कडवे यांत जे श्रेष्ठ असतात त्यांस पाटीदार ह्मणतात, आणि यांतच चौथी सतनेड म्हणून एक ज्ञाति आहे. कडवे यांचा सांप्रदाय असा आहे कीं, बारा वर्षांनीं एक वेळ मुलींचीं लग्नें करावयाचीं! गोंज उंझा या गांवीं त्यांची एक देवी आहे. तिचा गुरव बारा वर्षांनीं एकदां तिथि सांगतो; म्हणजे ते लोक पत्रें लिहून त्याप्रमाणें इतरत्र पाठवि-तात. व जेथें त्या लोकांची वस्ती असेल तेथें त्यास कळवितात. बऱ्हाण-पुर, उज्जनी, उमरावती, रतलाम, इंदुर, येवलें, मिरत, अमदाबाद, बडोदें वगैरे ठिकाणीं यांची बहुत वस्ती आहे;तेथें त्या कुंकुमपत्रिका आल्या म्हणजे ते लोक पत्रिका घेऊन येणाऱ्या जासुदांचा मान करून त्या घे-तात, आणि मग त्याप्रमाणें सर्व चालतात. नंतर मुलीस वर पाहून कोणा एकास रुपया आठ आणे देतात व त्याशीं तिचें लग्न लावून त्याच बैठकींत त्याची फारकत घेतात. मुलीस वर मिळाला नाहीं तर फुलांचे ढिगाशींच तिचा विवाह करतात; आणि मग तीं फुलें टाकून देतात. ह्याप्रमाणें त्या मुलीचा प्रथम विवाह झाला असें मानतात. आपल्या इकडेही ब्राम्हणां-मध्यें वधूचे वाईट ग्रह असले म्हणजे तिचा कुंभाशीं विवाह करितात आणि तो झाल्यानंतर मग खऱ्या नवऱ्याशीं तिचें लग्न करितात. ह्याप्रमाणेंच ही सदरची कडवे लोकांची रीति आहे. वधूचा फुलांचे ढिगाशीं विवाह झाल्यानंतर मग पाहिजे त्या काळीं दुसरे वराशीं विवाह लावावा असा प्रचार आहे. त्यास **नातरा** म्हणजे पुनर्विवाह म्हणतात व हे पुनर्वि-

---

* गुजराथेंत कुळंब्यांस ' रामसैन्य ' म्हणण्याचा पाठ आहे. यावरून **वाल्मीकांनीं** रामायणांत ज्यांस वानर म्हटलें ते अनार्य (शूद्र) च असतील असा ज्यांचा तर्क आहे तो खोटा म्हणवत नाहीं.

गाह पाहिजे तितकें वेळ आणि केव्हांहि केलें तरी चिंता नाहीं अशी रीति आहे. प्रथम लग्न मात्र त्यांच्या ठरलेल्या मुहूर्तावर झालें पाहिजे.

१२. परशुराम भाऊ पटवर्धन व बापु गोखले हे एकपत्निव्रतानें वागत असा लौकिक प्रसिद्ध आहे. त्यांचे येथील पदरच्या मंडळीस देखील एकपत्नीव्रताविषयीं ताकिदी असत, याजमुळें तेही लोक संभावितपणानें चालत. गोखले यांचे पदरचा मृदंग वाजविणारा विठोबा गुरव कोंडितकर हा प्रसिद्ध होता. व पुढें त्याचे दोन मुलगे बाळकृष्ण व मन्याबा हेही पुण्यांत व सातान्यांत प्रसिद्ध आहेत व यांच्याप्रमाणें मृदंग वाजविणारा दुसरा कोणी नव्हता अशीही त्यांची सर्वत्र ख्याति आहे. परंतु याकुळांत बापूसाहेबांपासूनच असा सांप्रदाय पडत आला होता कीं, भजन, कथा व गवयाचें गाणें यांतमध्यें मात्र हे गुरव मृदंग वाजवीत. स्त्रियांची संगति म्हणून त्यांनीं कधींही केली नाहीं. पुढें दाजीसाहेब रास्ते यांनीं सन १८४१ सालीं मन्याबास बोलावून आणून त्याजपुढें एक हजार रुपयांचा तोडा ठेवून सांगितलें कीं, तुम्हीं स्त्रियांचे गाण्यांत व बैठकींत मृदंग वाजवावा. परंतु मन्याबानें उत्तर दिलें कीं, बापूसाहेबांपासून जें आमचें व्रत चालले आहे तें आमचे कुळांत नेहमीं चालावयाचें. जसें गोखल्यांनीं सर्व संपत्ति टाकून आपल्या कुलव्रताप्रमाणें स्वामिकार्यार्थ प्राण दिला, त्याचप्रमाणें आम्हीही लाखों रुपयांचे संपत्तीकडे न पाहतां आपलें कुलव्रत कदापि सोडणार नाहीं!!

१३. मुंबईस प्रथम पुनर्विवाह झाला तेव्हां भटांनीं आपले रोजगार पिकविण्याकरितां जिकडे तिकडे ग्रामण्यें उभीं केलीं. ह्या लोभी व दुष्ट भटांनीं दूर दूर पर्यंत डांका पाठविल्या व थोतांडें उभीं केलीं; परंतु ठाणें येथें ब्राम्हणांत प्रमुख भिकोबा जोशी म्हणून आहेत त्यांनीं आपले गांवीं पत्रें आलीं तीं तशींच बांधून ठेवून ग्रामण्य म्हणून होऊं दिलें नाहीं व सर्व स्वस्थतेनें व्यवहार चालविले. असें हें एकच गांव सर्व हिंदुस्थानांत आढळेल. याजवरून सुज्ञ लोक जेथें आहेत तेथें मूर्खांनीं कसेही व कितीही दुष्ट उद्योग केले तरी बंडाळी उत्पन्न होत नाहीं.

१४ गुजराथ, मारवाड, व राजपुताना या प्रांतीं भाट लोकांची फार

नसती असून ते विश्वासुक आहेत अशीहि त्यांची प्रसिद्धि आहे. त्या भाटांत कितीएक कवी असून त्याचा धंदा लोकांच्या वंशावळी लिहून बाळगाव्या आणि त्यांची चरित्रें लिहावीं. त्याजबद्दल ते श्रीमान् लोकांपासून वर्षासनें घेतात व लग्न मुंजींत वगैरे हक्क ठेवतात. यावरून इतिहास लिहिण्याकरितां ही जाति उत्पन्न केली आहे असें दिसतें. या लोकांचा क्षत्रियांशीं फार संबंध असतो; कारण कीं, त्यांचीं चरित्रेंही लिहिण्यासारखीं असतात. पूर्वीचे **सूत**पुराणिक व **संजय** हे याच भाट ज्ञातीचे होते. हे लोक दुसऱ्यास जामीन होतात व कांहीं जुल्मी कायदा झाला तर आडवे पडतात. तसेंच त्यांजवर कोणीं जुल्म केला तर त्रागा व झासा करितात. त्रागा म्हणजे आपले घरचा माणूस मारून त्याचें डोकें कापून सरकारचे कचेरींत किंवा शत्रूचे घरीं टाकतात. खंडेराव महाराज गायकवाड यांनीं सन १८६२सालीं मोजणी केली तेव्हां कडी येथें तीन भाटांनीं जीव दिले! या प्रमाणें बहुतवेळ घडलें आहे. यासच त्रागा म्हणतात; आणि झासा म्हणजे अमक्याचें घर जाळूं किंवा आमक्यास मारूं असा कागद लिहून झाडास बांधतात आणि भय दाखवितात. कर्नाटकांतही, याप्रमाणें जे भय दाखवितात त्यांस तळई म्हणतात. या विलक्षण चाली पूर्वींच्या अंदाधुंद कारकीर्दींत पडल्या, परंतु त्या इंग्रजींत बहुतेक मोडल्या!

१५. कोळवण वगैरे डोंगरी प्रांतांत भगत असतात. ते कोणत्या तरी एका बायकोचें नांव सांगतात कीं, हिच्याजवळ भूत आहे आणि यामुळें गांवांत ताप रोग वगैरे येतात. मग तेथील सर्व भोळ्या लोकांस तें सत्य वाटून ते मूर्खपणानें त्या बाईस मारतात झोडतात किंवा तिचा खून करितात. अशा बाईस ते डांकीण किंवा भुताळी म्हणतात. या अज्ञानी लोकांत ही गैर समजूत फार प्रचलित आहे आणि याजमुळें ठाणें अदालतींत असे खुनाचे खटले बहुत येतात. हा सर्व वंडावा अज्ञान लोकांस ज्ञान येईल तेव्हांच संपेल; तोंवर अशा कितीक स्त्रिया डांकिणी व भुताळ्या म्हणून मारल्या जातील हें कांहीं कळत नाहीं!

१६. गिरनारीं येथें अश्वत्थाम्याची शिळा दाखवितात. परंतु वास्तवि-

क तो अशोक राजाचा लेख आहे व त्यांत धर्माज्ञा लिहिल्या आहेत. ह्या लेखास सुमारें २१०० वर्षे झालीं. हा लेख एका डोंगराचे टोंकावर जागा साफ करून त्याजवर लिहिलेला आहे. गीर म्हणून काठेवाडांत एक विस्तीर्ण डोंगर आहे. त्यांतलाच हा एक भाग जुनागडाजवळ आहे, त्यास गिरनारी म्हणतात. सौराष्ट्र देशांत जीं पांच रत्नें म्हणून लिहिलीं आहेत त्यांतीलच हें एक आहे:—

**सौराष्ट्रे पञ्च रत्नानि नदी नारी तुरंगमा।**
**चतुर्थं सोमनाथश्च पंचमं हरिदर्शनम्॥**

या गिरनारी पर्वतावर जीं बहुत देवळें आहेत, त्यांत हिंदूचींही देवळें आहेत. त्यांमध्येंच अंबाजी दत्तात्रयें यांचें एक मोठें उंचस्थानीं देऊळ आहे. या गडावर रायालिंगार म्हणून प्राचीन काळीं एक राजा होता त्याचा वाडा आहे, व त्याचे नजीकच रैवत पर्वत व सुवर्ण रेखा नदी अशीं आहेत. या पर्वतावर जो किल्ला आहे त्याचें प्राचीन नांव जीर्णगड असें आहे. ह्या नांवाप्रमाणें येथें अद्यापि भुईंत पुष्कळ इमारती सांपडतात. हल्लीं तेथें एके बाजूस मात्र थोडीशी वस्ती आहे; बाकी ओसाड पुष्कळ आहे. ही जुनागडच्या * बाबीची राजधानी आहे,

१७. चार ठिकाणीं द्वारका दाखवितात: एक डाकोर येथें जुनी मूर्ति द्वारकेहून आली आहे ती; दुसरी मूळद्वारका, ही समुद्राचे कांठीं कोडीनार म्हणून एक गांव आहे तेथें होती असें म्हणतात; तिसरी गोमती द्वारका, ही हल्लीं शंकराचार्यांचा शारदा मठ आहे ती होय. येथें एक फार मोठें देऊळ आहे व तें विश्वकर्म्यानें बांधिलें आहे असें म्हणतात. त्याचे पलीकडे दहा कोसांवरील गोपीतलावावर चार पांच कोस गोपिचंदनाचीच जमीन आहे. आणि त्यानंतर चौथी द्वारका, द्वारकाबेट म्हणून गोसावी महा-

---

* **बाबी** हा वंश गुजराथ व काठेवाड इकडे फार मोठा आहे. बाब याचा मूळ फार्शी भाषेंत दार असा अर्थ असून, पूर्वीं बादशाहाचे वेळेस ह्या वंशाचे पूर्वज दारावरील मोठ्या अधिकाऱ्यांपैकीं असावे असें वाटतें.

राज यांचे अधिकारांत आहे. या जीथें द्वारकेस जातांना वाटेंत आरमडें म्हणून एक गांव आहे. तेथें गाइकवाडाचा एक शिपाई रस्त्यांत शेगडी पेटवून बसलेला असतो; व त्या शेगडींत लोखंडाचे शिक्के नेहमीं तापत असतात. तेथें जो यात्रेकरी येईल त्यास डाग देतात आणि त्याबद्दल मुद्रा घेणारांजवळून उलटे आणखी चार आठ आणे घेतात. हा कारखाना नेहमीं चालूच आहे, व येणेंकरून उत्पन्नही बरेंच होतें. यात्रेकरी सुद्धां त्या मुद्रा मोठ्या हौसेनें घेतात. त्या तप्त मुद्रांचे डाग बरे होण्यास अजमासें तीन महिने लागतात, असें आहे; तथापि मूर्ख व धर्मभोळे लोक पैसा देऊन आपलें शरीर डागवून घेतात! आतां हल्लीं बडोद्यांत इंग्रजी अंमल झाला आहे त्यांत तरी ही चाल बंद व्हावी हें योग्य आहे. परंतु ह्याकडे सुशिक्षित कामदारांचें जेव्हां लक्ष्य जाईल तेव्हां व्यवस्था होईल. ही डागण्याची इजा हजारों धर्मपिशा प्राण्यांस आहे तरी त्याजबद्दल सरकारास पांच सात हजार रुपये मिळकत आहे, यामुळें कदाचित् हा प्रचार अजूनही बंद होत नसेल! या मुद्रा घेण्याचे चालीबद्दल अशी दंतकथा आहे कीं, वैष्णवांचीं जीं बावन द्वारें आहेत, त्यांपैकीं **पीपाभगत** ह्मणून एक द्वार आहे म्हणजे त्या नांवाचा एक मोठा वैष्णव होता. तो जातीचा रजपूत असून द्वारकेस यात्रेला येत असे. एके दिवशीं तो ह्मणाला कीं, पूर्वीं जी सुवर्णाची द्वारका होती ती पाहण्यास मला देव बोलावीत आहे यास्तव मी जातों. असें ह्मणून तो समुद्रांत शिरला, व जातां जातां पुढें अदृश्य झाला. नंतर पंधरावे दिवशीं समुद्रांतून तो बाहेर आला. त्या वेळेस त्याचे हातांत शंख, चक्र, गदा व पद्म अशा सुवर्णाच्या चार मुद्रा होत्या. पुढें त्या त्यानें द्वारकेंत जे जुने राजे होते त्यांजवळ दिल्या आणि सांगितलें कीं, " येथें जे यात्रेस येतील त्यांचे अंगावर ह्या मुद्रा तापवून द्याव्या असा देवानें मला हुकूम केला आहे. व मी इतके दिवस समुद्रांत गुप्त झालों तो द्वारकेंतच होतों. " या त्याच्या सांगण्यावरून ही चाल चालू झाली. पुढें सोन्याच्या मुद्रा झिजून गेल्या; तेव्हां आतां प्रस्तुतच्या ह्या लोखंडाच्या भक्कम मुद्रा चालत आहेत! अज्ञान काळीं सदरील

गोष्ट लोकांनीं सत्य मानिली असावी. परंतु याप्रमाणें आजच्या सज्ञान-कालीं ही ती गोष्ट अमलांत असणें फार दुःखास्पद आहे!

१८. वैष्णव लोकांत मुद्रा घेण्याची चाल बहुत ठिकाणीं आहे, आणि त्या ज्याचे अंगावर नाहींत त्यास लोक ओंवळा व अशुची (अपवित्र) असें समजतात. मध्व संप्रदायांत त्यांचे स्वामी मुद्रा देतात व त्या मुद्रा स्त्रिया, पुरुष व मुलेंही घेऊन त्यांवर त्यांस दक्षिणा म्हणून कर देतात. याप्रमाणेंच ठिकठिकाणीं भोळे यात्रेकरू मुद्रा घेतात. अयोध्येंत, मथुरेंत, जनकपुरास, धरणीधर, तुळशीशाम, आणि डाकोर वगैरे ठिकाणीं कोठें किरिट, कोठें धनुष्य बाण, कोठें शंखचक्र आणि कोठें सुदर्शन अशा प्रकारच्या मुद्रा देण्याची रीति आहे.

१९. कांठेवाडांत सत्रुंजी नदीचे कांठीं पालीठाणें या शहराजवळ एक डोंगर आहे त्या ठिकाणीं श्रावक लोकांचीं अनेक मंदिरें आहेत; तशीं मंदिरें पृथ्वीवर एका ठिकाणीं सुद्धां कोठेंही नसतील. हीं मंदिरें कोट्यावधी रुपये खर्च करून बांधलीं आहेत. यांचप्रमाणें अंबाजीचे डोंगरावर कुंभारी या गांवीं व अबूचे पाहाडावरील देलवड्याचीं देवळेंही अद्भुत आहेत. तीं पाटणचे महाराज यांनीं शके १००० त बांधलीं. पाली जवळचें राणिकपूरचें देऊळही अतिचमत्कारिक आहे. हीं सर्व देवळें जैन धर्माचीं आहेत. या डोंगराचें येवढें माहात्म्य वाढण्याचें कारण हेंच कीं, यांजवर बहुत तीर्थंकरांचें निर्याण झालें आहे.

२०. मथुरेंत विष्णु मंदिर व वृंदावनांत श्रीरंगाचें मंदीर हीं माणिराम पारखजी यांनीं बांधलीं आहेत व तीं फार अद्भुत आहेत. मणिराम पारखजी हे दौलतराव शिंदे यांचे पोतनीस होते त्या वेळेस त्यांस बहुत पैसा मिळाला. सदरील देवळांपैकीं श्रीरंगाचे देवळास ६० लाख रुपये लागले असें म्हणतात. हें देऊळ त्रिचनापल्लीस जें देऊळ आहे त्याचीच प्रत केली आहे. वृंदावनांत नित्यानंद प्रभूचें दुसरें एक देऊळ आहे तेंही असेंच फार मोठें आहे. हीं देवळें किती भक्कम म्हणून सांगावयाचें झालें तर इतकें सांगितल्यानें वाचकांचें समाधान होईल

कीं, प्रलयकाळ होऊन गेला तरी हीं देवळें जशींचीं तशींच प्रलय कालोत्तर दृष्टीस पडतील.

२१. प्राचीनकालीं लोखंडाचे व दगडाचे खांबांवर लिहून ते खांब उभे करण्याची चाल असे. या प्रकारचे स्तंभ या हिंदुस्थानांत बहुत ठिकाणीं आहेत. ते कांहीं लोखंडाचे व कांहीं दगडाचे असून त्यांजवर लेख आहेत. दिल्लीचे मैदानांत, प्रयागचे किल्ल्यांत, व दिल्लीचे दक्षिणेस फिरोजशिरचे दिल्लींत असे एकेक स्तंभ आहेत. पुराण्या दिल्लींतही एक लोखंडाचा स्तंभ आहे; त्यास कोणी लोखंडाचा ह्मणतात व कोणी पंचरशी ह्मणतात. याप्रमाणें ठिकठिकाणीं लेख करण्याची पूर्वी चाल होती. यांजवर बालबोध अक्षर आहे परंतु ती प्राचीन लिपी असल्यामुळें तें वाचतां येत नाहीं.

२२. या देशांत डोंगर पुष्कळ आहेत. ते कोरून त्यांत देवळें व वाडे करण्याची पूर्वी फार चाल होती. त्या कोरींव कामास लेणीं म्हणतात. याप्रमाणें नाशकाजवळ एक धर्मराजाचें लेणें व दुसरें चांभारलेणें अशीं दोन लेणीं आहेत. त्याचप्रमाणें मुंबई नजीक घारापुरी येथें एक आहे; नाणे घाटांत व शिवनेरीसही हीं लेणीं आहेत; तुळशी तलावाजवळ कान्हेरीचीं लेणीं तर प्रसिद्ध आहेत; खंडाळ्याजवळ कारलें येथें वेहेराईचें लेणें आहे; आणि सर्वांहून श्रेष्ठ अशीं वेरूळचीं लेणीं तर सर्वप्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणें पाचोरा स्टेशनाजवळ वीस कोसांवर अजंठा घांटाखालीं फर्दापूर म्हणून गांव आहे तेथील लेणींही मोठीं अद्भुत आहेत.

२३. सदाशिव पंत भाऊ पेशवे यांची स्त्री पार्वतीबाई ही पाणपत येथील घोर संग्राम झाल्यावर पळून गेली ती भरतपूरच्या जाटाचे मुलखांत आली. तेव्हां तेथील सुरजमल्ल राजानें असा बंदोबस्त ठेविला होता कीं, जे मराठे पळून येतील त्यांचा चांगला बंदोबस्त ठेवावा, व त्यांस दक्षिणेंत सुखरूप रवाना करावें. बाईसाहेब ही पेणचे कोल्हटकर यांची कन्या होती. ती येतांच सुरजमल्ल यांणें बाईचा मोठा आदर करून सांगितलें कीं, हिंदूंचें राज्य स्थापन करण्याकरितां व परकीय राज्य

बुडविण्याकरितां पेशव्यांनीं लढाई दिली, हें आम्हां सर्व हिंदूंस भूषण आहे. त्यांत जे मेले त्यां सर्वांस स्वर्गीं वास आहे यांत संशय नाहीं. याज-करितां आपण दुःख न मानून येथें राहावें; तुम्ही माझे बहिणीप्रमाणें आहां. तुमचा मी सर्व बंदोबस्त करून पुण्यास रवाना करून देतों, व जे दुसरे हिंदु वगैरे लढाईंतून माझे देशांत येतील त्यांचाही सांभाळ मी करून त्यांस दक्षिणेंत पोंचतें करीन. आतां, प्रारंभींच लढाई व्हावी असा माझा हेतु नव्हता. कारण कीं, त्यांत आपल्या पक्षास जय मि-ळेल असें मला दिसलें नाहीं. तथापि झाली गोष्ट ती झाली, त्यास उ-पाय नाहीं. परंतु हिंदूंनीं हिंदूंस सर्व प्रकारें मदत करावी हा माझा धर्म आहे. असें समाधान करून बाईंस त्यांच्या मोठेपणाप्रमाणें नावता देऊन त्यांची पुण्यास रवानगी केली!

२४. अशी ह्मण आहे कीं, ज्याणें विजापूर पाहिलें नाहीं त्यानें द-क्षिणेंत कांहीं पाहिलें नाहीं. कारण, तेथील सर्वच कामें अद्भुत आहेत: इभ्राम रोजा, गोल्या घुमट, उपळ्या बुरूज, तोफा, मेंगी महाल, आसा-र महाल, मोती मसीद, ताजबावडी, अर्क किल्ला, पहिला कोट, त्याचे बाहेर तिकोन्याचा कोट, दफ्तरखाना, राजवाडा, या सर्व इमारती पाह-ण्यालायक आहेत, व त्यांस किती खर्च झाला असेल याचें गणित होत नाहीं. असें ह्मणतात कीं, अल्ली अदलशा बादशाहा याणें, प्राचीन काळीं विजयानगर ( आनेगोंदी ) येथें हिंदू नरपती ( राजे ) होते त्यांजवर हल्ला करून त्यांस मारून व त्यांचा खजिना लुटून आणिला. त्यांत त्यास ८० लाख होन मिळाले; त्याचा त्याणें या इमारतींकडे व्यय केला. विजय नगरांत सुवर्णाचें नाणें इतकें विपुळ होतें कीं, मुसलमान ह्मणत—तेथें सोन्याचा पाऊस पडला असावा!

२५. पूर्वीं कर्नाटकांत सोन्याचें नाणें फार चालत होतें. होनाचीं नांवें तर कृष्णशाई होन, सदाशिव शाई होन, हुकेरी, आनंदराई, वरा-हो, मत्स्य होन ( हें चार रुपयांचें नाणें ) वगैरे अनेक आहेत. पुढें मुसलमानांनीं एक सुलतानी होन केला; त्यास इंग्रज पेगोडा असें ह्मण तात त्याचीही किंमत चार रुपयेच आहे. या होनांचे पोटीं अर्धा होन,

पाव होन, हे भागही आहेत. त्याची किंमत दोन रुपये, एक रुपया अशी आहे. याशिवाय फनम म्हणून अर्धा रुपया किंमतीचें नाणें आहे. त्याचे पोटीं चुणी व डाळी याप्रमाणें चार आण्यांचें सोन्याचें नाणें आहे. रामटकी म्हणून एक ५० रुपये किंमतीचें सोन्याचें नाणें आहे, त्याजवर रामाची व हनुमंताची मूर्त्ती असते. याशिवाय मुसलमानांचे कारकीर्दीत झाडशाई, अकबरी, जहांगिरी वगैरे मोहोरा पाडून तें नाणें सुरू झालें आणि युरोपाशीं व्यापार असतांनाः या वेळीं व्हेनिस येथून हिंदुस्थानच्या मालाचे मोबदल्यांत पुतळ्यांचें नाणें इकडे आलें तेंही चालू आहेच.

२६. यशवंतराव होळकराकडून लोकांस मिळालेल्या शके १७२०
सालच्या सनदांवरील शिक्यांत असलेले श्लोक पाहिले; ते खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत:—

इंद्रप्रस्थस्थितो राजा चक्रवर्त्ती भुमंडले ।
तत्प्रसादात्कृता मुद्रा लोकेऽस्मिन्वै विराजते ॥ १ ॥
लक्ष्मीकांत पदांभोज भ्रमरा यीतचेतसां ॥
यशवंतस्य विख्याता मुद्रेषा पृथिवीतले ॥ २ ॥

२७. रास्ते यांचा मूळ पुरुष शाम्जी असून त्यांचें उपनांव गोखले आहे. त्यांस एक सदाशिव नाईक व दुसरे भिकाजी नाईक असे दोन पुत्र होते. हे साताऱ्यास सावकारी करून असत यांचें दुसरें नांव हें, ते रास्तपणानें वागत म्हणून रास्ते असें पडलें. या दोघां पुत्रांपैकीं सदाशिव नायकांचा पुढें वंश नाहीं. भिकाजी नाईक यांस मात्र सात मुलगे होते ते येणेंप्रमाणें:— १ मल्हारराव, २ गणतराव, ३ आनंदराव, ४ लक्ष्मणराव, ५ गंगाधरराव, ६ रामचंद्रराव, आणि ७ जीवनराव. या पुत्रांपैकीं आनंदराव याचे पुत्र माधवराव व माधवरावांचे बळवंतराव व गंगाधरराव. पैकीं गंगाधरराव यांचे खंडेराव हे पुत्र होते; ते मयत होऊन हल्लीं त्यांचे दत्तक आहेत भिकाजी नाईक यांचीच मुलगी गोपिकाबाई, ही श्री. बाळाजीबाजीराव उर्फ नाना साहेब यांस दिली होती. तिचे विश्वासराव, थोरले माधवराव व नारायणराव असे तिघे पुत्र होते.

इ. स.

माधवराव रास्ते यांस १७६२ त सरदारी मिळाली; त्यांत बागलकोट, तालिकोट, कडेवळीत वगैरे माहाल त्यांजकडे सरंजामास होते.

२८. हरभट कोतवडेकर पटवर्धन हे पटवर्धन सरदारांचे मूळ पुरुष होते. त्यांचे पुत्र बाळंभट व त्यांचे पुत्र १ हरभट, २ पांडुरंगभट मादवाडकर, व ३ केशवभट असे तीन होते. पैकीं हरभट यांस ६ पुत्र होते ते:—१ कृष्णंभट मंगळवेढेकर, २ बाळंभट, ३ त्रिंबकपंत—यांत कागवड व कुरुंदवाडकर आहेत—, ४ गोविंदरावहरी यांत—सांगलीकर, मिरजकर व सोनईकर हे आहेत—, ५ रामचंद्रराव यांत—जमाखिंडी, चिंचणी व तासगांव हे येतात—, आणि ६ भास्करराव शेडवाळकर यांतील—कृष्णंभटाचे बळवंतराव, त्यांचे गणेशपंत त्यांचे पांडुरंग, त्यांचे रामचंद्र, व त्यांचे हरिहरराव हे आहेत. दुसरे बाळंभट, यांचे वंशांतील भाऊ साहेब हे सांगलीकरांकडे दत्तक झाले; तिसरे त्रिंबकपंत त्यांचे नीळकंठ, त्यांचे रघुनाथ, त्यांचे त्रिंबक, त्यांचे केशव, व त्यांचे दादा साहेब कुरुंदवाडकर; चौथे गोविंदराव, त्यांचे पांडुरंग, त्यांचे चिंतामणराव आप्पा, त्यांचे दत्तक पुत्र भाऊसाहेब व औरस पुत्र धुंडिराज तात्या साहेब; पांडुरंगराव यांचे भाऊ गंगाधर, त्यांचे नारायणराव, त्यांचे गणपतराव आणि त्यांचे गंगाधर ऊर्फ बाळा साहेब, हे मिरज किल्ल्यांत राहतात; पांचवे रामचंद्रराव, त्यांचे परशुराम पंत भाऊ, त्यांचे रामचंद्र, त्यांचे गोपाळराव आणि त्यांचे दत्तक यादवाडकरांपैकीं रामचंद्रराव हे होत. हे पटवर्धन मोठे पराक्रमी ब्राह्मण सरदार असून कर्नाटकचे सरसुभे होते व हैदर नाईक व टिपु सुलतान यांस पुढें वाढूं न देण्याविषयीं मूळापासून कर्नाटक सरसुभ्यावर यांची योजना झाली होती. यांची फौज पट्टणचे स्वारींत इंग्रज सरकारचे मदतीस गेली होती. हे पटवर्धन नेहमीं बाळाजी बाजीराव पेशवे यांजबरोबर लष्कर घेऊन फिरत. यांची जाहागीर तीस लाख रुपयांची होती. कर्नाटकांतील मुलूख यांनींच जिंकून घेतला. यांजमध्यें मोठे पराक्रमी पुरुष गोविंदहरी, परशुराम रामचंद्र व नीळकंठ त्रिंबक हे होते.

२९. सावनूरचे नवाबांचा मूळ पुरुष अबदुल हुसेनखान यानें कांहीं

दिवस अकबरबादशाहाची वजिरी केली. त्याचा मुलगा बहिलोलखान हा विजापूरचे बादशाहाचा सरदार होता. त्याचा मुलगा अबदुल रहिमखान यास सरकार नांदेर हें जाहागीर मिळालें. पुढें त्याचा मुलगा अबदुल् करीमखान बाहादूर दलेलजंग यास सरकार बंकापूर व कर्नाटक सुभा हे मिळाले. त्याचा मुलगा दलेलखान यास बेळगांव ऊर्फ अजीमनगर व तोरगळ सरकार हें जाहागीर दिलें. त्याचा मुलगा फत्तेखान, त्याचा मुलगा अबदुल मजीदखान, त्याचा गफारखान, त्याचा सतारखान व त्याचा अबदुल हकीमखान, याची जाहागीर टिपूनें हिसकून घेऊन त्याची मुलगीही मागितली, ह्मणून तो पेशव्यांचे आश्रयास आला व परशुराम भाऊंबरोबर श्रीरंगपट्टणचे स्वारीस गेला. तेव्हां त्यास पेशवे चार हजार रुपये महिना देत होते. पुढें टिपूनें आपली बहीण याचे मुलास दिली त्याचें नांव दलेलखान. यास एल्फिन्स्टन साहेबांनींही चार हजार रुपये नेमणूक करून दिली होती, व पुढें त्याचे बदल तापूर वगैरे ४० हजारांची जाहागीर दिली.

३०. शाहु महाराज छत्रपति यांची, साताराचे गादीवर बहुत वर्षें राज्य केल्यामुळें फार प्रसिद्धि आहे. कोणास, अमुक गोष्ट कधीं घडली किंवा अमुक गांव कधीं मिळाला म्हणून विचारिलें तर, त्याजविषयीं शाहुछत्रपतींचें राजपत्र आहे ह्मणून लोक हॅसेनें सांगतात. यांनीं शके १६२९ चे चैत्र शुद्ध १ दे पासून शके १६७१ पर्यंत ४२ वर्षें राज्य केलें! त्यांत मराठी राज्य अगदीं शिखरास पोंचलें. पुढें शके १६७१ सालीं शुक्लनाम संवत्सराचे मार्गशीर्ष वद्य ३ शुक्रवारीं सकाळीं सातारा ऊर्फ शाहुनगर येथें त्यांचा मृत्यु झाला. तेव्हां त्यांची पत्नी सकवारबाइ शिरके व लक्ष्मीबाई नाटकशाळा या दोघी कृष्णा व वेण्या संगमीं माहुलीस सती गेल्या. त्या दिवशींची इंग्रजी तारीख २६ दिसेंबर सन १७४९ इसवी, आणि मुसलमानी सन खमसेन मया व अलूफ छ. १९ मोहरम, ही होती.

३१. छत्रपति यांचे सेनापति प्रथम संताजी घोरपडे हे होते. यांस हिम्मत बाहादूर हें पद असून हे मोठे पराक्रमी होते. ह्मसवडकर माने

यांनीं औरंगजेबास मिळून विश्वासघातानें यांचें डोकें कापून बादशाहास दिलें. पुढें त्यांचे मागून अनुक्रमें धनाजी जाधवराव, खंडोजी दाभाडे, दावळजी सोमवंशी, कान्होजी मोहिते, हंबीरराव व हंसाजी मोहिते हे सेनापती झाले. ह्या सेनापतींचे गायकवाड हे मुतालीक होते.

३२. भोंसले यांचीं गांवें खानवटें तर्फ पाटस, वावी तर्फ संगमनेर व वेरूळ हा असून त्या गांवीं हे मराठे आहेत. त्यांजमध्येंच शिवाजी हा अवतारी पुरुष निघाला. पुढें वावीकरांपैकींच शाहु महाराज हे दत्तक घेतले. हे शाहु महाराज ह्मणजे थोरल्या शाहु महाराजांचे नातु होत.

३३. इ० सन १७२० ह्मणजे अशरीन मया व अल्फ ( ६०९ ) रजब रोजीं श्री. छत्रपती यांणीं चिमणाजी बल्लाळ यांस सर लष्करची सरदारी दिली. त्यावेळीं जैताजी पाळकर हे सरनौबद होते. पुढें हैबतराव नाईक निंबाळकर हे सर लष्कर झाले, तेव्हां त्यांचे हाताखालीं मोहिते हे सेनाकर्ते होत.

३४. ब्राह्मणांस आपले कुळासंबंधाची माहिती असावी असें पूर्वापर सांगत आले आहेत. ती माहिती ह्मणजे जात, नांव, आडनांव, शाखा, सूत्र, गोत्र, प्रवर, मूळगांव, कुळस्वामी, देव, त्रिपुरुष ह्या गोष्टी आणि वतनवाडी वगैरे असल्यास तें, असें ठाऊक असावें.

३५. सह्याद्री डोंगर हा मध्य हिंदुस्थानाचे देश व कोंकण असे विभाग करितो. त्याचें स्वरूप घोण म्हणजे शतपदी म्हणून एक जीव असतो त्याप्रमाणें आहे. ह्या डोंगराचे चिमट्यांत हजारों नद्यांचे उगम झाले आहेत; व त्यांस खोरीं व नेहरें ह्मणतात. ह्या पर्वताच्या पाठीवर जेथें कांहीं जमीन आहे तेथें वस्ती ही आहे. त्या वस्तीस मुऱ्हे व पठार असें ह्मणतात. मौजे कास, यवतेश्वर, मांढरदेव, महाबळेश्वर हे मुऱ्हे आहेत व मीन नेहर, भामन हेरे, कुकड नेहर हीं नेहरें ह्मणजे नागिनीचे दुतर्फा डोंगर व मध्यें नदीचा प्रवाह, तीं होत. सह्याद्रिपर्वत हा नीळगिरी पासून खानदेशांतील सोनगडा पर्यंत आहे. त्याचीं कांहीं ठिकाणीं फारच उंच शिखरें आहेत. त्यां पैकीं नाशकाजवळ कळसूबाई, ठाण्याजवळ ढाक, सूर्यमाळ, दापूर माळ, आजापर्वत हीं ठिकाणें

बहुत उंच आहेत. या डोंगराचें जें वर्णन संस्कृतांत आहे त्यास **सह्या-द्रिखंड** असें ह्मणतात.

३६. कितीएक दिवसपर्यंत कांहीं मनुष्यें सुधारणुकेचे कामीं अगदीं पुढारी असतात, परंतु पुढें त्यांचे बुद्धीचा पालट होऊन ते मागें हटून पुन: धर्मभोळ्या लोकांप्रमाणें वर्तूं लागतात. याचीं उदाहरणें:— भास्कर दामोदर पाळंदे, सदाशिव बल्लाळ गोंड्ये, बापूरावजी मांडे, जनार्दन सखाराम गाडगीळ वगैरे आहेत. असा पालट होण्यास वास्तविक काय कारणें असतील तीं असोत.

३७. ध्यानांत ठेवण्या सारख्या गोष्टी व त्यांच्या तारखा:—खंडेराव महाराज गायकवाड यांचा मृत्यु बडोदें येथें तारीख २८ नोवेंबर १८७० रोजीं चंपाषष्ठीस झाला.

ता० २७ डिसेंबर १८४७ रोजीं बडोद्याचे थोरले सयाजीराव महाराज गायकवाड हे वारले.

ता० ५ एप्रिल १८४८ रोजीं साताऱ्याचे श्री. शहाजी छत्रपति साताऱ्यास वारले.

तारीख १२ जुलई सन १८५३ रोजीं वाईंत कृष्णेस पाणी येऊन दोन आळ्या वाहून गेल्या.

तारीख २० जून १८५७ रोजीं साताऱ्यास मानसिंग शिपाई निसबत नाझरकचेरी यास बंडाचे गुन्ह्यावरून फांशी दिलें. पुढें हें तुफान पुष्कळच वृद्धिंगत झालें.

तारीख ८।९।१० आगष्ट सन १८६८ रोजीं अमदाबादेस अतिवृष्टि होऊन प्रचंड वारा सुटला. त्यांत दहा हजार घरें पडलीं त्यामुळें मोठी धांदल उडाली, व गरिबागुरिबांना आश्रय नाहींसा झाला. परंतु मुंबई वगैरे बाहेरील ठिकाणची लाख रुपये मदत आली. यामुळें गरिबांचीं घरें पुन्हां सरासरी झालीं. रेल्वे, टपाल, तार वगैरे सर्व बंद पडलें होतें. त्या वेळेस तेथें रिची साहेब हे कलेक्टर होते.

सन १८६९ सालीं मारवाडांत मोठा दुष्काळ पडून हजारो लोक उठून गेले व मेले.

ड्यूक आफ् एडिंबरो राणीसाहेबांचे द्वितीय पुत्र हे मुंबईस तारीख १० मार्च सन १८७० रोजीं आले.

चिमणाजी पंडित सचीव हे तारीख १२ फेब्रुवारी सन १८७१ रोजीं वारले.

रा० ब० मोरोबा कान्होबा यांनीं आपल्या पुनर्विवाहित स्त्रीशह तारीख १७ फेब्रुवारी सन १८७१ रोजीं जीव दिला. यांचें हें लग्न तारीख २६ मार्च सन १८७० रोजीं झालें होतें.

रा० ब० विष्णु परशराम रानडे पंढरपूरचे डेप्युटी कलेक्टर हे तारीख ८ आगस्ट सन १८७१ रोजीं मृत्यु पावले.

हिंदुस्थानचे गवर्नर जनरल लार्ड मेयो यांस तारीख १९ फेब्रुवारी सन १८७२ रोजीं पोर्टब्लेर येथें मारेकऱ्यानें मारलें.

बडोद्याचे प्रसिद्ध सावकार व दानशूर श्री०गोपाळराव मैराळ हे तारीख २६ मे सन १८७२ ह्मणजे वैशाख व० ४ शके १७९४ मंगळवार रोजीं बडोद्यास वारले. असा धर्मात्मा पुनरपि होणें कठीण.

कर्नल फेर हे बडोद्यास तारीख १८ मार्च सन१८७२ रोजीं रेसिडेंट होऊन आले.

जनरल मीड साहेब ह्यांस बडोद्याचे मल्हाररावप्रकरणाचे चौकशीस कमिशनर नेमिलें, व त्याप्रमाणें ह्यांची कचेरी तारीख ५ नोवेंबर १८७३ रोजीं सुरू झाली.

श्री० मल्हारराव गायकवाड यांची द्वितीय पत्नी लक्ष्मीबाई ईचें लग्न नवसरीस तारीख ७ मे सन १८७४ रोजीं झालें. तेव्हां नवसरीचे सुभे नारायणराव वासुदेव खारकर हे होते. या लग्नांत बाई ही गर्भार होती, तरी उखा व शकुंतला या पुराणप्रसिद्ध स्त्रियांच्या दाखल्यांनीं तिच्याशीं लग्न करण्यास चिंता नाहीं असा १६ शास्त्र्यांनीं मल्हारराव यांस शास्त्रार्थ लिहून दिला होता.

ह्या लक्ष्मीबाईस तारीख १६ अक्टोबर सन १८७४ त पुत्र झाला. पुढें मल्हारराव गाईकवाड यांची चौकशी तारीख २२ फेब्रुवारी सन १८७५रोजीं कोर्ट भरून सुरू झाली. ते ह्यांजवर आलेल्या विषप्रयोगाचे

आरोपांतून मुक्त झाले तरी त्यांस गैरवर्त्तणुकीमुळें तारीख २२ एप्रील सन १८७५ रोजीं मद्रासेस रवाना केलें पुढें त्यांचे मागून बडोद्याचे गादी-वर जे सयाजीराव महाराज बसले त्यांचें दत्तविधान तारीख २७ मे सन १८७५ रोजीं श्री. जमनाबाईकडून झालें.

तारीख २३ सप्टेंबर सन १८७५ सालीं अमदाबादेंत नदीचें पाणी शिरून नदीच्या कडेचीं घरें वाहून गेलीं व माधवपुरा व लष्करचा बाजार वगैरेही वाहून गेले. हें पाणी अमदाबादेंत दोन दिवस होतें. ह्या जलप्रलयानें वीस लक्षांचें नुकसान झालें! ह्या वेळीं बारोडेल साहेब हे कलेक्टर असून ह्या प्रसंगास उचित अशी सरकारानें व लोकांनीं पुष्कळ मदत केली.

तारीख २३ नोवेंबर सन १८७५ रोजीं युवराज प्रिन्स आफ वेल्स हे बडोद्यास आले.

मिस मेरी कार्पेंटर ही प्रसिद्ध व विद्वान् बाई विलायतेहून अमदाबादेस तिसऱ्यानें तारीख १८ फेब्रुवारी सन १८७६ रोजीं आली. तिचा सर्वकाळ उद्योग हिंदुस्थानांतील स्त्रियांची स्थिति सुधारावी हाच होता.

३८. महंमद बेगडा हा अमदाबादेस राज्य करीत असतां त्यानें दोन राजांस ताकीद लिहिली कीं, तुम्ही मुसलमान व्हाल तर राहाल. ते राजे, एक जुनागडचे यादवराजे व दुसरे चांपानेरचे पटईरावळ. हे होत. पैकीं जुनागडचे राजांनीं तें मुसलमान राजाचें ह्मणणें कबूल करून मुसलमान झाले. परंतु चांपानेरचे राजांनीं सांगितलें कीं, लढाईस यावें. तेव्हां मुसलमानांचा हल्ला होऊन त्यांत तें शहर अगदीं उजाड झालें. तें अद्यापि ओसाडच आहे. चांपानेर हें शहर फार मोठें होतें. तेथें गडावर राजा राहात असे; त्यानें आपलीं बायका पोरें ठार मारून झांबरतलाव नांवाच्या तळ्यांत टाकलीं आणि जवाहिराचे दागिने होते ते जात्यांत घालून दळून टाकले. सारांश, ह्याप्रमाणें शत्रूच्या हातीं कांहीं लागूंनये ह्मणून असा सर्व प्रकारें आपल्या चीजवस्तांचा व मनुष्यांचा नाश करून टाकला. मग पुरुष राहिले त्यांनीं केशरी पोषाख करून सतीचे वेष घेतले आणि लढाईंतून पुन्हां परतून यावयाचें नाहीं असा संकल्प करून

गडाखालीं उतरले; ते लढून लढून शेवटीं सर्व मेले. क्षत्रियामध्यें, अशा मार्ग किंवा मरूं ह्या निर्वाणीच्या संकल्पास जोहार ह्मणतात. या गडावर त्याचे माहाल, वाडे, राण्यांचे माहाल, तोरणें, दरवाजे हीं फारच चत्कारिक आहेत. व खालीं शहर, मांडवी, व चंपेश्वर महादेव वगैरे स्थलें असून ह्यांचे भोंवतीं पुष्कळ तलाव व विहिरी आहेत; आणि ह्याजवरूनच ती मोठी राजधानी होती असें दिसतें. यांचें माहात्म्य पावकाचलमाहात्म्य ह्मणून आहे त्यांत वर्णिलें आहे. या पावागडास पावकाचल ह्मणतात व त्याजवर कालिकेचें एक देऊळ असून वाममार्गी लोकांच्या अनुष्ठानाची ही जागा आहे.

३९. नवरत्नें ह्मणजे हिरा, मोतीं, माणिक, प्रवाळ, नीळ, पाच, वैडूर्य, गोमेद व पुष्कराज हीं असून तीं नवग्रहांवर योजितात: वैडुर्य रत्नास राहु किंवा लसण्या ह्मणतात; पुष्करानास बृहस्पति ह्मणतात; नीळास शनि ह्मणतात व ह्याचें संकृतांत मरकत हें नांव आहे; मोतीं (चंद्र), प्रवाळ (मंगळ), माणीक (सूर्य), पाच (बुध), हिरा (शुक्र), आणि गोमेद (केतु). यांशिवाय या देशांत दुसरे बहुत मौल्यवान् पाषाण आहेत. त्यांचीं नांवें स्फटिक, हकीक, चंद्रकांत, यमुनी, शीलान वगैरे पंनास प्रकारचीं आहेत. शिवाय इमारती व मूर्त्ती वगैरे करण्याचे संगमरवर वगैरे बहुत जातीचे रंगारंगांचे दगड असून आग्रा, जयपूर, गया, खंबायत वगैरे ठिकाणीं यांचा मोठा व्यापार आहे.

४०. या देशांत पाहण्यासारखीं ठिकाणें बहुत आहेत. मोठे मोठे नदीसंगम—जसे, गंगायमुनेचा प्रीतिसंगम प्रयागास आहे, कृष्णेचा व कोयनेचा संगम कऱ्हाडास आहे, कृष्णेचा व वेण्येचा माहुलीस आहे, तसाच गोदावरी व प्रवरा यांचा संगम टोक्यास आहे आणि कृष्णा व भीमा यांचा संगम कांणूरास आहे. इत्यादि अनेक चमत्कारिक ठिकाणें आहेत. जबलपुरापासून ६ कोसांवर नर्मदेचे दोन्ही तटाकीं चार पांढराच दगड असून त्या मधून पाणी वाहतें त्यामुळें ती जागा फारच चमत्कारिक व पाहण्यासारखी आहे. या दगडाच्या अनेक वस्तू करून जबलपूरचे स्टेशनावर पुष्कळ विकावयास येतात.

४१. कोंकणांत राजापूर येथें एक वार्षिक झरा आहे, तो माघांत प्रगट होतो, व दोन महिन्यांनीं जातो. त्यास राजापूरची गंगा ह्मणतात. महिकांठ्यांत ठाकुरापलीकडे गळतेश्वर महादेव ह्मणून आहे, त्याचे जवळ उन्हाळीं फार आहेत; ठाकुराजवळ लसुन्द्रा आहे तेथें १७ उन्हाळीं कुंडें आहेत; भिवंडीजवळ वज्रेश्वरीचीं ऊन व गोड पाण्याचीं कुंडें आहेत; सुरतेजवळ देवकीकुंड ह्मणून ऊन पाण्याचा झरा आहे; आणि कांठेवाडांत तुळशीशामाजवळ गोड पाण्याचें उष्ण कुंड आहे. नाशकाजवळ टाकेद म्हणून गांव आहे तेथें जटायूची समाधि असून तेथें सर्वतीर्थ ह्मणून एक मोठा झरा आहे. तो कुंडांत येऊन बाहेर वाहात आहे. त्या सर्वतीर्थाविषयीं अशी आख्यायिका आहे कीं, श्रीरामचंद्रांनीं जटायूचे मरणसमयीं सर्व तीर्थें येथें आणिलीं. कावनई किल्ल्याखालीं एक झिरा आहे त्यास कपिलधारा म्हणतात. वांईजवळ पांचगणीस एक महादेव आहे, त्यांतून गंगा म्हणून पाण्याची धार वाहते. खटाव देशांत एरळा नदीचे कांठीं नागनाथ आहे. त्याचें दर्शन घेण्यास तर मोटा लावून पाणी काढून टाकावें लागतें तेव्हां त्याचें दर्शन होतें. त्या देवळांत नेहमीं पुरुषभर पाणी असतें. पुण्याजवळ वनेश्वर महादेवाचे देवळांतही पाणी फिरविलें आहे. त्याचप्रमाणें वांईजवळ लोहाऱ्यास भीमाशंकर आहे त्यांतही पाणी फिरविलें आहे. महाबळेश्वरास एक मोठा झरा आहे, त्यास पंचगंगा ह्मणतात. भोराजवळ अंबवडें येथील नागनाथ ह्मणून एक स्थान आहे तेथेंही पंचगंगा आहे. या दोन्ही ठिकाणीं सातारचे अनगळनाईक सावकार यांनीं देवळें बांधलीं आहेत.

४२. अमदाबादचा कांकरिया तलाव व धोलक्याचा मुनसर तलाव हे सिद्धराजजयसिंग यांनीं बांधिले आहेत. पाडव्याची शाळा व ढवळके येथील मनोरे हे पाहाण्याजोगे आहेत. अमदाबादेजवळ अढाळज येथील विहीर प्रसिद्ध आहे. कपडवंजचें कुंड, शिहोरचें ब्रम्हकुंड व गौतमाश्रम हीं पाहण्यासारखीं असून कोटेश्वरी अंबाजीचे डोंगरांत सरस्वतीचा उगम आहे व पट्टणाजवळ शांडिल्यांचा आश्रम आहे. ते आश्रम व सिद्धपूरची रुद्रमाळ हींही चमत्कारिक व प्रेक्षणीय आहेत

४३. अधिकमास यास धोंडा, मलमास व पुरुषोत्तममास असें म्हणतात. ते बारा वर्षांत चैत्र, ज्येष्ठ व श्रावण हे अधिक होतात. अठरा वर्षांनीं आषाढ अधिक येतो. चोवीस वर्षांनीं भाद्रपद अधिक येतो. १४१ वर्षांनीं अधिक आश्विनमास येतो. व ७०० वर्षांनीं अधिक कार्तिकमास येतो. आश्विन व कार्त्तिक हे दोन महिने अधिक आले तरी त्यांस अधिक म्हणत नसून भाद्रपदापर्यंत मात्र अधिक म्हणतात. ज्या वर्षीं अधिक आश्विन पडतो त्या वर्षीं पौषक्षय होतो. व त्या वेळीं दोनप्रहर पर्यंत मार्गशीर्ष व दोन प्रहरांनंतर पौष होतो. आणि याप्रमाणें त्या दोन्ही महिन्यांचीं धर्म कर्मेंही एकाच महिन्यांत करितात. या नोंद मासाचें नांव सव सर्प आहे. कार्त्तिकापुढील चार महिने अधिक होत नाहींत. व आश्विनाचे पूर्वीं क्षय मास होत नाहींत.

४४. शिवाजीस छत्र, सिंहासन व मुद्रा हीं राज्याभिषेकसमयीं प्राप्त झालीं. शके १५९६ ज्येष्ठ शुद्ध १३ आनंदनाम संवत्सर या दिवसापासून भोंसले यांचा जो राज्याधिकार चालला तो सातारचे शाहाजी छत्रपती वारले तों म्हणजे २१५ वर्षेंपर्यंत चालला होता. त्या मुदतींत १७७१ पर्यंत भोंसले राजे हे आपले पत्रांत फारशी म्हणून कांहीं एक लिहीत नसून **स्वस्तिश्री** म्हणून लिहीत व त्यांजवर राज्याभिषेक शक घालीत.

४५. पेशवे सरकारचे हुजुरातींत धनगर मंडळी फार असे त्यांस १२ राव म्हणत. त्यांचे गांव तर्फ नीरथडीस आहेत त्याचा तपशील:—

| रावांचीं नांवें. | गांवांचीं नांवें. |
|---|---|
| १ अढळराव.... ... ... .... .. | मौजे अहिरे. |
| २ अभंगराव... ... .... .. ... | मौजे दरूली. |
| ३ झुंजारराव. ... ... ... | मौजे वाघोशी. |
| ४ परमाळराव. .... ... ... | मौजे अंदोरी. |
| ५ प्रचंडराव. .... .... ... | मौजे पिंपरे बुद्रुक. |
| ६ रणवीराव. ... ... .... | मौजे कोपरडें. |
| ७ भालेराव. .... ... ... | मौजे लेहबुद्रुक. |
| ८ गंभीरराव. .... .... .... .. | मौजे सुलड. |

९ सर्जेराव. ... .... .... ... मौजे पाडळी.
१० शृंगारराव. .... ... .... मौजे बोरी.
११ अंकुशराव .... ... .... मौजे पाडेगाव.
१२ विश्वासराव ... ... ... .. .... मौजे गोरवें.

यांशिवाय नगर प्रांतीचे वणजारी लोकही होते; ते अद्यापि ग्वाल्हेरीस जनरल बापु आल्हाड वगैरे सरदार आहेत. मराठे व धनगर हे गेलेलें मनुष्य जाळतात व त्याजवर छत्र्या ( समाधी ) बांधतात. सदरील सर्व गांवीं छत्र्या पाहण्यांत येतात. त्याचप्रमाणें वानवडीस महादजी शिंद्यांची व खडकीस मल्हारराव होळकरांची छत्री आहे.

४६. कुलाब्याचे राजे आंग्रे यांचा शिक्का खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. यांचे मूळ पुरुष कान्होजी तुळाजी हे असून पुढें मानाजी जयसिंग आणि नंतर राघोजी हे झाले.

**राजाशाहुनृपतिचरणीं सादर, राघवसुत मानाजी व जारत-**
**माहसरखेल निरंतर.**

४७. देवराव हिंगणे हे महादेवभट हिंगणे नासिककर यांचे पुत्र होत. हे मोठे मसलती असून दिल्लीस वकिलीवर होते. यांची दौलत व मिजास फार होती. तीन लाख रुपयांच्या तर त्यांचे पायांत खडावा असत व दररोज तीनशें रुपयांचा खर्च एकाचे खिचडीकडे होत असे असें ह्मणतात! त्यांचे पुत्र दामोदर, त्यांचे गणेश, त्यांचे कृष्णराव आणि त्यांचे दत्तक पुत्र दामोदरराव ऊर्फ नानासाहेब, हे हल्लीं आहेत, यांस सात हजारांचे गांव इनाम आहेत.

४८. यजुर्वेदाचें शतपथ ब्राह्मण याचे पाहिले काण्डांत सहाने अध्यायीं जळप्रळय झाला त्यांत ईश्वररूपेनें मनु वांचला व त्यास देवानें नावेंत बसवून संरक्षण केलें असें लिहिलें आहे. तें असें कीं,—

**मनवे ह वै प्रातः अवनेग्यमुदकमाजहुर्यथेदं पाणिभ्यामवने जना य। हरन्त्येवं तस्याऽवने निजानस्य मत्स्यः पाणी आपेदे, स हाऽस्मै वाचमुवाद ॥१॥ बिभृहि मा पारयिष्यामि त्वेति कस्मान्मा पारयिष्यसीत्यौघ इमाःसर्वाःप्रजा निर्वोढा ततस्त्वा**

पारयितास्मीति कथं ते भृतिरिति ॥२॥

पुढें ही कथा बरीच लांब आहे. तिची प्रत भागवतांत उतरली असून याच कथेचे आधारानें मनुमच्छसंवादरूप मच्छपुराण आहे. शिवाय हीच कथा नोहाचा प्रळय व नुहाचें (नोहाचें) तुफान म्हणून बायबलांत व कुराणांतही असून त्यांतील नौकेचें रक्षण वगैरेंचा तपशीलही सारखाच आहे! तेव्हां या कथेचें मूळ कोठें म्हणावें? वेदांत किंवा बायबलां किंवा कुराणांत किंवा पुराणांत? जगांतील बहुमतानें पाहिलें असतां वेदास प्राचीनत्व आहे, त्याअर्थीं वेद हेच या कथेचे व शोधाचे प्रतिपादक असून बायबलवाले आणि कुराणवाले यांणीं तो कथाभाग यथाप्रत आपले पुस्तकांत उतरून घेतला आहे हें सिद्ध होतें.

४९. अठरा पुराणें—

१ मार्कंडेय, २ मत्स्य, ३ अग्नि, ४ भागवत [ देवी ], ५ विष्णू, ६ शिव, ७ लिंग, ८ वामन, ९ कूर्म, १० बहन्नारदीय, ११ आदित्य, १२ गरुड, १३ स्कंद, १४ भविष्य, १५ ब्रम्हांड, १६ ब्रम्ह, १७ वाराह आणि १८ पद्म,

या शिवाय आणखी पुराणें आढळतात तीं—

१ गणेश, २ कालिका, ३ ब्रम्हवैवर्त्त, ४ कल्की; ५ नृसिंह, ६ आत्म, ७ मुद्गल व ८ श्रीमद्भागवत वगैरे.

यांत सात्विक, राजस व तामस असे तीन वर्ग असून त्याविषयीं वाद आहे.*

५०. मुख्य स्मृती वीस आहेत असें म्हणतात त्या—

१ मनु, २ याज्ञवल्क्य, ३ पराशर, ४ व्यास, विष्णु ६ अत्रि, ७ वसिष्ठ, ८ गौतम, ९ दक्ष, १० कात्यायन, ११ उशना, १२ हारीत, १३ शंख, १४ लिखित, १५ बृहस्पति, १६ आपस्तंब, १७ यम, १८ शातातप, १९ संवर्त्त आणि २० अंगिरा.

---

* याविषयीं विशेष खुलासा व विवेचन पाहणें असल्यास आमच्या स्वाध्याय पुस्तकांत ( पृष्ठ ६६ ) पहावें.

याशिवाय पुष्कळ स्मृती आढळतात, त्यांस उपस्मृती ह्मणतात. त्या—१देवल,२ कोकिल, ३ बुध, ४ बौधायन, ५ आश्वलायन, ६ जाबाल,७ लोगाक्षी इ०. यांत लघु, वृद्ध, सात्विक, राजस, तामस, असे भेद आहेत. *

५१. सूत्रें—आश्वलायन, आपस्तंब, हिरण्यकेशी, कात्यायन, लाट्यायन, गोभिल, शौनक, बौधायन इत्यादि प्रसिद्ध आहेत.

५२. शिवाय संहिता ह्मणून पुराणासारख्या आहेत:—सनत्कुमार, प्रऱ्हाद, सूत, ईशान, वायवी इ०

५३. ज्योतिषग्रंथ एकंदर चार लक्ष आहेत; त्यांत सिद्धांत, गणित, होरा, स्वरोदय, रमल वगैरे भेद आहेत. पैकीं सिद्धांत १८ आहेत त्यांचीं नांवें.—

१ ब्रह्म, २आर्य, ३वसिष्ठ, ४ अत्रि, ५ मनु, ६ पौलस्त्य, ७ लोमेश, ८ मरीची, ९ अंगिरा, १० व्यास, ११ नारद, १२ शौनक, १३ भृगु, १४ यवन, १५ पवन, १६ गर्ग, १७ कश्यप आणि १८ पराशर.

या सिद्धांताखेरीज मुहूर्त, जातकाभरण, केशवी इत्यादि फलग्रंथ आहेत. स्वरोदय प्रकरणीं पवनविजय, समरसार वगैरे ग्रंथ आहेत. भास्कराचार्यांचा सिद्धांतशिरोमणी हा ग्रंथ केवळ गणितप्रकरणीं आहे.

५४. खेड तालुक्यांतील निंबगांवचे राहणार यशवंतराव यांचे चिरंजीव गंगाधर ऊर्फ गंगोबा हे होळकराचे दिवाण झाले. व त्यांनीं पेशवाई अंमलांत मोठी दौलत कमावली. त्यांचें उपनांव चंद्रचूड होतें. त्यांचे पुत्र यशवंतराव, त्यांचे पुत्र महादेवराव, त्यांचे दत्तक गंगाधरराव व त्यांचे दत्तक बळवंतराव गंगाधर, हे हल्लीं असून यांस मोंगलाईंत व इंग्रजींत सरंजाम चालत आहे. नाशिकच्या सुंदरनारायणाचें देऊळ वरील गंगाबांनीं बांधलें.

---

* याविषयीं विशेष खुलासा व विवेचन पाहणें असल्यास आमच्या **स्वाध्याय** पुस्तकांत ( पृष्ठ ६६ ) पहावें.

९५. लिंगाईत हे शैवमतानुयायी असून त्यांजमध्यें शीलवंत, दीक्षावंत व पंचम अशा जाती आहेत. त्यांचे ग्रंथ परमेश्वरतंत्र शंकरसंहिता, शिवरहस्य परमरहस्य, अनुभवसूत्र, वीरागम शैवागम, आचारकौस्तुभ, वीरशैव चिंतामणि, पाशुपतागम, बसव पुराण वगैरे आहेत. हे लिंग धारण करतात, भस्म लावितात, कोणताही विटाळ धरीत नाहींत, मृतक्रिया करीत नाहींत, कोणाच्या हातचें खात नाहींत, आणि त्यांचे अन्नावर कोणाचीही दृष्टि पडली तरी त्यांचें अन्न विटाळतें! परंतु कोंकण प्रांतीं जे लिंगाईत गुरव आहेत ते शिवाची पूजा करितात आणि ब्राह्मणांकडे जेवतात. ते शिंग व वाजंत्रें वाजविण्याचा धंदा करतात. शिवाचे देवळांत यांची, गुरवांची, गोसाव्यांची किंवा जंगम, नाथ किंवा जोगी यांची पूजा असते.

९६. पावसाळ्यामध्यें रानांत आपले आपण भाज्या उगवतात, त्यांतील चाई, करटुलीं, गोमेटी, खारीभाजी, पाथरी वगैरे प्रसिद्ध आहेत. यांशिवाय एक श्लोक आढळला आहे त्यांत अशा भाज्यांचीं वीस नावें सांपडतात, तीं अशीं—

**काकी, आकुल, चोच, फांद, मुरवा, दिंडा, कुरा, पेंढरें ॥**
**भारंगे, कवलू, डहाण, कुरडू, चिंचोरठी, भोंकरें ॥**
**तेरें, नावळ, टाकळा, फटकुरी, औदांबरें, पाखरी ॥**
**शाखा या वनिंच्या करूनि भुपती भोक्ता म्हणावा हरी ॥ १ ॥**

यांशिवाय आभई, कोळाई, चाई, शेवगा, गोडकुचली वगैरे अनेक वनभाज्या आहेत.

९७. धर्मशास्त्रांत त्रयोदश पुत्र लिहिले आहेत ते—

१ औरस, २ दत्तक, ३ दौहित्र, ४ क्षेत्रज, ५ गूढज, ६ कानीन ७ पौनर्भव, ८ क्रीत, ९ कृत्रिम, १० स्वयंदत्त, ११ सहोढज, १२ अपविद्ध, आणि १३ द्व्यामुष्यायन. हे तेराही प्रकारचे पुत्र पूर्वयुगीं चालत होते. परंतु हल्लीं औरस व दत्तक हे दोन मात्र चालू असून बाकीचे अक्रा रद्द केले आहेत.

९८. मनूनें असें लिहिलें आहे कीं, क्षत्रियांनीं मुख्य आठ राष्ट्रें

बसविली, परंतु पुढें क्रियालोपानें त्यांस ब्राम्हणांचें गुरुत्व सुटल्यामुळें तीं भ्रष्ट झाली:—

**पौंड्रकाः श्चौड्रद्रविडाः कांबोजा यवनाः शकाः॥पारदाःपह्लवाश्चीनाः किराता दरदाः खशाः ॥ ४४ ॥ शनकैस्तु क्रियालोपादिमाः क्षत्रियजातयः॥ वृषलत्वं गता लोके ब्राह्मणानामदर्शनात्॥४३॥म०अ०१०**

६९ ब्राम्हणांचीं षट् कर्मे मनूनें लिहिलीं आहेत तीं:-

**अध्यापनमध्ययनं यजनं याजनं तथा ॥**

**दानं प्रतिग्रहश्चैव षट्कर्माण्यग्रजन्मनः॥ ७५ ॥**

ह्मणजे, दुसऱ्यास पढविणें, आपण पढणें, स्वतः यज्ञ करणें, दुसऱ्याचे घरीं यज्ञ करणें, दान करणें आणि दान घेणें.

६०. पूर्वं युगीं मुलींचीं लग्नें आठ प्रकारांनीं करण्याची चाल होती ह्याचें वर्णन मनूनें असें केलें आहे:-

**ब्राह्मोदैवस्तथैवार्षः प्राजापत्यस्तथाऽऽसुरः॥**

**गांधर्वो राक्षसश्चैव पैशाचश्चाऽष्टमोऽधमः ॥२१॥**—अ०३.

६१. स्त्रियांना पुरुषांनीं मान द्यावा; कारण, तेणेंकरून ईश्वराची प्रसन्नता राहते. याविषयीं मनूचें मत पुढें लिहिलें आहे. ह्यावरून पूर्वीचा समज व सद्विचार कसा होता हें ध्यानांत येतें: —

**यत्र नार्यस्तु पूज्यंते रमंते तत्र देवताः ॥**

**यत्रैतास्तु न पूज्यंते सर्वास्तत्राऽफलाः क्रियाः॥५६॥ .**

**संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैवच ॥**

**यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवं ॥६०॥** —अ० ३

परंतु ह्याविरुद्ध लोक स्त्रियांदिकांस छळून कल्याण इच्छितात, तें कसें होईल!!!

६२. वेदाची महती मनूनें वर्णन केली आहे ती अशी कीं, चारवर्ण, चार आश्रम, स्वर्ग, नरक, भूत भविष्य आणि वर्त्तमान हीं सर्व वेदानें सांगितलीं आहेत; ह्याजपासून तीं शिकावीं:-

**चातुर्वर्ण्यं त्रयो लोकाश्चत्वारश्चाऽऽश्रमाः पृथक् ॥**

**भूतं भव्यं भविष्यं च सर्ववेदात्प्रसिध्यति॥९७॥**—अ०१२.

१३. अनेक जुने कागद, पत्रें व सनदा वगैरेंवर ज्या राजमुद्रा पाहण्यांत आल्या त्या खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत. ह्या अस्सल मुद्रा सोन्या रुप्याच्या असून त्या सातारच्या वाड्यांत होत्या, त्या सातारचे कलेक्टर मि० रोझ् साहेब यांनीं घेऊन सर्व विलायतेस रवाना केल्या.

(१). राजा शिवाजी.—

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥
शहासूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते॥१॥

(२). राजाराम.—

धर्मप्रद्योतिताशेष वर्णा दाशरथेरिव ॥
राजारामस्य मुद्रैषा विश्ववन्द्या विराजते.॥

(३). वेडा शिवाजी.—

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥
रामसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥

(४). राजा शाहु.—

वर्धिष्णुर्विक्रमे विष्णोः सा मूर्त्तिरिव वामनी ॥
शंभुसूनोरसौ मुद्रा शिवराजस्य राजते ॥

(५). शाहूचा दत्तक रामराजा.—

गौरीशंभुवरप्राप्त–प्राज्य साम्राज्य संपदा ॥
शिवसूनोरियं मुद्रा रामराजस्य राजते ॥

(६). रामराजाचा पुत्र दुसरा शाहु.—

श्रीशंभोः पादकमल–सेवाऽभिलष्टदयावहा ॥
मुद्रैषा शाहुराजस्य रामसूनोर्विराजते ॥

(७). दुसरे शाहूचा पुत्र प्रतापसिंह.—

गौरीनाथवरप्राप्त–शाहुराजात्मजन्मना ॥
मुद्रा प्रतापसिंहस्य भद्रा सर्वत्र राजते॥

(८). शिवाजी राजाचे शामराजपंत रांझेकर प्रधान होते यांचा शिक्का.—

श्रीशिवनरपति हर्षनिधान, शामराज मतिमत्प्रधान ॥

(९). पिंगळे पेशवे यांचा शिक्का.—

श्रीराजाराम नरपति हर्षनिधान ॥
मोरेश्वरसुतनीलकंठ मुख्यप्रधान ॥

(१०). भट्ट उपनामक पेशवे.—

श्री राजारामनरपति हर्षनिधान
माधवराव बल्लाळ मुख्य प्रधान ॥

(११). किन्हईकर प्रतिनिधी—

श्री आई आदिपुरुष श्रीशाहु छत्रपति स्वामी
कृपानिधिः तस्य परशुराम त्र्यंबक प्रतिनिधिः॥

(१२). परशराम त्र्यंबक यांच्या पूर्वींचे प्रतिनिधींची मुद्रा.

श्री लक्ष्मी नृहरेः प्रीते मुद्रा नीराजिजन्मनः
राजाराम प्रतिनिधेः प्रऱ्हादस्य विराजते ॥

(१३). हणमंते प्रतिनिधी यांची मुद्रा.—

राजाराम प्रतिनिधे—र्लक्ष्मीकांत प्रसादतः ॥
तिमाजी रघुनाथस्य मुद्रेयं विराजते ॥

(१४). भोरच्या सचीवांचे मुद्रा.—

श्रीरामभजनाऽऽसक्त—नारायण जनेरियम् ॥
शंकरस्य शुभा मुद्रा पूर्णेन्दुरिव राजते ॥

(१५). सेनापतींची मुद्रा.—

राजारामचरणीं दृढ भाव, सेनापति धनाजी जाधवराव॥

या शिक्क्यांतील श्लोकांची रुचि ज्यांस संस्कृत ज्ञान असेल त्यांस विशेष वाटेल.

१४. प्रतिनिधींचे पदाची माहिती अशी आहे कीं,—

शिवाजी महाराज यांजपाशीं नीराजी पंत ह्मणून न्यायाधीश होते. त्यांचे पुत्र प्रऱ्हाद निराजी हे गोवळकोंड्याचे बादशाहाकडे वकील होते. त्यांस प्रतिनिधी हें पद राजाराम छत्रपति, ज्यांची समाधि सिंहगडा, वर आहे, त्यांनीं इ॰ स॰ १६९०सालीं दिलें.त्यांचे पुढें नारो प्रऱ्हाद यास पद मिळालें; तो चंदीचे हल्लयांत गेला. त्यानंतर इ॰ स॰ १६९८ त

तिमाजी रघुनाथ हणमंते यांस प्रतिनिधि केलें. परंतु पुढें त्यांस ताराबा-ईनीं काढून किन्हईकर परशुराम त्रिंबक यांस इ० सन १७०० मध्यें प्रतिनिधि केलें. त्यानंतर शाहु महाराज आल्यावर त्यांणीं १७०८ सालीं त्यास कैद करून नारो प्रल्हाद याचा भाऊ गदाधर प्रल्हाद यास प्रतिनिधि केलें. पुढें इ० स० १७१४ त परशुरामपंत यांस नेमलें. पुढें ते वारले तेव्हां १७२० त त्यांचे पुत्र श्रीनिवास परशुराम यांस प्रतिनिधि केलें. त्यापुढें जगजीवन प्रतिनिधि होते, त्यांस शाहु महाराज गेल्यावर पेशव्यांनीं कैद केलें. पुढें १८५१ सालीं श्रीनिवास गंगाधर ऊर्फ भवानराव यांस प्रतिनिधि नेमिलें. ते १७६३ सालीं बदलून नारो-शंकर राजे बहादर यांस प्रतिनिधि केलें; त्यानंतर पुनः भवानराव यांस १७६८ सालीं नेमलें. त्यांचे पुत्र * परशुराम व त्यांचे दत्तक श्रीनिवास परशुराम; हे हल्लीं आहेत. यांची सर्व दौलत बाजीरावाचे कारकीर्दींतच जप्त होऊन परशरामपंत यांस कैद करून पुण्यास ठेविलें होतें. कारण, त्यांणीं वाई प्रांतांत रामोशी लोकांकडून दंगा करवून चोऱ्या, दरवडे वगैरे घातले त्यावरून बापू गोखले यांस त्यांजवर पाठविलें व त्यांणीं त्यांस कैद केलें. परंतु पुढें १८१२ त त्यांस लाख रुपयांचा सरंजाम देऊन परत पाठविलें. यांजवळ रमातेलीण नांवाची स्त्री कारभारीण होती.

६५. दक्षिणेच मुसलमानी राज्याची राजधानी विजापूर दाखल जफर येथें होती. नंतर खुजस्तेबुन याद औरंगाबाद येथें मुख्य सुभा झाला. त्यानंतर फरखुन्दाबुनियाद हैदराबाद येथें दक्षिणचे सुभे निजाम हे राहूं लागले.

६६. पुणें शहर हल्लीं जेथें आहे तेथें कसबे लोहगांव म्हणजे जेथें तुकाराम बोवांची सासुरवाड होती त्या कसब्याच्या तीन वाड्या होत्या; त्या-एक कासारवाडी, दुसरी पुणेंवाडी, आणि तिसरी पाडळी. त्यां पैकीं कासारवाडीवर पेठ कायम झाली, पुणें वाडीस मुंजेरी म्हणतात आणि पाडळींत माळी राहात होते त्यास हल्लीं माळीच म्हणतात. पुणें वाडीचे पाटील शिंदे व कुळकर्णी राजऋषी होते. पुढें पुणें शहर वाढलें

* परशुरामपंत यांचा जन्म, त्यांचा बाप गेला त्याच दिवशीं झाला!

तेव्हां यांजकडे कांहीं पेठा राहिल्या व बाकी पेठांचे इतर कुळकर्णी झाले. पुण्याचे आग्नेयेस मुंजेरीची जमीन आहे व पूर्वेस गाळीची जमीन आहे. परंतु तेथें ह्यांच्यांची पाटीलकी चालत नसून गाळी, मेहेत्रेहेच अधिकार चालवितात.

पुण्याच्या पेंठांचे कुळकर्णी.

| पेंठेचें नांव. | कुळकर्ण्याचें नांव व जात. |
|---|---|
| १ सदाशिव पेंठ. ... .... ... | ठोसर, कोंकणस्थ. |
| २ वेताळपेंठ ... .... | शिंग्रे, देशस्थ. |
| ३ शुक्रवार पेंठ. .... ... | तुटकणे, ,, |
| ४ आदितवार पेंठ. .... ... | मेणजोगी, ,, |
| ५ मंगळवार पेंठ किंवा न्याहालपेंठ .... | माळो, ,, |
| ६ बुधवार व शनिवार पेंठ .. .... | राजऋषी, ,, |
| ७ रास्त्यांची पेंठ .... .... | गोकाशी, ,, |

बाकी राहिलेल्या पेंठांत कुळकर्णी नाहींत. पूर्वीं फरोक्त व गहाण खतांचे हेच रजिस्ट्रार ( नोंदणीदार) असून वसाहतींत जमिनी वगैरे हेच देत. ह्याच पेंठांस मुसलमानांनीं जीं नांवें दिलीं आहेत तीं खालीं लिहिल्याप्रमाणें:—

| हिंदूंचीं नांवें. | मुसलमानांचीं नांवें. |
|---|---|
| १ बुधवार पेंठ. ... ... .. | मुहियाबाद. |
| २ आदितवार पेंठ... .... .... | मलकापूर. |
| ३ शनिवार पेंठ .... .... ... | मुनुजाबाद. |
| ४ सोमवार पेंठ .... .... .... ... | शाहापूर. |
| ५ मंगळवार पेंठ ... .. .... | आस्तापूर. |

पेंठ कसबा यास ' मोहतर्फा ' ह्मणतात. याचे शेट्ये होनप ह्मणून मोळक होते. देशमुख, शितोळे, होनप, देशपांडे, चौधरी, शेट्ये, महाजन वगैरेंचे पूर्वीं दुकानांवर हक्क पोहोंचत होते. पुण्यास एकंदर आठरा पेंठा आहेत त्या येणें प्रमाणें—१ कसबा व सातवारांच्या सात, ९ वी शिवापुरी, १० भवानी पेंठ, ११ घोरपड्यांची पेंठ, १२ सदाशिवपेंठ, १३ नारायण

पेंठ, १४ गणेश पेंठ, १५ हणमंत पेंठ, १६ वेताळ पेंठ, १७ गंज आणि १८ रास्ते यांची पेंठ. ज्यांणीं ज्यांणीं पेंठा वसविल्या त्यांणीं त्यांणीं आपलेकडे पुष्कळ जागा ठेविल्या: दीक्षितांची जागा रविवारांत, खासगीवाले लिमये यांच्या जागा शुक्रवारांत, रास्ते यांचे पेंठेंत रास्ते यांच्या जागा, वानवडीस शिंद्याचे लष्करची जागा, लडकीचे पुलावर होळकराची जागा, लकडी पुलावर गायकवाडाचे छावणीची जागा, आणि घोरपडे यांचे पेंठेंत घोरपड्यांची जागा ह्याप्रमाणें होत्या.

६७. भीष्मांनीं शांतिपर्वांत व अनुशासनपर्वांत जे चार धर्म सांगितले आहेत ते—दानधर्म, राजधर्म, मोक्षधर्म व आपद्धर्म हे असून हे चारीही फार चांगले आहेत.

६८. लढाईचे पूर्वीं शेवटचा निरोप घेऊन श्रीकृष्ण दुर्योधनाकडे गेले आणि पांडवांकरितां पांच गांव मागून ह्मणाले कीं, इतकें दिलें तरी पांडवांची समजूत पडेल! ते पांच गांव हे होते:—

इन्द्रप्रस्थं यमप्रस्थं जयन्तं वारुणावतम् ॥
देहि मे चतुरग्रामान् पंचमं हस्तनापुरम् ।

ह्या पांच गांवांचीं हल्लींचीं नांवें—दिल्ली, कलकत्ता, जयपूर, प्रयाग आणि पाणिपत हींच होत असें ह्मणतात. परंतु दुर्योधनानें सांगितलें कीं, सुईचे अग्रावर बसेल इतकी मृत्तिकाही येथें मिळावयाची नाहीं! भाऊबंदकीच्या कज्जे कफावर्तांचा हाच उगम दिसतो, व प्रस्तुत तर तो सर्वत्र अनुभवास आहे!

६९. मनूचे धर्मशास्त्रावर मेधातिथि, गोविंदार्णव, कुल्लूकभट्ट, नंदराजकृत व्याख्या व मन्वर्थमुक्तावली इत्यादि टीका आहेत. याज्ञवल्क्य योगेश्वर यांजवर विज्ञानेश्वरानें मिताक्षरा ह्मणून टीका केली आहे. आणि याज्ञवल्क्यावरच पराशरानंतर माधवांनीं टीका केली आहे तिचें नांव पराशरमाधवी असें आहे. संस्कृत ग्रंथकारांची अशी रीति होती कीं, ते मूळ ग्रंथावर ज्या व्याख्या किंवा अर्थ करीत त्यास त्यांचे रीतीप्रमाणें अनेक नांवें पडत. जों जों संस्कृत ज्ञान बुडूं लागलें तों तों टीकांची जरूर फार पडत चालली. याजमुळें टीका ग्रंथही फार झाले. त्यांचीं नांवें:— भाष्यें

वृत्ती, कारिका, चूर्णिका, दीपिका, व्याख्या, नौका अशीं आहेत. म्हणजे, वेदावर ज्या व्याख्या आहेत त्या ग्रंथास भाष्य ह्मणतात, आणि पाणिनीच्या व्याकरणसूत्रांवर पतंजलीनें ज्या व्याख्या केल्या त्या ग्रंथास महाभाष्य ह्मणतात. कारिका म्हणजे मूळ सूत्रें मोडून त्याचे श्लोक करितात त्या; चूर्णिका ह्मणजे श्लोक मोडून त्याचा बखरीसारखा गद्यरूप मजकूर लिहितात त्या; आणि मूळचा ग्रंथ सिंधु या नांवाखालीं असला तर त्याचे व्याख्येस नौका ह्मणतात. निर्णयसिंध्वादि ग्रंथांच्या टीकांस नौका ही अन्वर्थक संज्ञा आहे. म्हणजे त्या ग्रंथरूप समुद्राचा पार लावणारी ही टीकारूप नौका होय!

७०. हिंदु लोकांनीं स्वयंपाकावर जे ग्रंथ केले आहेत त्यांस नलपाक, भीमपाक, भोजनकुतूहल, सूपशास्त्र वगैरे नांवें आहेत; गायनावर जयदेव, नारद, तुंबर यांनीं ग्रंथ केले असून नृत्यावर भरतशास्त्र आहे. कामशास्त्रावर रतिरहस्य, रतिमंजरी, कोकशास्त्र वगैरे पंडितकृत ग्रंथ झाले आहेत. आणि मोठमोठीं प्रकरणें, शिल्प, वैद्यक, गायन, युद्ध वगैरेंस तर त्यांनीं उपवेदच ह्मटला आहे; अर्थ व शब्दज्ञानार्थ कोशही अनेक आहेत; सुभाषित, हितोपदेश, पंचतंत्र इत्यादि बोधपर ग्रंथ, आणि कादंबऱ्या, काव्यें, नाटकें, भाण वगैरे करमणुकेचे ग्रंथ आहेत. हिंदु ग्रंथकार कांहीं शास्त्रांचा शोध करतां करतां फार पुढें गेले; परंतु पुढें वाईट काळ येऊन त्यांत वाईट ग्रंथ निर्माण झाले. त्याचे उदाहरणार्थ, वेदांतांतून तंत्रें, यामल वगैरे निघाले; वैद्यकांतून कर्मविपाक निघाला; गणितविद्येंतून मुहूर्त व फलग्रंथ निघाले; घोड्यांचे गुणवर्णन वगैरे कलांतून शालिहोत्र वगैरे निघालें, धर्मशास्त्रांतून पुराणें निघालीं, आणि स्वाध्यायांतून 'जटा माला शिखा रेखा' दिविकृती निघाल्या. आतांही सर्व बंडें भ्रांतीनें किंवा निरुद्योगीपणानें अथवा पोटाकरितां निघालीं असावीं असें वाटतें.

७१. पूर्वीं मनुष्यास बोध करण्याच्या हिंदुलोकांच्या रीती अनेक होत्या: ते प्रश्नोत्तरानें बोध करीत, कल्पित गोष्टी सांगून बोध करीत, उदाहरणानें बोध करीत, शंका घेऊन समाधानें लिहीत अथवा आज्ञा

लिहून बोध करीत. ह्याविषयीं शांतिपर्व, गीता वगैरे भारतांत आहेत, हेंच पहिल्या रीतीचें उदाहरण आहे. पंचतंत्र हें दुसऱ्या रीतीचें उदाहरण होय; इतिहास हें तिसऱ्या रीतीचें उदाहण आहे; षड्दर्शनें हें चौथ्या रीतीचें उदाहरण आहे व स्मृती हें पांचव्या रीतीचें उदाहरण होय.

७२. माध्यंदिनी शाखेचीं यजुर्वेद संहितेवर सायन, कर्क, देवयाज्ञिक, उव्वट व महीधर हीं पांच भाष्यें आहेत; आणि ऋग्वेदावर, तैत्तिरीय संहितेवर आणि सामवेदावर सायनाचार्यांचें मात्र भाष्य आहे. परंतु अथर्व वेदावर भाष्य झालेलें आढळत नाहीं.

७३. ऋषी नष्ट झाल्यावर जे ग्रंथकार झाले त्यांनीं नवीन कल्पना किंवा शोध काढण्याचा केवळ राजीनामाच दिला!व ह्मणून त्यास केवळ 'पुरुष' ह्मणून त्यांचे ग्रंथांस आर्ष ह्मणजे ऋषिकृत ग्रंथ न म्हणतां पौरुष ग्रंथ किंवा साधारणत: निबंध म्हणतात. या पौरुप पद्धतीचे ग्रंथ वीरमित्रोदय, दलपत इत्यादि निबंध आहेत. या पौरुष ग्रंथांची ही मेहनत पाहिली तर पराकाष्ठेची आहे.तरी ते ग्रंथ केवळ पूर्वीचे ग्रंथ शोधून त्यांचें सार काढलें असून त्यांत नवीन कांहींच नाहीं. फक्त ब्राम्हणांचे उपजीविकेच्या साधनांची वृद्धि करण्याकरितां व लोकांस ज्यास्त बंधनें होण्याकरितां या ग्रंथकर्तृ-वशक्तीचा उपयोग झाला. आणि हा हेतु पुराणांनीं व तंत्रांनीं तर नीटपणीं तडीस नेला असें ह्मणावें लागतें. ग्रंथकार विद्वान् होते हें निर्विवाद आहे; परंतु त्यांच्या बुद्धीचा कल फिरून त्यांत तरी मतिमांद्य आलें हें कालमाहात्म्य समजावें इतकेंच. परंतु आतां हीं बंधनें सोडविण्यास महाप्रयास आहेत. ह्या पौरुष ग्रंथांचा ( निबंधांचा ) पर्वतप्राय राशि व त्यांचा खुलासा आमच्या 'स्वाध्याय' पुस्तकांत परिशिष्ट २, पृष्ठ १४६ यांत पहावा म्हणजे समजेल.

७४. सप्त ऋषी ह्मणून जे ह्मणतात त्यांचीं व त्यांच्या स्त्रियांचीं नांवें.—

| ऋषी. | | | | स्त्रिया. |
|---|---|---|---|---|
| १ कश्यप.... | .... | .... | .... | दिती वगैरे १३. |
| २ भरद्वाज ... | .... | .... | .... | वीरा. |

३ अत्रि.... .... .... अनसूया.
४ जगदाग्नि .. .... .... रेणुका.
५ विश्वामित्र.... .... ... (आढळत नाहीं.)
६ गौतम.... .... .... .... अहल्या.
७ वसिष्ठ... .... ... .... अरुंधती.

७५. या देशांत सर्व धान्यें पिकतात परंतु ग्रंथांतरीं अठरा धान्यें ह्मटलीं आहेत त्यांची यादी.—

| संस्कृत नांवें. | प्राकृत नांवें. | संस्कृत नांवें. | प्राकृत नांवें. |
|---|---|---|---|
| १ गोधूम . . | गहूं. | १० प्रियंगव... .... | राळे. |
| २ व्रीहि, शालि.... | तांदूळ. | ११ श्यामाक........ | सांवे. |
| ३ तुवरी........ | तूर. | १२ यवनाल........ | जोंधळे. |
| ४ मुद्ग .......... | मूग. | १३ लंक.......... | लाख. |
| ५ चणक....... | हरभरे | १४ हरीक.... .... | कोद्रे. |
| ६ तिल... ...... | तीळ. | १५ चवली... | चवळया. |
| ७ यव..... .... .... | जव. | १६ नीवार.... | भगर वगैरे. |
| ८ माष .. ... ... | उडीद. | १७ कुलित्थ .. | कुळीथ |
| ९ मसुरा.... .. | मसुरा. | १८ वाटाणे (?) ... | वाटाणे |

शिवाय नाचणी, मका, बाजरी, राजगिरा वगैरे धान्यें हीं इकडे सर्व साधारण आहेत, यांपैकीं जोंधळे, बाजरी, मका हीं राक्षसी धान्यें ह्मणतात; कारण तीं आर्यावर्तांतील नसून हेमाडपंतांनीं लंकेकडून आणिलीं, आणि दक्षिण दिशा ही सर्वदा राक्षस भूमी ह्मटली आहे.

७६. नरगुंदचा किल्ला मूळ इ० सन १६७३ त शिवाजीनें बांधला. पुढें आपाजी सुरो हेब्बळीकर जाहगिरदार यांजपाशीं रामराव दादाजी ह्मणून एक कोंकणचा ब्राम्हण चाकरीस राहिला असून जाहागिरदार यांची पागा कोल्हापूरकर राजांजवळ चाकरीस होती, त्या पागेवर त्यास ठेविलें होतें. त्या राजाची चौथाई वसूल करण्याकरितां जाहगिरदार फिरत त्यांजबरोबर रामरावही फिरे. याप्रमाणें १७०२ पर्यंत चाललें. पुढें रामराव यांनीं १७०६ सालीं मुसलमानांपासून नरगुंद किल्ला घेत-

ला. त्यामुळें कोल्हापूरकर राजानें चौथाई अंमल बसविण्याकरितां बारा पथकांची सरदारी व त्या किल्ल्याची सनद हीं रामरावांस दिलीं. नंतर रामराव यांनीं नरगुंदांत व्यंकटेशाचें देऊळ बांधिलें. पुढें रामरावांचा पुतण्या दादाजी यास कोल्हापूरचे राजांनीं सचीवाचें पद दिलें. त्या दादाजींचा मुलगा भास्करराव, त्यांचा व्यंकटराव, त्यांचा दादाजी आणि त्यांचा भास्करराव. भास्करराव यांस बंड केल्यामुळें सन १८५७ सालीं फांशीं दिलें व नरगुंदची जाहगीर खालसा झाली. ह्याप्रमाणें नरगुंद संस्थानाचा आद्यंत आहे.

७७. होळकर यांचा मूळपुरुष मल्हारराव, त्यांचे पुत्र खंडेराव, त्यांची विधवा स्त्री प्रसिद्ध अहल्याबाई, त्यांचे पुत्र मालिराव, ते मेल्यावर अहल्याबाईनें तुकोजीराव यांस दत्तक घेतलें; तुकोजीरावास काशीराव व मल्हारराव खासे हे दोन व कृष्णाबाई म्हणून राख होती तिचे यशवंतराव व विठोजी हे दोन असे चार पुत्र होते. पैकीं विठोजी यांस पुण्यांत बाजीरावानें बुधवारच्या वाड्यापुढें हत्तीचे पायाशीं दिलें त्या अदावतीवरून पुढें यशवंतरावांनीं पुणें लुटलें. यशवंतराव यांचे पुत्र मल्हारराव, त्यांचे हरजीराव आणि त्यांचे तुकोजीराव; हे हल्लीं इंदुरास आहेत.

७८. बाळाजी विश्वनाथ भट हे श्रीवर्धनचे कुळकर्णी असून ते प्रथम धनाजी जाधवराव सेनापति यांजवळ होते. नंतर हैबतराव नाईक निंबाळकर सरलष्कर यांजबरोबर होते. तेथें त्यांणीं कामगिरी केली म्हणून त्यांस सेनाकर्ते असें पद दिलें व नंतर आंग्र्यांचें पारिपत्य केलें ह्मणून त्यांस मुख्य प्रधानत्व मिळालें. त्यांचे पुत्र बाजीराव व चिमणाजी अप्पा असे दोन. पैकीं चिमणाजी अप्पांचे पुत्र सदाशिवराव हे पाणपतांत ठार झाले. बाजीराव यांस इ० स० १७२० सालीं प्रधान पद मिळालें. त्यांस बाळाजीपंत नाना, जनार्दन बाबा व रघुनाथ दादा असे तीन पुत्र होते. पैकीं बाळाजी यांस सन १७४० चे आगष्ट महिन्यांत प्रधानकीचीं वस्त्रें मिळालीं व ते १७६१ सालीं पर्वतीस मरण पावले. त्यांस विश्वासराव, माधवराव व नारायणराव असे तीन पुत्र होते. त्यांतील विश्वासराव पाणपतांत पडून मृत्यु पावले. तेव्हां तारीख ६ जुलई सन

१७६१ इसवी मध्यें माधवराव यांस वस्त्रें मिळालीं. माधवराव हे १७७२ सालीं थेऊरास क्षयानें वारले. नंतर १७७२त नारायणराव गादीवर बसले. त्यांस [illegible] १३ आगष्ट १७७३रोजीं मारेकरी यांनीं मारलें. त्यावेळेस त्यांचें [illegible] वय केवळ १८वर्षांचें होतें. त्यांस सवाई माधवराव हे पुत्र होऊन त्यांना [illegible] पासून चाळिसावे दिवशीं (१७७३) पेशवे पदाचीं वस्त्रें मिळालीं. सवाई माधवराव हे तारीख २८ आगष्ट सन १७९५ सालीं दिवाणखान्यांतून पडून मेले. त्यांची स्त्री यशोदाबाई यांचे मांडीवर चिमाजी अप्पा यांस तारीख २६ मे १७९६ रोजीं दत्तक दिलें. परंतु हे पुतण्यास चुलते दत्तक झाले! त्यांनीं थोडेच दिवस अधिकार चालविला. पुढें, बाजीराव हे होळकराचे भयानें वसईस पळून इंग्रज कंपनी सरकारच्या आश्रयानें राहिले होते. त्यांचे बंधु अमृतराव यांचे पुत्र विनायकराव यांस सातार्‍याहून पेशवे पदाचीं वस्त्रें आलीं होतीं, परंतु बाजीराव यांसच जनरल वसली साहेबांनीं सन १८०३ सालीं पुण्यास कायम केलें. नंतर चिमाजी व अमृतराव यांस काशी व चित्रकोट येथें पाठवून पेनशनें दिलीं. पुढें बाजीराव यांचा इंग्रजांशीं बिघाड झाल्यामुळें त्यांणीं त्यांस पदभ्रष्ट करून व कैद करून ब्रह्मावर्तास पाठविलें. ते कांहीं दिवस मथुरेस राहून नंतर अंतकाळ पर्यंत ब्रह्मावर्तासच होते.

७९. पूर्वीपासून बहुतकरून ऋषींचे ग्रंथ आहेत व ते ऋषी ग्रंथकर्ते असून ते नवीन धर्मशास्त्रप्रतिपादक होते. हे ऋषी सहा प्रकारचे धरिले आहेत:—१ छंदऋषी, २ ब्रह्मऋषी, ३ महर्षी, ४ राजर्षी, ५ गोत्रऋषी, आणि ६ देवऋषी. यांपैकीं पहिल्या वर्गांतील वसिष्ठ, कण्व इ० छंदऋषी होत; दुसर्‍यांतील अत्री वगैरे हे ब्रह्मर्षी; ३ तील भृगु वगैरे महर्षी; ४ तील विश्वामित्र, प्रियव्रत, जनक, ऋतुपर्ण वगैरे राजर्षी; ५ तील शांडिल्य, कौंडिण्य वगैरे गोत्रऋषी; आणि ६तील नारद हा देवऋषी होय. हे सर्व ऋषी ब्राह्मणाचेच वंशज नसून त्यांत क्षत्रिय—वैश्य—शूद्र—व अप्सरापुत्र इत्यादि होते. ह्मणून ऋषींचें कुळ व गंगेचें मूळ शोधूंनये असें ह्मणतात. कवषऐलुष हा छंदऋषि शूद्र असून राजर्षी हे क्षात्रिय होते; ब्रह्मर्षी हे ब्राह्मण, आणि देव-

षी हे आर्य लोकांचे मूळ भूमींतील राहिवाशी होत; छंदऋषी म्हणजे वेदांचे मंत्र ज्यांणीं केले ते; महर्षी म्हणजे ज्यांचे वंश मोठे ते; त्यांस प्रजापती असेंही नांव आहे. आणि गोत्रऋषी म्हणजे हल्लींच्या ब्राम्हणांचे पूर्वज ते. परंतु पुढें ह्या ऋषींविषयीं पुराणिकांनीं अद्भुत गोष्टी प्रसिद्ध केल्या. कीं, कोणी सागर पीत. कोणी गंगेस मांडींत दाबून टाकीत, कोणी साठ लक्ष्या अन्न खात. अशीं त्यांचीं खोडसाळ व असंभाव्य माहात्म्यें प्रसिद्ध झालीं. आणि तशीं सामर्थ्य हल्लींच्या ब्राम्हणांत जेव्हां दिसेनात तेव्हां ऋषी नष्ट झाले असें ठरलें. ब्राम्हणांचें महत्व जाण्यास दुसरें कारण असें झालें कीं, ते लोभी होऊन विद्यातपहीन झाले. तिसरें कारण असें झालें कीं, ब्राम्हण ही ज्ञाति वंशपरंपरा ठरली, तेव्हां एकाच जातींत सर्व ऋषी व्हावे हें असंभाव्य आहे. पूर्वीं जेथें ऋषित्व दृष्टीस पडे तो ऋषी ठरत असे. परंतु पुढें त्याचा संकोच झाल्यामुळें आतां कोणी ऋषी नाहींत असें ठरलें हें मोठें अनिष्ट झालें. एकाच जातींत जसे सर्व वीर किंवा सर्व भक्त झाले नाहींत, त्याचप्रमाणें ऋषीही एकाच जातींत उत्पन्न झाले नव्हते. देवऋषी म्हटलेल्यांस जाति होती असें दिसत नसून ते जातीधर्म झाल्याचे पूर्वींचे लोक होते असें वाटतें.

८० राजमंडळांत त्यांच्या पत्रांचे शेवटीं लिहिण्याच्या पद्धती वेगळाल्या होत्या:—

‘ भाग्यं लेखनाऽवधि:’

‘ आज्ञाप्रमाण.’

‘ लेखनसीमा.’

‘ लेखनाऽवधि:’

‘ निदेश समक्ष.’

‘ मर्यादेय विराजते.’

‘ मोरतवपुद.’

‘ लेखनसीमा समुल्लसति.’

यांशिवाय किरकोळ कामगारांचे शिक्के पाहण्यांत आले ते येणेंप्रमाणें:—

" श्री राजाराम महिपालक, सेवक कृष्णसुत त्र्यंबक ॥"

"राजा शाहु छत्रपतिचरणीं तत्पर, फत्तेसिंग भोंसले राजकुमर॥"

८१. साताऱ्याचे छत्रपती शाहू महाराज हे बादशाहाचे कैदेंतून आल्यावर ताराऊसाहेब म्हणजे राजाराम महाराजांची स्त्री हिणें तंटा केला. त्या वेळेस तिला व तिचे पुत्रास वारणा नदीचे पलीकडील मुलूख देऊन कोल्हापूर येथें राहण्यास सांगितलें व त्यांस दुसरे अष्ट प्रधान नेमून दिले. पुढें ही बाई ८६ वर्षांची होऊन सन १७६१ सालीं मेली.

८२. खंडेराव दाभाडे सेनापति हे गुजराथेंत चौथाई वसूल करण्याकरितां शिरले तेव्हां त्यांचेबरोबर दमाजी गाइकवाड व कंठाजी कदमबांडे हे होते. दमाजी मेल्यावर त्यांचा पुतण्या पिलाजी हा सरदार झाला. पुढें जोतपूरच्या अभयसिंगानें त्यास डाकोर येथें मारेकरी घालून मारलें. पिलाजीचा मुलगा दमाजी हाही सरदारी करूं लागला होता परंतु त्यास बाळाजी बाजीराव यांणीं साताऱ्यास कैद केलें व पुढें खुलें केलें. दमाजीचा मुलगा गोविंदराव, त्याचा मुलगा आनंदराव व त्याचा मुलगा सयाजीराव हे १८४७सालीं वारले. तेव्हां त्यांचे मागून त्यांचे पुत्र गणपतराव, त्यांचे मागून त्यांचे बंधु खंडेराव, आणि पुढें त्यांचे बंधु मल्हारराव बसले. शेवटीं मल्हारराव पदच्युत होऊन हल्लीं सयाजी महाराज हे श्री. जमनाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन इंग्रजांनीं राज्य चालविलें आहे। दमाजी गायकवाड यांणीं सन १७५५ सालीं अमदाबाद घेऊन पुढें पट्टन व खेराळू वगैरे महाल घेतले.

८३. विजापुरास सुलतान युसफ अदिलशहा याणें १४८९ पासून १५०० पर्यंत राज्य केलें. त्याचे मागून सुलतान इस्मायल अदिलशा, त्यानंतर सुलतान मलु अदिलशा, नंतर सुलतान इब्राम अदिलशा बडे, नंतर सुलतान अल्ली अदिलशा, नंतर ईब्राम अदिलशा छोटे, मग महंमद अदिलशा, त्यावर अल्ली अदीलिशा छोटे आणि नंतर सिकंदर आदिलशाहा झाला. याचे कारकीर्दींत सन १६८७ सालीं औरंगजेबानें विजापूर घेऊन त्याचें राज्यही खालसा केलें. याच बादशहाचे कारकीर्दींत दक्षिणेंत मोजणी होऊन इदलशाही बिघा चालू झाला व किरी-

टी रामराजा यांचें राज्य खालसा झालें. याप्रमाणें नऊ बादशाहा झाले. त्यांचें ऐश्वर्य कसें होतें हें त्यांची राजधानी पाहिली असतां समजेल.

८४. अहंमदनगरास जे राजे झाले त्यांचीं नावें:—१ मलिक अहंमद निजाम मुलुक बहिरी १४८७; २ सुलतान बुऱ्हाण निजामशाहा; ३ सुलतान हुसेन निजामशहा; ४ सुलतान मुर्तिजा निजामशाहा; ५ सुलतान मिरान हुसेन निजामशाहा; ६ सुलतान इस्मायल निजामशाहा आणि नंतर ७ सुलतान बुरान निजामशाहा. हा बादशाहा सन १५९४ सालीं मेला. हें राज्य जाहांगीर बादशाहानें घेतलें.

८५. दिल्लीचे बादशाहा हे प्रत्येक जण आपले राज्याचें साल पहिलें धरून मरे तों पर्यंत शके लिहीत, त्यास जलूस ह्मणतात. प्रत्येक बादशाहाचा जलूस वेगळा आहे. बाबर पादशाहा १४९६ इसवींत गादीवर बसला तो पहिला जलूस म्हणजे हिजरी सन ९००.

| | |
|---|---|
| त्याचीं जलूसाचीं वर्षें...३६. | जाहांदरशाहाचीं"..... .....१. |
| हुमायुनाचीं" ....... २७. | फरूखशीराचीं" ........ ....७. |
| अकबराचीं" ... .... ५०. | महमदशाहाचीं" ..... ...३०. |
| जाहांगीराचीं" .......२४. | अहंमदशाहाचीं".... ...., ७. |
| शाहाजाहानाचीं" ....५१. | महमद अलमगीराचीं"... ५. |
| औरंगजेबाचीं" .. ... ४. | शाहा अलम सानीचीं" ४५. |

पुढें १८०३ सालीं इंग्रजांनीं दिल्ली घेऊन बादशाहास पेन्शन दिलें, त्याचे पूर्वीं तो दहा वर्षें महादजी सिंदे यांचे कबजांत होता.

८६. वेदांस निगम, छंद, श्रुती, आम्न, ब्रह्म, वगैरे नावें पुष्कळ आहेत. परंतु या ग्रंथांखेरीज दुसरे ग्रंथांसही त्यांचे महत्वाचे कारणानें वेद ह्मणण्याचा परिपाठ आहे. जसें—आयुर्वेद, गांधर्व वेद, शिल्पवेद वगैरे भारतासही इतिहासवेद म्हणतात!

८७. हल्लीं जे ब्राम्हण ग्रंथ उपलब्ध आहेत ते: १ तैत्तिरीय ब्राम्हण, २ ऐतरेय ब्राम्हण, ३ शतपथ ब्राम्हण ४ गोपथ ब्राम्हण ५ कौशीतकी ब्राम्हण ६ छांदोग्य ब्राम्हण, ७ सामविधान ब्राम्हण, ८ तांड्य

ब्राह्मण, मंत्रब्राह्मण वगैरे९. या ग्रंथांत यज्ञयागक्रिया आहेत व त्याजवर ही पौरुषग्रंथ झाले असून त्यांची संख्या मोठी आहे. अग्निष्टोमप्रयोग, हौत्रप्रयोग, चातुर्मासप्रयोग, सोमपद्धति, इष्टीविधान, क्रतुरत्नमाळा वगैरे प्रकरणेंही त्यांमधीलच आहेत.

८८. गायनांत मूळ सप्तसूर आहेत त्यांचीं नांवें:-

**सा रि ग म प ध नी.** यांचे रि सा, सा रि असे उलट पालट सूर ह्मणून सुमारें ५१०० प्रस्तार होतात. याजपासून वर्जावर्ज यानें राग होतात त्यांचीं नांवें - भैरव, मालकंस, परज, सोनी, कालंगडा, हिंडोल, मारू बसंत, पंचम, ललत, केदार, बिहाग, खमाज, आडाना, बागेसरी, कानडा इ०. यांचे पोटीं दरबारी, मियाचा, कौशीक, वगैरे भेद आहेत. तसेच कल्याणांतही नऊ भेद आहेत. शाम, यमन, पुर्वी, शुद्ध, हमीर, जयत, मोहन, ककमोद आणि भूप. श्रीरागांत ६ भेद आहेत:-जयताश्री, दीपश्री, मालवश्री, पूर्वीश्री, धवलाश्री, आणि ललताश्री. शिवाय सोरट, पिलू, मुलतानीदेश, मालव, गुर्जरी, शाहाना, सरपर्दा, तोडा, शंकराभरण, जोगी, बागेसरी, धनासरी, मार्वा, केदार, निषापुरी, काफी, झिंझुटी, निषापुरी, बिभास, सिंधी, अलैय्या, तैलंग, बिलावल वगैरे. यांतील तोडीचे भेद ५ आहेत: देशी, जीवनपुरी, मियाचा, लक्ष्मणपुरी आणि आसावरील; खट, रामकलि, गुणकरी, सुगराई; बिलावलचे ३ भेद:-यमन बिलावल, कोकबबिलावल व मियाचा बिलावल; सारंगाचेही भेद तीनच आहेत:—वृंदावनी, मधुमाध, व गौड; हे मल्हाराचे तीन भेद आहेत:-मियाचा, गौड, सूर, मेघ व देशी; शिवाय सोरट, धनाश्री, अडंग, मधु माधवी वगैरे बाहाराचे भेद चार.-वसंताचा, बागेसरीचा कानड्याचा व केदाराचा. याशिवाय अनंतभैरवी, कांभोज, जयजयवंती, दीपचंदी, खुरजन, मोहनावती, वगैरे बहुत राग असून ते केव्हां केव्हां ह्मणावे याच्या जाणते लोकांनीं वेळा व ऋतू ठरविले आहेत. त्यांत मुख्य राग व रागिण्या यांत आमेज, धुन वगैरे भेद आहेत. गायनाच्या बाण्या चार आहेत: नारद, तुंबर, रंभा व गंधर्व. शिवाय गोवर, हार खडार, डागर, बिंद्रावनी वगैरे आहेत. यांस

जे ताल गातात त्यांत आदिताल, चौताल, झंपा, थिलंदी, तीवट वगैरे नांवें आहेत. स्वर केवळ नादब्रह्म असून त्यांचे लगत चर्मतारादियुक्त अनेक वाद्यें कंठास साह्य करितात. मृदंग, सारंगी, सतार, सारमंडल, बीन, ताऊस, रुद्रवीणा वगैरे वाद्यें हीं गायनशास्त्रास आणखी साह्य करितात. ज्याचा अंतपारच नाहीं असें हें शास्त्र आहे. या संबंधानें मनुष्याची एक एका वाद्यांत चांगली गति होण्यास एकेक आयुष्य पाहिजे!

८९. पुढें लिहिल्याप्रमाणें साताराचे मराठे राजांनीं राज्य केलें—शिवाजी ६ वर्षें, संभाजी ६, राजाराम १३, ताराबाईसाहेब ८, आणि शाहू महाराज ४२ वर्षें!

९०. राजाज्ञा हें पद प्रथम रंगराव उद्धव यांस इ०स० १७०९मध्यें मिळालें. नंतर तेंच पद नारोराम, त्या नंतर चिमणाजी दामोदर, त्यापुढें दत्ताजी शिवदेव, त्यावर भवानी शंकर व त्यानंतर शाहु महाराजांनीं मोरेश्वर देशपांडे वांईकर यांस, याप्रमाणें दिलें. त्यावरून हल्लीं पर्यंत वांईकर देशपांडे यांचे वंशास राजाज्ञा म्हणतात.

९१. थोरले बाजीराव यांस मसूर मुक्कामीं छ० २० जमादिलाखर सन अशरीन (इ० स० १७२०) सालीं पेशवेपदाची वस्त्रें दिलीं. त्यावेळीं त्यांचें वेतन तेरा हजार ठरलें होतें.

९२. हिंदुस्थान देशांत उत्तरेकडे व दक्षिणेंत डोंगर फार असून ते सोईवार असल्यामुळें डोंगरी किल्ले फार आहेत व त्याशिवाय भुईकोट किल्ले ही आहेत. त्यांपैकीं कित्येकांचीं नांवें:—साताराचा किल्ला, मकरंदगड, नांदगिरी ऊर्फ कल्याणगड, कमलगड, भूषणगड, पांडवगड, संतोषगड, सदाशिवगड, वंगली—जयगड, प्रतापगड, सालरगड, किल्ले मोरगिरि उर्फ गुणवंत गड, प्रचीतगड, राजगड, रायगड, प्रचंडगड, वाल्गड, वितंडगड, विशालगड, वहिरवगड, भगवंतगड, मच्छिंद्रगड, वसंतगड, वंदन. चंदन, केंजळा, महिमानगड, वर्धनगड, व्याघ्र, परळी ऊर्फ सज्जनगड, मनमोहनगड, सुंदरगड, महिमंडण, महिपत, वैराट, रोहिडा, विचित्र, विजय, चंद्र, मंडण, सुषेणगड, गंभीरगड, अवचित, पाहुली, मंगल, पन्हाळ, चांदवड, हर्ष, हरिश्चंद्र, तारागड, नारगड,

मराठी ग्रंथ ... ठाणे.

त्रिंबक, आगढा, पटा, अरनाळा, कर्नाळा, मंगलगड, थाळनेर, मांडव, अशीरगड, पावागड, राघव, पुरंदर, शिवनेरी, देवगड, वगैरे:—भुईकोट. चाकण, आग्रा, प्रयाग, मिरज, मालगांव, अमदाबाद, विजापूर वगैरे. दर्याचे किनाऱ्यास:—कुलाबा, खांदेरी, उंदेरी, रत्नागिरी, ठाणे, अरनाळा, मालवण, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, रेवदंडा, जंजिरा वगैरे.

९३. शंकराचार्यांचे चार मोठे शिष्य झाले त्यांनीं चार दिशेस चार मठ स्थापन केले. त्यांचीं नांवें:—

१ त्रोटकाचार्य यांचा उत्तरेस बद्रीकेदाराजवळ जोतिमठ; यांचे -पर्वत, सागर व गिरि असे तीन प्रकारचे गोसावी असून आनंद हे ब्रह्मचारी आहेत. हे गोसावी (संन्यासी) यांचे सेवक होत.

२ शृंगेरीस पृथ्वीधराचार्य यांणीं दक्षिणमठ स्थापन केला. यांचे शिष्य—सरस्वती, भारती व पुरी असे तीन प्रकारचे गोसावी असून चैतन्य हे ब्रह्मचारी आहेत.

३ पश्चिमेकडे विश्वरूपाचार्य यांणीं द्वारकेस शारदामठ स्थापिला. त्यांचे शिष्य तीर्थ व आश्रम असे दोन प्रकारचे गोसावी असून, स्वरूप हे ब्रह्मचारी आहेत.

४ पद्मपादाचार्य यांणीं पूर्वेकडे जगन्नाथास गोवर्धनमठ स्थापिला; त्यांचे शिष्य वन व अरण्य असे दोन प्रकारचे गोसावी असून प्रकाश हे ब्रह्मचारी आहेत. येणें प्रमाणें चार मठ, दशनाम गोसावी, आणि चार ब्रह्मचारी झाले. यांत या मुख्य चार मठांशिवाय संकेश्वर, हंपी कुंभकोणं वगैरे त्यांच्या शाखा आहेत.

९४. हिंदुस्थानांत यात्रेचीं ठिकाणें फार आहेत. त्यांत कांहीं स्नानाचीं, कांहीं दर्शनाचीं व कांहीं श्राद्धादिक करण्याचीं असून त्यांतही कांहीं सर्व लोकांचीं, कांहीं मतवाल्यांचीं, व कांहीं प्रांतांतील लोकांचीं अशा भेदानें आहेत. गया हें सर्वांचें क्षेत्र; गढडे हें स्वामी नारायण पंथाच्या लोकांचें; रामदासी लोकांचें परळी हें स्थान; तसेंच, पालिठाणें हें जैनांच्या यात्रेचें ठिकाण; छत्तीस गड हें कबीरपंथी लोकांचें; व आलंमप्रभु लिंगाईत लोकांचें पवित्रस्थान. याशिवाय कांहीं स्थानें जातिविशेषा-

कारितांच प्रसिद्ध आहेत: परशुराम चित्तपावन ब्राह्मणांचा; अमदाबादेजवळ असणारी उंझामाता ती तिकडील कडवे कुळंबी मात्र पूजितात. देवांमध्यें देखील कांहीं धनगरांचे देव कांहीं महारांचे देव, कांहीं वाण्यांचे देव असे भेद आहेत. कांहीं ठिकाणीं पंढरपुराप्रमाणें मूर्तीच मुख्यत:पूज्य असतात;कांहीं ठिकाणीं नाशिकाप्रमाणें विशेष माहात्म्यें असतात; कांहीं ठिकाणीं देहू आळंदी वगैरे ठिकाणांप्रमाणें सत्पुरुषांच्या समाधीच यात्रास्थानाला कारण असतात; नैमिषारण्य, दशाश्वमेध, कुरुक्षेत्र, वगैरेसारखीं कांहीं स्थलें पूर्वीं मोठाल्या गोष्टी घडल्यामुळें पुण्यक्षेत्रें झालीं आहेत. राजापूरची गंगा, उन्हाळीं, ज्वालामुखी वगैरे स्थलें हीं कांहीं चमत्कारिकपणामुळें लोकांस पूज्य होतात. याप्रमाणें जशीं स्थळें पवित्र धरलीं आहेत तसे कालही पवित्र धरले असून त्यांचीं माहात्म्यें वर्णिलीं आहेत. कार्त्तिकमाहात्म्य, एकादशीमाहात्म्य वगैरे हीं पवित्र कालाचीं उदाहरणें होत. कितीएक ठिकाणीं शूद्र वगैरे मात्र बलि देण्याकरितां जातात. तीं स्थलें कोंढणपूर, विंध्यवासिनी, कलकत्त्याचीं काली वगैरे आहेत, कांहीं ठिकाणें भुतें व रोग काढण्याकरितां ह्मणून प्रसिद्ध आहेत: नरसोबाची वाडी, सातार्‍याजवळ निंबचा कोटेश्वर वगैरे ठिकाणें ह्या संबंधी प्रख्यात असून तेथें सेवेकरितां शेंकडों लोक जातात. नैमिषारण्य हें लखनौजवळ असून त्यास नीमसारही ह्मणतात. तेथें द्वादश संवत्सरपर्यंत सत्र होऊन सूतांनीं पुराणें सांगितलीं. कोंकणास परशुरामक्षेत्र ह्मणतात, दंडकारण्यास रामक्षेत्र ह्मणतात, वऱ्हाडांत तापीचा उगम आहे तेथें व रामेश्वराचे दक्षिणेस कन्याकुमारी, वसईजवळ निर्मळक्षेत्र, हंपी विरूपाक्ष, उडपि सुब्रह्मण्य, अष्टविनायक, अष्टसिद्ध शाकांबरी, एल्लमा देवी इत्यादि अनेकश: यात्रांचीं ठिकाणें आहेत. कित्येक ठिकाणें नद्यांचे उगम, संगम, व मध्य हेच विशेष ठरविले असल्यामुळें तेथें लोक जातात.—

सर्वत्र सुलभा गंगा त्रिषु स्थानेषु दुर्लभा ॥
हरिद्वारे प्रयागे च गंगा सागरसंगमे ॥

याप्रमाणें सर्व नद्यांचे उगम, मध्य, व मुखें ठरविलीं असून त्यांत प्र-

त्येक ठिकाणच्या लोकांनीं आपआपल्या क्षेत्रांचें, नद्यांचें आणि देवांचें माहात्म्य इतरांपेक्षां श्रेष्ठ यानें वर्णिलेलें आहे:—

काश्यां माघे च यत्पुण्यं सर्वतीर्थेषु यत्फलं।
तत्फलं समवाप्नोति साभ्रमत्याऽवगाहनात् ॥
साभ्रमतीमाहात्म्य, पद्मपुराण दक्षिणाऽभिमुखी
गंगा यत्र देवो नृकेसरी ॥
तत्र श्रीविजयो तीर्थ काश्यां शतगुणं भवेत् ॥
गोदातीरीं कुशतर्पण गांवाचें माहात्म्य.

याच प्रमाणें काशीस दंडण, प्रयागीं मुंडण व गयेस पिंडण असें ही त्या तीन स्थळींचें माहात्म्य आहे व हींच त्रिस्थली किंवा तिरस्थळी होय.

९९. पुढील श्लोकांत १२ ज्योतिर्लिंगें वर्णिलीं आहेत:—

सौराष्ट्रे सोमनाथंच श्रीशैल्यं मल्लिकार्जुनं ॥
उज्जयीन्यां महाकालं ओंकारममरेश्वरं ॥ १ ॥
केदारं हिमवत्पृष्ठे डाकिन्यां भीमशंकरं ॥
वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे ॥ २ ॥
वैजनाथं चिताभूमौ नागेशं दारुकावने ॥
सेतुबंधे तु रामेशं घृष्णेशं च शिवालये ॥ ३ ॥

(१) सोमनाथास वेरावळ बंदर, सोमनाथ पट्टण व प्रभास पाटण अशीं तीन नांवें असून हें क्षेत्र जुनागडच्या नवाबाचे राज्यांत काठेवाडांत समुद्रकांठीं आहे. सोमनाथाचें प्राचीन देऊळ मुसलमानांनीं लुटून त्याची मशीद केली; तें देऊळ अद्यापि तसेंच चुना लावलेलें ओसाड पडलें आहे. परंतु दुसरें देवालय अहल्याबाई यांणीं बांधलें असून त्यास गाइकवाडाचे नामांकित दिवाण विठोबा देवाजी यांणीं चार हजारांचीं इनामें वगैरे दिलीं आहेत. त्याजमुळें त्या देवस्थानाला चौघडा व बरीच सेवक मंडळी असते. येथें समुद्र असून हेंच तीर्थ आहे. तेथें दुसरी एक हिरण्यानदी असून याच नदीवर सर्व यादव मेले ती जागा दाखवितात. तसेंच तेथें श्री कृष्णास बाण लागला ती जागा ( भल्लुका

क्षेत्र ) व ज्यानी देह विसर्जन केला ती जागाही आहे. परंतु हल्लीं तेथें नबाबानें एक मसीद बांधिली आहे. शिवाय सर्व गांवांत शिवाचीं हजारों दगडी देवळें आहेत. यावरून ही शिवपुरी पूर्वी मोठी असेल असें वाटतें. येथें खाणींतील दगड फार चांगले निघतात. त्याचीं देवळें व घरें होऊन निटाप्रमाणें त्यांचा उपयोग होतो. मुसलमानांनीं मुख्य देऊळ लुटलें, परंतु त्याशिवाय जीं हजारों देवळें आहेत तीं तशींच राहिलीं असून तीं मोडावयास एक युग पाहिजे असें दिसतें आणि याच अडचणीमुळें तीं तशींच राहिलीं आहेत. तरी आतां कांहीं देवळें जुनीं होऊन पडलीं आहेत. सोमनाथाचे नवे देवळांत नर्मदेंतील दोन हात उंचीचा मोठा भव्य बाण बसविला आहे.

( २ ) श्रीशैल्य मल्लिकार्जुन हें प्रसिद्ध स्थळ कृष्णानदीचे कांठीं निजामाचे राज्यांत असून श्रीशैलाचें देऊळ लहान आहे. हें क्षेत्र हल्लीं आगगाडीच्या कृष्ण ( स्टेशना ) पासून पंचवीस कोस पडतें.

(३) महाकाळ हा उज्जनी शहरीं आहे. हें शहर विक्रम राजाच्याही पूर्वीचें असून त्यास दोन हजार वर्षांवर वर्षे झालीं. हल्लीं तेथें शिंदे सरकारचा अंमल आहे; व येथें क्षिप्रा नदी आहे. हें देऊळ विच्छिन्न झालें होतें तें महादजी शिंदे यांणीं पुन्हां बांधलें.

( ४ ) ओंकार मांधाता या ज्योतिर्लिंगाचें देऊळ नर्मदेंत एका खडकावर आहे. हें पूर्वी मांधाता ह्मणून कोणी सूर्यवंशी राजा होता त्याणें बांधलें असें ह्मणतात.

( ५ ) बदरी केदार हा हरिद्वारापासून वर शंभर कोस आहे. तेथें एकंदर पंचबदरी असून त्यांत हा मुख्य आहे. येथें बदरीनाथाचे पुजारी राउळ ब्राह्मण आहेत. अलीकडे येथून बारा कोसांवर शंकराचार्यांनीं ज्योतिर्मठ स्थापन केला असून तेथें ज्योतीश्वरमहादेव आहे. केदारावर बर्फ फार पडतें यामुळें सहा महिन्यांनीं जेव्हां उष्ण काळामध्यें उन्हानें तें विरून जातें तेव्हां त्या देवळास जाण्याला वाट होते. आणि त्यावेळीं तेथें जाऊन पुजारी दरवाजा उघडतात तेव्हां प्रांजवरोबर यात्रेकरी जातात, व पुनः संध्याकाळीं परत येऊन ज्योतिर्मठांत राहतात. या प्रां-

ताचें गरवाळ व कमाऊं असें नांव आहे. येथें कमिशनर असून तेथील राजा श्रीनगरचा आहे.

( ६ ) भीमाशंकर हा खंडाळ्याचे घांटाजवळ डोंगरावर असून आजपासून भीमानदीचा उगम आहे. हें देऊळ नाना फडणविसांनीं बांधलें. या देवालयाचे रानास डाकिनीवन असें ह्मणतात.

( ७ ) विश्वनाथाचें देऊळ काशीत आहे. त्याचे जुन्या देवळाची तर मशीद झाली आहे, परंतु अर्धा भाग अद्यापि राहिला असून त्याच्या शेजारींच नवा विश्वनाथ स्थापन केला आहे. विश्वेश्वर-देवालयाचे शिखरावर रणजित शिंगानें सोन्याचा पत्रा बसविला आहे. व तेथें जवळच ज्ञानवापि वगैरे आहेत. येथून पुढें गेलेवर मानमंदीर ह्मणून सवाई जयसिंगानें ज्योतिषाचे शोधाकरितां बांधलेली वेधशाळा आहे. काशीत बौद्धांचें सारनाथ हें प्रसिद्ध ठिकाण आहे. काशीची सर्व वस्ती मराठी राज्यांतच झाली असून पूर्वींचीं कायतीं दोन चार ठिकाणें मात्र आहेत. बाकी सर्व घांट शिंदे, होळकर, पेशवे यांणींच बांधले असून घरेंही त्याच कारकीर्दींतील आहेत. येथें शिवालयें तर बहुत आहेत. याजवरून ही पूर्वापार शिवपुरी होती असें अनुमान होतें. काशी हें गंगेचे कांठीं मोठें भव्य शहर असून येथील सर्व घरें दगडी आहेत व ते दगड लांकडासारखे उपयोगी पडतात. काशींतील मुख्य देवः—

**विश्वेशं माधवं धुंढिं दंडपाणिं च भैरवं ॥**
**वंदे काशीं गुहां गंगां भवानीं मणिकर्णिका॥ १ ॥**

येथें कबीर व रामानंद यांचा संवाद झाला तें ठिकाण आहे; हरिश्चंद्र राजा डोंबाचे घरीं चाकरीस राहिला त्याची मठी आहे; व शिवालय नांवाच्या घांटावर गोसाव्यांचा आखाडा आहे. येथें घांट पुष्कळ आहेत; शहरांतील रस्ते फार अरुंद असून नव्या सडका झाल्या आहेत; सरकारी कारखाने वगैरे शहरापासून दूर दूर वसले आहेत; येथें फार मोठी संस्कृत पाठशाळा असून तींत प्रसिद्ध बापुदेव शास्त्री, बाळशास्त्री रानडे, प्रमदादास बाबू, हे मोठे विद्वान आहेत वगैरे मोठे मोठे विद्वान् गुरु आहेत. का-

शांत पुस्तकालय(लायब्ररी)ही चांगली आहे.काशीची गंगानदी(भागिरथी) ही फार मोठी असून दक्षिणच्या पंचवीस नद्यांयेवढी विस्तृत आहे.शहरच्या दाट वस्तीमुळें घांटांजवळ पाणी मळकट असतें ह्मणून पलीकडच्या तीरचें पाणी आणतात,किंवा वर सांगितलेल्या शिवालय घांटाकडील आणितात. येथें अन्नछत्रें तर बहुत आहेत. येथें नेहमीं यात्रा पुष्कळ येते व येथें सर्व प्रकारचे ब्राम्हण राहतात. हा प्रदेश फार चांगला आहे तरी येथें उन्हाळा फार तीव्र आहे. बौद्धानें आपला धर्म प्रथम येथेंच उपदेशिला. त्याचाच वर लिहिलेला सारनाथ ह्मणून प्रसिद्ध बुरुज आहे. येथें कस्तूरी व कापडाचा व भांड्याचा व्यापार मोठा आहे.

( ८ ) त्रिंबकराज हें ज्योतिर्लिंग पूर्वी अंजननेरीस असून तद्दर्शक तेथें शिवाचीं देवळें फार आहेत. पण ह्या देवाचें देऊळ मुसलमानी कारकीर्दींत लुटलें गेलें. पुढें सदाशिवराव भाऊ साहेब पेशवे यांणीं त्रिंबक या गांवामध्यें नवी जागा योजून तेथें प्रस्तुतचें देऊळ बांधिलें. त्यांत लिंगस्थापन नसून देवाचे ठिकाणीं एक उखळा सारखा खळगा आहे. त्रिंबकाचे अलीकडे अंजनी ह्मणून गांव असून तेथें हनुमंताची माता राहत होती असें ह्मणतात. हा गांव पूर्वीं मोठी शिवपुरी असावी असें अनुमान होतें ह्मणून वर ह्मटलेंच आहे. येथील देवळें शके हजारामध्यें बांधलीं असे त्यांजवर लेख असून त्यांतील कांहीं देवळें जैनांचीं असावीं असेंही दिसतें; आणि त्याच सुमारास नासिकचीं लेणीं झालीं असावीं. त्रिंबकास नारायण नागबळी ह्मणून एक कर्म करण्याकरितां पुष्कळ लोक जातात.हें कर्म ह्मणजे प्रेतास सद्गति देण्याचा विधि आहे. ज्या कोणास भ्रांति पडते कीं, आपले कुळांत कोणी पिशाच होऊन आपल्या कुटुंबांतील मनुष्यांस उपद्रव करितो, त्याची क्रिया करणें याचें नांव नारायण नागबळी. हा केला ह्मणजे तो मृत मनुष्य मानलेल्या पिशाचयोनींतून मुक्त होतो अशी भोळ्या लोकांची समजूत आहे!

( ९ ) वैजनाथ यास परळी वैजनाथ असेंही ह्मणतात व हा निजामाचे राज्यांत आहे.

( १० ) अवंढ्यानागनाथ हाही निजामाचे राज्यांतच आहे.

( ११ ) लंकेस जाण्याकरितां रामचंद्रांनीं सेतु ह्मणजे पूल बांधला तेव्हां त्याजवळ रामचंद्रांनीं श्रीरामेश्वराची स्थापना केली अशी पुराणप्रसिद्ध आख्या आहे. हल्लीं रामेश्वर हा बेटांत असून त्याचें मोठें देऊळ आहे. त्या बेटांत वस्तीही मोठी आहे. या सेतूजवळच्या समुद्रांतील वाळू प्रयागास गंगेंत नेऊन टाकतात व प्रयागच्या गंगोदकाच्या कुप्या भरून रामेश्वरास स्नान घालतात. असें करण्यांत फार पुण्य आहे, असें जाणून स्वतांकरितां किंवा भाड्यानें लोकांकरितां बहुत लोक उद्योग करितात. असा उद्योग करणारांस कावडीवाले ह्मणतात. ग्वाल्हेर, इंदूर, बडोदें या ठिकाणीं अशा कावडीवाल्यांचा रोजगार पुष्कळ आहे. कोणी दोनशें रुपयांस रामेश्वरास कावड पोंचविण्याचा मक्ता करितात. आणि जे कोणी ओंकारेश्वरासच घालतात त्यांस पन्नास साठ रुपयांचाच मक्ता देतात कित्येक कावडीवाले कावडी भरून तेथें विकण्यासही आणतात.

( १२ ) घृष्णेश्वर ह्मणून निजामाचे राज्यांत व औरंगाबादेजवळ वेरूळ गांवीं शिवलिंग आहे. त्याचा पूर्वीं उच्छेद झाला असल्यामुळें हल्लीं अहल्याबाईनीं नवीन बांधला आहे. या देवाचे पाठीमागें डोंगर असून त्यांत अद्भुत लेणीं आहेत. हीं लेणीं कारलें, कान्हेरी, घारापुरी, शिवनेरी, नासिक, इत्यादि ठिकाणीं जीं लेणीं आहेत त्यांपेक्षां फार मोठीं आहेत. यांचे बरोबरीचीं दुसरीं लेणीं अजंठ्याचे घांटांत फर्दापूरचे डोंगराजवळ आहेत. त्यांस खानदेशांतील पाचोरास्टेशनावरून मार्ग असून तीं स्टेशनापासून २० कोसांवर आहेत. या वेरूळच्या लेण्यांस काय खर्च लागला असेल याचें अनुमानच होत नाहीं! येथें अजमासें दहा पंधरा लेणीं आहेत, तीं सर्व डोंगर कोरून केलीं असून तीं अजमासें दोन हजार वर्षांपूर्वीं, जेव्हां इकडे बौद्धधर्म चालत होता त्या काळीं जैन साधूंस राहण्यास त्या काळचे राजांनीं केलीं असावीं असें अनुमान आहे. बौद्धांचे देवळास चैत्य व धर्मशाळेस विहार असें ह्मणतात. गुजराथींत त्यांस देहरू आणि अपाश्रा अशीं नांवें आहेत. वेरूळाजवळ दौलताबाद ह्मणून किल्ला आहे;

ह्याचें पूर्वीचें नांव देवगिरी असें होतें. तेथें जाधव राजे असून त्यास मुसलमानांनीं पादाक्रांत केलें तरी त्यांचा वंश हल्लीं देऊळगांवीं राहतो. ह्या वंशांतीलच रामदेव जाधव होत व जगदेवराव जाधव हे तर प्रसिद्धच आहेत. याच जाधवांचे दिवाण हेमाडपंत हे असून त्यांचे हेमाद्रिनामक पुष्कळ ग्रंथ प्रसिद्ध आहेत. देवगिरी येथील बालाजीस ' कानगी ' चें उत्पन्न सुमारें लाख रुपये असून शिवाय जाधवांस देशमुखीचें उत्पन्न आहे.

९६. सप्तपुरी म्हणून सात पवित्र नगऱ्या धरिल्या असून तेथें लोक यात्रेकरितां जातात. ह्या पुरींचीं नांवें—

अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका ॥
पुरी द्वारवती चैव सप्तैता मोक्षदायकाः ॥

यांचें अनुक्रमें वर्णन:—

( १ ) अयोध्या ही काशीपासून तीस कोस रेल्वेचे मार्गावर आहे. हा मार्ग औंध व बुंदेलखंड रेल्वे कंपनीनें केला असून तेथून नजीकच लखनौ आहे. अयोध्येजवळ तीन कोसांवर फैजाबाद म्हणून एक मुसलमानी शहर आहे. अयोध्या हा सर्व गांव राममंदिरांनीं भरला असून तेथें हनुमंतगढी म्हणून एक मारुतीचें देऊळ आहे तेथें वैरागी राहतात. या ठिकाणाजवळच रामचंद्राचें जन्मस्थान म्हणून आहे. परंतु त्याजवर आतां मुसलमानांनीं मशीद केली आहे; याजमुळें वैरागी व मुसलमान यांची नेहमीं तक्रार चालत असते. तसेंच, तेथें दुसरें त्रेताराम ह्मणून एक ठिकाण आहे. शिवाय स्वर्गद्वार या नांवाचा एक घाट असून तेथें शरयू ह्मणून मोठी नदी आहे. येथें चोवीस अवतारांचें एक देऊळ आहे. हा मुलूख फार उत्तम आहे तरी येथें भिकारी फार आहेत.येथें सरवरिये ब्राह्मणांची मोठी वस्ती आहे.या गांवापासून दहा कोसांवर स्वामिनारायण यांचें छपय्या ह्मणून गांव असून तेथें एक मोठें मंदिर बांधलें आहे. अयोध्येस वानर पुष्कळ आहेत.

( २ ) मथुरा हें शहर यमुनेच्या कांठीं असून त्याची शोभा फार उत्तम आहे. मथुरेंत आदिवराह, आदिकेशव इत्यादींचीं देवळें व मंदिरें

पुष्कळ, सुरेख आणि मजबूत आहेत. तेथें यमुना नदींत कांसवें पुष्कळ आहेत याजमुळें यमुनेची मूर्ति काढावयाची असल्यास ती कच्छावर काढतात; व गंगेची मगरारूढ काढितात. कारण, गंगेमध्यें मगर फार आहेत. येथें विश्रामघाट ह्मणून एक मुख्य आहे. या गांवांत सर्व चौबे राहतात व कोठें दहावीस दक्षिणी ब्राह्मणांचीं घरें आहेत. या शहरास दिल्लीचे रस्त्यावर हात्रस म्हणून स्टेशन असून त्या गांवापासून रेल्वेची शाखा पंधरा कोस नेली आहे. यमुना नदीच्या कांठीं मथुरेंतील दगडी घरांची शोभा काशीसारखी उत्तम दिसते. हा मुलूख फार रसाळ आहे. या प्रांतास ब्रिज (व्रज) ह्मणतात. मथुरेपासून जवळच डीग, भरतपूर, आग्रा हीं शहरें असून तेथें जाट लोकांची वस्ती पुष्कळ आहे. मथुरेपासून एका बाजूस तीन कोसांवर गोकुळ व दुसरे बाजूस वृंदावन आहे. वृंदावनांतही देवळें मोठीं व उत्तम आहेत. मथुरेंत वैष्णवमार्गी बंगाली लोक पुष्कळ येतात. येथें नित्यानंदमहाप्रभुजी म्हणून वैष्णवांचा गुरु झाला त्याचें देऊळ आहे. शिवाय पारखजी यांचें श्रीरंगाचें देऊळ असून ती साठ लाख रुपयांची इमारत आहे. या गांवांत कदंब, कालियामर्दन, रमणरेती, वगैरे कृष्णलीलेचीं ठिकाणें दाखवितात. रमणरेतीची माती घेऊन वैष्णव कपाळीं लावितात. याचप्रमाणें गोकुळ हें ठिकाणही जुनें असून तेथें नंदाचा वाडा व यमलार्जुन, ब्रम्हांडघाट, वसुदेवांनीं श्रीकृष्णास गोकुळीं आणिलें तो घाट वगैरे अनेक बाळलीलेचीं ठिकाणें दाखवितात. गोकुळाजवळ वल्लभाचार्यांचे वंशज गोसावी महाराज यांणींही एक स्वतंत्र गोकुळ केलें असून तेथें त्यांचीं घरें आहेत. शिवाय, या ब्रिज प्रांतांत गोवर्धन व बर्साणा ह्मणून राधेचें गांव इत्यादि बहुत ठिकाणें चौऱ्यांयशी कोसपर्यंत आहेत. त्यांची प्रदक्षिणा वैष्णव लोक चार महिने राहून करतात. तेव्हां ते सर्व जमून मोठा संघ काढितात व त्या वेळीं त्यांजबरोबर रासधारी नांवाचे नाटककार असून ते दरएक ठिकाणचीं सोंगें घेऊन कृष्णलीला दाखवितात. याप्रमाणें गोकुळ हें वैष्णव व त्यांतही विशेषेंकरून वल्लभपंथी लोकांचें मोठें ठिकाण आहे. मथुरेस जरासंधाच्या

बायका सती गेल्या तद्दर्शक एक बुरूज आहे. या मथुरायात्रेचें माहात्म्य वल्लभवंशानें फार वाढविलें असून पूर्वी इतकें प्रसिद्ध नव्हतें असें ह्मणतात.

( ३ ) मायापुरी ह्मणजे हरिद्वार; हें साहरणपूरचे स्टेशनापासून वीस कोसांवर आहे. तेथें गंगानदी आहे. या गांवीं गोसावी, बैरागी व उदासी यांचा मेळा फार मोठा भरत असून संक्रांतीचे पर्वणीस प्रथम स्नान करण्याचा जो मान हल्लीं गोसाव्यांकडे आहे तो त्यांनीं पूर्वी १८०४ मध्यें लढून मिळविला. येथें पूर्वी दिल्लीचे बादशहाचा अंमल होता. पुढें तें ठिकाण शिख लोकांकडे गेलें, नंतर वीस वर्षे पर्यंत महादजी शिंद्याकडे होतें आणि नंतर इंग्रजांनीं घेतलें. येथें जे गोसावी व बैरागी यांचे वडे वडे मेळे भरतात त्यांत दहा दहा लक्ष लोक प्रत्येक मेळ्यांत असतात. पूर्वी त्यांचा विवाद तोडण्यास अदालत किंवा राजे असमर्थ होते. याजकरितां शिंद्याचे कारकीर्दीत गोसावी व बैरागी यांजमध्यें जेव्हां तंटा पडला तेव्हां सरकारी बंदोबस्त पक्का असल्यामुळें त्यांस असें सांगण्यांत आलें कीं, तुह्मी आपसांत लढून श्रेष्ठ कोण हें ठरवावें. त्याजवरून ते उभयतां वर लिहिल्याप्रमाणें १८०४ मध्यें लढले. त्यांत बैरागी व गोसावी मिळून पंधरा हजार लोक मेले आणि गोसाव्यांची फत्ते झाली. तेव्हांपासून गोसावी हेच प्रथम स्नान करितात. हल्लीं इंग्रजांत चांगला बंदोबस्त असतो याजमुळें विशेष तंटा होत नाहीं. याप्रमाणेंच गोसावी व बैरागी ह्मणजे शैव व वैष्णव यांचे मेळे उज्जनी त्रिंबक प्रयाग वगैरे ठिकाणीं जमतात तेथेंही त्यांचे मोठाले तंटे पडतात. परंतु तेथही स्नानाचा अग्राधिकार गोसावी यांजकडेच आहे. बैरागी हे वैष्णव असून त्यांचा सात्विक धर्म याजमुळें त्यांचा उपाय चालत नाहीं व याजकरितां त्रिंबक व उज्जनी येथें बैरागी मुळींच येत नाहींत. तसेंच, ज्या देवांस बळिदान होतें त्या ठिकाणींही बैरागी जात नाहींत. हिंगळाज माता, अंबाजी, विंध्यवासिनी, काली, वगैरे ठिकाणीं बैरागी जात नसून गोसावी मात्र जातात.

( ४ ) काशी हें क्षेत्र तर सर्वप्रसिद्ध आहे. तेथें जो संकल्प

करितात तो असा—“ अविमुक्तवाराणसीक्षेत्रे, आनंदवने, महा-
स्मशाने, गौरीमुखे, त्रिकंटक विराजिते भागीरथ्यां पश्चिमतीरे” इ०. हें
क्षेत्र शिवनिर्मित आहे असें काशीखंडांत वर्णन आहे. वैष्णव म्हण-
तात कीं, हें अयोध्यानगरीचें स्मशान होतें. भागीरथीचे दक्षिणतीरीं
रामनगर हें राजधानीचें शहर असून त्यास व्यासकाशी असें नांव आहे
परंतु त्यास शिवांनीं शाप दिला आहे असें म्हणतात. काशी क्षेत्रीं पुरातन
असें कांहीं दिसत नाहीं, परंतु मुसलमानांनीं मुख्य स्थानें बहुतेक तोडून
त्यांजवर मनोरे बांधले आहेत ह्यामुळें जुनीं स्थळें मोडलीं असावीं.
सारनाथ मात्र पुरातनचा आहे तरी पुढें मराठ्यांचे राज्यांत या क्षेत्रास
ऊर्जितावस्था प्राप्त झाली ती अद्यापि आहे. काशीस महाराष्ट्र ब्राह्म-
णांची वस्ती चार पांच हजार आहे काशीचें वर्णन शेरिंग साहेब
नामक एका पाद्री गृहस्थानें फार चांगलें लिहिलें आहे तें पाहिलें
असतां जिज्ञासूंची इच्छातृप्ति होईल.

(५) तुंगभद्रातीरीं शिवकांची व विष्णुकांची हीं क्षेत्रें आहेत. या
शिवाय एक जैनकांचीही आहे.

(६) अवंतिका म्हणजे उज्जनी. हें क्षिप्रानदीचे तीरीं विक्रमाच्या
राजधानीचें पुरातन शहर आहे, परंतु तें आतां पडीत झालें आहे. येथें
महाकाल म्हणून शिवलिंग असून तें पूर्वी मुसलमानांनीं फोडिलें होतें
असें म्हणतात. परंतु तो पुढें महादजी शिंद्यांनीं स्थापिला. याचें स्वतंत्र
वर्णन वर बारा ज्योतिर्लिंगांखालीं केलेंच आहे. उज्जनी हें माळवा मुल-
खाचें मुख्य शहर आहे.

(७) द्वारका; ह्या चार आहेत: एक गोमती द्वारका ही स्मार्तां-
ची व बेट द्वारका ही वैष्णवांची आहे. शिवाय, कोडीनार ही मूळची
द्वारका होय असें म्हणतात; आणि डाकोरासही द्वारकेची मूर्ति आहे
असें म्हणतात; येकूण चार द्वारका झाल्या. गोमती द्वारकेस शंकरा-
चार्यांचा शारदामठ आहे हें वर एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. तेथें
एक होकी यवढें उंच असें श्रीयंत्र स्थापन केलें आहे. येथील देऊळ
विश्वकर्म्यानें बांधिलें असें म्हणतात. येथें जी गाइकवाडांची गादी आहे

तीस उग्रसेनाची गादी ह्मणतात. मुसलमानी धांदलींत बोडाणा रजपूत याणें या देवळांतील मूर्त्ति उचलून डाकोरास आणिली ती परत गेली नाहीं. पुढें स्थिरस्थावर झाल्यावर शंकराचार्यांनीं द्वारकेचे देवळांत नवीन मूर्त्ति बसविली. तेथेंच शंकराचार्यांची गादी आहे. हें पाहून वल्लभाचार्यांचे पुत्र विठ्ठल नाथजी यांणींहि असें सांगितलें कीं, मला स्वप्नांत विहिरींत श्रीकृष्णमूर्त्ति आहे ती स्थापावी असा दृष्टांत झाला. असें सांगितल्यावर त्याप्रमाणें ती मूर्त्ति सांपडली तेव्हां तिची स्थापना गोमती द्वारकेपासून दहा कोसांवर दर्यांत जें द्वारका बेट आहे तेथें केली. ह्या बेटद्वारकेंतील हें मंदिर मर्यादी, ह्मणजे वल्लभाचार्यांचे रीतीप्रमाणें पांच वेळ पूजा व पांच वेळ दर्शन मात्र व्हावयाचें असून इतर वेळेस देऊळ बंद असतें. आणि ह्याच रीतीप्रमाणें जें देऊळ असेल त्यास मर्यादी असें ह्मणतात; व जेथें सर्व वेळ दर्शन होतें त्यास स्मार्त्त रीतीचें मंदिर ह्मणतात. तेथें शंखोद्धार वगैरे अनेक तीर्थें असून अष्टनायकांचीं वगैरे देवळेंही पुष्कळ आहेत. येथें भाट्ये, वाणी, लवाणे वगैरे वैष्णव फार येतात. येथें गोसावीमहाराजांचे शिष्याचा अधिकार विशेष आहे. वैष्णवांचे छप्पन्न भोग वगैरे करणें तर येथेंच करितात येथें देवाचे पैशाचीं दुकानें असून तेथें पैसाहि फार आहे. या द्वारकेस जातांनां दर्याचे कांठीं आरमुडे ह्मणून एक गांव असून तेथें तप्तमुद्रा देतात. त्याचे जवळच गोपीतलाव ह्मणून एक गांव असून तेथें चार कोस भूमि सर्व गोपीचंदनाची आहे व त्यामध्यें एक तलाव. वही आहे वगैरे वर एका ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे. येथें मुद्रा देण्याचा सांप्रदाय पीपाभगत ह्मणून होता त्याणें काढिला असें ह्मणतात. येथें मिराबाईचें मंदीर आहे. गोमतीद्वारकेस गाइकवाडी मामलेदार राहतात व तो गांव मोठा आहे गोमती द्वारकेची गोमती नदी ही खारे पाण्याची असून हें गांव बंदरही आहे. ज्या प्रांतांत ही द्वारका आहे त्यास उखामंडळ असें नांव आहे. हा प्रांत वाईट व खडकाळ असून त्यांत वाघीर लोकांची वस्ती आहे. वाघीर हे क्षत्रियवंशज असून त्यास काबेही ह्मणतात. त्यांणींच कृष्णाचें राज्य घेतलें.

पुढें ते १८०२ साली दर्यांत जहाजें घालून चोऱ्या वगैरे करूं लागले याजमुळें इंग्रज व गायकवाड हे एकत्र होऊन त्यांणीं त्यांचा प्रांत घेत-ला व त्यांस पनशनें दिलीं. पुढें अलीकडे १८५६ सालीं ह्या वाघीरां-नीं पुनःदंगा केला व त्यांनीं आपल्या प्रांतातून गाइकवाडी मामलेदार पळवून लाविला. तेव्हां गायकवाडांनीं इंग्रज सरकारची मदत घेऊन बार्टन साहेब याचे साह्यानें तो दंगा मोडून वाघीरांचें गांव उजाड करून टाकिलें. त्यांणीं दहा वर्षें हा दंगा केला होता व त्यांत दोन्हीं द्वारकेचें सर्व धन लुटीस गेलें होतें परंतु देऊळ मात्र कायम राहिलें. हें देऊळ फार सुंदर व उंच असून तें पांच कोसांवरून दिसतें. द्वारकेस जाणें तें कोणी दर्यांतून जातात, कोणी राजकोटावरून जातात व कोणी पंचतीर्थी करीत दर्याचे कांठानें जातात. पंचतीर्थींत पहिलें तीर्थ तुळशीश्याम. हे गीर पर्वतांत असून तेथें गोड्या पाण्याचीं उष्णकुंडें आहेत; दुसरें तीर्थ सोरटीसोमनाथ; तिसरें पोरबंदर ऊर्फ सुदामपुरी; चौथें माधवपूर, येथें मधुवनांत श्रीकृष्णाचा व रुक्मिणीचा जो विवाह झाला आहे त्याचें वहुलें आहे; आणि पांचवें द्वारका क्षेत्र. या वाटेनें गिरनार ह्मणून एक पर्वतशिखर आहे. गीर हा पर्वत चाळीस कोस लांब असून त्याचें एक शिखर उंच आहे त्यास गिरनार म्हणतात. त्याजवर श्रावक लोकांचीं देवळें आहेत व अंबाजी, दत्तात्रय वगैरे कांहीं हिंदूंचींहि देवळें आहेत. या पर्वताचे खालींच अशोक राजाचा सुमारें २३०० वर्षांचा दगडावर कोरलेला जुना लेख आहे. त्या नजी-कच भूतनाथमहादेव, दामोदरकुंड व गोसावीमहाराजांची बैठक आहे. गीरनाराखालीं जुनागड ह्मणून एक शहर असून तेथील राजा नवाब आहे. तो पूर्वीं यादववंशीय हिंदु होता असें ह्मणतात; परंतु अम-दाबादेस मुसलमानी राज्य झालें त्या वेळेस तो मुसलमान झाला. या प्रांतांत ज्या भागांत जुनागड आहे त्यास काठेवाड ह्मणतात. हा प्रांत फार उत्तम असून त्यांत नद्या व डोंगर बहुत आहेत. तिकडे कापूस फार पिकत असल्यामुळें तेथील राजाचें उत्पन्न पूर्वीपेक्षां सहा पट अधिक झालें आहे. गाइकवाडी अमलांत या प्रांतांत फार लग्

मी होती. या प्रांतांतील सर्व राजे गाइकवाडास खंडणी देत असून जुनागडचे राजासही पेषकष देतात. या प्रांतांत पोरबंदर, जोडीया, वेरावळ, घोगो, भावनगर वगैरे शेंकडों बंदरें आहेत. हल्लीं हा प्रांत सुखी आहे असें म्हणतात. यांत इंग्रजांचा एकही गांव नाहीं. परंतु राजकोटास पोलिटिकल एजंट यांचें ठाणें आहे. पूर्वी यादवांचे वेळेस हा प्रांत एक बेट होतें. त्यांतच यादवांनीं वस्ती करून कृष्ण भगवान् यांनीं राज्य केलें. परंतु आतां समुद्र हटून गेला याजमुळें गुजराथेस हा प्रांत लागला आहे. तरी तेथें नळकंठा ह्मणून समुद्राची जागा आहे त्या प्रांतासच लागून कच्छ देश आहे. तेथील वाणी, प्रेमण, वगैरे अफ्रिकाखंडांत, अरबस्तानांत व झांझिबार प्रांतीं वगैरे अनेक ठिकाणीं व्यापारास जातात. काठेवाडांत पालीठाणें म्हणून श्रावक लोकांचें एक मोठें देवस्थान भावनगराजवळ आहे. या देशांत स्मार्त, वैष्णव, बीजमार्गी, श्रावक, स्वामी, नारायण, वल्लभाचार्य वगैरे धर्म चालतात. पूर्वी या प्रांतीं गायकवाडाची मोठी फौज असून त्याच्या छावण्या माणिकवाडा, अमरेळी, द्वारका, या ठिकाणीं होत्या व अद्यापिही तेथें थोडे बहुत लोक आहेत. या प्रांतास सौराष्ट्र असें नांव आहे; परंतु त्यास काठेवाड ह्मणायाचें कारण हें कीं, यांत काठी लोक राहतात.

९७. चार धाम ह्मणून यात्रेचीं चार ठिकाणें आहेत तीं—केदार, रामेश्वर, जगन्नाथपुरी आणि द्वारका. यांपैकीं दोन धाम विष्णूचे आहेत; व दोन शिवाचे आहेत. स्मार्त हे बदरीकेदारास जातात व वैष्णव हे बदरीनारायणास जातात. केदाराचे वाटेनें पंचकेदार व पंच प्रयाग आहेत. चार धामांची यात्रा केली ह्मणजे बैरागी मोठें श्रेष्ठत्व पावतो; मग तो कोणतेही जातीचा असला तरी त्याच्या हातचें सर्व बैरागी खातात, व महंत करणें असल तर त्यासच करितात. बैरागी ह्मणतात कीं, आह्मास जाति नाहीं; कारण, हरिभक्त हे सर्व एकाच जातीचे आहेत. त्यांचा शुक्लवर्ण, अच्युत गोत्र आणि अनंत शाखा असें ते ह्मणतात. बदरीकेदार हा श्रीनगरापासून ८० कोसांवर हिमालयांत आहे. याचें माहात्म्य सूतसंहितेंत आहे. या बदरीकेदारापासून ८० कोसांवर आहे.

त्यास बदरीनारायण ह्मणतात. केदार व नारायण हे बैलखादे आहेत.

(२) रामेश्वर हा दक्षिणेंत मद्रासपासून ६० कोस आहे. येथें दोन सागराची मर्यादा मानितात. पश्चिम व दक्षिणेकडून आला आहे तो. रत्नागिरीचा समुद्र व पूर्वेकडून आला आहे. तो महोदधि समुद्र होय. या सेतूचें दर्शनमाहात्म्य सर्से लिहिलें आहे कीं,—

शतयोजनविस्तीर्णं शतयोजनमायतम् ॥
रामचंद्रसमादिष्टं मलसंचयसंचितम् ॥
सेतुं दृष्ट्वा समुद्रस्य ब्रह्महत्यां व्यपोहतु ॥–पराशरस्मृति.

(३) जगन्नाथ या देवाचें देऊळ ज्या गांवांत आहे त्या गांवास पुरी ह्मणतात. या प्रांतास उडसा (ओडीसा) किंवा उत्कलदेश ह्मणतात व तो कलकत्त्यापासून ८० कोस आहे. येथें जगदीश्वर म्हणजे कृष्ण, बलदेव व सुभद्रा यांच्या कलेवर मूर्त्ती आहेत. या देवाचें देऊळ फार मोठें असून त्याचे शिखरावर वैष्णवी सुदर्शनचक्र स्थापन केलें आहे. येथें नैवेद्याच्या नेमणुका इतक्या आहेत कीं, त्यांचें अन्न सर्व गांव खाऊन उरतें म्हणून तें विकतात व वाळवून प्रसाद म्हणून वांटतात. त्याविषयीं असें म्हणतात.–" जगन्नाथका भात, जगपसारे हात "! कोणाकडील दोन मण तांदुळाचा नैवेद्य व कोणाचा दहा शेरांचा, अशा नेमणुका देवास फार आहेत. आणि त्यामुळें येथें अन्न फार शिजलें जातें. इतक्या अन्नाचा नाश न व्हावा म्हणून त्यास दोष नाहीं असें ठरविलें आहे; व त्यामुळें सर्व वर्णांचे लोक तें अन्न विटाळ न मानतां एकादशीचे दिवशींहि खाऊन एकादशी मानीत नाहींत!

(४) द्वारका हें क्षेत्र एक धाम आहे. या देवळांत रणछोडजी व त्रिकमजी यांच्या मूर्त्ती असून कुशेश्वरमहादेवाचें देऊळही तेथेंच आहे.

९८. पंच प्रयाग म्हणून जे म्हणतात ते हे होत:—यांत मुख्य लेटी व अलकनंदा या दोन नद्यांचा संगम जेथें आहे त्यास (१) विष्णुप्रयाग म्हणतात; पिंडार नदी व अलकनंदा या दोन नद्या जेथें मिळतात त्यास (२) कर्णप्रयाग म्हणतात; मंदाकिनी व अलकनंदा जेथें

मिळतात त्यास ( ३ ) रुद्रप्रयाग म्हणतात; भागीरथी व मंदाकिनी जेथें मिळतात त्यास ( ४ ) देवप्रयाग म्हणतात; यमुना व गंगा मिळतात त्यास ( ५ ) भूतप्रयाग व सातान्याजवळ कृष्णा व वेण्या मिळतात त्यास सन्मानार्थ (६) दक्षिणप्रयाग म्हणतात.

९९. या हिंदुस्थानांत पंच सरोवरें यात्रेचीं ठिकाणें आहेत: ( १ ) नारायणसरोवर कच्छ देशांत भुज शहरापासून चाळीस कोस व द्वारकेहून मांडवी बंदरास गेलें म्हणजे तेथून जवळच आहे. (२) पुष्कर राज, हें अजमीरपासून तीन कोस आहे. तेथील ब्राम्हणांस पुष्कर ब्राम्हण किंवा पोखर्णे म्हणतात. शिवाय तेथें छनात नांवाचे ब्राम्हणही आहेत. छनात म्हणजे सवाई जयसिंगानें एकत्र केलेल्या सहा ज्ञाती, त्या:- १ खंडेलवाळ, २ गौड, ३ सारस्वत, ४ दायमा ५ पारीख व ६ पुष्करणे. यांची एक पंगत करून त्यांणीं क्षत्रियांचें अन्न घ्यावें असें ठरविलें. पुष्कर हें सरोवर डोंगरांत असून त्यांत पाणी फार खोल व उत्तम आहे. या क्षेत्रीं देवळें फार आहेत. त्या नजीकच ज्येष्ठ, कनिष्ठ व मध्यम असे तीन पुष्कर आहेत. (३) बिंदुसरोवर, हें अमदाबादेपासून ३० कोसांवर सिद्धपूर येथें आहे त्यास मातृगया म्हणतात. कारण कीं,येथेंच कपिलमहामुनि यांणीं आपली देवहूती माता इजला ज्ञान सांगून मोक्षास नेलें.तेथें जे तिचे अश्रू पडले त्याचेंच हें सरोवर आहे असें म्हणतात.तें लहान आहे.या गांवीं सरस्वती नदी आहे ती फार सुंदर आहे. सिद्धराज जयसिंग म्हणून जो पाटणचा राजा झाला, त्याणें येथें घांट व रुद्रमाल म्हणून चमत्कारिक इमारत बांधली आहे. परंतु ती हल्लीं पडीत आहे. (४) पंपासरोवर, हें कर्नाटकांत किष्किंधेजवळ आहे आणि ( ५ ) मानससरोवर हिमालयांत आहे. परंतु त्याचा ठिकाण लागत नाहीं.

१००. त्याचप्रमाणें चार देवींचीं पीठें आहेत;परंतु त्यांस ३॥पीठेंच म्हणावयाचा पाठ आहे. जुने मराठी भाषेंत त्यांस औटपीठही म्हणतात. १ कोल्हापूरची महालक्ष्मी;१तुळजापूरची भवानी;१ मातापूरची रेणुका-

परशुरामाची आई; ३ आणि जोगाईचे अंब्याची योगेश्वरी. ही चित्तपावन ब्राह्मणांची कुलस्वामिनी आहे. यांशिवाय किरकोळ देवस्थानें आहेत तीं:—एकलिंगजी, नाथद्वार— येथील मूर्त्ति गोवर्धनावर होती. वल्लभाचार्यपंथांत हें स्थान मुख्य आहे. झाडखंडी वैजनाथ हा कलकत्त्याजवळ आहे; गोकर्ण महाबळेश्वर कारवार जिल्ह्यांत आहे; पशुपतेश्वर नेपाळास; मुक्तनाथजेथें शाळग्राम निघतात तें व दामोदर कुंड आणि अमरनाथ हीं काश्मीरांत; तप्तमणिकर्णिका व ज्वालामुखी पंजाबांत; रेवाळेश्वर; कुरुक्षेत्र; त्रिस्थळी म्हणजे— प्रयाग, काशी व गया हीं हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहेत. बेचराजी, अंबाजी व उत्कट महादेव हे गुजराथेंत प्रसिद्ध आहेत; ब्रम्हकपाट हिमालयांत; व्यंकटेश व कार्त्तिकस्वामी कर्नाटकांत; धरणीधर गुजराथेंत; परशुराम चिपळोणास ( कोंकणांत ); कन्याकुमारी, पद्मनाभ व श्रीरंग कर्णाटकांत, शंभूमहादेव, जोतीबा, महाबळेश्वर, खंडोबा, पंढरपूर हीं दक्षणेंत; दर्भशयन, अनंतशयन, अमरकंटक, जनार्दन, मीनाक्षी, हंपी विरूपाक्ष हींहि कर्नाटकांत आहेत; कामरूप देशांत बंगाल्या पलीकडे कामाक्षी देवी आहे.

१०१. वेदांनीं आप, तेज, वायु, आकाश, सूर्य, अग्नि इत्यादिकांस देव मानिलें आहे. आणि पुराणिकांनीं वीर पुरुषांसच देव मानिले. तथापि त्यांत मनःकल्पित पुष्कळ देव केले. त्याचप्रमाणें तंत्रांत दश महाविद्या, चंडी, वेताळ, भैरव, हीं अनेक कल्पित प्रकरणें उत्पन्न झालीं. वेदांत छंदोमय मंत्र आहेत, पुराणांत स्तोत्रमय मंत्र व तंत्रांत कवचें, दुर्ग, रक्षा, हृदय, वर्म, सहस्रनाम, पटल, पद्धती अशा प्रकारचे मंत्र केले आहेत. मांत्रिकांस असें वाटत होतें कीं, मंत्र हेच आमचीं कवचें व दुर्ग आहेत. शिवकवच, गणेशदुर्ग, रामरक्षा, आदित्यहृदय, गायत्रीसहस्रनाम, हनुमानपटल, पुरश्चरणपद्धती इत्यादि मांत्रिकांचीं प्रकरणें होत. आतां हे सर्व प्रकार अज्ञानाच्छादन व छाया यांची विपुलता होती तेव्हां उत्पन्न होऊन विचार मंद पडला आणि भक्ति व भोळेपणा वाढला असें दिसतें.

१०२. महाबळेश्वर, नरवर, पंचमहाल, नरवाई, वगैरे ठिकाणीं पूर्वी लोखंडाचे कारखाने असून ते चालविणारी जात धावड ह्मणून होती. धावडांनीं लोखंड केलें ह्मणजे घिसाडी, लोहार हे त्याचे नग करीत. याचप्रमाणें हल्लीं कपडवंजास व दिल्लीस कांचेचे कारखाने आहेत. पावसाळ्यानंतर ऊस ह्मणून जमिनीवर एक प्रकारचा मातीसारखा पदार्थ होतो; तो जमा करून त्याची भट्टी लाविली ह्मणजे कांच होते. त्या कांचेच्या शिशा,बांगड्या असे पदार्थ इकडे होतात. परंतु ही कांच चांगली नसून ज्या लोकांचे हातीं हे कारखाने आहेत ते अगदीं भिकारी आहेत व त्यांस कोणत्याही प्रकारचें उत्तेजन नाहीं. ईडरचे डोंगरांत स्लेटीचे नरम दगड असून त्याच्या वाट्या,पेले, मूर्ती वगैरे घडून विकावयास आणितात. रतनपूर, चूडाराणपूर वगैरे ठिकाणीं हकीक, यमुनी स्फाटिक, वगैरे उंच किंमतीचे दगड सांपडतात. त्याचप्रमाणें गयेस व कावी ह्मणून भडोच जवळ एक बेट आहे तेथेंही असेच अनेक प्रकारचे मूल्यवान् दगड सांपडतात. गयेस कथील, तांबे, कोळसे, यांच्या खाणी डोंगरांतून आहेत व सुवर्णही कांहीं ठिकाणीं सांपडतें. ऊसमातीचा इकडे साबणहि होतो. या साबणाचे कारखाने गुजराथेंत असून ते बोहोरी लोकांकडे आहेत. या देशांत सोरा काढण्याचे कारखानेही बहुत ठिकाणीं होण्याजोगे आहेत. पावागडाखालीं सोन्याची जमीन पुष्कळ आहे तेथून तो काढून जर विलायतेंत पाठविला तर बहुत नफा होईल. जुनागडची सुंदरीक नदी ऊर्फ सुवर्णरेखा यांत सोनें आहे. जामनगरचे रानांत मोकळगांवाजवळ तांब्याची खाण आहे. परंतु जे धंदे करितात ते भिकारी असून त्यांस सामर्थ्य व उत्तेजन नाहीं आणि जे श्रीमंत आहेत ते धुंदींत असून उल्लू आहेत.याचप्रमाणें हे उद्योग यत्नांवांचून पडून राहिले आहेत.

१०३. अलेक्झांडर फार्बस हे गुजराथेंत अमदाबादेस जज्ज होते, तेव्हां त्यांनीं लोकांचें अज्ञान पाहून १८४८ सालीं एक छापखाना काढला. व त्यांत ते स्वतां एक वर्तमानपत्र काढीत. हेंच वर्तमानपत्र

प्रथमतः गुजराथेंत समजावयाचे. पुढें त्यांनीं उद्योग करून जुनीं पुस्तकें संग्रह करावा व नवीं तयार करावीं, भाषासुधारावी, आणि लोकांस ज्ञान द्यावें ह्मणून 'व्हर्न्याक्युलर सोसायटी' स्थापन करून मुंबईंत 'ट्रान्स्लेशन सोसायटी' स्थापिली. शिवाय, त्यांणीं दलपतराम दादाभाई या प्रसिद्ध कवीचा संग्रह करून त्याजकडून बहुत कविता करविल्या व बखरींचे ग्रंथ लिहविले. नंतर त्यांणीं अनेक शोध करून इंग्रजींत रासमाळा ह्मणून एक गुजराथचा इतिहास लिहिला. त्याचा तर्जुमा गुजराथींत झाला आहे. हे साहेब लोकहिताचे कामीं फारच तत्पर होते. भाट व हिवंचे वगैरे लोकांकडून त्यांणीं पुष्कळ हकीकती मिळविल्या व त्यांचा उपयोग करून भूतनिबंध वगैरे ग्रंथ केले. याचप्रमाणें सदरील सोसायटी कारितां पुष्कळ द्रव्य जमा करून ती कधीं बंद पडूं नये असें केलें. व त्याप्रमाणें तिचें कामही फार चांगलें चालत आहे. सारांश, असे साहेब लोक विरळा या देशांत येतात. याचप्रमाणें मिस कारपेंटरसारख्या मडमा विलायतेंतही क्वचित् होतात. हीं माणसें फार थोर समजावयाचीं व ह्मणून नेटिव लोकांस त्यांच्याविषयीं कृतज्ञता बुद्धिही फार आहे.

१०४. पुण्यास मारियट व अन्डरसन हे दोन साहेब जज्ज होते. त्यांची कीर्त्ति लोकांत अद्यापि आहे. त्यांची लोकांवर ममता, निस्पृहता व थोरपणा अगदीं अपूर्व होतीं; व याजमुळें नेटिवांस तीं देवमाणसें दिसत होतीं!

१०५ नाना फडणीस हा पुरा ब्राह्मण होता ह्मणून तो तोतया, इंग्रज, दादा साहेब व निज़ाम या चार मोठ्या मसलतींतून पार पडला!

१०६. बहुत राज्यांचें मूळ चोर व लुटारू यांजमध्येंच आहे. ह्मणजे लुटारू लोक हे प्रथम लुटी करतात व त्यांत विजयी झाले म्हणजे पुढें होतां होतां राजे बनतात! हा इतिहास बहुतेक राज्यांचा आहे,

१०७ धर्माचे नांवावर या पृथ्वींत ज्या धांदली, दुष्ट व्यवहार आणि मूर्खपणाचे आचार विचार झा ले आहेत, होत आहेत आणि होतील

त्यांची गणती करणें ह्मणजे अपरिमित आहे! सहगमन विधी व सुतीसंस्कार किती झाले! विधवांचीं वपनें किती झालीं! झाडांचीं लग्नें किती लागलीं! धर्मयुद्धें किती झालीं? निर्दयपणा किती झाला? लुटी व खून किती झाले! उपद्रव व द्वेष किती झाले! परकीयपणा किती उत्पन्न झाला! अभिमान किती वाढला! आत्महत्या करून किती मेले! किती जणांनीं देह करवतून घेतले! जळसमाधी व जिवंत समाधी कितीकांनीं घेतल्या! कड्यांवरून कितीजणांनीं उड्या टाकल्या! लहानपणीं लग्नें झाल्यामुळें क्षयरोगी व व्याधिग्रस्त होऊन किती मनुष्यें मेलीं! जगन्नाथाचे रथाखालीं किती मेलीं! त्याचप्रमाणें गंगेच घाटावर अन्नपाणी टाकून किती मेली! आणि धर्माभिमानानें अग्नींत किती होमलीं! सारांश, हीं धर्माचीं बंडें वाढलीं ह्मणजे कांहीं केल्या आटोपत नाहींत!

१०८. शाळग्रामशिला ही वैष्णव लोक प्रत्यक्ष विष्णुमूर्ति मानितात, त्याचें तीर्थ घेतात व त्यास नैवेद्य दाखवितात. पुराणांत त्याचे परीक्षेवर पुष्कळ अध्याय आहेत त्यांवरून त्याच्या मूर्त्ती कोणत्या प्रकारच्या आहेत याची जी परीक्षा आहे ती त्यांचीं चक्रें व मुखें मोजून त्यांचा निश्चय होतो. याविषयीं पुराणांत माहात्म्य लिहिलें आहे तें:—

शालग्रामशिलायां तु नित्यं सन्निहितो हरिः ॥
तेषां स्पर्शनमात्रेण मुच्यते सर्वकिल्बिषैः ॥ १ ॥
हिरण्यवज्रकीटेन निर्मितं चक्रमुत्तमं ॥
तत्र स्नानमवाप्नोति वाराणस्या शताधिकं ॥ २ ॥
म्लेच्छदेशेऽशुचौ वापि चक्रांको यत्र तिष्ठति ॥
योजनानां तथा त्रीणि मम क्षेत्रं वसुंधरे! ॥ ३ ॥
यो मृतस्तत्समीपे तु मृते वा नियतेऽतकं ॥
सर्वमोक्षमवाप्नोति सत्यं सत्यं न अन्यथा ॥ ४ ॥
शालग्राममयी मुद्रा संस्थिता यत्र कुत्र चित् ॥
वाराणस्यां यवाधिक्यं समतात् योजनत्रयं ॥ ५ ॥ पद्मपुराण.

नेपाळांत पशुपतिनाथ आहे, त्यापासून वर १६० कोसांवर मुक्तनाथ म्हणून शिवस्थान आहे तेथें गंडकी नदींत हे पाषाण सांपडतात. तेथें या पाषाणाचा मोठा पर्वतच असून त्याचे दगड आणून त्यांच्या मूर्ती करितात व त्यांवर यंत्रें कोरतात. शिवाय ह्या पाषाणाचे खल होतात व सोन्याच्या कसोटीलाही हाच दगड उपयोगी पडतो. शालग्रामास स्त्रिया व शूद्र यांनीं स्पर्श करूं नये असें मत आहे. परंतु हें ब्राम्हणांचें मत वैराग्यांनीं गुंडाळून ठेवून ते वाटेल त्यास शालग्रामाची पूजा करूं देतात. वैष्णवांमध्यें शालिग्रामपूजा श्रेष्ठ धरिली आहे. इतर ब्राह्मण जें प्रायश्चित्तार्थ पंचगव्य घेतात त्याबद्दल वैष्णव हे, शालिग्रामावर पाणी घालून त्याचें तीर्थ घेतात. या दगडांवर सोन्याच्या बारीक रेघा असतात. त्यांवरून ते सोन्याच्या खाणींशीं संलग्न असणारे दगड असावे असें अनुमान होतें.

१०९. भरतखंडांत ज्या पुण्यनद्या मानिल्या आहेत त्या:— १ भागीरथी, २ यमुना, ३ सरयू, ४ गोदा उर्फ वृद्धगंगा अथवा गोतमी, ५ कृष्णा, ६ साबरमती उर्फ काश्यपी गंगा, ७ नर्मदा उर्फ रेवा, ८ तुंगभद्रा, ९ कावेरी, १० वेण्या, ११ तापी, १२ सरस्वती, इत्यादि.

११० सरस्वती नदी पांच ठिकाणीं प्रसिद्ध असून गुप्त झाली आहे असें म्हणतात.—

रुद्रावर्त्ते कुरुक्षेत्रे श्रीस्थले पुष्करेऽपि वा॥
प्रभासे पंचमे तीर्थे पंच प्राची सरस्वती ॥ १ ॥

(१) रुद्रावर्त्त हिमालयांत आहे असें म्हणतात तेथें सरस्वती आहे. (२) कुरुक्षेत्र दिल्लीपलीकडे आहे तेथें सरस्वती आहे. ( ३ ) श्रीस्थल म्हणजे सिद्धपूर हें गुजराथेंत असून तेथें सरस्वती आहे, ती अंबाजीचे डोंगरांतून कोटेश्वरापासून निघाली ती झिंझुवाडा याजवळ गुप्त झाली. म्हणजे, पुढें रेतीचा मुलूख आल्यामुळें त्यांत चालेनाशी झाली. ( ४ ) पुष्करतीर्थांतही ती आहे असें म्हणतात, आणि ( ५ ) प्रभासीं आहे

असें म्हणतात. तेथून प्रभासाजवळ प्राचीन सरस्वती आहे, तिचें पाणी फार निषारी असून त्या ओघांत अधरमाधव म्हणून एक मूर्त्ति आहे. प्रभास, सोमनाथ व वेरावल हीं एकाच गांवाचीं नावें आहे. प्रभासास यादवांनीं जो आपला नाश करून घेतला तो हिरण्यानदीचे तीरीं झाला असें म्हणतात. येथेंच, जेथें श्री कृष्णास बाण लागला तें भल्लुका क्षेत्र आहे व त्याचा देह पडला तें देहोत्सर्गक्षेत्र आहे. [ पहा, गोष्ट ९५—[१] सोमनाथवर्णन. ]

१११. पूर्वीं, अग्निहोत्री ब्राम्हणांस बोलावून आणून त्यांनां घरें व नेमणुका करून देऊन ब्रम्हकर्म करावयास लाविलें असतां त्यांत मोठें पुण्य आहे असें मानलें होतें. यास्तव क्षत्रिय राजे व इतर हिंदूराजे हे त्याप्रमाणें ब्राम्हणांची वस्ती करवीत. याचीं उदाहरणें बहुत आहेत. वाईस माधवराव रास्ते यांणीं धर्मपुरी वसविली. त्या वस्तीकरितां सरकारांतून मौजे केंजळ हें गांव इनाम करून देऊन ब्राह्मणांस घरें करून दिलीं आहेत; खंडेराव रास्ते यांस, मौजे वाकरूळ हें आंग्र्यांचें इनामी गांव असून तेथें वस्ती करण्याकारितां आंग्रे सरकारांनीं एक मोठी खार दिली आहे, तिच्या उत्पन्नाचे भाग करून देत असतात; याचप्रमाणें प्रतिनिधींनीं कऱ्हाडास ब्राह्मण वसवून अग्रहार गांव दिले आहेत; गोपिकाबाई पेशवे यांणीं नासिकाजवळ गंगापुरास याच प्रमाणें वस्ती करविली आहे शिवाय गोपिकाबाईनीं निफाड तालुक्यांतील चितगांव हें १३ ब्राह्मणास व्यतिपाताबद्दल दान केल्याचें प्रसिद्ध आहे. अमदाबादेस आबा शेलूकर यांजकडे गुजराथ सुभा झाला तेव्हां त्यांनीं जे पांच अग्निहोत्री दक्षिणेंतून नेऊन व त्यास वर्षासनें करून देऊन अमदाबादेस भद्रेंत घरें देऊन ठेविले आहे. त्यांचीं नावें:—

१ वैजनाथभट, त्यांचे पुत्र रामभट तुळजापूरकर.
२ श्रीनिवासभट पुणतांबेकर. यांचा मुलगा बाळकृष्णभट किणगी.
३ शिवरामभट अयाचीत नासिककर.
४ रंगभट नासिककर.

१ राजाराम भट्ट जागलेडकर.

प्राचीनकाळीं सिद्धराज जयसिंग ह्मणून अनिहिलपूरचा राजा होता, त्याणें हिंदुस्थानांतून सहस्त्रब्राह्मण नेऊन व त्यांस स्वाध्य देऊन गुजराथेंत वसविले त्या जातीस हल्लीं औदीच्यसहस्त्र असें ह्मणतात. त्या काळीं किती एकांची अशी प्रतिज्ञा असे कीं, दान ह्मणून घ्यावयाचेंच नाहीं. राजे पाठीस लागत कीं, दान घ्या; आणि त्यांत जो दान घेई त्यास जातीबाहेर ठेवीत. याजमुळें औदीच्य टोळकिया ही जात गुजराथेंत उत्पन्न झाली. ब्राह्मणांस इच्छाभोजन द्यावें अशी प्राचीन चाल होती; त्याची श्रियाळ राजाचे आख्यानांत तर पराकाष्ठा वर्णिली आहे. याप्रमाणें ब्राह्मणांनीं सर्वत्रो लोकांस आपले कबजांत आणून स्वकीय महत्व वाढविलें होतें. अद्यापिही बाया बापड्या व त्यांजसारखेच जे गृहस्थ आहेत त्यांजमध्यें ही समजूत कायम आहे. आतां यापासून देशाचें हित झालें किंवा अहित झालें याचा विचार सर्वांनीं करावा.

११२. गणिताचे तीन भाग आहेत: होरा, गणित आणि संहिता. होरा ह्मणजे जातक, ताजक, व प्रश्न केला तर उत्तर सांगणें; गणित ह्मणजे देशकालज्ञान; आणि संहिता ह्मणजे मुहूर्त व त्याचीं फलें वगैरे. धर्माचे ही चार भाग किंवा पाद आहेत ते: तप, सत्य, व्रत, व दान.

११३. ब्रह्मक्षत्रिय ही जात दिल्लीहून अकबराचे स्वारीबरोबर गुजराथेंत आली. त्या जातींतील तोडरमल्ल याजकडे मोठा हुद्दा होता. त्याचे दोन जांवई चितोडगडचे लढाईंत गेले, तेव्हां त्याचे विधवा कन्यांचीं पुन्हा लग्नें करण्यास अकबरानें सांगितलें. परंतु त्यामुळें जातींत फाट होऊन, लवाणे हे मूळचे क्षत्रिय होते त्यांणीं मात्र ही चाल कबूल केली व त्याप्रमाणें ते हल्लीं पुनर्विवाह करीत आहेत. बाकीचे राहिले त्यांणीं पुनर्विवाह कबूल केला नाहीं. पुढें तोडरमल्ल याचे आश्रयानें अमदाबाद, जुनागड, हैदराबाद ( सिंध ) आणि लखनौ या चार ठिकाणीं ब्रह्मक्षत्रिय यांची वस्ती झाली. यांचे गुरु परोत ह्मणजे पुरोहित हे पंजाबी सारस्वत आहेत. सोरटीये सारस्वत हे वैष्णव असल्या-

मुळें हिंसा करीत नाहींत परंतु पंजाबी सारस्वत हे हिंसा करितात. त्यांचे कुळधर्महि देवीसंबंधी असून त्यांत बळी वगैरे देतात.

११४. मालवणचे किल्ल्यांत शिवाजी महाराजांची मूर्ति आहे, तिची पूजा अभ्यंकर म्हणून ब्राह्मण आहेत ते करितात व त्या मूर्तीवर अभिषेक करितात. दुसरे ब्राह्मणही तेथें अभिषेकास जातात. या देवळाचे कारभारी राणेराव म्हणून मराठे आहेत. त्याचप्रमाणें बावामलंग म्हणून कल्याणाजवळ एक पीराचें स्थान आहे त्याचे पुजारी केतकर उपनावाचे ब्राह्मण आहेत. अव्वल इंग्रजींत कांहीं मुसलमानांनीं या ब्राह्मणांशीं तंटा करून सरकारांत फिर्याद केली, तेव्हां ब्राह्मणांनीं साहेबांचे विद्यमानें पीरास चिठ्ठया टाकण्याचें ठरविलें व ज्यास पीर कबूल करील त्यास पुजारीपणा द्यावा असें ठरल्यावरून पीरापुढें चिठ्ठया टाकिल्या. त्यांत ब्राम्हणाचेंच नांव आलें. त्याप्रमाणें केतकर हे पीराची शुश्रूषा ठेवितात. हा पीर पेशव्यांस पावल्यावरून त्यांनीं मुळीं हें संस्थान केतकरांकडे दिलें असें म्हणतात. असेंच मारवाडांतही जैनांचे देवळांत देवाचे पुजारी ब्राम्हण असतात!

११५. शाक्तमार्गी असें म्हणतात कीं, दशावतारांतील परशुराम हा शाक्त होता. त्या परशुरामानें परशुरामसूत्र व परशुरामकृत कालीसहस्रनाम असे दोन ग्रंथ केलेले प्रसिद्ध आहेत. परंतु हा अवतारी परशुराम किंवा त्याच नांवाचा कोणी पंडित होता हें स्पष्ट कळत नाहीं. मोठ्याचें नांव द्यावें ही चाल सर्वत्र आहे. याचप्रमाणें शंकराचार्यस्वामी हेही शाक्त होते असें म्हणतात व त्यास प्रमाण एक प्रपंचसारसंग्रह व दुसरा कौलप्रशंसा हे दोन ग्रंथ त्यांचे नांवावर आढळांत येतात, परंतु हें खरें किंवा खोटें हें समजत नाहीं.

११६. मालेगांवकर रतनसिंग जाधवराव, यांचे उपाध्ये भास्करराव म्हणून देशस्थ ब्राम्हण होते. ते शाहूमहाराजांचे कारकीर्दीत मोठे सिद्ध शाक्त म्हणून प्रसिद्ध होते. पुढें त्यांचे शिष्य उमानंदनाथ व दुसरे उपेंद्रबावा तैलंग हे होते. सदरील राव सातार्‍यांतच राहात असून त्यांनीं अंतर्वरिवस्या व बहिर्वरिवस्या असे दोन ग्रंथ व सप्तशतीवर गुप्तवती

नायक टीका व विधान अशीं दोन प्रकरणें केलीं आहेत. त्यांचे नातु मल्हारश्रौती हे पुण्यांत पेशवे कारकीर्दींत प्रसिद्ध होते. सातार्‍यास दुसरे असेच मचादेव माहुलीकर म्हणून मोठे शाक्त होते. मराठी राज्यांत मंत्रशास्त्री शत्रूवर अनुष्ठानें करण्याकरितां बाळगीत. पर्वतेश्वरचे द्रवीड हे मंत्रशास्त्री ह्मणूनच पेशव्यांनीं त्यांस आणून नेमणुक देऊन ठेविलें होतें.

११७. राजपूत ( गिरासी ) यांची वस्ती काठेवाड प्रांतीं फार आहे. तिकडील सर्व राजे व संस्थानिक याच जातीचे आहेत. त्यांचीं आडनांवें येणेंप्रमाणें:—

१ गोहेल रजपूत हे पांडवांचे वंश म्हणवितात. हे ज्या प्रांतांत राहातात त्यास गोहेलवाड ह्मणतात. भावनगरचा ठाकूर हाही गोहेलच आहे. त्यांचे पोटांत वच्छाणी, गोविंदाणी, देवाणी, आदेराणी व लाटिया अशा पांच शाखा आहेत.

२ जाडेजा, यांस जाधवही ह्मणतात. त्यांतून जे कांहीं बाटून मुसलमान झाले त्यांस गोले सलास व मेमने असें ह्मणतात. जुनागड व कच्छ भूज येथील राव हे जाडेजा या आडनांवाचेच आहेत.

३ चव्हाण पूर्वीं पृथ्वीराज हा दिल्ली व अजमीरचा राजा होता. त्याचें हेंच आडनांव होतें. याजवळ चंदभाट होता.

४ सरवेया, ५ वाळा, ६ वाजा.

७ राठोड, हे बळीचे वंश ह्मणवितात. याच जातीचे जोतपूरचे राणे आहेत.

८ सिसोदिया, या जातीचे उदेपूरचे महाराणे आहेत.

९ झाला, या लोकांचे वस्तीस झालावाड ह्मणतात.

१० चूडासमा, ११ वाघेला.

१२ चावडा, पूर्वीं वनराज ह्मणून राजा होता तो या जातीचा होता.

१३ परमार, धारचा विक्रम.

१४ सोळंखी, पाटणचा राजा सिद्धराज ह्म या जातीचा होता.

१५ बरया, १६ सिद्दी,

१७ जेठवा—हे हनुमंताचे वंश ह्मणवितात.

१८ जाधव, १९ कच्छवाह, जयपूरचे राजे या जातीचे आहेत.

२० तुवर, आणि २१ वाढेल, किंवा वाघीर हे या देशीं आहेत.

११८. प्रथम काशीचें माहात्म्य वाढलें असें अनुमान करितां येतें. नंतर त्याचा नमुना पाहून दुसरे क्षेत्रींचे ब्राह्मणांस उमेद येऊन त्यांणीं आपले गांवचीं माहात्म्यें लिहिलीं. त्यांत मुख्य विषय असा असतो कीं, आमचें क्षेत्र काशीपेक्षां मोठें व श्रेष्ठ आहे. यांचीं उदाहरणें—

आजन्म मरणाभ्यासा—द्वाराणस्यां तु यत्फलं ।
तत्फलं निमिषार्धेन पंचवट्यां तु राघव! ॥—पंचवटी माहात्म्य.
दक्षिणाभिमुखे गंगा यत्र देवो नृकेसरी ।
तत्र श्रीविजयो तीर्थं काश्यां शतगुणं भवेत् ॥—कुशतर्पणमाहात्म्य.
रेवातीरे तपः कुर्या—न्मरणं जान्हवीतटे ।
दानं दद्यात्कुरुक्षेत्रे त्रिविधं गौतमीतटे ॥
केदारे च कुरुक्षेत्रे पुष्करे श्रीस्थले तथा ।
प्रयागे पंच वर्षानि माघस्नानं करोति यः ॥ पद्मपुराण, उत्तरखंड.
काश्यां माघे च यत्पुण्यं सर्वतीर्थेषु यत्फलं ।
तत्फलं समवाप्नोति ताम्रागस्नानमाहनात् ॥
काशीयात्रा पांच, द्वारकेच्या तीन; पंढरीची जाण एक यात्रा॥ }
तुकाराम. }

इत्यादि शतशः उदाहरणें आहेत. याचा खुलासा पाहणें असल्यास आमच्या ' स्वाध्याय ' नामक पुस्तकांत पहा— ( पृ० १०१ पासून पुढें. )

११९. म्हैसुरांत व बंगलूरास जैन ब्राह्मण आहेत ते चार वेद पढतात. यांचीं नांवें; १ सद्धर्मवेद, २ तत्वार्थवेद, ३ आगमार्थवेद, आणि ४ द्वादशांगवेद.

१२०. शंकराचार्य स्वामी यांस शिवाचा अवतार ह्मणतात; रामानुज यास शेषाचा अवतार ह्मणतात; मध्वाचार्यांस वायूचा अवतार ह्मण-

तात; निंबार्कास सूर्याचा अवतार ह्मणतात; वल्लभाचार्यांस अग्नीचा अवतार म्हणतात; आणि स्वामी सहजानंद यांस नारायणाचा अवतार म्हणतात. याप्रमाणें अवतारी पुरुष मानण्याची लोकरूढी आहे.

१२१. रणजितसिंग महाराज हे अटक नदी उतरून पलीकडे जाऊं लागले तेव्हां त्यांचा गुरु येऊन म्हणूं लागला कीं, अटकेपर्यंत मात्र हिंदूंस जाण्याची मर्यादा आहे. तेव्हां रणजितसिंगमहाराज बोलले कीं,—

सब भूम है गोपालका, इसमे अटक कहा?
जिसके मनमें खटक रही, वोही अटक रहा!

असा जाब देऊन गुरुजींस म्हणाले कीं, तुम्हीं महत्कार्यास विघ्नकर्ते होऊंनये.

१२२. हिंदु लोकांत अनेक घातकी, निरुपयोगी व अनर्थकारक चाली आहेत त्यायोगानें ते मरून चित होऊन गेले आहेत! या चालींपैकीं नवर मुलाचें व मुलीचें घटित पाहण्याची चाल आहे. या घटितानें मोठे राजास चांगली कन्या मिळत नाहीं. एखाद्या मूर्ख जोशी बोवांनीं अंक मोजून सांगितलें कीं, या मुलींचें खडाष्टक येतें किंवा या मुलीचा गण मिळत नाहीं आणि ती गोष्ट राणी व राजे यांजकडे कळविली ह्मणजे तीं अज्ञानी माणसें या अज्ञान ज्योतिषी बोवांचे फांशांत सांपडून आपले कामास मूर्खपणानें विघ्नें करून घेतात; आणि चांगल्या कन्या टाकून वाईट कन्या करितात. तसेंच, येण्याजाण्यास मुहूर्त पाहून चांगली वेळा जोशीबोवा सांगतील त्याप्रमाणें जाण्याचा विचार होतो, याजमुळें फार विघ्नें उत्पन्न होतात. हिंदूलोकांनीं आपले अज्ञानानें अनेक फसवणुकांमध्यें पडून जी आपली धूळ करून घेतली त्यांतील हें एक उदाहरण आहे. याविषयीं लोकांनीं सावध व्हावें याचप्रमाणें विनाकारण कार्यांत खर्च करण्याची चाल आहे तीही बहुत अहितप्रद आहे. परंतु हें आमचे लोकांस कळावें कधीं?

१२३. अल्प वयांत लग्न करण्याची वहिवाट सुरू झाली त्या दि-

वर्षापासून या देशास क्षयरोग लागला असें म्हटलें तरी चिंता नाहीं. सर्व वीर्य, बळ व पराक्रम जाऊन हल्लीं आहेत या प्रकारचे अनेक भ्रांतींनीं बद्ध असे हे लोक होऊन बसले. हजारों शृंखळा यांचे पायांत पडल्या आहेत व तेणेंकरून महारोगग्रस्त मनुष्याची स्थिति होते त्या प्रमाणें या हिंदू लोकांची स्थिति सर्व जगतांतील राष्ट्रांशीं तोलून पाहिली तर महारोग्यासारखी सर्व अंगें झडून अशक्तता आलेली अशी दिसते!

१२४. घोड्यांचे व कबूतरांचे रंग फार असतात. त्यांपैकीं कितीएक घोड्यांचे रंगांचीं नावें.

| | | |
|---|---|---|
| १ कुमाइत अबलक. | ७ सुरंग. | १४ अबलक. |
| २ मेलासबजा. | ८ चंपाजरदा. | १५ तांबडा अबलक. |
| ३ जरदा. | ९ श्रीखंड जरदा. | १६ सोनसळा बोर. |
| ४ समन जरदा. | १० चितोडा. | १७ काळा कुमाईत. |
| ५ अष्टमंगळ. | ११ सारंगा. | १८ बोर सुरंग. |
| ६ श्यामकर्ण. | १२ गंगा. | १९ मोतियासबजा. |
| | १३ मव्हासुरंग. | २० सफेद निळा.इ० |

याविषयीं शालहोत्र म्हणून एक ग्रंथ आहे. त्यांत त्यांची परीक्षा व औषधी लिहिल्या आहेत. त्याप्रमाणेंच घोड्याचे भोंवऱ्यावरून त्याचे धन्यास लाभ व नाशाचें भविष्य करण्याच्या भ्रांतीही त्यांत फार लिहिल्या आहेत. वर कन्येचें घटित पाहण्याच्या मूर्ख चालीविषयीं जें लिहिलें आहे त्याप्रमाणेंच हें आहे.

१२५. बाजीराईंत सोदेगिरी फार माजली त्या वेळेस उनाड लोक शेंडी संजाबदार, पागोटें कंगणीदार, जोडा अणीदार, अंगरखा कळीदार, मिशा पीळदार, धोत्रें चुणीदार, भोंवया कमाणदार, गंध साकळीदार, आणि छाती गोलदार असीं ढोंगें करूं लागून पूर्वींचा साधेपणा गेला!

१२६. श्री अनंत पुरम् या गांवचें नांव इंग्रजांनीं त्रावेन्द्रम् असें

पाडलें. तेथील राजाचा किताब खालीं लिहिल्या प्रमाणें दोन हात लांब आहे.

" हिज् हायनेस् श्री पद्मनाभ दासावानजी बलरामवर्मा कुळशेखर कीर्तिपती मुनी सलतान महाराज राजाराम राजाबाहादूर सर समशेर जंग ग्रांट क्रॉस स्टार आफ् इंडिया महाराज त्रावणकोर. "

या किताबावरून या देशांत कसकशा कारकीर्दी झाल्या त्या सर्व लक्ष्यांत येतात. ह्मणजे प्रथम संस्कृत, नंतर प्राकृत, नंतर मुसलमानी आणि नंतर इंग्रजी. या चारींचीं स्वरूपें या अलकाबांत ( पदवींत ) आहेत.

१२७. ज्याचे लांबी रुंदीचा पत्ता नाहीं त्यांत सर्वांस शिरण्यास सांपडतें: ज्याचें गोत्र ठाऊक नाहीं त्याचें गोत्र काश्यप. जो विषय कोठें आढळत नाहीं त्यास जागा बौधायनसूत्र. ह्मणजे, त्या सूत्राचा पत्ता नसून पाहिजे त्याणें त्याचाच आधार सांगावा. जी उपासना वेदांत नाहीं ती उपनिषदांत पाहावी. आणि याचप्रमाणें अनेक माहात्म्यें व कथा यांविषयीं स्कंदपुराणाचा पत्ता नाहीं ह्मणून त्याचें नांव घेण्यास सर्वांस सांपडतें!

१२८. शिवाजी राज्यावर बसला त्याचा श्लोक—

प्रासादो जगदीश्वरस्य जगतो मानंदनोनुज्ञया
श्रीमच्छत्रपतेः शिवस्य नृपतो सिंहासने तिष्ठता ॥
शाके शाण्णव बाणभू मिगणनामानंदसंवत्सरे
ज्योतीराजमुहूर्तकीर्तिमहते शुक्लाय सार्षेतिथौ ॥

ह्मणजे,—१५९६ ज्येष्ट शुद्ध १३ शनवार, आनंदसंवत्सर, रायगड.

१२९. शिवाजीनें अष्ट प्रधान नेमिले त्यांचा श्लोक—

प्रधान, आमात्य, सचीव, मंत्री, सुमंत, न्यायाधिश, दिव्य शास्त्री ॥
सेनापती, त्यांत असे शहाणा अष्टप्रधानीं नृप मुख्य जाणा ॥

१३०. पुणें प्रांतीं अष्टगणपती आहेत, त्यांचा श्लोक–

स्वस्तिश्री गणनायको गजमुखो मोरेश्वरे सिद्धिदं
बल्लाळे मुरुडो विनायक माढा ( गढ ) चिन्तामणिस्थेवरे ॥
लेण्याद्रौ ( जुन्नर ) गिरिजात्मकं सुवरदं विघ्नेश्वरं ओझरे
ग्रामे रांजणसंज्ञके गणपती दद्यात्सदा मंगलं ॥

१३१. नासिकास सिंहस्थ हें मोठें पर्व असून तें आमचे आठवणींत शके १७४८ सालीं होतें. त्या सालीं तेथें जरी मरीनें माणसें फार मेलीं. त्यापुढें पुन्हां १७६८ सालीं जरीमरीचा मोठा प्रळय झाला. त्यानंतर पुढें शके १७८० सालीं कपिलाषष्ठी होती तेव्हां तेथें मोठी यात्रा भरली होती. पूर्वींची १२--१२ आणि १८--१८ पायऱ्यांची धारण जाऊन लोकांस महर्घता अशी या कपिलाषष्ठीच्या पर्वणीपासूनच प्राप्त झाली! तिची या २--४ सालांत तर कमालच झाली. पुढें शके १७८४ त व नंतर शके १७९५ सालीं असे सिंहस्थ पाहण्यांत आले. नासिक क्षेत्र हें फार द्रव्यवान् असून सोन्या रुपयाचे दागिने घालून बायका गोदावरीवर पाण्यास येत त्यांचे हातांतील शेरभर सोनें दररोज गंगेचे घांटावर झिजत असे असें म्हणतात. परंतु या क्षेत्रीं लुटी फार झाल्या. अजब सिंग, हरीपंत भावे, होळकराचे पेंढारी, अमृतराव पेशवे इत्यादिकांनीं लुटून तेथील बहुत द्रव्य हरण केलें. पुढें राज्यक्रांती झाल्यावर पेठे, राजेबहादर, हिंगणे वगैरे जे तेथील मोठाले गृहस्थ ते गरीब झाले. त्याजमुळें आतां नासिकांत कांहीं अर्थ राहिला नसून सर्व दारिद्र्यग्रस्त झालें आहे!

१३२. गोऱ्या कुंभार म्हणून जो साधू झाला त्याचें मूळगाव तेर-गांव नांवाचें धाराशिव पासून ७ कोसांवर आहे.

१३३. थोरले माधवराव पेशवे यांची आई गोपिकाबाई यांणीं बापुभट बोवा घारपुरे यांचा उपदेश घेतला तेव्हां त्यांस एक लक्ष रुपये दिले. त्यांचे पुत्र रामभट घारपुरे यांचा घांट व देऊळ नासिक येथें आहे. त्यांची मान्यता बाजीराव साहेब यांजवळ फार होती. ते मंत्र-

शास्त्रांत मोठे पराक्रमी आहेत. असे श्रीमंतास वाटत होतें. त्यांस इनाम जाहागिरीही मिळाल्या आहेत त्या त्यांच्या वंशाकडे चालतात.

१३४. नाना फडणिसांचे वेळेस पाणिपतांतील भाऊ साहेब ह्मणून एका मनुष्यानें वेष घेऊन तोतया केला. त्याची भूल इतकी वाढली कीं, त्यास बहुत लोक सामील झाले व तो भाऊ साहेब ह्मणून बहुत माहीतगारीच्या गोष्टी सांगे. परंतु नानांची खातरी होती कीं, हा मनुष्य खोटा आहे. पुढें त्यास आंग्रे यांनीं कोंकणांत धरून पुण्यास पाठविलें. तेथें नाना व महादजी शिंदे यांणीं ठराव करून त्यास मरणाची शिक्षा दिली. इंग्रजी अम्मल झाल्यावर सवाई माधवरावांची बायको यशोदाबाई ह्मणून एक बाई प्रगट होऊन तिणें सरकारांत कलकत्यापर्यंत अर्ज्या व फिर्यादी केल्या. ही बाई कितीएक दिवस पर्यंत पुण्यास असून खणळींत रामाचे देवळांत राहात असे, शहाजी महाराज यांचा बाप राजे चतरसिंग ह्मणून एक मनुष्य प्रगट झाला होता. त्याची चौकशी होऊन तो खोटा ठरला आणि त्यास इंग्रज सरकारानें पन्नास रुपये पेन्शन देऊन कैदेंत ठेविलें होतें. चतरसिंग यांणें १८०२ सालीं बाजीरावावर बंड केलें होतें. ह्मा नंतर परशुराम भाऊंनीं सातारा घेतला तेव्हां जो चतरसिंग पळून गेला. तोच मी म्हणून हा पुढें इंग्रजी झाल्यावर प्रगट झाला. परंतु त्याचे बायकोनें व पुत्रांनीं त्यास ओळखलें नाहीं सबब तो रद्द झाला. गोविंदराव घोरपडे यांचाही तोतया झाला होता परंतु तो असाच रद्द झाला. भागवतांतही प्रतिवासुदेव ह्मणून कृष्णाचा तोतया झाला होता, असा लेख आहे. त्याचप्रमाणें गुजराथेंत सोजित्रें येथें हरीकृष्ण महाराज ह्मणून स्वामी नारायणाचा तोतया झाला होता. त्यानंतर हल्लीं धोळका येथील छोटमुल्लाल मुन्सफ याचा मुलगा मथुरेस बुडाला, त्याचा एक भभुतगीर ह्मणून तोतया झाला आहे. परंतु तो अमदाबादेंत आल्यावर त्याची आई, बायको, व सासरा यांणीं त्यास कबूल केलें. तरी बहुत लोकांस तो खोटा वाटतो. ठाणें जिल्ह्यांतही थोडे दिवसांपूर्वी असाच एक मुलगा आपल्या आईबापांपासून १०।१२ वर्षेपर्यंत नाहींसा झाला होता,

तो पुढें आईबापांकडे आला. व त्यास आई बापांनीं ३-४ महिने आपले जवळ ठेवून आपल्या तरूण सुनेचें गर्भाधानही केलें. परंतु २-४ महिन्यांनीं त्यांणीं त्यास खोटा ह्मणून काढून दिलें. तेंव्हा तो मनुष्य ठाण्यास येऊन लोकांच्या येथें वार लावून निर्वाह करीत राहिला आहे अशा अनेक प्रकारच्या भूली व लुच्चेगिऱ्या या जगांत चालू आहेत!

१३५. अमदाबादे पासून ४० कोसांवर विरमगांव परगण्यांत झिंझुवडा ह्मणून एक प्राचीन शहर आहे. परंतु तें हल्लीं उजाड आहे तरी त्याचे दरवाजे, कोट, त्याचा जिना व तेथील गोमुखी गंगा वगैरे पाहण्या जोगीं आहेत. याचप्रमाणें बडोद्यापासून दहा कोसांवर पावागड ह्मणून किल्ला असून त्या जाग्याचें पावकाचल माहात्म्यही आहे.त्या किल्ल्यावर महाकालीचें देऊळ आहे. या गडाखालीं चांपानेर ह्मणून एक मोठें शहर होतें. तें हल्लीं वैराण झालें आहे. परंतु त्याची प्राचीन स्थिति दाखविणारे त्याचे दरवाजे,मांडवी,लखी माहाल, तोरणें वगैरे बहुत ठिकाणें आहेत. ओसाड घरांच्या दगडी विहिरी पुष्कळ असून तलावही बहुत आहेत. या गांवीं पटईरावळ ह्मणून राजा होता. ( याविषयीं पहा गोष्ट ३८ ). ३८ हा प्रांत शिंद्याकडे होता तो हल्लीं इंग्रजांकडे आहे.हा प्रांत डोंगरी असून त्यांत हालोल,कलोल,गोद्रे, जालोद व दाहोद असे तालुके आहेत. त्यास पंचमहाल म्हणतात. यांत जमीन चांगली आहे परंतु पाणी वाईट व वस्ती थोडी असून तेथें भावडे व कोळी लोक राहतात. या पंचमहालाची वहिवाट खेडा जिल्ह्याखालीं आहे.

१३६. आपय्यादीक्षित यांणीं ग्रंथ लिहिला त्यांत संन्यासाची मोठी स्तुति करून संन्यासाशिवाय मोक्ष नाहीं असें लिहिलें आहे. पुढें ते मरणावसानी झाले तेंव्हा त्यांचे स्नेही त्यांस ह्मणाले कीं,तुम्हांस तुमचे लेखाप्रमाणें आम्ही संन्यास देतों. त्यावेळीं त्यांणीं उत्तर केलें कीं, आम्ही शिवाचे भक्त आहों, शिवभजनानें आम्हांस मुक्ति होईल. आम्हीं संन्यासाविषयीं जें लिहिलें तें ग्रंथाचा जसा ओघ आला तसें लिहिलें परंतु आमचें मत तसें नाहीं! याजवरून पूर्वींचे ग्रंथकार हल्लींचे पाके-

ह्यांसारखेच होते असें दिसतें. म्हणजे जिकडून फी मिळेल अथवा जिकडे कल फिरेल त्याचा पक्ष घेऊन बोलत. व तसेंच, ते जो पक्ष हातीं घेत त्याचें यथेच्छ मंडण करीत. भर्तृहरी हा उत्कृष्ट कवि होता, परंतु त्याणें ज्या तोंडानें वैराग्यशतक लिहून स्त्रियांची निंदा केली त्याच तोंडानें शृंगारशतक लिहून स्त्रियांचें महत्व लिहिलें! तेव्हां याजवरून त्यांस खरा स्वाभिप्राय कांहीं नव्हता असें दिसतें.

१३७. शिवाजी छत्रपती भोंसले याचा जन्म शके १५४९ विजय नाम संवत्सरीं झाला. त्यास प्रतापगडच्या भवानीची भक्ति होती. त्याणें पुंडावे करून जय मिळविले व पुढें १५९६ त गागा भट्ट येऊन त्यांणीं रायगडीं शिवाजीच्या वयाचे ४७ व्या वर्षी त्याचें मौंजिबंधन केलें आणि राज्याभिषेकही केला. त्यापासून दक्षिणेंत भोंसले राजे झाले. याप्रमाणें पुढें शिवाजी वर्षे ६, संभाजी ८, शिवाजी ताराबाईचा मुलगा ७, राजाराम ११, आणि शाहु ४३, एकून ७५ वर्षे पर्यंत भोंसलेशाही चालली होती.

१३८. भरतखंडांत साधू संत होऊन ज्यांणीं कीर्तन, भक्ति, व ज्ञानमहिमा वाढविला त्यांचीं नांवें—

| | |
|---|---|
| १ मच्छिंद्रनाथ. | २ गोरखनाथ. |
| ३ जालंदरनाथ. | ४ कानीपा. |
| ५ भर्तृहरी. | ६ गोपीचंद. |
| ७ चोखामाहार. | ८ रोहिदासचांभार. |
| ९ सजणाकसाई. | १० नरहरि सोनार. |
| ११ गोराकुंभार. | १२ सावंतामाळी. |
| १३ निराबाई. | १४ नागोपरगारंद. |
| १५ धनाभाट. | १६ गुरुदादू |
| १७ एकनाथपंत. | १८ रामदास स्वामी चैतन्य ब्रह्मचारी. |
| १९ कृष्ण जयराम स्वामी. | २० वामनस्वामी. |
| २१ तुकाराम मराठावाणी. | २२ बोधराज. |
| २३ कबीर. | २४ मध्वमुनीश्वर. |

| | |
|---|---|
| २५ अमृतराव. | २६ शंकराचार्य. |
| २७ जयदेवस्वामी. | २८ चांगदेव. |
| २९ भानुदास. | ३० मुकुंदराज. |
| ३१ निवृत्तिनाथ (त्रिंबकेश्वरीं.) | ३२ ज्ञानेश्वर. (आळंदीस). |
| ३३ सोपानदेव सासवडकर. | ३४ मुक्ताबाई. |
| ३५ नामदेव शिंपी. | ३६ कूर्मदास. |
| ३७ बाजीत पठाण. | ३८ लतीफखान. |
| ३९ शाहाहुसेन खान. | ४० मुकुंद दास. |
| ४१ रामानंद स्वामी. | ४२ कन्याहरदास. |
| ४३ केशवस्वामी. | ४४ रंगनाथस्वामी. |
| ४५ आत्माराम स्वामी. | ४६ मुक्तेश्वर. |
| ४७ आनंदमूर्त्ति. | ४८ निरंजनस्वामी. |
| ४९ गणेशनाथ. | ५० कमाल. |
| ५१ मालोपंत. | ५२ स्वामिनारायण. |
| ५३ मोरोपंत. | ५४ सौभागशाहा फकीर. अमदाबाद. |
| ५५ नाभाजी. | ५६ जनाबाई. |
| ५७ निराबाई. | ५८ मध्वाचार्य. |
| ५९ निंबार्कस्वामी. | ६० रामानुजस्वामी. |
| ६१ विष्णुस्वामी. | ६२ वल्लभाचार्य. |
| ६३ चैतन्यगुरु. | ६४ नित्यानंदस्वामी. |
| ६५ गुरुनानक. | ६७ बोधले बोवा. |
| ६८ सखारामबोवा कवाडकर. | ६९ अक्कलकोटकर स्वामी. |
| ७० चंडिराम बोवा. | ७१ जयराम नाना नगरकर. |
| ७२ लाला भगत. | ७३ कुबेरजी भगत. |
| ७४ माधवगीर बोवा. | इ० इ० इ० |

या साधूंच्या कथा व कविता बहुत प्रसिद्ध आहेत. त्यांच्या समाधिस्थानांचे दर्शनार्थ बहुत यात्रा भरतात. भक्तमाला, संतविजय, भक्तलीलामृत, आणि भक्तिविजय वगैरे यांच्या चरित्रांचे ग्रंथ आहेत. शांत

त्यांनीं जे चमत्कार केले ते किंवा ज्ञानविषयीं जो लौकिक आहे तो सर्व लिहिला आहे. म्हणजे तुकाराम देहासहित स्वर्गास गेले, ज्ञानेश्वरांनीं भिंत चालविली, चांगदेव वाघावर बसत होते, इत्यादि अनेक कथा त्यांत ग्रथित केल्या आहेत.

१३९. नारायण हें श्रेष्ठत्वदर्शक नांव पांच ठिकाणीं लावितात:— १ अग्निनारायण, २ वेदोनारायण, ३ व्यासोनारायण, ४ आपोनारायण, आणि ५ सूर्यनारायण. तसेंच ब्रह्म हें व्याप्तिदर्शकनाम नादब्रम्ह, अन्नब्रम्ह, आकाशब्रम्ह इत्यादि पदार्थांस लावून म्हणतात.

१४०. पंजाबांत यात्रेचीं ठिकाणें आहेत तीं:—अनंतनाग, वेणीनाग, शेषनाग, हिंदुकुश, शारकादेवी, हरीपर्वत, नरसिंगकटास, जगदग्न्यश्रम, वडी ज्वालामुखी, रामतख्त, भरतजन्म, अचलतीर्थ, चिंत्तपूर्णादेवी, जैनादेवी, त्रिलोकनाथ, जनकगैल, त्रिसंध्याकुंड, रुद्रसंध्या, दूधगंगा, भैरवघाटी, कमलसर, केसरकुंड, आणि अमृतसर ( येथें नानक गुरूचें देऊळ आहे ) इ०

१४१. दत्तात्रयाचीं ठिकाणें गाणगापूर, औदुंबर, गीरनार, व मातापूर अशीं आहेत. नरसिंहाच्या जागा नृसिंहपूर—भीमा व नीरा संगमीं, नरसोबा-ची वाडी—कोल्हापुराजवळ आहे, हीं स्थळें अशींच वांई, माहुली, कऱ्हाड वगैरे ब्राम्हणवस्तीमुळें व कृष्णानदीमुळें क्षेत्रें आहेत.

१४२. जैन लोकांचीं क्षेत्रें —काठेवाडांत पालिठाणा,' गयेजवळ सम्मतशिखरजी, आबूपर्वत, जुनागड, आकोल्याजवळ अंत्रिक, राधनपूराजवळ, पारखजी संकेश्वर, भडोचेजवळ कावी इ० आहेत.

१४३. काशींत दुर्गादेवीचे देवळांत व गयेत मंगळाईचे देवळांत जनावरें फार मारितात. त्याचप्रमाणें काशीजवळ विंध्यामाता, कलकत्त्यास कालिका व हिंगळाज माता इत्यादि ठिकाणीं हिंसा फार असून या हिंसेचे भक्षक गौडब्राम्हण आहेत. दक्षिणी व कर्नाटकी ब्राम्हण यज्ञांत मात्र मांस भक्षण करितात, परंतु पंचगौडांत नित्यांतच बळीचें भक्षण करण्याची चाल आहे!

१४४. या देशांत जीं जुनीं मागें आहेत त्यांस हेमाडपंती किंवा

पाडवांचीं कृयें असें म्हणावयाची वहिवाट आहे. परंतु अशा सर्वच इमारती त्यांच्या नसून त्या पृथक् पृथक् जैन व शैव राजांनीं बांधिलेल्या आहेत. या मासल्याचीं कामें पुण्याजवळ येवत या गांवीं बोलेश्वराचें देऊळ, पुरंदर किल्ल्याखालीं नारायणपूरचें देऊळ, कल्याणाजवळ अमरनाथाचे देऊळ, सिन्नरचें महादेवाचें देऊळ, त्रिंबकेश्वरचा गोदानदीचा घाट, करवीरचें अंबाबाईचें देऊळ, पंढरपूरचें विठोबाचें देऊळ, हीं सर्व जुनीं असून चमत्कारिक व पाहण्यासारखीं आहेत. अमरनाथाचे देवळास चुना मुळींच नसून तें केवळ दगडांनींच रचून काढलेलें आहे. यावरून व इतर शोधावरून शके १२०० चे पूर्वीं चुना लावण्याची चाल नव्हती असें दिसतें.

१४५. विधवेचा पुनर्विवाह करावा व तो सशास्त्र आहे असें प्रतिपादन मुळीं विष्णुशास्त्री बापट यांणीं पुणें येथें १८४० सालीं केलें. त्यानंतर कलकत्त्यास १८५५ सालीं विद्यासागर पंडित यांणीं केलें. व त्यानंतर मुंबईत विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांणीं १८६३ सालीं केलें. या त्रिवर्गांचे त्याविषयीं बहुत ग्रंथ असून या कामाची कीर्त्ति म्हणून फक्त उभय पंडितांस आहेच.

१४६. या भरतखंडाचे पंडितांनीं स्त्रियांची जशी निंदा केली आहे अथवा त्यांजविषयीं जितकी असन्मानबुद्धी प्रकाशित केली आहे. अशी कोणतेही देशांतील पंडितांनीं केली नाहीं. कोणी ह्मणतात त्यांस भूक फार, कोणी ह्मणतात त्यांस काम फार, कोणी ह्मणतात स्त्रिया प्रत्यक्ष राक्षसी, कोणी म्हणतात स्त्रियांचे बुद्धीनें नाश होतो, कोणी ह्मणतात त्या कपटी असून त्यांचें चरित्र कोणासही समजावयाचें नाहीं, कोणी म्हणतात त्यांचें लग्न अगदीं लहानपणीं करावें व तें न केल्यास बापास फार पाप लागतें, कोणी म्हणतात त्यांणीं मात्र पतिव्रत्यानें असावें परंतु पुरुषास अनीतीची वगैरे कांहीं चिंता नाहीं व कोणी म्हणतात स्त्रियांनीं एकवेळ मात्र लग्न करावें व पुरुषानें पाहिजे तितके वेळां करावें! बायको लंगडी किंवा आंधळी झाली तर मग पुरुषास तिला टाकून देऊन दुसरी करण्याची सनद मिळते परंतु पुरुष रक्तपित्या जरी झाला

तरी तिणें आस टाकूंनये! नवरा गेला तर स्त्रीनें सन्यासव्रतानें जन्म-भर राहावें आणि तिकडे तर नवऱ्यानें बायकोचें सुतक फिटताच लग्न करावें;इतकेंच नाहीं, तर त्याणें पाहिजे असल्यास तिच्या समक्ष तिला दोन चार सवती कराव्या!मुलीनें वरास शोधून काढावा परंतु वराचे पक्षानें पाहिजे ती दांडगाई करावी. अशी त्यास मुभा असून कन्येच्या पक्षानें खालीं मान घालून बसावें!पुरुषानें ऐंशीं वर्षेंपर्यंत लग्न करावें परंतु दुर्दैवानें मुलगी आठव्या वर्षींच विधवा झाली तरी तिणें पुनर्लग्न करूंनये! यावरून हा सर्व अन्याय, निर्दयता व नीचपणा दिसतो.

१४८ पैगंबराचे पाठीमागें सय्यदाचे वंशांत बगदाद येथें एक साधू झाला, त्याचें नांव कुतबरावनी ऊर्फ पिरानूपीर किंवा अब्दुल् कादर जिलानी ऊर्फ महबूब सुभानी. या पुरुषास फकीर लोक फार भजतात आणि त्यानें पुष्कळ करामती केल्या असें म्हणतात. खंडेराव महाराज यास फकीर लोकांनीं या पीराच्या करामती सांगून व तो नवसास पावतो म्हणून त्याचे मनांत भरविलें होतें. याजमुळें खंडेरावानें बावन लक्ष रुपयांची मोत्यांची व रत्नांची चादर या मनुष्याचे कबरेवर बगदाद शहरास पाठविण्याकरितां तयार केली होती व बडोद्यास मो. ठाल्या सरकारी दुकानांस या पीराचींच नांवें दिलीं होतीं. कुतबरबानी मौलाअली, महबूब सुभानी हीं नांवें बडोद्याचे वेशीवर कोरलीं होतीं. कीं, तेणें करून या शहरास सर्वदा बरकत यावी. जसे फकीर गुरु सांगत तसे महाराज करीत होते. या साधू पुरुषाचे वंशांत सय्यद अहमद रफाई साहेब म्हणून एक पुरुष झाला त्याचे नांवावर अद्यापि मुसलमान आपले शरीरास पीडा करून घेऊन लोकांस तमाशे दाख-वितात, आणि रफाई साहेबाचे आशीर्वादानें हें होतें म्हणून लोकांस भ्रम घालतात. गालांतून चाकू घालतात, अंगांत सुरी टोंचितात व पोटांत चाकू घालतात. परंतु यांत रफाई साहेबाचें नांव मात्र असून हा सर्व कृति व युक्ति आहे.

१४८. अकबर बादशाहाकडे एक पंडित गेला असतां त्यास बाद-शाहानें दोन मोहोरा दिल्या व पंडितानें या आपले शिष्याचे हातीं

दिल्या नंतर बाहेर. जाता जातां शिष्य म्हणाला कीं, येवढ्यानें काय होतें? तेव्हां पंडित बोलला,

' शाकाय वा स्याल्लवणाय वा स्यात्. '

तें कोणीं जवळच्या मनुष्यानें ऐकून त्याणें बादशाहास सांगितलें कीं, पंडित असें बोलले. तेव्हां बादशाहानें पंडितास बोलावून आणून विचारलें कीं, तुम्ही काय बोललां? पंडित बोलले कीं, माझा शेवटचा चरण कोणीं ऐकून तुम्हास सांगितलें असेल, आपण सर्व श्लोक ऐकिला तर आपणास मीं काय म्हटलें तें कळेल. बादशाहा म्हणाला कीं, तुम्हीं कोणता श्लोक शिष्यास सांगितला? तेव्हां पंडितांनीं लागलेच मागील तीन चरण नवीन जोडून सांगितले—

दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा मनोरथं पूरयितुं समर्थः ॥
अन्येन केनाऽपि नृपेण दत्तं शाकाय वास्याल्लवणाय वा स्यात्॥

१४९ रावबहादुर धुंडिराज विनायक विवळकर यांचे आजे परशराम श्रीधर हे आंग्रे सरखेल यिजारत माहा यांचे पदरीं होते. पुढें आंग्रे यांचा निर्वंश होऊन त्यास दत्तकाची परवानगी मिळाली नाहीं व कुलाबा संस्थान खालसा झालें. पुढें विनायकराव बाबा साहेब विवळकर वारले. यांचे पुत्र धुंडिराज हे हल्लीं असून यांणीं लोकांस द्रव्य देऊन कितीएक सोम व कितीएक वाजपेय असे बहुत यज्ञ केले. यांची भक्ति यज्ञावर व श्रोत्रिय ब्राह्मणांवर फार आहे. याचप्रमाणें पुण्यांत सदाशिव नारायण कानिटकर वकील यांणींही सप्तसंस्था केल्या. याप्रमाणें हे गृहस्थ या कलियुगांतील प्राचीनबर्हिच आहेत!

१५०. अंबाशंकर हे ब्रम्हक्षत्रिय अमदाबादेंत प्रिन्सिपाल सदर आमीन असतांना त्यांचे कोडतांत जेठाभाई नांवाचे मोठे सावकार, जो चाळीस लाख रुपयांची असामी होती असें म्हणत, त्यांच्या मुलानें त्यांजवर आपल्या हक्का विषयीं फिर्याद केली. या कामीं अंबाशंकर यांस

जेठाभाईनीं सांगितलें कीं, मी तुह्मांस एक लाख रुपये देतों, व तुह्मीं मुलाचा दावा रद्द करावा. तेव्हां अंबाशंकर ह्मणाले कीं, आम्ही कोणापासून पैसा घेत नाहीं हें तुम्हांस ठाऊक असेलच. त्यावर जेठाभाई ह्मणाले कीं, तें खरें, पण लाख रुपये देणारा तरी तुम्हांस कधींच मिळाला नसेल! तेव्हां अंबाशंकर यांणींही उत्तर दिलें कीं. लाख रुपये देणारा आम्हीं पाहिला नाहीं हें खरें आहे, परंतु लाख रुपयांस नाहीं ह्मणणारा असाही मनुष्य तुम्हीं कधीं पाहिला नसेल, हें ध्यानांत ठेवावें!

१५१. कितीएक ज्ञातींस दुसऱ्या कितीएक ज्ञातींचे ब्राह्मण पुरोहित नेमिलेले आहेत: भंगसाळी, लवाणे व ब्रह्मक्षत्रिय यांचे उपाध्ये सारस्वत ब्राह्मण आहेत. याजवरून ह्या चारी जाती पंजाबांतील असाव्या असें दिसतें. त्याचप्रमाणें भटे यांचे उपाध्ये पोकर्णे ब्राह्मण आहेत.

१५२. तांदुळांमध्यें पुढें लिहिल्याप्रमाणें बहुत जाती आहेत: अंबेमोहोर, तांबसाळ, पंखाळी, जिरेसाळ, कमोद, इलाची. सुतरसाळ, पटणी, वहाड, कचरी, दोडकी, महाडी, कोळंबा, बोडकें किंवा कोथिंबिरी, निधुन, महाद्या वरंगळ, भडस, तवसाळ, साठी, मुखवेल, राजभोग, दोडका, घोसाळवेल, कानडा, हळवा, कृष्णसाळ इ०.याचप्रमाणें जोंधळ्याच्या अनेक जाती आहेत त्याः शाळू, कार, हुंडी, अगडी, मोतिया, निळवा वगैरे. आणि याचप्रमाणें वक्षी, खपला, जोडगेव्या अशा अनेक जातींचे गहूं असतात.

१५३. सापांच्या अनेक जाती वेगळाल्या आहेत त्याः—साप, नाग, विरोळा, खड्यानाग, काळा-पिवळा-शुभ्रनाग, धामण, घोणस, आर, फरड, चुंडेल, जानेठा, मणियार, दुतोंड्या, फुरसे, आंधेले, अजगर, चितळा, नागेली, बीस खोपरा, हरणवाळा. कांडर, घो वगैरे. यांतील कांहीं निर्विष आहेत, व कांहीं सविष आहेत. पैकीं निर्विष साप फार आहेत ह्मणूनच गांवोगांवीं वाहिरोबा, देवी आणि मंत्री यांचे गुण येतात! सविष सर्पदंशावर कधींच कोणताही उपाय चालत नाहीं.

१५४. भुतांवर ज्यांचा विश्वास आहे ते त्यांमध्येंही अनेक वर्ग सा-

नितात. जसे—ब्रह्मराक्षस, जखीण, खविस, समंध, मार्का, लावसट, झोटिंग, हडळ,प्रेत इत्यादि. परंतु वस्तुतः हा सर्व भ्रम आहे असें तत्व- ज्ञान्यांचें व विचारि लोकांचें मत आहे.

१५५. इ० स० १८०२ सालीं गाइकवाड सरकारचे दिवाण रावजी अपाजी परभू हे होते. तेंव्हांपासून त्यांचे पुढें त्यांचे पुत्र सीताराम बोवा, आणि नंतर अनुक्रमें विठोबा देवाजी, वेणिराम भाई, गोपाळपंत दादा देवधर, भाऊतांबेकर, गणेशपंत ओझे पळसपेकर गोविंदराव रोडे, नारायणराव भाऊ शिंदे, गोपाळराव मैराळ जाहिर दिवाण व आंतून बळवंतराव राहुरकर, शिवाजी खानवेलकर आणि शेवटीं दादाभाई नौरोजी असे झाले. दादाभाईंचे कारकीर्दींत मल्हारराव कैद होऊन सर टी. माधवराव हे दिवाण झाले. ते हल्लीं आहेत.

१५६. अमदावाद पेशव्यांनीं सुल्हसन् सलास् खम्सैन् मय्या तैनू व अल्फ ह्मणजे इ० स० १७५३ सालीं घेतली व तेथें दामोदर महादेव हे सुभेदार नेमिले. पुढें श्रीपत बापूजी, भवानी शिवराम व आपाजी गणेश हे सुभेदार झाले. नंतर गुजराथ सुभ्याचा कामदार हरी चिंतामण दीक्षित, फत्तेपूरचे कुळकर्णी, आबा शेलूकर राघोबा काका परभु (इ०स०१८०२ पासून पुढें दहा वर्षे ), विठ्ठलराव बाबाजी, रामचंद्रपंत गोद्रेवाले, राम- चंद्रपंत मुल्हेरकर, नारायणराव ताकटे निसबत त्रिंबकजी डेंगळे. नंतर नगरकर यांचे वेळेस—नागोपंत आबा देवचके,कुशाबा मामा परभू आणि पुढें खेड्याहून आलेले बावशा दामोदर असे सुभेदार येऊन नंतर दंडलाप साहेब व ऐरन साईड साहेब हे दाखल झाले. व तेंव्हापासून इंग्रजी अम्मल सुरू झाला.

१५७. गुजराथेंत अमदावाद प्रांतीं काळ पडून त्यांचीं नांवें त्या त्या सालावरून लोकांचे तोंडीं चालतात तीं—

| नांवें. | संवत. | इसवी सन. |
|---|---|---|
| १. चहोत्रा. | १७७४ | १७१७ |
| २. सत्येशिया. | १७८७ | १७३० |
| ३. अठयेशिया. | १७८८ | १७३१ |

| | | |
|---|---|---|
| ४. तीहोत्रा. | १८०३ | १७४८ |
| ५. अडताळा. | १८४८ | १७९१ |
| ६. अगनोत्रा | १८६९ | १८१२ |

१५८. दक्षिणेंत रामोशी, भिल्ल, कोळी वगैरे लुटारू लोक आहेत तसे गुजराथेंतही कोळी आहेत. तिकडे इंग्रजी अमलांत गेंडाळ कासच्या हा जमात जमवून लूट करूं लागला तेव्हां त्यास मेजर फुल जेम्स यांणीं मारिलें. तसाच तिकडे दुसरा एक जोवन वर्त्ताळिया नांवाचा मनुष्य असून तोही लूट करीत असे. परंतु वर्ताळ्यास स्वामीनारायण जाऊन त्यांनीं त्यास उपदेशानें सुधारलें व त्याजकडून चोरटेपणा सोडविला. दक्षणेंत उमाजीनें बंड केलें ह्मणून त्यास १८३२ सालीं फांशीं दिलें. त्याचप्रमाणें भागूजी, राघो भांगरे वगैरे यांणीं उपद्रव केला होता, परंतु त्यांचीही तीच गति झाली. आणि नुक्तेच गेल्या (१८७९) सालीं हरी मकाजी रामोशी व वासुदेव बळवंत फडके हे दोघे बंडखोर, अनुक्रमें मारले व काळ्या पाण्यावर पाठविले!

१५९. हिंदू लोकांत, कित्येक जनावरांचे अंश असतात तेही पवित्र मानतात. ते पदार्थ—

| अंश. | जनावर. | उपयुक्त व पवित्र पदार्थ. |
|---|---|---|
| अस्थी. | गेंड्याच्या, हत्तीच्या इ० | खडकपात्र, शंख, शिंपले, हस्तिदंत. |
| केश. | डुकराचे. | कुंच, [ देव उजळण्याकरितां ]. |
| मांस. | मृगाचें, गाईचें. | कस्तूरी, गोरोचन. |
| चर्म. | सर्प, हरिण, व्याघ्र. | कांत, कृष्णाजिन, व्याघ्रांबर. |
| नख. | वाघाचें. | वाघनख. |
| कृमि. | किरमिज, मधुमक्षिका. | किरमिजीरंग, मेण. |
| पंख. | मोर. | मोरचेल. |
| विष्ठा, मूत्र. | गाईचें. | गोमय, गोमूत्र. |
| उच्छिष्ट. | वासराचें. | धारोष्णदूध. |
| वमन. | माशीचें. | मध. |

१६०. अष्टादश पुराणांची संख्या.--

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ ब्रह्मपुराण. | १०,००० | १० ब्रह्मवैवर्त | ,, | १८,००० |
| २ पद्म ,, | ५५,००० | ११ लिंग | ,, | ११,००० |
| ३ विष्णु ,, | २३,००० | १२ वराह | ,, | २४,००० |
| ४ शिव ,, | २४,००० | १३ स्कंद | ,, | ८१,००० |
| ५ भागवत ,, | १८,००० | १४ वामन | ,, | १०,००० |
| ६ नारद ,, | २५,००० | १५ कूर्म | ,, | १७,००० |
| ७ मार्कंडेय ,, | ९,००० | १६ मत्स्य | ,, | १४,००० |
| ८ अग्नि ,, | १५,००० | १७ गरुड | ,, | १९,००० |
| ९ भविष्य ,, | १४,००० | १८ ब्रह्मांड | ,, | १२,००० |

१६१. सांगोल्केकर देशपांड्यांपैकीं ज्यांस सुमंत पदवी मिळाली त्यांचें नांव आनंदराव; त्यांचे पुत्र महिपतराव, त्यांचे जीवनराव व त्यांस दोन पुत्र-गोपाळराव व महिपतराव असे होते. त्यांच्या विधवा वेणूबाई व कृष्णाबाई. त्या प्रत्येकीस १५०० रुपये पेन्शन होतें. त्या दोघींनीं अनुक्रमें रामचंद्र व अमृतराव हे मुलगे दत्तक घेतले ते हल्लीं आहेत.

१६२. रामशास्त्री परभुणे हे पुण्यांत असतां एक हरदास बाई आली होती. तिची कथा श्रीमंतांचे वाड्यांत झाली. तिणें कथा करते वेळेस आख्यानाचा ओघ स्त्रियांवर आणून व स्त्रियांस काम फार इत्यादि वर्णन करून पूर्वयुगीं स्त्रियांस काम कमी होता तरी त्या युगीं पुनर्विवाहाची परवानगी होती, आणि कलींत निषेध केला आहे याचें कारण काय? काम वाढला ह्मणून निषेध करणें हें शोभत नाहीं! तिणें असें ह्मणून शास्त्रीबोवास विचारिलें कीं, या गोष्टीचा मेळ आपण घालावा. तेव्हां सर्व सभासद चकित होऊन शास्त्रीबोवा काय उत्तर देतात हें पाहूं लागले. तों शास्त्रीबोवा ह्मणाले कीं, कलिनिषेध लिहिणारे पुरुष होते; त्यांनीं फावलें तसें लिहिलें. स्त्रियांचे सुखदुःखाचा विचार त्या काळीं कोणीं केला नाहीं!

१६३. विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांणीं कृष्णंभट गोखले पुराणीक यांस पुण्यांत (१८६७) विचारिलें कीं, कलीमध्यें पुनर्विवा-

ह चालण्यास हरकत काय आहे? तेव्हां पुराणीक बोलले कीं, काहीं हरकत नाहीं; परंतु जो पुनर्विवाह करील त्याणें रीतीबाहेर चाललों हें समजून जास्ती धर्मिष्टपणानें राहिलें पाहिजे. म्हणजे, त्याचीं धाराग्नि वगैरे ठेवून धार्मिक बुद्धीनेंच लग्न केलें असें दाखविलें असतां आम्हीहि त्याचे घरीं जेवूं परंतु पुनर्विवाह करणारे उनाडपणा करितात याजमुळें लोकांस त्याविषयीं धर्मबुद्धि उत्पन्न होत नाहीं व त्यामुळें तक्रार पडत, इतकेंच तात्पर्य आहे.

१६४. दगड फोडून नग करितात त्यांचीं नांवें—गुंडा, पाटथरा, दब्बर, बेंदरी, चिरा, ढापा, फरस, कांडकी, तोड उथळी, लादी, वगैरे.

१६५. रामानुजस्वामी शंकराचार्यांचे पाठीमागें झाले, त्यांस आठशें वर्षें झालीं. शंकराचार्यांनीं वेदान्तगत प्रसिद्ध केलें तें ठीक नाहीं असें रामानुजांचे पूर्वज नाथमुनि यांस वाटून त्यांणीं त्याविषयीं योगरहस्य व न्यायतत्व केलें. त्यापुढें पुंडरीकाक्षाचार्य, रामाचार्य व यामुनाचार्य हे झाले. रामानुजाचार्यांनीं श्रीभाष्य, वेदार्थसंग्रह, गीताभाष्य व गद्यत्रय वगैरे ग्रंथ करून बहुत शिष्य व मठ केले. त्यांचे पुढें वेदान्ताचार्य झाले. त्यानंतर सुदर्शनाचार्य, ब्रह्मस्वतंत्र परतंत्र स्वामी, वरवरमुनि. वगैरे मोठाले पंडित होऊन त्यांणीं तें मत प्रसिद्धीस आणिलें. पुढें त्यांत वडघल व तेंगल, म्हणजे उत्तरेकडील व दक्षिणेकडील, असे दोन पंथ झाले. तेंगल म्हणजे दक्षिणेकडचे; त्यांचा मुख्य तोताद्रीमठ असून त्यांचा आचार वेगळा आहे. ते आपलें सर्व कर्म 'द्राविडप्रबंध' म्हणून एक प्राकृत ग्रंथ आहे त्याजवरून करितात. ते विधवेचें पवन करीत नाहींत व यज्ञांतही हिंसा करीत नाहींत. बैरागी वगैरे सर्व तेंगल मताचे आहेत. रामानुजाचा जन्म भूतपुरीत झाला व मृत्यु कावेरीतीरीं श्रीरंगास झाला.

१६६. (१) भानुदास म्हणून एक पैठण प्रांतीं साधु होते. त्यांचा पुत्र(२) चक्रपाणी, त्याचा पुत्र(३) सूर्याजीपंत, त्याचे पुत्र (४) एकनाथ पैठणकर, त्यांचे पुत्र(५) हरि पंडित, त्यांचा (६) रघु.श्याम, त्याचा(७) नारायण बोवा,त्याचा (८) रामचंद्रबोवा, त्याचा(१२) बाळकृष्ण, त्याचे

(१३) रंगनाथ व त्यांचे हल्लीं दत्तक घेतलेले ( १४ ) बालकृष्ण बोवा. या प्रमाणें प्रसिद्ध एकनाथ महाराजांची पूर्वोत्तरपीठिका आहे.

१६७ दर्यांत नावा असतात त्यांचें रूप, आकृती व बांधणी यांवरून त्यांचीं वेगवेगळीं नांवें असतात.—

| | | |
|---|---|---|
| १ बंदरबोट. | १० डिंगी. | १९ तिर्कटी. |
| २ तर. | ११ उलमी. | २० आगबोट. |
| ३ होडा. | १२ जंक. | २१ मनवार.(म्यान् ऑफ् वॉर). |
| ४ नाव. | १३ जॉलीबोट. | २२ महागिरी. |
| ५ डोणी. | १४ केबीन बोट. | २३ फतेमारी. |
| ६ पडाव. | १५ गलबत. | २४ बगला. |
| ७ पनेळ. | १६ तारू. | २५ मचवा. |
| ८ बतेला. | १७ जहाज. | २६ बर्कीण. |
| ९ गुराब. | १८ बार्कत. | २७ तराफ. |

नावेचें पोट सामान असतें तें–१ नाळ, २ सुकाणु, ३ डोलकाठा, ४ वल्हें, ५ शीड, ६ नांगर, ७ दोर, ८ शिडाची शिंकाळी, ९ ताज, १० कपी, ११ बालदी, १२ गमत वगैरे.

याशिवाय खलाशांची परिभाषा आहे ती:—

बरवा, घोस म्हणजे डावी बाजू; दगण म्हणजे उजवी बाजू; निरीम म्हणजे ओझें; वगैरे.

१६८. कृष्णाजी विसाजी पेठे गुहागरकर यांचे पुत्र त्रिंबकराव मामा व त्यांची कन्या रखमाबाई ही विसाजी अण्णा पेशवे यांस दि-ली होती. त्रिंबकराव मामा यांचा पुत्र विसाजी, त्याचा पुत्र अमृतराव; त्याचा पुत्र त्रिंबकराव त्याचा पुत्र अमृतराव; यास एल्फिन्स्टन साहे-बांनीं बाजीरावानीं बुडविलेले सरदारांचे पटांत नांव घालून दोन हजार रुपये वर्षास पेन्शन करून दिलें. त्याचे दोन पुत्र हल्लीं आहेत.

१६९. शंकराजी केशव हसबनीस हे वसईचे वसलतीत उपयोगी पडले म्हणून त्यांस कोंकणांत इनामें, गांव, व जमिनी दिल्या. शंक-रानांचे पुत्र सर्वोत्तम आबा, त्यांचे नारायणराव, त्यांचे विनायकराव,

हे शके १७६२ साली वारले; त्यांचे त्रिंबकराव, गणपतराव व शंकरराव हे तीन पुत्र होते.

१७०. नारोपंत खरसीकर (वाईप्रांत) यांस मुजुमदारीचा दरक १७१३ इसवींत मिळाला. त्यांचा मुलगा नीळकंठराव, त्याचा मुलगा नारायणराव, आणि त्याचे पुत्र नीळकंठराव व जीवनराव. पैकीं नीळकंठराव यांचे पुत्र कृष्णराव, यांस वाळकी, बोपखेळ, मांजरी वगैरे गांवें सरंजामास असून त्यांचा पुत्र नारायण आणि जीवनरावांचा गोरेश्वर असे पुतणे चुलते हल्लीं आहेत.

१७१. बाळाजी नारायण नातू हे कोंकणांतून रोजगाराकरितां आले. ते शिवाजी नाईक हुजरे यांजकडे खासगी कारकून होते. नंतर ते हसवनीसांकडे होते. त्यानंतर खंडेराव रास्त्यांचे पदरीं राहिले व पुढें एल्फिन्स्तन साहेबांकडे दोनशें रुपये पगारावर होते. बाजीराव पळाल्यानंतर त्यांस एल्फिन्स्तन साहेबांनीं हजार रुपये सालीना पेन्शन व बारा हजारांचे गांव इनाम दिले. तरी एल्फिन्स्तन साहेबांजवळ हे दिवाणाप्रमाणें काम करीत होते यास्तव दुसऱ्या राजे रजवाड्यांजवळूनही यांस पुष्कळ गांव मिळाले आहेत.

१७२. पूर्वी धर्मशास्त्राप्रमाणें १२ प्रकारचे पुत्र वारस होत होते; ते:—१ औरस, २ क्षेत्रज, ३ दत्तक, ४ कृत्रिम, ५ गूढ, ६ उपाविद्ध, ७ कानीन, ८ सहोढ, ९ क्रीत, १० पौनर्भव, ११ स्वयंदत्त, आणि १२ शौद्र.

१७३. पूर्वी आठ प्रकारचीं लग्नें चालत होतीं तीं:— १ ब्राम्ह, २ दैव, ३ आर्ष, ४ प्राजापत्य, ५ आसुर, ६ गांधर्व, ७ राक्षस आणि ८ पैशाच्य. पैकीं पहिलीं चार प्रकारचीं लग्नें ब्राम्हणांनीं करावीं असा ठराव आहे.

१७४. बायकांच्या लुगड्यांमध्यें अनेक जाती आहेत त्या:— चंद्रकळा, रास्ता, गुलाली, अंजिरी, रुद्रकांठीं, पोफळी, बाळपट्टि, गोमीकांठि, मोतेचूर, नारळीपदरी, दंडिया, धावडी, येवली, अमदाबादी, सोलापुरी, कर्नाटकी, गर्भसुती, शालू, पैठणी, कर्वतीकांठी, रुइफुली वगैरे.

१७५. अनेक ठिकाणीं मापें चालतात तीं:—पल्ला, कळसी, माप, पायली, फरा, तिपटें, खंडी, मुडा, मण, अधोली, टिपरी, शेर वगैरे.

१७६. यमाजीपंत शिवदे हे प्रतिनिधींचे मुतालीक होते. त्यांचे पुत्र गमाजी यमाजी. त्याची नक्कल ( निर्वंश) झाली. परंतु यमाजी यांचे भाऊ अंताजीपंत होते. त्यांस वासुदेव ह्मणून पुत्र होता; त्याचा अंताजी, त्याचा नारायण आणि त्याचे अंताजी मुतालीक; हे हल्लीं कऱ्हाडास असून त्यांजकडे बारा हजारांचें इनाम चालत आहे.

१७७. पटवर्धनांचा मूळ पुरुष हरभट्ट, त्याचा मुलगा बाळंभट, त्याचे मुलगे हरभट कातवडेकर, पांडुरंगभट यादवाडकर व केशवभट. पैकीं हरभटाचे भास्करभट, कृष्णंभट, बाळंभट, त्रिंबक, गोविंदपंत, व रामचंद्र असे सहा मुलगे. पैकीं भास्कर याचा वंश शडनाळकर; कृष्णंभटांचा वंश मंगळवेढकर; यांतील शेवटचे पुरुष हरिहरराव रामचंद्र, ते थोडे दिवसांपूर्वी वारले! हे अगदीं तरुण असून त्यांचे मृत्युसमयीं त्यांची पत्नी गरोदर होती तीस काय संतान होतें पहावें; ते शिलेदारच होते. तिसरे बाळंभट यांचे वंशांतील सांगलीकरांनीं भाऊसाहेब दत्तक घेतले ते; चौथे त्रिंबक, यांचे वंशांत कुरुंदवाड व कागवाड हीं दोन संस्थानें; पांचवे गोविंदपंत यांचे वंशांत सांगलीकर व मिरजकर; आणि सहावे रामचंद्र, यांचे वंशांतील जमखिंडीकर, चिंचणीकर व तासगांवकर. पैकीं रामचंद्रराव हे जमखिंडीस यादवाडकरांपैकीं दत्तक घेतले आहेत.

१७८. कायगांवकर दीक्षित यांचा मूळ पुरुष नारायणदीक्षित पाटणकर, शांडिल्य गोत्री, होता. त्यास श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांणीं गुरु केलें होतें. त्यास वासुदेव व बाळकृष्ण असे दोन पुत्र होते. पैकीं वासुदेवास रामचंद्र व गोविंद असे दोन मुलगे होते. रामचंद्र याचे पुत्र जगन्नाथ व त्यांचे नारायण जगन्नाथ हे हल्लीं आहेत. गोविंद याचे वासुदेव व त्याचा अनंत वासुदेव गोविंद ऊर्फ दादासाहेब हे नुक्तेच ( पौष शु० ७ शके १८०१ रोजीं ) शेंदुर्णीस वारले. त्यांचा अनंत दीक्षित हा आहे. यांची अर्धी वांटणी आहे. पैकीं नारायण जगन्नाथ यांस हिस्सा आहे. बाळकृष्ण याचा लक्ष्मीनारायण.

त्याचा बाळकृष्ण व त्याचा यज्ञेश्वर असे होते. यांस खानदेशांत वरील सेंदुर्णी महालांतील २५ गांव इनाम आहेत. शिवायं गोदावरीतीरीं कायंगांव हें इनाम आहे. हल्लीं सालारजंग बहादूर यांचे दरबारांत त्यांची चांगली चलन आहे.

१७९. प्रांतांत तर्फा असतात व तर्फेंत मौजे असून एखादा कसबाही असतो. ज्या गांवची सीमा बारा गांवांस जोडलेली असते किंवा ज्या गांवीं बाजार असतो किंवा ज्या गांवास बारा बलुतें व अलुतें असतात अथवा ज्या गांवीं जमीदारांचें राहाणें असतें त्यास कसबा ह्मणतात.

१८०. इसवी सन १७५५ सालीं रघोजी भोंसले सेना साहेब सुभा यांणीं गोंडवाण व नागपूर प्रांतीं मराठ्यांचा अंमल बसविला. त्यांचे कारभारी भास्कर पंडित ह्मणून होते. रघोजीस जानोजी, साबाजी, मुधोजी व बिंबाजी असे चार मुलगे होते. पैकीं मुधोजीचे मुलगे रघोजी, चिमाजी व व्यंकोजी असे तीन. रघोजीचा परसोजी व व्यंकाजीचा मुधोजी अप्पा, हा १८१८ त पदभ्रष्ट झाला. परसोजीचे दत्तक रघोजी हे ता० ११ दिजंबर १८५३ सालीं वारले. त्यांच्या अन्नपूर्णाबाई, आनंदीबाई, दर्याबाई व कमळजाबाई अशा चार बायका होत्या. त्यांनीं जानोजी भोंसले यास दत्तक घेतलें, ते हल्लीं आहेत. हल्लीं त्यांस लाख रुपयांचें उत्पन्न असून त्यांचें राज्य खालसा झाल्यामुळें तेथें हल्लीं इंग्रजी झाली आहे.

१८१. नवग्रहांचे देश व गोत्रें आश्वलायनपरिशिष्टांत लिहिलीं आहेत, तीं अशीं:— सूर्य कलिंग देशांत उत्पन्न झाला, त्याचें गोत्र काश्यप; सोम यमुनातीरीं झाला, त्याचें गोत्र आत्रेय; मंगळ आवंतीमध्यें झाला, त्याचें गोत्र भारद्वाज; बुध हा मागध देशांत झाला, त्याचें गोत्र अत्रि; गुरु हा सिंधु देशांत झाला, त्याचें गोत्र आंगिरस; शुक्र हा भोजकट देशांत झाला, त्याचें गोत्र भार्गव; शनि सौराष्ट्र देशांत झाला, त्याचें गोत्र काश्यप; राहु बर्बर देशांत झाला, त्याचें गोत्र पैठीनस; व केतु मध्य देशांत झाला, त्याचें गोत्र जैमिनी. त्याप्रमाणें लिहिलें आहे.

या पुरुषांची योजना ग्रहांत कशी झाली ह्याचा विचार इतिहासकारांनीं व इतिहासज्ञांनींच करावा.

१८२. माणिकजी वीरजी ऊर्फ माकावीरा हे सुरतेजवळ रान्देर गांवीं मूळीं राहात असून त्यांचे पुत्र कावसजी माणिकजी हे ठाण्यास राहाण्यास आले. त्यांचे पुत्र रुस्तुमजी वकील, यांणीं बहुत दिवस वकिलीचें काम केलें. त्यांचे पुत्र खरशेटजी रुस्तमजी हे कल्याणास मुन्सफ होते; ते हल्लीं बडोद्यास वरिष्ठ कोडताचे अधिकारी आहेत!

१८३. श्री रामाचीं देवळें बांधतात त्यांत दोन प्रकार असतात: एक वनवासिराम, ह्मणजे राम लक्ष्मण व सीता यांच्या उभ्या मूर्त्ती करतात; व दुसरी पट्टाभिषिक्त राम, म्हणजे पांच मूर्त्ती बसलेल्या करून त्यांत भरत व शत्रुघ्न हे जास्ती असतात. कोणी तेरा मूर्त्ती करतात. त्यांस वरील पांचांशिवाय नळ, नीळ, जांबुवंत अंगद वगैरे सर्व दरबार असतो. याचप्रमाणें हनुमंताचे मूर्त्तींच्या दोन तऱ्हा आहेत. वीर हनुमान व दास हनुमान. पहिली मूर्त्ति उड्डाण करिते आहे अशी असते, व दुसरी हात जोडून उभी असते.

१८४ मद्दीज भटाचा मुलगा मध्वाचार्य यास पुढें वासुदेवाचा अवतार असें त्याचे शिष्य म्हणूं लागले. त्याचा जन्म ११९९ इसवींत झाला. यांणीं उडपीस व सुब्रह्मण्यास वगैरे मठ केले आहेत. यांचें द्वैत मत म्हणजे, ईश्वर व जीव पृथक् असून एक धनी व एक सेवक असें आहे. पूर्वीं जसें हनुमान् व भीम हे वायूचे अवतार झाले तसे कलींत तुळव गांवीं मध्वाचार्य हे झाले असें ह्मणतात. यांचे मतें विष्णु, नारद, गरुड, पद्म, वराह, आणि भागवत इतकीं सहा पुराणें मात्र सात्विक व वाचावयाजोगीं आहेत.

१८५. रामानुजस्वामींचें मत चालविणारे रामानंद ह्मणून झाले. त्यांचे पुढें आशानंद, कबीर, रोहिदास, पीपा रजपूत, सरसुरानंद, चोखानंद, भावानंद, धनाभाट, सेना न्हावी, महानंद, परमानंद, आणि श्रियानंद असे बारा शिष्य झाले. व त्यांणीं प्राकृत ग्रंथही बहुत केले.

१८६. कबीराचे मुख्य चेले श्रुत, गोपालदास, भागुदास, नारायण

दास, चूडामणदास, जगोदास, जीवनदास, कमाल, टांकसाळी, साहेबदास, आणि नित्यानंद असे दहा झाले. कबीराचे ग्रंथ २१ आहेत. त्यांस कबीरपंथी लोक वेदासारखे मानतात. त्यांचीं नांवें:—सुखनिधान, गोरखनाथकी गोष्टी, कबीरपंजी, बुलाखीकी गोष्टी, रामानंदकी गोष्टी, आनंदराम, सागर, शब्दावली, मंगल, वसंत, होली, रेखता, झुलणा, कहारा, हिंदोला, बारामास, चंचरा, चोतिसा, आलेफनामा, रागेणी, व दाखलबीजक.

१८७. वल्लभाचार्य हे गुजराथेंत व गोकुळपर्यंत प्रसिद्ध आहेत. त्यांचे अणुभाष्य, सुबोधिनी, सिद्धांतरहस्य, भगवल्लीलारहस्य, एकांतरहस्य वगैरे ग्रंथ आहेत. यांचे मंदिरास मर्जादी ह्मणतात. ह्मणजे त्यांत शेवेकर साचोरा ब्राह्मण असावे त्यांनीं नित्य आठ वेळेस पूजा कराव्या व तितकेवेळ दर्शन होण्याकरितां दारें उघडीं ठेवून त्यानंतर बंद करावीं. त्या दर्शनाच्या वेळांस मंगळा, शृंगार, गोवाळ, बाळभोग, उत्थापन, राजभोग, संध्या व शयन. असे म्हणतात. याशिवाय रासयात्रा, रथयात्रा व जळयात्रा वगैरे नैमित्तिक उत्साह करितात, व त्यामध्यें त्यांचे शिष्यांत जे अष्ट कवी झाले आहेत त्यांची मात्र कविता गातात; इतरांची गात नाहींत. यांचे मंदिरांत तीन प्रकारचें पाणी असतें: खासा, मर्यादी व शेवकी. पहिलें देवाकडे, दुसरें भक्तांकडे व तिसरें इतर सर्व कामांस लावतात तें. डाकूर, श्रीनाथ व बेट द्वारका येथील मंदिरें हीं याच रीतीचीं आहेत.

१८८. रामानुजाचे ७०० मठ आहेत असें ह्मणतात. हे मठ अहोबलमठ, तोताद्री, रामेश्वर, श्रीरंग, कांची, मेलकोटा, इत्यादि आहेत. पैकीं कांहींत सन्यासी अधिकारी आहेत व कांहींत आचार्य अधिकारी आहेत. रामानुजास त्याचे शिष्य शेषाचा अवतार असें समजत होते रामानुजाच्या पित्याचें नांव श्रीकेशवाचार्य व आईचें नांव भूमिदेवी. याचा जन्म कांचीस झाला असें ह्मणतात. या सांप्रदायाचे लोक अवैष्णव लोकांचे दृष्टीचा विटाळ मानितात व यास्तव ते पडदे लावून गुप्तपणें जेवतात. याचप्रमाणें लिंगाईत हे अशैवांचा विटाळ मानितात व त्याकरितां त्यांच्या दृष्टीआड जेवतात खातात! ह्याप्रमाणें रामानुज आणि

लिंगाईत हे परस्पर व्युत्क्रम स्थितींत असून ते आपापल्यास वीर वैष्णव व वीरशैव असें म्हणतात.

१८९. बद्रिकाश्रमाजवळ पंच बदरी व पंच केदार आहेत.त्यांपैकीं पंचबदरी आहेत ते: योगबदरी, ध्यानबदरी,आदिबदरी,वृद्धबदरी, आणि विषादबदरी.

१९०. गोसावी व बैरागी यांचे आखाडे सात आहेत ते. १ वस्त्रधारी, २ निरंजनी, ३ निर्वाणी, ४ निर्मोही, ५ दिगंबरी, ६ ताटंबरी व ७ खाकी. यांपैकीं गोसावी हे दशनाम ह्मणवितात: १ वन,२ अरण, ३ तीर्थ, ४ आश्रम, ५ गिरी, ६ पर्वत, ७ सागर, ८ भारती, ९ पुरी आणि १० सरस्वती. याशिवाय कोणी इंद्रही ह्मणवितात.

१९१. या देशांत जीं कितीएक मतें चालतात व ज्यांचा अद्यापि सिद्धांत झाला नाहीं, त्यांस वाद म्हणतात. त्यांपैकीं कित्येक वादच आहेत ते: द्वैतवाद, अद्वैतवाद,पदार्थवाद, मायावाद,ईश्वरवाद, अनात्मवाद, अनादिवाद, कर्मवाद, उद्योगवाद,ब्रह्मवाद, शुद्धाद्वैतवाद, निर्गुणवाद, सगुणवाद, विशिष्टाद्वैतवाद, पुनर्जन्मवाद, परिणामवाद, विग्रहवाद वगैरे. असेच पहिली एकादशी व दुसरी एकादशी,प्रत्यक्षपशु किंवा पिष्टपशु इत्यादि अनेक वाद सारखे चालले आहेत. यांचे सिद्धांत कालत्रयीं ह्मेण्याचें चिन्ह दिसत नाहीं!

१९२. गुजराथेंत भील, कोळी, वाघेर व कांठी इत्यादि जातीचे लोक अजमासें अडीच हजार वर्षांपूर्वी राहात होते. नंतर यदुवंशाचे यादव येऊन त्यांनीं कांठेवाड किंवा सौराष्ट्र प्रांत जिंकिला व ते जीर्णगड ऊर्फ जुनागड येथें किल्ला बांधून राहिले. त्यांचें राज्य कितीएक वर्षें निर्वेध चाललें. पुढें हा प्रांत दाम या नावाच्या राजांचे हातीं लागला. त्यांचे शिक्के अद्यापि सांपडतात, त्यांजवर जयदाम, जीवदाम, रुद्रदाम, यशदाम अशीं नांवें लिहिलेलीं आढळतात. पुढें तो प्रांत इसवी सन २५० चे सुमारास यवन लोकांचे हातीं गेला होता. त्यांतील राजे साह ह्मणून झाले. त्यांचीं नांवें रुद्रसाह, श्रीसाह, विजयसाह,क्षेत्र-

शाह इत्यादि आहेत. पुढें गुप्त या नांवाचे राजे झाले.त्यानंतर६५०साली शिलादित्य हा जैनधर्मी राजा झाला. त्याचें राज्य साळोंखी यांणी घेतलें. व साळोंखी यांजपासून वनराज चावडा याणें घेतलें.तो राजा शैव असून त्याणें पट्टण राजधानी केली होती. पुढें योगराज क्षेम, श्रीवीरसिंह, रत्नादित्य, असे अनुक्रमें इ० स० ९३५पर्यंत राजे झाले. पुढें मूळराज झाला. त्याणेंच सितपुरची रुद्रमाळा व किर्तिस्तंभ हीं बांधिलीं.याणें आबू ऊर्फ अचलपर्वतीं परमार राजे राहात होते त्यांजपासून खंडणी घेतली व ब्राह्मणांस सिहोर व सितपूर हीं दान दिलीं. त्याचे पुढें चामुंड राजा झाला; त्याचे कारकीर्दीत मुसलमान हिंदुस्थानांत उतरून सोमनाथपर्यंत लूट झाली. ते गेल्यावर पुढें दुर्लभराज भीमदेव हा इ० स० १०२४ इसवींत राज्य करूं लागला. त्याचे वेळेस महंमद गिझनी याणें येऊन मथुरा लुटली.या राजाची स्त्री उदयमती नांवाची होती तिणें बहुत देवळें बांधिलीं. त्यापुढें विसळदेव राजा झाला, त्याणें वीसनगर वसविलें. पुढें सन १०७२ साली कर्णराजा झाला; त्याणें कर्णसागर तलाव व मुंढेरा बांधला.मुंढेरा गांवच्या ब्राह्मण ज्ञातीस मोढ ह्मणतात.याणें असावळ गांवीं साबरमतीचे कांठीं कर्णावती शहर वसविलें. त्यासच हल्लीं अमदाबाद ह्मणतात. त्यापुढें इ० स० १०९४ साली सिद्धराज जयसिंग हा राजा झाला. त्याणें धोळक्यास व वीरमगांवीं तलाव केले, शितपुरास सरस्वतीचे तीरीं घांट बांधिला, गिरनारावर देवळें बांधिलीं, झिंझुवाडास इमारती बांधिल्या आणि कर्णावतीचें नांव श्रीनगर असें ठेविलें. हा राजा शैव होता. त्याचे पुढें कुमारपाल नांवाचा श्रावक धर्मी राजा इ०स०११५०त झाला.त्याजवळ हेमाचार्य ह्मणून मोठा पंडित होता. त्यापुढें अजयपाल राजा झाला. त्यानंतर दुसरा भीमदेव हा राजा झाला त्याचेच वेळेस म्हणजे इ० स०११९४ साली पृथ्वीराजाचा पराभव करून कुतुबुद्दीन हा गुजराथेत आला. त्यापुढें दुसरा विसळदेव, अर्जुनदेव, सारंगदेव, व कर्ण असे अनुक्रमें झाले.सन१३००इसवींत अलेफखान याणें लंबायत घेतलें आणि सितपूर व पट्टण हीं लुटून तेथील इमारती पाडल्या. याच वेळेस देवगिरीचे जाधवराजे यांची कन्या कालादेवी

ही कर्णास चावयाची होती. परंतु ती खिजरखान याणें हरण केली. पुढें महंमद तघलख आला. नंतर तैमुरशाहा दिल्लीस आला. पुढें सुलतान मुजफर शाहा गुजराथेंत येऊन तो स्वतंत्रपणें राज्य करूं लागला. त्याजपुढें अहंमदशाहा हा अमदाबाद येथें आपल्यास गुजराथी बादशाहा असें नांव घेऊन राहिला. त्यापुढें कुतबशाहा हा व नंतर महंमद बेगडा झाला. बेगडा याणें चांपानेर लुटिलें व जीर्णगड ऊर्फ जुनागड घेतला. व याजवरूनच त्याचें नांव बेगडा ( दोन गडांचा विध्वंसक) असें पडलें. ही गोष्ट सन १५११ त झाली. पुढें बहादुरशाहा, महंमदशाहा व अहंमदसानी (१५७२)हे झाले. त्यानंतर मुजफर व अहंमद झाले. या वेळेस दिल्लीहून अकबरशाहा येऊन त्याणें गुजराथ घेतली. पुढें, गुजराथचा अम्मल आनयसिंग रजपूत याजकडे व * बाबीकडे होता तो कांहीं ठिकाणचा त्यांजपासून इ० स० १७०० त खंडोजी दाभाडे सेनापती यांणीं घेतला. पुढें गाइकवाड, पेशवे, शिंदे, व होळकर ह्या मराठी सरदारांनीं मिळून सन १७५३ सालीं अमदाबाद घेतली. ती शेवटीं १८१७ मध्यें इंग्रजांनीं घेतली. फिरंगी यांणीं गुजराथेंत दीव म्हणून बंदर आहे तें १५११ त घेतलें. व इंग्रजांनीं गुजराथ पैकीं सुरत येथें १६१२ सालीं प्रथम वखार घातली. याप्रमाणें त्या दोन लोकांचा मूळ पाया येथें स्थापन झाला.

१९३. अहंमदशाहा बादशाहाचे वेळेस अमदाबादेस चार अहंमद होते ते—१ अहंमद बादशाहा, २ शेखअहंमद, ३ मलीक अहंमद, आणि ४ काजी अहंमद.

१९४. मुसलमानांनीं अमदाबादेस या शहराचे आसपास बारा कोसांत एकंदर १४०० मशीदी बांधिल्या आहेत असें ह्मणतात. परंतु हल्लीं त्यांचे मोठ मोठाले ढीग मात्र ठिकठिकाणीं पडले आहेत! दगडी कामें लाखों रुपये खर्च करून केलीं होतीं परंतु तीं पडीत झालीं आहेत. अमदाबादेस पाहण्यासारख्या इमारती जुम्मामशीद, मिरजापूर-

---

* 'बाबी' यावरील पृष्ठ ८ मध्यें पायथ्याची टीप पहा.

ग्रंथ

ची मशीद; शेख अहंमद, खटूगंजबक्ष याची जागा सरखेज गांवीं आहे ती, शाहाआलम, बटवा गांवीं कुतबे आलम, काकरिया तलाव, त्याजवरचे डच ऊर्फ वलंदेजी लोकांचें कबरस्थान, दादाहरीची विहीर, अदाळजगांवची विहीर—ईचें मोठें दगडीं काम तर पांच सात अलाख रुपयांचें आहे—, सय्यद उसमान माहजफीन खाम शाहापूर याची मशीद, मीर आबू तुराब, चंद्रावतीची कबर, आसारव्याची विहीर, मलिक आलम, राणीशिपी, कुतुबशा, मियाखान चिश्ती, आचरत बिबी, सारंगपूरची मशीद, मद्रसा—जेथें हल्लीं तुरुंग आहे—, भद्रेतील मशीद, नीलकंठ महादेव, हटीसिंगाची वाडी, प्रेमाभाईचा वाडा इत्यादि. या सर्व जागा पाहण्या लायक आहेत.

१९५. पूर्वीं सूत, संजय वगैरे भाट होते. हल्लीं भाटांमध्यें ज्या अनेक जाती आहेत त्याः— ब्राह्मभाट, बारवटभाट, वहीवंचे भाट, कंकाली भाट, तुर्की भाट, श्रमणभाट वगैरे.

१९६. गुजराथेंत कोळ्यांस ठाकोर ह्मणण्याची चाल आहे. शिवाय त्यांस बारिया, धराळा व पगी असेंही म्हणतात.

१९७. सन १८१५ सालीं त्रिंबकजी डेंगळा याजकडे गुजराथ सुभा होता त्याचे सनदेवर जे शिक्के आहेत ते—' श्रीमंत पंत प्रधानचरणीं तत्पर मल्हारजी सुत त्रिंबकजी डेंगळे निरंतर, ' याप्रमाणें आहेत.

१९८. सन १७४६ सालच्या गाइकवाडाच्या शिक्क्यांत हीं अक्षरें आहेतः 'मार्त्तंडचरणीं तत्पर पिलाजी सुत खंडेराव गाईकवाड निरंतर' पुढें १७९९ सालचे सनदेंत आहेत तीं: " श्रीराजा शाहु छत्रपती आखिल प्रौढ प्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड सेना खासखेल समशेर बाहादूर." पुढें सन१८२१सालीं झालेल्या नव्या सनदेवर ही तसाच मजकूर असून नांव मात्र सयाजी आहे. आणि त्यानंतर सन १८७२ सालीं झालेल्या सनदेवरही त्याच प्रमाणें असून नांव मात्र मल्हारराव असें बदललें आहे.

१९९. शिख म्हणून जो पंथ आहे तो मूळ नानकगुरु याणें उत्पन्न

केला. ह्यास आधार पंजाबी भाषेंत गुरुमुखी लिपीनें लिहिलेला एक ग्रंथ आहे. ह्यास ग्रंथ साहेब असें ह्मणतात. ह्याची पूजा अमृतसर येथें सुवर्णाचे देवळांत होत असते. हा पंथ त्यागी वैराग्याप्रमाणें असून त्याचा मुद्दा मुसलमानांचें व हिंदूंचें वांकडें मोडावें असा होता. नानकाचे पुढें गुरु **अंगद**, नंतर **अमरदास**, नंतर **रामदास**—हा अकबर बादशाहाचे वेळीं होता—,पुढें **अर्जुनमल्ल** यास इसवी १६०० मध्यें कैदेंत टाकिलें—,पुढें **हरगोविंद**—यांणीं बंड केलें; ह्याचा शिष्य **हरराय**, ह्यानंतर **श्रीहरकिसन** व ह्यावर गुरु **तेघबाहादुर**—याजवर १६७५ सालीं दिल्लीच्या फौजा येऊन त्यांणीं ह्यास मारलें व हाच शिखांचा पडता काळ आला; आणि शेवटी दहावा **गुरुगोविंद** झाला. ह्यास दसम पातशाहा असें ह्मणतात. यांणें आपली राज्य मिळविण्याचा प्रयत्न केला होता. याणें 'वाहगुरूकी फते' याप्रमाणें नमस्काराचें शब्द ठरविले व शिख लोकांस हत्यारें देऊन त्यांस खालसा असें नांव ठेविलें. परंतु अखेरीस औरंगजेबाचे सैन्यानें ह्यास पळविलें. पुढें बंदा वैरागी याणें मुसलमानांस फार मारिलें तेव्हां मुसलमानांनीं ह्यास कैद करून मारिलें. शिखांमध्यें निर्मळ, उदासी, व अकाली असे पंथ झाले व त्यांपैकीं कोणी चक्र बाळगितात. पुढें नादिरशाहा व अहंमदशाहा अबदल्ली यांचे गर्दीत पुनः जे शिख लोक उठले, ह्यांतच पुढें रणजितसिंग वाढला व ह्याणें राज्य मिळविलें. ह्याचप्रमाणें सर्व पंजाब, काश्मीर व पेशावर हे प्रांत ह्याचे कबजांत आले. पुढें रणजित सिंग गेल्यावर १८४८ सालीं फौजेनें गर्दी करून बंड केल्यामुळें इंग्रज सरकारानें तें शिखांचें राज्य सर्व खालसा केलें. तेव्हां रणजितसिंगाचा मुलगा दिलीपसिंग व ह्याची विधवा आई चंदाराणी हीं उभयतां विलायतेस जाऊन राहिलीं. ह्यांत दिलीपसिंगानें तर धर्मांतर करून ख्रिस्तीधर्माचा स्वीकार केला. परंतु आई मात्र आपल्या मूळ धर्मांत होती ती पारिस येथें वारली.

२००. या देशांत कितीएक लोकांमध्यें आग्रह करून दुसऱ्यांस वश करण्याच्या चाली होत्या. रजपूत लोकांत बाहेर वटे ह्मणून होतात.

ह्मणजे, कोणास राजाचा जुलूम किंवा अन्याय झाला असें वाटूं लागलें ह्मणजे, ज्यास तो जुलूम लागू होतो तो मनुष्य घर सोडून रानांत जाऊन अनेक प्रकारचे दंगे करितो, वाटा मारितो, व गांव लुटितो. असा दहा दहा वर्षें त्याचा उपद्रव चालतो. राजाच्या फौजा त्याजवर जातात; तरी तो सांपडत नाहीं. दक्षिणेंत रामोशी लोक याच प्रकारचे दंगे करितात. याप्रमाणें उमाजी नाईक १८२८ सालीं झाला, व राघोजी भांगऱ्या वगैरे याच प्रकारचे दंगे करून गेले. गुजराथेंतही ब्राह्मण व भाट हे झारा व त्रागा करितात; ह्मणजे, खून करूं, लुटूं, अशा प्रकारचीं पत्रें लिहून झाडांस बांधितात; दुसऱ्याचे घरीं जाऊन आपलाच गळा कापितात; किंवा आपल्या घरचें एखादें पोरबाळ नेऊन मारतात आणि त्याचें डोकें कापून त्याचें तोरण ज्याजवर त्रागा केला त्याचे घरास बांधितात; व जरि ते ती हत्या करितात, तरी ही हत्या तुझ्यावर आहे असें त्यास ह्मणतात. सन १८६० सालीं खंडेराव गाइकवाडांनीं पैमाष करण्याचा हुकूम केला तेव्हां सर्व भाट वगैरे जमून, पैमाष करूं नये म्हणून म्हणाले, आणि कितीएक तर कडीस आपले अंगावर तेल ओतून उभे जळाले! तेव्हां अशा त्रागा करणाऱ्यांस धरून खंडेरावांनीं त्यांचे पारिपत्य केलें. तरि लोकांमध्यें त्यांचें भय फार आहे. व म्हणून अद्या-पिही जामीन घेणें तर भाटास घेतात अशी पूर्वापर रीत चालू आहे. कर्नाटकांत काटक लोक आहेत, त्यांस कांहीं पीडा झाली किंवा पीडा नसूनही त्यांस ती पीडा अशी वाटली तर ते तळई करितात. म्हणजे ज्यांजकडून पीडा होते असें त्यांस वाटतें त्यांचीं गुरें चोरतात, त्यांचीं खळीं व घरें जाळतात आणि शेतें कापतात, अशी कर्नाटकची रीत आहे. याचप्रमाणें आपले इकडे बाजारकरी वाणी यांस कांहीं विरुद्ध वाटलें म्हणजे ते हरताळ पाडतात. रयतेस वाईट वाटलें ह्मणजे ती फरारी होते व गांव सोडून देते. अशा अनेक प्रका-रच्या चाली या देशांत पूर्वी होत्या परंतु त्या हल्लीं इंग्रज सरकारचे राज्यांत वर्ज झाल्या व पूर्वीप्रमाणें पीडाही कमी झाल्या. तसेंच सरकार बळवान् आहे याजकरितां लोकांचाही आग्रह चालत नाहीं. तरी

खानदेशांत जेव्हां पैमाषी झाली तेव्हां लोक आडवे झाले व त्यावेळीं फौज पाठवून त्यांचा बंदोबस्त करावा लागला. अशीं उदाहरणें कधीं कधीं घडतात. अशा लोकांस यूरोपांत 'औटलॉ' म्हणतात. अशाच, जशा इकडे डाकिनी मानितात तशा तिकडे "वीच" मानितात व त्यांस पूर्वी मारीत असत परंतु आतां ती चाल ज्ञानवृद्धीनें बंद होत आहे.

२०१. उत्साहांत ललित करण्याचा सांप्रदाय आहे. त्याचा मुद्दा असा आहे कीं, ईश्वरभक्तीस्तव जीं सहा दर्शनें व छत्तीस पाखंडें निर्माण झालीं त्यांची फोड करून, जे ईश्वरप्राप्तिविषयीं लटपट करितात, त्यांजवर ईश्वरानें प्रसाद करावा असें हें ललितरूप नाटक करून दाखवून प्रार्थना करावी हीं सहा दर्शनें ऐके ठिकाणीं खालीं लिहिल्याप्रमाणें वर्णन केलीं आहेत.—

कापालिकश्च जैनश्च ब्राह्मणो जंगमस्तथा
सन्यासी च तथा सौरि षड्दर्शनमपि स्मृता:॥

ललितांत सोंगें घेतात तीं:— कापालिक, मराडी, दाकोता, जोशी, भाट, ब्राम्हण, लेखक, पंडित, वासुदेव, गोंधळी, मानभाव, फकीर, जंगम, गोसावी, नाथ, जती, रावळ वगैरे. व या सर्वांवर ईश्वरानें प्रसाद करावा अशी या ललिताचे शेवटीं प्रार्थना करितात.

२०२. लोखंडाच्या जाती पुष्कळ आहेत व त्या वेगळाल्या कामास लावितात. सिकई, रूपाशाई, रेळ, मनवरी, बाबशाई, (रोलछाप) बीड, पोलाद, गजवेल, माळवी इ०.

२०३. कापसाच्या अनेक जाती आहेत त्यांत लाळिया, जडिया वागड, कानमी, नरमा, इ० मुख्य आहेत. कोणाचें बोंड फुटून कापूस बाहेर पडतो, कोणाचें फुटत नाहीं, कोणाची तार लांब असते, कोणाचें झाड मोठें असतें, कोणाचें झाड पांच वर्षें राहतें, व कोणाचें वर्षास पेरावें लागतें. नरमा जातीच्या कापसास देवकापूसही म्हणतात. त्याच्या बिया वेगळ्या नसून जडलेल्या असतात व त्या फोडून पेराव्या लागतात.

२०४. कच्छ देशचे झाडेचे रजपूत व नैसवड्याचे क्षत्रिय या

लोकांमध्यें मुली जन्मास आल्या ह्मणजे मारून टाकण्याची अतिशय क्रूर चाल होती. याचें कारण ते असें समजत कीं, लग्नास खर्च फार येईल व वरपक्षाकडे उन्मत्तपणा फार होईल. ह्या कन्या मारणें ह्मणजे सुरी, चाकू किंवा खिळा यांणीं भोसकून न मारतां एका भांड्यांत पुष्कळ दूध ठेवून त्यांत त्या बाळाला बुडवून मारीत! या प्रयोगास दूधपिती ह्मणतात. परंतु इंग्रज सरकारानें याविषयीं बंदोबस्त करण्याकरितां एक सुपरिंटेन्डेन्ट नेमून त्याणें गर्भार बायकांचीं नावें लिहून घ्यावीं व त्या प्रसूत झाल्यावर तपास करून गुन्हा शाबित झाल्यास शिक्षा करावी असा बंदोबस्त केला. तसेंच याजबद्दल ग्रंथ लिहून अशी बालहत्या करणें हें पाप आहे असें लोकांचे मनांत भरवून दिलें.आणि तेणेंकरून ही चाल बंद झाली.या संबंधाचा प्रथम ग्रंथ सरकारच्या जाहिरातिवरून १८४७ सालीं डा० भाऊदाजी यांणीं केला व त्याबद्दल त्यांस बक्षीस मिळालें होतें. नंतर त्या ग्रंथाच्या प्रती सरकारानें त्या लोकांस वांटल्या. तरी अशा दुष्ट चाली केवळ ग्रंथांनींच बंद होणाऱ्या नसून त्याबद्दल राजबलानेंच विशेष बंदोबस्त होतो.

२०५. सती जाण्याचा प्रकार हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं मानिला होता, कितीएक ठिकाणीं रजवाड्यांत तर अशी चाल होती कीं, राजा किंवा ठाकूर मेले ह्मणजे मोठी गर्ता(खांच)खणून त्यांत अग्नि पेटवून त्यास जाळीत. नंतर ती चिता पंधरा दिवसपर्यंत तशीच पेटलेली असे व त्यांत वरचेवर लांकडें टाकीत. तेव्हां त्या चितेजवळ त्यांचे पदरचा भाट जाऊन ढोंग करून,'महाराज माझे अंगीं आले आहेत' असें ह्मणे;आणि मग, 'महाराज स्वर्गास बसले आहेत त्यांणीं फलाण्या मनुष्याची याद केली आहे,' असें सांगे.ह्मणजे लागलीच त्या मनुष्यानें येऊन त्या खाईत उडी टाकावी.असा समारंभ पंधरा दिवस नित्य होऊन त्या वेळांत त्याप्रमाणें नांवें घेतलेलीं दहा वीस मनुष्यें त्या खाईंत जळून पडत!मेलेले मनुष्यांच्या मुलांबाळांचें परिपोषण दरबाराकडून चालवीत, परंतु हा अनर्थ फार माजला होता. त्या मृतराजाच्या किंवा ठाकुराच्या बायका, दासी,चोपदार व भाट हे सर्व याप्रमाणें सती जात!ही चाल इंग्रजांनीं मोडण्याकरितां बहुत प्रयत्न

मराठी ग्रंथ सं
नं०
दाखल सन १८९



केला. तरी कित्येक प्रसंगीं लोकांचा याजबद्दल फार दुराग्रह पाहून कित्तीएक ठिकाणीं सती जाणाऱ्या बायांस, त्यांस आज्ञा व उत्साह देणाऱ्या भटांस व त्या समयीं तेथें असणाऱ्या लोकांस काळेपाण्यावरही पाठविलें. त्याचप्रमाणें याविषयीं राजांस ताकिदी देऊन त्यांचे लेख करून घेतले कीं, आमचे मुलखांत सती जाणार नाहीं. मराठे राजे, क्षत्रिय राजे व असेच इतर सर्व जातींचे राजे यांजकडूनही असे लेख घेतले. परंतु त्यांत साताऱ्याचे बुवासाहेब महाराज यांणीं इंग्रज सरकारचे विरुद्ध दुराग्रहानें कित्तीएक वर्षे पर्यंत ही गोष्ट कबूल केली नाहीं. तेव्हां शेवटीं ते पदच्युत झाल्यावर १८४० सालीं त्यांचे बंधू अप्पा साहेब यांणीं इंग्रज सरकारच्या म्हणण्याप्रमाणें हा करार करून लिहून दिला.

२०६. या हिंदुस्थानांत दासी व दास करण्याचा प्रकार फार चालला होता. दानखंडांत दासीदान लिहिलें आहे. हे दास व दासी काळांत व लढाईंत विकत घेत. याप्रमाणें पुण्यांत बहुतेक गृहस्थांच्या घरीं लेकवळे, कुळंबिणी व गुलाम असत. असाच सर्व देशभर हा प्रकार होता. दासींचें लग्न होत नसे व त्यामुळें त्यांचे व्यभिचारापासून झालेले संततीस शिंदे, पोर्गे असें म्हणण्याची रूढी पडली आहे. पुण्यांत तर एके रस्त्यास शिंदेआळी असेंच नांव आहे व त्यांत त्यांचीच वस्ती असे. शिवाय कसबिणी, पोरी वगैरे विकत घेत व त्यांशीं मोठमोठे लोकांमध्यें जे सोदे लुच्चे निघत ते मिशी ( लग्न ) लावीत; असे अनेक प्रकारचे दुराचार चालत होते, ते इंग्रज सरकारांनीं बंद केले. गुलामगिरी बंद करण्याचा कायदा केला व इतर राजे रजवाडे यांजपासूनही त्याप्रमाणें कौल करार लिहून घेतले, त्यामुळें ह्या घेड्या चालींचा सर्व बंदोबस्त झाला.

२०७. गोंडवण प्रांतांत अशी चाल होती कीं, एक मुलगी मारून तिचा होम करावा. त्यास मरीया म्हणतात. तेथील लोकांची अशी समजूत असे कीं, याप्रमाणें केलें असतां गांवचीं शेतें चांगलें पीक देतात. व याकरितां सर्व गांवकरी आपले गांवांतील कोणाजवळ तरी मुलगी मागत. मग ती देण्यास तो मोठ्या हौसेनें कबूल होई. कारण,

सर्व गांवचें काम, आपली मुलगी दिल्यानें सर्व गांवची आबादी होत, त्या अर्थी एवढ्या महत्कार्यास आपण ना म्हणूंनये, अशी लोकांची समज होती. परंतु हीही चाल इंग्रज सरकारांनीं अगदीं बंद केली. यजुर्वेदांत नरमेध करण्याविषयीं असेंच बपशीलवार विधान लिहिलें आहे. तें विलक्षण वाचकांस श्रुत असेलच.

२०८. दिल्लीचे राज्याची मोडकळी झाली व अमीर उमराव सर्व मुलूख व जुलमी होऊन आपसांत फूट झाली. तेव्हां त्यांची अशक्तता पाहून त्यांच्या प्रदेशाचे तुकडे संपादन करण्याकरितां सभोंवतालचे राजे प्रयत्नास लागले. त्यांत काबूलचे पठाण, जाट, शीख, मराठे, व इंग्रज हे सर्वच होते. काबूलेस पठाणांनीं काबूल बळकावलें; अहंमदशाहा अबदल्ली याणें पाणपतावर लढाई देऊन अफगाणिस्तान आटपलें व तो दिल्लीचे बादशाहास मानीनासा झाला; शिख, लोकांनीं पंजाब घेतला; मराठ्यांनीं दक्षिण व माळवा ह्याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानापर्यंत बळकाविलें; आणि इंग्रजांनीं बंगाल घेतला. पुढें हळू हळू बाकीचीं राज्यें सर्व इंग्रजांचे हातीं येऊन ते सार्वभौम पद पावले. तरी दक्षणचें राज्य पेशव्यांचे हातींच होतें. पुढें त्यांतही अंदाधुंदी फार होऊन शिंदे होळकर आपसांत भांडूं लागले व पेंढारी यांणीं मनस्वी दंगा माजविला. बरें, हे पेंढारी कोण याचा विचार केला तरी त्यांत एकच जात नव्हती. ब्राह्मण परभू, मराठे, रामोशी, भील, कोळी, मुसलमान, वगैरे सर्व जातींचे लोक लहान लहान टोळ्या करून लुटण्याचा क्रम चालवीत. एकेका पेंढाऱ्याजवळ पांच पांच हजार फौज असे. त्याशिवाय कोणाजवळ शंभर दोनशेंही असे. त्यांचीं घोडीं फार जलद चालत. त्यांणीं नेहमीं गांवें व रस्ते लुटावे. तशांत शिंदे, होळकर हे त्यांस आश्रय देत म्हणून तर ते सर्व मुलुखभर फिरत. कोंकणांत, देशांत, माळव्यांत वगैरे ठिकाणीं त्यांचा फार उपद्रव असे. त्यांणीं अनेक प्रकारचे जुलूम करावे. याचप्रमाणें कर्नाटकांतही काटक, पुंड व पाळेगार यांचाही पेंढाऱ्यांसारखाच जुलूम चालत असे. ते एखाद दुसऱ्या वाटसरास लुटीत येवढेंच नाहीं तर ते लग्नासारख्या मोठाल्या कार्याकरितां जात असलेल्या मोठ्या समाजाच्या वऱ्हा-

ऱ्यांसही लुटून फस्त करीत! हे इतके दुष्ट होते कीं, ते वाटसरास अर्धी मारीत आणि मग त्याजवळ कांहीं सांपडलें तर शोधीत! या लुटाऱ्यांस कोणी विचारता नसे. उलटें राजे व राजांचे अधिकारी हे या चोरांपाशीं आपले हिश्शाचा ठराव करून त्यांस मदत देत! असा क्रम नाना फडणवीस मेल्यापासून बाजीराव जाईपर्यंत चालला होता. त्यांचा निःपात करण्याकरितां जनरल माल्कम साहेब जे पूर्वीं लॉर्ड लेक साहेबाजवळ आडिक्याप होते त्यांस नेमिलें. तेव्हां त्यांणीं मोठी फौज व रिसाले जमवून त्या पेंढाऱ्यांचा पाठलाग करून त्यांस नाहींसें केलें. या पेंढाऱ्यांसारखाच दुसरा एक उपद्रव होता तो हा कीं, कित्येक गोसाव्यांच्या हत्यारबंद झुंडी देशभर फिरत असत. ते गांवोगांव लूट करीत नसत, पण दर गांवीं सिधा घेत व तो सिधा त्या गांवच्या लोकांस देणें भाग पडे! परंतु त्या झुंडीही इंग्रजी अमलांत बंद झाल्या.

२०९. जुन्या काळीं म्हणजे हजार पंधराशें वर्षांपूर्वीं ऋषी होते तेव्हां विद्येची चर्चा या देशांत मोठी होती असें त्यांचे ग्रंथांवरून दिसतें. ज्योतिष, वैद्यक, तर्कशास्त्रें व मोठ्या मोठ्या कविता या त्या काळीं झाल्या परंतु पुढें विद्येच्या नांवें अगदीं शून्य पडलें. गृहस्थांस लिहिणें, वाचणें व हिशेब वगैरे येत. परंतु जुन्या ग्रंथांवरून मराठी भाषेंत उतरलेल्या भारत भागवतांच्या कथा हेच काय ते त्या काळीं वाचनाचे ग्रंथ होते. याजमुळें खोट्या गोष्टी व खोटे भूगोल यांचे दृढतर समज लोकांचे अंतःकरणावर फार झाले. भिक्षुकांची विद्या पाहिली तर कांहीं वेदमंत्र पाठ करीत. अशा वेदपाठीस वैदिक म्हणत, आणि शास्त्रांतील वाक्यें पाठ करणारांस शास्त्री म्हणत; आणि हेच काय ते विद्वान् म्हणून मानले असत. परंतु त्याजमध्यें अर्थाविषयीं शून्य असे. असा अनिष्टकाल बहुत दिवस चालला. भिक्षुक लोक जुन्या पोथ्या घरांत बाळगून त्या कोणास न दाखवितां मोठ्या गुप्त रीतीनें ठेवीत व ह्यामध्येंच त्यांस मोठी अब्रू वाटे. पूर्वींचे वैद्यांनीं कोणास औषध वगैरे न सांगतां सर्व प्रकार गुप्त ठेवण्याचा प्रघात पडला. परंतु हल्लीं इंग्रजी अमलांत हें सर्व अज्ञान जाऊन सर्व देशभर प्रकाश पडला आहे. पृथ्वीचे नकाशे व गोल चोहोंकडे प्रसिद्ध

झाले; इतिहास लिहून त्यांचीं मराठी पुस्तकें करून सर्व मुलांकडून तीं वाचवितात व भूगोल वगैरे विद्या शिकवितात यामुळें विद्वानांची संख्या वाढत आहे, असें दिसूं लागलें आहे. अमेरिका व विलायत पर्यंत लोक जाऊन बाहेर काय आहे हें पाहूं लागले याजमुळें पूर्व अज्ञान दूर होत चाललें; हें इंग्रजांच्या सहवासाचें फळ आहे. अज्ञान व भ्रम यांचे डोंगर या देशांत हिमालय व सह्याद्रिपेक्षांही मोठे झाले होते ते बसत चाललेले आहेत, हा एक इंग्रजी राज्याचा लाभ आहे.

२१०. उज्जनीस विक्रम राजा झाला; त्याची परोपकाराबद्दल फार प्रसिद्धि आहे. परदुःखभंजनाबद्दल त्याणें मोठ मोठीं साहसी कर्मे केलीं. त्याचे पुढें राजा भोज म्हणून धारेस झाला; तो विद्वानांस उत्तेजन देण्याबद्दल प्रसिद्ध आहे. सिद्धराज जयसिंग म्हणून पट्टणचा राजा होता; हा इमारती बांधण्याबद्दल मोठा प्रसिद्ध आहे. शिवाजी राजे भोंसले हे किल्ले बांधण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. तोडरमल्ल व मलिकंबर हे जमिनीवर यथान्याय सारे ठरविण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. अकबर बादशाहा हा हिंदू लोकांस चांगले रीतीनें वागविण्याबद्दल प्रसिद्ध आहे. इतकेंच नव्हे तर, जें मोठ मोठ्या विद्वानांस आज समजलें आहे तें त्यास पूर्वींच कळलें होतें. म्हणजे, सती बंद करण्याबद्दल त्याणें हुकूम दिला होता व गोवध बंद करण्याबद्दल त्याणें फार मान दिला होता. जाणतीं मुलें झाल्यावेरीज लग्न करूं नये असाही ठराव प्रथम त्याणेंच केला. त्याचप्रमाणें विधवांनीं पुनर्विवाह करण्याबद्दल उत्तेजन दिलें, हिंदू व मुसलमान यांचा आप्तपणा केला, स्वधर्मास व हिंदुधर्मास सारखें मानिलें, आणि जिंकलेले लोकांवर विश्वास ठेवून सांस मोठ्या पदव्या व सरदाऱ्या दिल्या, अशी त्याचीप्रख्याति आहे.

२११. शिवाजी, रामराजा, व शाहू यांचे कारकीर्दीत जे मराठे सरदार नामांकित झाले त्यांचीं नावें—उदाजी चव्हाण, खंडेराव दाभाडे, संताजी घोरपडे, मानाजी मोरे, खंडोजी माणकर नामजाद, कान्होजी आंग्रे, तान्हाजी मालुसरे, नागोजी माने, व्यंकोजी

नाईक निंबाळकर, जगपाळराव नाईक निंबाळकर, दमाजी थोरात, दमाजी गाइकवाड, कंठाजी कदमबांडे, चंद्रसेन जाधवराव, हैबतराव निंबाळकर. येसाजी कंक, नेताजी पवार, हंसाजी मोहिते, प्रतापराव गुजर धनाजी जाधव, उदाजी पवार, राणोजी शिंदे, मल्हारजी होळकर वगैरे.

२१२. पूर्वी उंच जातीचे लोकांचा जुलूम नीच जातीचे लोकांवर फार असे; तो आतां नाहींसा होऊन ज्याप्रमाणें वाघ व बकरी एके ठिकाणीं पाणी पिऊं लागलीं तसेच नीच जातीचे लोक एके ठिकाणीं व सारख्या न्यायानें राहूं लागले आहेत.–एक वेळ निपाणकर यांच्या घोड्याचे अंगावर मळ दिसला ह्मणून त्यांणीं खासदारास फटके मारण्याचा हुकूम केला व तो बिचारा त्या मारानें प्राणास मुकला! कनोजचा एक क्षत्रिय ठाकूर होता, त्याचे आबदारानें विड्यास अधिक चुना लाविल्यामुळें त्याचे तोंडास फोड आले, म्हणून वचकभर चुना आणून तो आबदारापुढें तरवार काढून उभा राहिला आणि त्याजकडून तो खावविला; व तेणेंकरून तो मरण पावला! याप्रमाणें पूर्वी अंदाधुंदी होती. जबरदस्तीनें कोणीं कांहीं केलें तरी त्यास कोणी कांहीं बोलत नसे. हल्लीं झुलू लोकांची वगैरे नीति याप्रमाणेंच आहे. यावरून ज्यांस शास्ता कोणी नाहीं त्यांची स्थिति अशीच असते.

२१३. मल्हारराव गाइकवाड राज्यावर असतां त्यांजजवळ मर्जीतील (वृषभस्कन्ध्ये) मंडळी बरीच असून त्या दरएकास सहाशें रुपये महिना नेमणूक होती, या नेमणुकांविषयीं कितीं एकांचा दावा असा होता कीं, त्यांणीं त्यांस राज्यावर येण्याविषयीं मदत केली, कितीं एकांनीं खंडेराव महाराजांकडून मल्हाररावांसाठीं हाल भोगले, कोणी ह्मणत आम्ही महाराज गादीवर येण्याकरितां तप केलें, कोणी ह्मणत आम्हीं शकून सांगितला, कोणी ह्मणत आम्हीं खटपट केली, कोणी ह्मणत आम्ही आप्त. याप्रमाणें अनेक सोंगांनीं अनेक लोक त्यांचे भोंवतीं जमले होते या सर्वांचीं नांवें खालीं लिहिलीं आहेत—

१ त्र्यंबकराव गोविंद मास्तर, पटवर्धन २ मुकुंदराव मामा.

| | |
|---|---|
| ३ खासेराव. | ४ रामराव, ( मुकुंदरावाचा जावई.) |
| ५ चंद्रशेट सोनार- | ६ शेखजी. |
| ७ मलूकचंद खत्री, | ८ आत्माराम माधवजी. |
| ९ विष्णुपंत नेने. | १० दामोदरपंत नेने. |
| ११ नाना खानवेलकर- | १२ दाजी खानवेलकर. |
| १३ गुजाबा खानवेलकर. | १४ नारायणराव डाक्तर. |
| १५ बळवंतराव राहुरकर. | १६ गोपाळराव जपे. |
| १७ राजाराम जपे- | १८ माधवराव धोपटकर. |
| १९ रावजी आठवले. | २० गणपतराव आठवले. |
| २१ गणेश शास्त्री वैद्य. | २२ दादा आंबोकर. |
| २३ रामेश्वर स्वामी नारायण. | २४ नारायण जोशी पाद्रेकर. |
| २५ पाटणकर. | २६ गोविंददास बहिरागी. |
| २७ गोविंदजी नाईक. | २८ यशवंतराव येवले. |
| २९ कृष्णाजी त्रिंबक रानडे. | ३० लक्ष्मणराव भगवंत. |
| ३१ अमरसिंग. | ३२ मोहनसिंग. |

या सर्वांस नेमणुका असून शिवाय आजकडे कामें असत तीं: कोणाकडे तफावत खातें, कोणाकडे शहरदुरुस्ती, कोणाकडे इमारत खातें, कोणाकडे दिवाणगिरी. कोणाकडे अनुष्ठानें, कोणाकडे वैद्यगिरी व कोणाकडे खुषमस्करीचा धंदा. या सर्वांनीं पांच वर्षे गोंधळ घातला; परंतु एकाचे हातूनही घडगत झाली नाहीं!!

२१४. शाहुमहाराज मेल्यावर बाळाजी बाजीराव पंत प्रधान हे राजमंडळ मोडून पुणें मुक्कामीं आले तेव्हांपासून पुण्याची भरभराट चालली. त्यापूर्वीं ३० वर्षें म्हणजे १७२० सालीं बाजीराव पेशवे यांणीं पुण्याचे तळावर नदीचे कांठीं शनवारचा वाडा बांधून त्यांत ते कधीं कधीं राहात होते इतकेंच. त्याचप्रमाणें पुण्याभोंवते कुरणाचे गांवीं मराठे शिलेदार आपले घोडे चारून तयार करीत, व सरकारी पागाही तेथें राहून दसऱ्यास बाहेर पडण्याकरितां तयार करीत. परंतु पुढें सदरप्रमाणें बाळाजी बाजीराव पुण्यांत वस्ती करून राहूं लागल्यापासून

खटाव प्रांतांतील शिलेदार व सरदार सर्जेराव, घोरपडे, नाइक, निंबाळकर, मावळ प्रांतचे मावळेमोकाशी, नीरथडीचे बाराराव धनगर मंडळी, नगराकडील वणजारी, शिलेदार, खानदेशाकडील कदमबांडे, पंढरपुराकडील पांढरे, पुण्यानजीकचे वाघोलीकर जाधव, पुणेकर पवार, तळेगांवकर ढमढेरे, पश्चिमेकडील तळेगांवचे दाभाडे सेनापती, जगताप बाबर, कोंकणचे मोहिते, गुजर, शिरके, खानवलेकर, गाणकर, सावंत, आंग्रे, आरमाराकडील धुळप वगैरे सरदार ही मंडळी तेथें येऊन राहूं लागली. त्या सरदारांचें लक्ष्य पुढील स्वारीवर असे. यास महिन्याचे महिन्यास पगार मिळत नव्हता; परंतु जाहगीर गांवें, इनाम गांवें, नक्त नेमणुका व तैनाती वगैरे असत. त्यांचा बारा महिन्यांनीं हिशेब होऊन कापड आंख*, नालबंदी व कांहीं रोख मिळून समजूत करीत व कधीं कधीं बाकयाही पुष्कळ राहात. हशम, गडकरी, किल्लेदार व सरनोबत वगैरे हे मराठे असत. कारखानीस, पोतनीस चिटणीस वगैरे परभू असत. फड म्हणून एक मोठें आफीस असे, त्यांत कारकून लोक ( मुत्सद्दी** ) लिहीत व त्यांस दरक, वकिल्या, सुभेदाऱ्या, फुट वाबुलती वगैरे मिळत. सरदारांमध्यें दोन तर्फा असत: कांहीं हिंदुस्थानचे व कांहीं कर्नाटकचे. रास्ते, पटवर्धन, प्रतिनिधी, अक्कलकोटकर, त्रिंबकराव मामा पेठे हे कर्नाटकचे सरदार; आणि राजे बहादर, पानसे, विंचूरकर, चिंतो विठ्ठल रायरीकर, आणि शंताजी माणकेश्वर वगैरे हिंदुस्थानचे सरदार. हे सर्व पेशव्यांचे हुकुमांत

---

* कापड आंख, या संबंधानें पहा, ऐतिहासिक गोष्टी भाग २, पृष्ठ ४४ ची तळची टीप. कापड १० रुपयांचें असून त्यावर सरकारी ५० रुपयांचा आंख पडला म्हणजे तीच त्याची किंमत झाली असें असे.

* * हल्लीं जसे मिलिटरी आणि सिव्हिलिअन असे दोन वर्ग आहेत तसे, पूर्वी मराठी शाहींत शिलेदार व मुत्सद्दी असे दोन वर्ग असत. शिलेदार म्हणजे तरवार बहादूर आणि मुत्सद्दी म्हणजे लेखकाचें काम करणारे.

चालून एक मतानें वागत. याप्रमाणें ही सर्व व्यवस्था खर्ड्याच्या लढाईपर्यंत चालली; पुढें नाना फडणीस वगैरे गेले व या मराठ्यांच्या भव्य दर्यात आटोपील असा कोणी राहिला नाहीं. बाजीरावानें सर्वांशीं द्वेष केला याजमुळें सर्व सरदार फुटले आणि एकामेकांशीं लढूं लागले व त्यामुळें पेंढारी माजले, मुलूख उजाड झाला आणि रयत त्रासून परदेशीय राजाची इच्छा सर्वांस वाटूं लागली!

२१९. मराठी कारकीर्दीच्या मित्या —

१५४९ शक विजयनाम संवत्सरीं शिवाजीचा जन्म.

१५९६ आनंदनाम संवत्सर, ज्येष्ठ शुद्ध ४ मंदवारीं, शिवाजीची मौंजी होऊन शु० १३ रोजीं राज्याभिषेक झाला. त्यास संभाजी व राजाराम असे दोन पुत्र होते.

१६०२. रौद्रनाम संवत्सर, चैत्र शुद्ध १९ रविवारीं शिवाजी याचा काळ झाला.

१६०२ वैशाख शुद्ध १३ स संभाजी राज्यावर बसला.

१६११ भावनाम संवत्सरीं संभाजी धरला गेला.

१६११ माघ शु० ९ रोजीं राजाराम यास रायगड येथें रामचंद्र पंत आमात्य व परशुराम त्रिंबक प्रतिनिधी ह्या कारभाऱ्यांनीं राज्याभिषेक केला.

१६२० बहुधान्यनाम संवत्सरे ज्येष्ठमासीं राजाराम साहेब वारले. त्यांस राधाबाई व राजसबाई अशा दोन स्त्रिया असून पहिलीपासून शिवाजी व दुसरीपासून संभाजी असे दोन पुत्र होते.

१६२१ सुभानुसंवत्सरीं वरील राजारामपुत्र जो शिवाजी त्यास वेड लागलें ह्मणून त्यास आमात्य यांणीं पन्हाळा किल्ल्यावर कैदेंत ठेविलें आणि त्याच किल्ल्यावर राज्याभिषेक केला.

१६२७ पार्थिवनाम संवत्सरीं संभाजी याचें नांव बेगमेनें शाहू असें ठेविलें. पुढें ते साताऱ्यास परत आले तरी दोन [illegible] गडबड होतीच. नंतर बंदोबस्त झाला.

१६२९ सर्वजित नामसंवत्सरीं शाहू महाराजांस साताऱ्यास पुनः

राज्याभिषेक झाला. आणि वारणानदीपलीकडे वेड्या शिवाजीची स्त्री जिजाबाई ईणें राज्य करावें असा तह ठरला.

१६३९ विकृतिनाम संवत्सरीं पिंगळे, आश्वलायन ब्राम्हण, यांची पेशवाई दूर होऊन ती परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यांस दिली.

१६३८ बाळाजी विश्वनाथ यांस पेशवाई झाली.

१६४० परशुराम त्रिंबक यांचा काळ होऊन श्रीपतराव यांस प्रतिनिधी झाली.

१६६८ क्षयनाम संवत्सरीं श्रीपतराव वारले आणि जगन्नाथ परशुराम यास प्रतिनिधी झाली.

१६७१ शुक्लनाम संवत्सर, मार्गशीर्ष शु० २ शुक्रवारीं शाहूमहाराज यांचा काळ झाला.

१६७६ भावनाम संवत्सरे भाद्रपद शु० २ किन्हईस दादोबा प्रतिनिधी वारले आणि भवानराव यांस प्रतिनिधी झाली.

१६८४ माधवराव बल्लाळ पेशवाई राज्यावर बसले.

१६९४ थोरले माधवराव थेऊर मुक्कामीं वारले.

१६९५ नारायणराव पेशवे मारले गेले.

१६९६ अधिक वैशाख शु० ७ स सवाई माधवराव यांचा जन्म.

१७१७ राक्षसनाम संवत्सर, आश्विन शु० १४ मंगळवारीं सवाई माधवराव समाप्त झाले.

१७१८ नलनाम संवत्सर, वैशाख मास, चिमणाजी माधव म्हणून मुद्रा झाली ती पुढील आश्विनापर्यंत होती. मार्गशीर्षांत बाजीराव यांस आणिलें.

१७२१ सिद्धार्थी नामसंवत्सर, फाल्गुन वद्य ४, माहे रमजान सुहूसन मय्या तैन व अलफ रोजीं बाळाजी जनार्दन भानु उर्फ नाना फडणवीस यांचा काळ झाला. हा अद्वितीय पुरुष होता.

१७२४ दुंदुभी संवत्सर, आश्विन व० १४ यशवंतराव होळकर यांची व शिंद्याची पुणें मुक्कामीं लढाई झाली, आणि श्रीमंत बाजीराव वसईस पळून गेले. त्यावेळीं अमृतराव पुण्यांतच होते.

१७२५ वैशाखमासीं वसईहून बाजीराव परत आले.

१७३०. विभवनाम संवत्सर, वैशाख शु० ९ स सातारचे रामराजे यांचे दुसरे पुत्र शाहू महाराज हे वारले.

१७३९ ईश्वरनाम संवत्सर, कार्तिक शु० ९ इंदुवारीं बाजीराव पुणें सोडून सासवडास गेले व त्याच दिवशीं इंग्रजी निशाण पुण्यास चढलें!

२१६. मराठी राज्यांत मोठ्या लोकांस किताब देत. ते येणें प्रमाणें.

१ नागपूरकर भोंसले– सेना साहेब सुभा.
२ आंग्रे–विजारत माहासरखले.
३ शिंदे–अलिजा बाहादूर.
४ नारोशंकर–राजे बाहादूर.
५ सुरापूरकर नाईक–बहिरी बाहादूर.
६ कंपनी–इंग्रज बाहादूर.
७ टिपू–सुलतान बाहादूर.
८ गाइकवाड–सेना खासखेल समशेर बहादूर.
९ घोरपडे–सेना धुरंधर.
१० वाडीकर सावंत– राजे सावंत बाहादूर.
११ विंचूरकर–उमदे तुलमुलख बाहादूर.
१२ अष्टप्रधान–पंडित.

२१७. दक्षिणचे साडेसहा सुभे होते ते असे:—

१ बऱ्हाणपूर; नर्मदादक्षणतीरापर्यंत.
२ ईलिचपूर, वऱ्हाड, बंगाल; पूर्वसमुद्रापर्यंत.
३ विजापूर; पश्चिमसमुद्रापर्यंत.
४ सुभे बेदर व हैदराबाद; पूर्व समुद्रापर्यंत.
५ सुभा अर्काट व कर्नाटक; दक्षिण समुद्रापर्यंत.
६ सुभे अमदाबाद, तमाम गुजराथ.
॥ दौलताबाद; मध्यदेश.

२१८. शिवाजी राजे यांचे कारकीर्दीतील टिपण—

१५७० (शके ) सर्वधारिनाम संवत्सर, श्रावण ब० १ रोजीं शहाजी महाराज यांस धरिलें.

१५७७ मन्मथनाम संवत्सर, पौषशु० १४ स जावळी घेतली.

१५७९ हेमलंबी नाम संवत्सर, चैत्र व० १० स बेदर घेतलें; ज्येष्ठ शु० १२ स संभाजी हा ज्येष्ठ पुत्र झाला.

१५८१ विकारी नामसंवत्सर, आश्विन शु०७अफजुलखान यास मारलें आणि पौषमासीं रुस्तुम जमानाचा मोड केला. माघमासीं विजापूरची स्वारी झाली.

१५८२ शार्वरीनाम संवत्सर, ज्येष्ठ शु० ८ स षाहिस्तेखान यास मारिलें. मार्गशीर्ष मासीं शिवाजी सुरतेस आले. माघ शु० ५ स शिवाजीचे वडील शाहाजीराजे वारले.

१५८७ विश्वावसुनाम संवत्सरीं जयसिंग व दलेलखान भेटले, व फाल्गुनमासीं दिल्लीस गेले.

१५९१ सौम्यनाम संवत्सर, माघ व०९ स सिंहगड घेतला व फाल्गुनांत पुरंदर घेतला.

१५९२साधारणनाम संवत्सरे ज्येष्ठ शु०४स लोहगड घेतला; आषाढ शु०२स रोहिडा घेतला;आणि पुढें सिंदोळा, कर्नाळा व माहुली घेतली.

१५९५ प्रमाथी नाम संवत्सर, चैत्र व०१०स परळी घेतली; श्रावण व० ९स सातारा घेतला; आणि आश्विन शु०१३स पांडवगड घेतला.

१५९६ आनंदनाम संवत्सर, ज्येष्ठ व० ९ स शिवाजीची मातोश्री जिजाऊ साहेब गेली. माघ व०५ स संभाजीची मुंज झाली.

१६०१ बाहादूर बिंडा घेतला. वैशाखमासीं भूपाळगड घेतला; फाल्गुनांत गुजर यांच्या कन्येबरोबर राजारामाचें लग्न झालें.

१६०२ रौद्रनाम संवत्सर,चैत्र शु०१५स शिवाजी राजे गेले; वैशाख व० १३ स रायगडास धरीधरी झाली. आषाढ शु०११ स शिवाजीची पत्नी पुतळाबाई सती* गेली. मार्गशीर्ष शु० १० रोजीं संभाजीस शाहुराजे पुत्र झाले, व माघ शु०७स संभाजीस राज्याभिषेक झाला.

---

* चैत्र शुद्ध १५ स शिवाजी राजे गेले व आषाढ शुद्ध ११ रोजीं यांची पत्नी सती गेली हा चमत्कारिक सतीचा योग वाचकांस आश्च-

२१९. मुंबईत कावसजी पाटलाचें तळें प्रसिद्ध आहे. सवाई माधवराव यांच्या जन्माचे सालीं इंग्रजांनीं ठाणें, साष्टी, वसई वगैरे घेतलीं. तेव्हां तेथील पेशव्यांचा सुभेदार आनंदराव विवलकर हा पुण्यास पळून गेला त्या वेळीं इंग्रजांनीं साष्टीची पाटिलकी कावसजीशेट यांजकडे सांगितली असून त्यांणीं तेथें बहुत वर्षें पर्यंत रिव्हेन्यू, कोतवाली व न्यायाधिशी हे सर्व अम्मल चालविले.

२२०. खंडेराव महाराज यांस रेसिडेंट साहेबांनीं आपले राज्यांत विद्याभ्यासाची तजवीज करण्याविषयीं कळविलें. तेव्हां त्यांनीं असा जबाब दिला कीं, आम्हीं आपले प्रजेस शिकविण्याची तजवीज केली तर ती फार दांडगी होऊन त्यांच्या तक्रारी फार वाढतील याजकरितां आज जें निमूटपणें काम चालतें आहे तें बरें आहे. आतां ही गोष्ट कांहीं आश्चर्याची नाहीं. अशा विलायतेंतही कल्पना थोडे दिवसांवर होत्या आणि हिंदुस्थानांत तर शूद्रांस शिकविण्याची मनाई होतीच. परंतु इंग्रजी राज्यांत जे माहात्म्ये पुरुष आहेत त्यांस हिंदुस्थानच्या प्रजेस शिकवून शहाणें करावें असें वाटतें व त्यांचे जोरानेंच विद्यालातें चाललें आहे. परंतु शिकलेले लोक उद्दाम व दांडगे होतात म्हणून त्यांस शिकवूंनये अशी कुरकुर करणारेही त्यांजमध्यें आहेत. सारांश, लोकांचे अज्ञानापासून आपल्यास लाभ असतात व ते जावे असें कोणास वाटत नाहीं।

---

यांस्पद होईल. हे खरें. पण तसें होण्याचें कारण नाहीं. शिवाजी राजे मेल्याची मिति आहे पण ते कोठें मेले याचा ठिकाण नाहीं. शिवाजी राजांनीं मोंगलास अगदीं जेर करण्याकरितां आपल्या सारखे १०-१५ शिवाजी करून निरनिराळ्या किल्यावर त्यांजकडून वस्ती करविली होती अशी आख्या आहे. याप्रमाणें पाहिलें असतां शिवाजी कोठें गेले याचा नक्की शोध न लागतां सदरील राजपत्नीस आपल्या भ्रताराच्या अस्थी सुमारें तीन महिन्यांनीं मिळाल्या असाव्या आणि नंतर ती साध्वी सती गेली असावी असें अनुमान होतें. व हे संभवनीय आहे.

२२१ सन १८६२ सालीं कम्यांडर इन् चीफ यांची स्वारी फिरण्यास निघाली तेव्हां त्यांजबरोबर विद्याखात्याचे डायरेक्टर हावर्ड साहेब व त्या वेळीं नुक्तेच विलायतेंतील शाळा पाहून आलेले रावसाहेब महिपतराम रूपराम यांस बरोबर दिले. सर्व राजांच्या भेटी घेऊन त्यांस शाळा घालण्याविषयीं सूचना करावी असा सरकारचा हुकूम झाला. मुख्य कम्यांडर इन् चीफ् हे फौजा पाहण्यास निघाले असल्यामुळें ठिकठिकाणीं त्यांचें आगत स्वागत चांगलें होई व त्यांचे योगानें हावर्ड साहेब व महिपतराम यांचाही दरबारांतून प्रवेश होऊन त्यांचा आदरसत्कार चांगला होईल अशा धोरणानें ही योजना केली होती. त्या प्रमाणें सर्व राजांचे दरबारांत ते फिरले, परंतु ही गोष्ट कोणासही उपतिष्ठली असें दिसलें नाहीं! भाग्य त्या विद्यादेवतेचें!

२२२. मल्हारराव यांस कैद केले तेव्हां बडोद्याचे राज्याची काय व्यवस्था करावी या विषयीं बहुत विचार चालला होता. त्यावेळीं कोणाचें मत वारसास राज्य द्यावें, कोणाचें मत इंग्रज सरकारचा अम्मलदार नेमून कारभार चालवावा, कोणी म्हणत कीं हिंदु मनुष्य नेमून त्याचे हातून कारभार करवावा, कोणी म्हणत कीं हें राज्य असेंच ठेवून सरकारानें पांच वर्षे जो शहाणा मनुष्य वाटेल त्यास नेमावें व त्याचीं पांच वर्षे झालीं म्हणजे दुसरा कोणी नेमावा. येणेंकरून राजे दिनकररावांसारखे मोठे व अमुदार मनुष्य सरकारचे दोस्त असून त्यांस देण्यासारखें सरकाराजवळ कांहीं नसल्यामुळें तशा योग्य लोकांस ही एक राज्य चालविण्याची मोठी जागा देण्यांत येईल. असे अनेक विचार चालतां चालतां असें ठरलें कीं, या देशांत दत्तक देण्याची चाल असून त्या प्रमाणें गायकवाडास सनदही झाली आहे व ती रीति लोकांस कबूल असल्यामुळें त्याप्रमाणें दत्तक देण्याचें ठरून सयाजीराव गायकवाड हा मुलगा गायकवाडीचा मालक झाला.

# पुरवणी.

## ऐतिहासिक गोष्टी

व

## उपयुक्त माहिती.

---o---

१. सन १६६० सालीं फिरंग्यांकडून इंग्लंडच्या राजास मुंबई प्राप्त झाली. तेव्हांपासून इंग्लंडच्या राजाकडूनच तेथें गव्हरनर नेमण्यांत येत. प्रथम सन १६६२ मध्यें सर अब्राहाम शिप्मन् ह्मणून गव्हरनर नेमिला. परंतु तो मुंबईस येत असतां त्यास फिरंग्यांचे अधिकारी येऊं देईनात. यास्तव तो अन्जनदिव्यास याची कांहीं तजवीज करण्याकरितां गेला. तो तेथेंच मेला. नंतर हंफ्री कुक ह्मणून मागील गव्हरनरचा सेक्रेटरी होता, त्यास गव्हरनर नेमिलें. त्यानंतर लूकास व त्यानंतर गेरी असे चार गव्हरनर सन १६६७ पर्यंत इंग्लंडचे राजाच्या तर्फेचे झाले. त्यांस दर सालास ८०० रुपये ह्मणजे दरमहा सुमारें ६६॥। रुपये मिळत. परंतु त्यावेळेस मुंबई बेटाशिवाय त्यांचा अधिकार कोठेंही नसून त्यांस फक्त व्यापाराचें काम असे. व तेथें त्यांस व्यापार करण्यांची मात्र परवानगी असून त्यांत मात्र त्यांस कधीं फायदा मिळे. पुढें मुंबई बेट कंपनीकडे आलें तरी त्यांणीं सन १६८२ पर्यंत त्याच पगारावर गव्हरनर नेमिले. नंतर सर जॉन चाइल्ड यास गव्हर्नर नेमिलें. तेव्हां त्यास ३००० रुपये सालिना ह्मणजे २५० रुपये दरमहा पगार होता. त्याचे कारकीर्दीत कप्तान केगविन याणें इंग्लंडच्या राजाचे नांवानें बंड केलें. परंतु पुढले वर्षी त्याची समजूत होऊन गव्ह-

रनराचा अम्मल चालूं झाला. ह्याप्रमाणें १६६७ पासून १७८७पर्यंत २४ गव्हरनर झाले. त्यानंतर जनरल् मेडो कम्यांडरइन्चीफ् यास गव्हरनर नेमिलें. या गव्हरनराचे नांवाचा मुंबई येथें किल्ल्यांत अद्याप मेडोस्ट्रिट नामक एक रस्ता आहे. त्यानंतर सन १७९६ मध्यें डंकन साहेब गव्हरनर झाला. याचे नांवाचाही डंकनरोड नामक एक रस्ता मुंबईंत आहे. रजपुत जातींतील मुली मारण्याची चाल बंद करण्याबद्दल प्रथम प्रयत्न याणेंच केला. हा बंगालखात्यांत मुत्सद्दी असून तो फार दयालू होता, अशी त्याची कीर्ति आहे. हा मुंबईंत १८११ त मेला. त्याचे पुढें दुसरे दोन गव्हरनर झाले. नंतर १८१९ त एल्फिन्स्टन् साहेब हा गव्हरनर झाला. हाही पूर्वी बंगाल खात्यांत मुत्सद्दी असून काबुलाकडे वकील होता, व पुढें पुण्यात गव्हरनरजनरलाचा वकील होता. त्याचे कारकीर्दींत पुण्याची लढाई होऊन दक्षिण हस्तगत झाली. या गव्हरनराचा लौकिक फार मोठा आहे. याणें कायदे केले; दक्षिणचा सर्व बंदोबस्त याचेच हातून झाला; व रयतेवरचे जुलूम काढून पेंढारी लोकांचा बंदोबस्त याणेंच केला. हा मोठा विद्वान् असून ग्रंथकर्ताही होता. विद्याखात्याचा पाया याणेंच घातला. याचा वर्षाचा पगार १,४३,९०० रुपये म्हणजे ११,९९१ रुपये दरमहा होता. कम्यांडरइनचीफचा सालीना पगार ७७,५०० व इतर कौन्सिलदारांचा ६०,००० रुपये होता त्याचे सेक्रेटरी वगैरे मोठा कारखाना असून त्याचा इतमाम मोठा होता. त्याचे चीफ् सेक्रेटरीचा पगार ४३,६०० रुपये, दुसरे सेक्रेटरीचा ३९,०००, खासगी सेक्रेटरीचा १८,०००, मिलिटरी सेक्रेटरीचा १२,०००,डाक्टर याचा ७,२०० व प्रत्येक एडिकांपाचा ३,२०० रुपये प्रमाणें सालात पगार असे. व हाच पगार हल्लीं त्या त्या अधिकाऱ्यांस आहे. त्यांस राहण्यास पुण्यास व महाबळेश्वरास मोठमोठीं घरें बांधिलीं आहेत. एल्फिन्स्टन याचे पुढें सर जॉन् माल्कम हा गव्हरनर झाला. हा मद्रासखात्याचा जनरल होता. हाही मोठा विद्वान्, पोक्त व मु-

सरी असून तो इराणांत वकील होता व मध्यहिंदुस्थानांत कुल मुखत्यारीचे कामावर होता. याचे कारकीर्दींत सुप्रीम कोर्टाचा जज्ज सर जॉन पिटर ग्र्यान्ट याचा श्रीमंत मोरो रघुनाथ ढमढेरे यांजबद्दल मोठा तंटा झाला. महाबळेश्वरास हवेकरितां प्रथम वस्ती याणेंच करविली. व त्या भागास माल्कमपेठ असें म्हणतात. पुढें सन १८३० त माल्कम साहेब विलायतेंत गेला. नंतर दोन गव्हरनर झाले. सन १८३४ पर्यंत मुंबईसरकार आपले हुकूम 'बांबेकूरीअर' नांवाचे पत्रांत १०,००० रुपये सालीना देऊन छापीत असे. तें बंद करून याजकडून 'मुंबई सरकारी ग्याझेट' नांवाचें स्वतंत्र पत्र निघूं लागलें. पुढें सर राबर्ट ग्र्यांट हा गव्हर्नर झाला. तो ता० ९ जुलई सन १८३८ रोजीं दापोडी (पुणेप्रांत) येथें वारला. मुंबईत त्याचे नांवाची ग्र्यांट मेडिकल कालेज नामक एक वैद्यपाठशाळा स्थापिली आहे. त्याचे पुढें फारिश साहेब गव्हरनर झाला. हा मोठा धर्मात्मा होता. नंतर १८३९ सालीं कार्न्याक साहेब हा गव्हरनर झाला. हा पूर्वी बडोद्यास रेसिडेन्ट होता. त्याचे पुढें १८४१ त, सर विल्यम् हे मेक्नातन् याची नेमणूक झाली. परंतु तो काबुलांत मारला गेला. सबब जॉर्ज अन्डरसन् साहेब हा गव्हरनर झाला. त्याचे कारकीर्दींत काबुल, पंजाब व हैदराबाद येथील लढाया झाल्या नंतर १८४२ त सर आर्थर, १८४६ त रीड साहेब व त्यानंतर १८४७ त सर जॉर्ज क्लार्क असे गव्हरनर झाले. सर जॉर्ज् क्लार्क हा बंगालसरकारचा प्रसिद्ध मुत्सद्दी होता. याचे कारकीर्दींत पंजाब सर झालें. नंतर लॉर्ड फॉकूलंड साहेब गव्हरनर होऊन आले, ते १८४८ पासून १८५३ पर्यंत होते हे पूर्वी बहुत ठिकाणीं गव्हरनर झाले होते. त्यानंतर लार्ड एल्फिन्स्तन हे गव्हर्नर झाले. यांचे कारकीर्दींत हिंदुस्थानच्या पलटणीचें बंड झालें होतें. परंतु त्याचा मोड होऊन तेव्हां पासून कंपनी सरकारचा अम्मल बंद झाला आणि त्या ठिकाणीं राणी सरकारचा अम्मल आला. तेव्हां पासून

प्रथम १८६० सालीं सर जॉन क्लार्क हे गव्हर्नरच्या जागयावर आले. यांचे कारकीर्दीत लेजिस्लेटिव्ह कौन्सिलें स्थापन झालीं. त्यानंतर सर बार्टल फ्रियर साहेब येऊन क्लार्क साहेब विलायतेचे कौन्सिलांत गेले. फ्रीयर साहेब हे, पूर्वी १८४२ पासून १८४६ पर्यंत असलेले गव्हर्नर सर जॉर्ज आर्थर यांचे जांवई होते. हे मुंबईचे मुत्सद्दी असून १८३३ पासून यांजकडे किरकोळ कामें होतीं. पुढें ते १८४८ त साताराचे रेसिडेन्ट, त्यानंतर सिंधचे गव्हरनर व त्यानंतर कलकत्त्याचे कौन्सिलर होते, आणि पुढें गव्हरनर झाले. यांचे कारकीर्दीत शेरबाजाराचें विलक्षण वेड पिकलें होतें. हे गेल्यावर १८६७ सालीं सर फिट्जराल्ड हे गव्हर्नर झाले. त्यानंतर १८७२ सालीं सर फिलिप् वोड्हौस गव्हर्नर झाले. हे पूर्वीं लंकेस गव्हरनर होते. यांचे कारकीर्दीत मुंबईस पदव्यांचा दरबार झाला. तेव्हां कलकत्त्याचे गव्हरनर जनरल लॉर्ड नॉर्थब्रूकही तेथें आले असून शिंदे होळकर वगैरे सर्व राजे आले होते. यांचे कारकीर्दीतच मल्हारराव गायकवाड यांची चौकशी करण्याकरितां कमिशन नेमिलें व मुंबई इलाख्यांत मोठा काळ पडला. नंतर १८७७ सालीं सर रीचर्ड टेंपल साहेब गव्हरनर झाले. हे पूर्वीं बंगाल्यांत, नागपुरास, पंजाबांत, व हैदराबाद वगैरे ठिकाणीं मोठे हुद्याचे कामावर होते. हे आतां लवकरच विलायतेस जाणार असून त्यांचे जागीं सर जेम्स फर्ग्यूसन हे येणार ह्मणून प्रसिद्ध झालें आहे. टेंपल साहेबांच्या कारकीर्दीत दक्षिणकडे दुष्काळ, दरवडे व उंदरांचा उपद्रव फार झाला.

---

२. गुजराथेंत मराठ्यांच्या प्रवेशास १६७० सालीं आरंभ झाला. याचसालीं शिवाजीनें सुरतेस वेढा देऊन खंडणी घेतली. नंतर १७०० चे सुमारास खंडोजी दाभाडे हे सेनापति ह्मणून गुजराथ प्रांतीं जाऊं लागले. पुढें ते १७२१ सालीं मेले. त्यांचा मुलगा त्रिंबकराव याचे हाताखालीं दमाजी व पिलाजी गायकवाड हे असून त्यांस मुतालिक सेनापती ह्मणत. पैकीं पिलाजी

यास १७३१ त डाकोर येथें जोतपूरचा राजा अभयसिंग यानें मारेकरी घालून मारिलें. पिलाजी गायकवाडानें सरबुलंदखानाकडून चौथाई घेतली. पुढें पुण्याहून बाजीराव पेशवे मुख्य प्रधान येऊन त्यांनीं दाभाडे यांजपाशीं हिशेब मागितला असतां दाभाडे यांणीं उत्तर दिलें कीं, ब्राह्मणांस हिशेब मात्र मागतां येतो, परंतु मुलुख सर करण्यास किती खर्च लागतो हें समजत नाहीं. त्याजवरून बाजीरावांनीं उत्तर दिलें कीं, तुह्मी इतके माजले आहांत तर उद्यां तयारी ठेवावी. ह्मणजे ब्राह्मणांस लढाई देतां येते व हिशेब घेतां येतो ह्या दोन्ही गोष्टी दृष्टीस पडतील. त्याप्रमाणें १७३१ सालीं त्या उभतांची डभईवर लढाई झाली. त्यांत बाजीरावांचे स्वार तीन हजार असून व दाभाडे ह्यांची फौज फारच मोठी होती.तरी त्रिंबकराव पडले. तेव्हां त्यांचा मुलगा यशवंतराव दाभाडे हा असून त्याचें वय लहान होतें ह्मणून त्याचा कारभार पाहण्यास गायकवाडास नेमिलें. पुढें सर बुलंदखान याणें मराठ्यांशीं जो तह केला तो दिल्लीचे बादशाहानें पसंत केला नाहीं ; त्याजवरून मराठे लोक मुलूख घेत चालले. नंतर मुलखाची वांटणी केली. ती अशी कीं, पेशव्यांनीं व गायकवाडांनीं निमे निमे वसूल घ्यावा. व त्यामुळे तेव्हां पासून बहुतेक ठिकाणीं दोन मामलेदार राहूं लागले, अमदाबादेंत दोन कचेऱ्या व दोन हवेल्या होत्या. पुढें दमाजी गायकवाड हा ताराबाईचे कारस्थानांत शिरला ह्मणून त्यास बाळाजी बाजीराव यांणीं कैद केलें, आणि त्याजपासून खंडणी लिहून घेतली. नंतर १७५३सालीं राघोबा, दमाजी, नारोशंकर राजेबहादर व विठ्ठल शिवदेव विंचूरकर असे येऊन त्यांणीं अमदाबाद घेतली. पुढें पट्टण प्रांतीं अम्मल झाला व कांठेवाडांत द्वारकेपर्यंत अम्मल बसवून खंडण्या येऊं लागल्या. बडोद्यापासून पश्चिमेस दहा कोस व दक्षिणेस भडोच येथपर्यंत शिंद्याचा अम्मल होऊन सर्व गुजराथेंत गायकवाडाचा अम्मल झाला. पुढें पाणिपतची लढाई झाल्यावर दमाजी बाबा पट्टणास आरले.

तेव्हां यांचे पुढें फत्तेसिंग राज्यावर बसले. त्यांचे कारकीर्दींतच राघोबा दादांचा दंगा झाला व त्यास यांणीं मदत केली सबब नाना फडणविसांनीं तीन हजार स्वारांचा रोजमुरा व पांच लक्ष रुपये खंडणी अशीं गायकवाडापासून घेण्याचा ठराव केला. इंग्रजांशीं गाइकवाडाचा प्रथम तह इ स. १७७० सालीं झाला व त्यानंतर १७८० त जनरल गाडर साहेबाचे विद्यमानें झाला. फत्तेसिंग ता० २१ डिसेंबर १७८९ सालीं मेले. यांचे गादीवर मानाजी गायकवाड बसले; ते ता० १० आगष्ट सन १७९३ सालीं वारले. पुढें गोविंदरावांस वस्त्रें झालीं. यांचे कारकीर्दींत अमदाबादचे सुभे आबा शेलूकर यांणीं दंगा केला व ते बाजीराव साहेब यांचा हुकूम मानीनात, सबब त्यांस कैद केलें. शेलूकर हे सातान्याजवळचे फत्तेपूर येथील कुळकर्णी असून नाना फडणवीसांचे ताब्यांत होते, व त्यांचे नांवाचा एक रस्ता पुण्यांत अद्यापि आहे. पुढें सन १८००त, गोविंदराव गायकवाड मेले, तेव्हां त्यांचा मुलगा अन्याबा गायकवाड हा गादीवर बसला ते अगदीं विक्षिप्त होता. त्याचा कारभार रावजी आप्पाजी नांवाचे परभू दिवाण पहात होते. त्याचे कारकीर्दींत मल्हारराव व कान्होजी गायकवाड हे दंगा करून राज्याची वांटणी घेऊं पहा लागले. व इकडे पुण्यांत तर बाजीरावी झाली त्यामुळे त्यांचा बंदोबस्त करील असा कोणी राहिला नाहीं. सबब रावजी इंग्रजांची मदत घेऊन दोघांस कैद करून कान्होजीस मद्रासेस नेलें, व मल्हाररावास मुंबईस कैद करून ठावलें. ते दोघेही तेथेच वारले. या महत्कृत्याबद्दल गायकवाडाकडून इंग्रजास खेडा गांव प्रांत मिळाला व तेव्हांपासून बडोद्यास रेसिडेन्ट राहूं लागला. आनंदराव गायकवाड हे ता० २ आक्टोबर १८१९ रोजीं मेले. त्यांचा कारभार फत्तेसिंग बाबा करीत होते. नंतर आनंदरावांचे पुत्र सयाजीराव हे गादीवर बसले ते ता० १९ डिसेंबर १८४७ रोजीं वारले त्यानंतर त्यांचे पुत्र गणपतराव यांणीं ता० १९ नवंबर १८५६ पर्यंत राज्य करून त्यांचे पश्चात् त्यांचे भाऊ खंडेराव यांणीं बडोद्याचें राज्य केलें. खण्डेराव महाराज हे चंपाषष्ठी शके १७९२ ह्मणजे ता० २८ नवंबर १८७० रोजीं वारले.

त्यावेळीं त्यांची पत्नी राणी जम्नाबाई ही गरोदर असल्यामुळें तिला पुत्र झाल्यास तो त्यांचे ठिकाणीं बसवावा असें ठरल्यावरून कांहीं दिवस वाट पाहावी असा ठराव झाला. परंतु कन्या झाली. ती हल्लीं आहे. ह्मणून मल्हारराव ह्यांस गादीवर बसविलें. त्या कन्येचें नांव आहिल्याबाई असें ठेवून 'ताराबावा' या आवडत्या नांवानें तिचें आव्हान करितात. मल्हाररावांची वर्तणूक वाईट असे चोहोंकडून लिहिलें आले ह्मणून त्यांस पदच्युत करून मद्रास पाठविलें व त्यांचे जागेवर सयाजीराव ह्मणून राणी जम्नाबाईंनीं दत्तक घेऊन त्यास बसविलें. त्याचा प्रतिपाळ इंग्रज सरकार करीत आहे. इंग्रज सरकारांनीं गाइकवाडाकडून सती बंद केल्याबद्दल १८४० सालीं ठराव करून घेतला. कन्याविक्रयाबद्दल १८४९ सालीं करार करून घेतला; व गुलामगिरी न होऊं देण्याबद्दल १८५६ सालीं करार झाला. खंडेराव महाराज यांणीं १८५७चे बंडांत इंग्रज सरकारास मदत केली ह्मणून, त्या वेळेपर्यंत जो गायकवाडांपासून एक हजार स्वारांचा खर्च घेत होते तो इंग्रज सरकारांनीं माफ केला व गायकवाडांची कृतज्ञता ह्मणून खंडेराव महाराजांस इंग्रज सरकारांनीं मोरचलें दिलीं व गायकवाड वंशांत दत्तक घेण्याची सनद दिली.

३. महादजी शिंदे १७९४सालीं वानवडीस मेले दौलतराव शिंदे दत्तक हे सन १८२७च्या मार्च महिन्यांत मेले. व जनकोजी शिंदे ता० ७ फेब्रुवारी सन १८४३ रोजीं मेले. तेव्हां त्यांची विधवा ताराबाई ईणें बयाजी शिंदे यांचा पुत्र जयाजीराव शिंदे हा ८ वर्षांचा असतां दत्तक घेतला. जयाजीराव यांचे कारकीर्दींत (रियासतींत फौजेंत)फितूर झाली त्याजवरून त्यांचीं पलटणें वगैरे सर्व कमी करून हल्लीं आहे तितकी ह्मणजे दहा हजार फौज व तीस तोफा ठेवाव्या ह्मणून ठराव झाला. पूर्वीं शिंद्यांचीं ९२पलटणें होतीं असें ह्मणतात ?

४. पुण्याहून बाजीराव पळून गेल्यानंतर अमदाबाद घेण्याकरितां संवत १८७४ सालीं खेड्याहून दन्डलाप, हेरन, आणि डागली असे तीन साहेब आले त्यांजबरोबर सामल खेमचंद टंकसाळी ह्मणून एक मनुष्य असून त्याशिवाय आणखी दोन तीन गृहस्थ होते. त्यांत

नालचंद ह्मणून होता त्यास तिजोरीचें काम दिलें, पुंजाता यास शिरस्तेदारी दिली व मोती गोविंद यास दप्तरदारी दिली. खेड्यास प्रथम राबर्टसन् साहेब कलेक्टर झाले. व दाजी त्यास यांजकडे साय (अकातीचा कारभार) दिली. प्रथम खेड्यास क्यांप होता, तो मोडून दिसा, हरसूल व कानपूर येथें छावण्या झाल्या. अस्तु. अमदाबादेस पुढें लिहिल्याप्रमाणें अनुक्रमें कलेक्टर झाले:—प्रथम कलेक्टर दंडलाप, नंतर जाकसन्, नंतर क्राफर्ड, यावर अर्बथनॉट, व पुढें फासेट (१८१८ मध्यें), यारी बॉरोडेल, वेबट, हाडो साहेब (१८२१), एल्फिन्स्टन्, शेफर्ड, थोरले बारोडेल व शेवटीं यांचे पुत्र धाकटे बारोडेल. हे नुक्तेच विलायतेस गेले आहेत.

५. भक्त ह्मणतात कीं, देवाची भक्ति नऊ प्रकारची आहे. ती नवविधा भक्ति व ती पूर्वीं कोण कोणीं केली त्याविषयीं पुढील दोन श्लोक आढळतात: —

श्रवणं कीर्त्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं ।
अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनं ॥ १ ॥
श्रीकान्तः श्रवणे परीक्षितिरभूद्वैयासिकी कीर्त्तने
प्रऱ्हादःस्मरणेऽङ्घ्रिपद्मभजने लक्ष्मीः पृथुःपूजने ।
अक्रूरः स्त्वभिवन्दने कपिपतिर्दास्येऽथ सख्येऽर्जुनः
सर्वे स्वात्मनिवेदने बलिरभूत्कैवल्यमेषां पदं ॥ २ ॥

६. कितीएक पुराणांमध्यें विष्णूचे १० आवतार वर्णिलेले आहेत, परंतु भागवतांत २४ लिहिले आहेत, यांचीं नांवें:—१ श्रीयज्ञ २ कपिलमहामुनि, ३ कुमार, ४ ऋषभ, ५ दत्त, ६ मनु, ७ मोहिनी, ८ हंसमूर्त्ति, ९ कृष्णद्वैपायनव्यास, १० पृथु, ११ ध्रुव, १२ हयग्रीव, १३ भिषक् ह्मणजे धन्वंतरि, १४ देवर्षी, १५ नारायण, १६ कच्छ, १७ कूर्म, १८ वराह, १९ नरहरी, २० खर्व, २१ श्रीरामाभिधा, २२ बुध, २३ कल्की, आणि २४ कृष्ण (द्वारकाधीश,)

पुण्यांत लोकांस इंग्रजी विद्या शिकवावी असें ठरल्यावर स्टीविन्सन पाद्री यांणीं शुक्रवारच्या वाड्याचे तालिमखान्यांत पहिल्यानें १८३० सालीं शाळा स्थापिली, नंतर बुधवार वाड्यांत १८३४ मध्यें इनडेल साहेब यांचें सरकारी विद्यालय स्थापन झालें. पुण्यास पूर्वी १८२० पासून विश्रामबागेचे वाड्यांत संस्कृतशाळा होती. तिजवर क्यांडीसाहेब यांस तपासणीस नेमिलें होतें. त्यांणीं ब्राह्मण लोक आपल्या समक्ष वेदाची परीक्षा देत नाहींत, ह्मणून सन १८४० मध्यें वेदाच्या शाळा कमी केल्या. पुढें संस्कृत शाळेचे मुख्याध्यापक राघवाचार्य हे वारल्यावर तेथें वाथिन साहेबांजवळ असणारे शाळेचे अध्यक्ष विष्णुशास्त्री बापट यांस आणिलें. हेच पुनर्विवाह मताचे आद्यप्रतिपादक होते. नंतर १८५० सालीं, इंग्रजी व संस्कृत अशा निरनिराळ्या दोन शाळा असणें ठीक नाहीं असें ठरून पूनाकालेज (पाठशाळा) ह्मणून इंग्रजी व संस्कृत अशी एकच शाळा करून तिचें नांव डेक्कनकालेज (दक्षिण पाठशाळा) असें ठेविलें. त्या शाळेकरितां नदीचे कांठीं एक मोठी इमारत बांधिली व विश्रामबागेंत फक्त धाकटी शाळा मात्र राहिली. संस्कृतापैकीं वेद बंद झाल्यावर ज्योतिष, वैद्यक, धर्मशास्त्र, तर्क, अलंकार व न्याय हे निरुपयोगी ठरून तेही बंद झाले. व फक्त व्याकरण मात्र राहिलें. पूर्वी जे शास्त्री तयार होत ते घोकून घोकून पाठचे मात्र होत, परंतु त्यांचा तर्क वाढत नसे; पण हल्लीं जे होतात ते त्यांजपेक्षां जास्ती विद्वान् होतात असा समज आहे व त्याप्रमाणें अनुभवही आहे. त्याचीं उदाहरणें महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, आबाजी विष्णू काथवटे, शंकर पांडुरंग पंडित, महादेव मोरेश्वर कुंटे वगैरे अनेक आहेत. यांजमध्यें कोणी वेदाचे भाष्यकार, कोणी षड्दर्शनाचें भाषांतर करणारे,कोणी मोठमोठ्या शास्त्रांचे व भाषांचे प्रोफेसर झालेले दृष्टीस पडतात. या प्रतिमेचे महाविद्वान् पूर्वीच्या शिक्षणक्रमानें होत होते असें ह्मणवत नाहीं. त्याचप्रमाणें पूर्वी वैद्यक शिकवीत होते,त्यापेक्षां हल्लीं जे वैद्य शाळेंत डाक्तर तयार होतात ते विद्येनें व शस्त्रकर्मानें पूर्वीच्या वैद्यांपेक्षां व हकीमांपेक्षां फार अधिक आहेत

हें निर्विवाद आहे. याचीं उदाहरणें भाऊ दाजी, नारायण दाजी, सखाराम अर्जुन, पांडुरंग गोपाळ वगैरे आहेत. असेंच हल्लीं केरो लक्ष्मण वगैरे गणिती झाले यांजप्रमाणें पूर्वींच बाबा जोशी रोडे वगैरे ज्योतिषी होत नव्हते. या सर्व गोष्टींवरून हल्लींचा विद्याशिक्षणक्रम जास्त महत्वाचा असून पूर्वींचा शिक्षणक्रम निखालस बुद्धीला जाड्य आणणारा होता असें स्पष्ट दिसतें. परंतु हल्लींच्या नवीन विद्वानांनीं प्राचीन विद्यांचा शोध व अभ्यास केल्यास फार उत्तम होईल.

८. विद्याखातें थोडें होतें तेव्हां त्याचा सर्व कारभार बोर्डाकडे होता. बोर्ड म्हणजे पांच असामी पंच नेमून एक सेक्रेटरी नेमून देत व तो सेक्रेटरी त्यांचा सर्व कारभार करीत असे. पुढें, चौघांकडे काम असल्यानें तें सुरळीत चालत नाहीं असा तर्क निघून बोर्डाचे बदला डैरेक्टर नेमिला. हल्लीं या विद्याखात्याचा दरसाल पंचवीस लक्ष रुपये खर्च असून त्याची व्यवस्था डैरेक्टराकडे आहे त्याचे हाताखालीं चार इन्स्पेक्टर म्हणून मोठे पाहाणीदार अधिकारि आहेत त्यांचे हाताखालीं डेप्युटी इन्स्पेक्टर व आसिस्टन्ट डेप्युटी इन्स्पेक्टर आहेत. मुंबई इलाख्याचे विद्याखात्यांत पुणें व मुंबई या दोन ठिकाणीं कालेजें ( मुख्यपाठशाळा ) असून अलीकडे अमदावादेसही एक कालेज उघडलें आहे. शिवाय पुण्यास इंजीनिअर कालेज ( इमारतीची शाळा ) व मुंबईस आर्टस्कूल ( शिल्पकलेची शाळा ) स्थापिलीं असून मुंबईस एक वैद्यशाळा व लॉ क्लास ( न्यायशाळा ) आहे. या सर्व शाळांतून शिकणाऱ्या उमेदवारांची परीक्षा यूनिव्हर्सिटी नामक सर्व विद्यापाठशाळेकडे घेण्याचें ठरविलें आहे. पूर्वीं विद्यावृद्धीकरितां राजे लोक दक्षिणा वगैरे देत असत. परंतु त्याचा लाभ सर्व लोकांस नसून विद्येची पठनपद्धतिही चुकीची होती असें वरील गोष्टींत उदाहरण दाखविलें आहेच. परंतु आतां जो शिकण्याचा क्रम आहे त्यापासून बुद्धि व तर्क वाढतो आणि सत्यासत्याचा विचार करण्यास समर्थ अशीं माणसें तयार होतात; असे लाभ हल्लीं सर्वांस दिसत आहेत. पूर्वींची विद्या म्हणजे सांचणीचे पाणी असून त्यास प्रवाह नव्हता. याचें कारण

उघडच आहे कीं. सर्व विद्या घोंकणीवर असून अर्थाचा विचार कोणीच करीत नव्हते. व अद्यापिही जेथें नेटीव्ह राजे आहेत तेथें हीच स्थिति दृष्टीस पडते. त्यास, ही सवाईविद्येची सुधारणा पूर्वी दिसत नव्हती पण हल्लींही दिसत नसल्यामुळें मोठें आश्चर्य आहे.

९. सन १८७९ सालीं मिस्तर वालंटैन साहेब इराणांत प्रवास करण्यास गेले होते. ते बुशायर बंदराहून यज्द, किरमान व तेहेरान या शहरांवरून रश्त ह्मणून कास्पियन समुद्रतीरावर एक गांव आहे तेथें जाऊन तेथून ते या लगतच बाकू नांवाच्या गांवीं गेले. तेथें रूस बादशाहाचा अम्मल आहे; तरी तेथें हिंदू लोकांचें शिवाचें मोठें देऊळ आहे; तें त्यांणीं पाहिलें. त्याविषयीं ते असें ह्मणतात कीं—तेथें एक मोठा दगडी प्राकार असून त्याचे आंत एक चौकोनी दगडी देऊळ आहे. त्यांत पुढें एक घंटा आहे व आंत गणपती व शिव यांच्या मूर्ती आहेत. त्यांचा पुजारी एक वैरागी बोवा असून त्याणें सांगितलें कीं, तें देऊळ ११०० वर्षांचें आहे. पूर्वी हिंदू लोक व्यापारासाठीं तेथें येत होते, त्यावेळेस हें देऊळ बांधिलें आहे. व तेव्हांपासून लाहोर व मुलतान येथून पुजारी पाठवून त्या देवळाचा संभाळ आजपर्यंत होत आला. परंतु आतां कोणी बोवा येत नाहीं याजमुळें मी (सांप्रतचा पुजारी) थकलों आहें, वगैरे. या विषयींची विशेष खुलासेवार हकिकत तारीख २० आगस्ट सन १८७९ च्या मुंबई 'टाइम्स' मध्यें दिली आहे ती पहावी. यावरून हिंदुधर्माचा विस्तार कोठपर्यंत झाला होता हें सर्वांस कळेल !

१०. कोल्हापूरचे राजवाड्यांत एक वेळ निपाणकर भेटीस जात असतां पुढील चौकांत तेथील राजानें वाघ सोडून दिला होता. इतक्यांत सिदोजीराव निंबाळकर सर देसाई सर लष्कर यांची स्वारी आली. तों पुढें लोक होते त्यांणीं सांगितलें कीं, आंत वाघ आहे. तेव्हां निपाणकर बोलले कीं, मी आतां मागें फिरावयाचा नाहीं. असें ह्मणून ते आंत शिरले; तों वाघ अंगावर येतो असें पाहून त्यांणीं त्याचे पुढील पाय धरून त्यास उभें केलें व इतक्यांत मागील लोकांनीं तरवारीनें

त्यास तोडिलें. मग निंबाळकर जाऊन राजास भेटले ! याच मनुष्यानें कोल्हापूरकर महाराजांची मुलगी मागितली होती. परंतु ती त्यांणीं दिली नाहीं ह्मणून निपाणकरांनीं कोल्हापूर घेऊन जबरदस्तीनें मुलीशीं लग्न लाविलें. असा हा उग्रकर्मा मनुष्य होता.

११. साठ वर्षांपलीकडील लोक-पाहिले असतां अगदीं प्रामाणिक होते असें दिसतें. ते त्याचें देणें त्यास देण्याविषयीं कधीं नाकबूल होत नव्हते. ते स्वतः नाकबूल होत नव्हते इतकेंच नाहीं; परंतु त्यांचे पुत्रपौत्रही नाकबूल करीत नसत. ते, ऋण हत्या व वैर हीं पापें मोठीं असें समजत व ब्रह्मस्व नाकबूल करणें हें नरकाचें द्वार समजत. कर्जरोखा लिहिला तर त्याजवर देवाची साक्ष घालीत. नासिकास गंगारघुवीर व साताऱ्याकडे कृष्णाबाई यांच्या साक्षी घालून बिकलम ॐ असें लिहीत! ही ब्राह्मणांची गोष्ट झाली. कुळंब्यास रुपये दिले तर रुपयाच्या संख्ये इतक्या दोरीस गांठी देऊन ती त्याणें सावकाराच्या हवालीं करावी. व पुढें एक रुपया परत आला ह्मणजे एक गांठ कुळानें सोडून टाकावी. ह्याप्रमाणें धनको ऋणकोंचे सर्व व्यापार चालत. भोळ्या व्यापारांतही कधीं तंटे पडत नव्हते ! आणि आतां तर बहुत लोक कपटी व ईश्वराचें भय न मानणारे असे निर्लज्ज व अधमाधम झाले आहेत हें पाहून जुन्या लोकांस आश्चर्य वाटतें. वास्तविक पाहिलें तर व्यापारास काय तो सत्याचा आधार. तो मुळींच गेला याजमुळें लोकांत पत व बरकत हीं राहिलीं नाहींत. कुळानें रुपये घतले दिवसापासून ते सावकारास न देण्याचा व त्यास फसविण्याचा जणूं काय त्याचा संकल्पच असतो. पूर्वीं सावकार लोकांस आपलें कुळ आपल्यास फसवील असें मुळींच भय नव्हतें. कुळ गरीब झालें तर आजचें कर्ज उद्यां देईल, परंतु खोटें बोलून नाकबूल कधीं होणार नाहीं ही प्रत्येकास खात्री होती व ह्मणून व्यापार बिनधोक चालत होता. परंतु त्या प्रामाणिकपणाचें आतां नांवही राहिलें नाहीं! याचप्रमाणें प्रामाणिक गुमास्तेही आतां मिळत नाहींत अशी बोभाट आहे !

१२. यशवंतराव महादेव भोसेकर हे मूळचे देशपांडे असून इंग्रजींत मामलेदार होते. पुढें त्यांस पेन्शनांत काढिलें. परंतु त्यांचे परोपकारीपणावरून त्यांचा लौकिक इतका वाढला कीं, हजारो लोक त्यांचे दर्शनास जाऊं लागून त्यांस नवस करूं लागले. व त्यांस देव मामलेदार असे नांव पडलें. यांची परोपकारी प्रवृत्ति फार असून ते स्वार्थावर मुळींच नजर देत नाहीत यामुळें त्यांस लोक फार चाहतात. यांजवर 'यशवन्तचरित्र' ह्मणून एक पद्यात्मक पुस्तक झालें असून त्यांत त्यांचें बहुत वर्णन केलें आहे.

१३ अक्कलकोट येथें एक स्वामी होते. ते दिसण्यांत वेड्या सारखे होते, परंतु त्यांचे वृत्तीचा लोकांस चमत्कार वाटून अक्कलकोट येथें त्यांजकरितां मोठी यात्रा भरत असे ते स्वामी गेले सालीं समाधिस्त झाले. त्यांची ही स्वहितावर दृष्टि नसे, याजमुळें लोक त्यांस भजत. त्यांजवरही 'स्वामीचरीत्र' नांवाचा एक ग्रंथ झाला असून त्यांत त्यांचें सर्व वर्णन आहे.

१४. हुमणाबाद येथें माणिक प्रभु ह्मणून एक साधु सन १८६० सालीं झाले होते. त्यांचीही जत्रा भरत असे. त्यांस लाखो रुपयांचे लोक नवस करीत व ते रुपये ते उडवीत. अशी दहा वर्षे त्यांची कीर्त्ति झाली. पुढें तेही समाधिस्त झाले.

१५ सन १८३० सालीं सातान्याजवळ पिंपोडें येथें एका कुळंब्याचा मुलगा नारायणबोवा ह्मणून प्रसिद्ध झाला होता. त्याचीही मोठी जत्रा भरूं लागली होती. एक वेळ तर सातारचे महाराज व मालकम साहेब गव्हरनर हेही त्याचे भेटीस गेले होते, हा बोवा साप धरीत असे, ही त्याची मुख्य करामत होती. परंतु पुढें तो मुलगा साप चावूनच मेला!

१६ भक्तिपंथांत ईश्वराचें किंवा अवतारादिकांचें नामस्मरण करणें हें एक मोठें साधन गणलें आहे. त्याविषयीं श्रुतीचा आधार आहे असें भजन करणारे ह्मणतात; व याविषयीं पुढील श्लोक भजनी लोक ह्मणत असतात:—

वेदांही हरिकीर्त्तनीं च महिमा केला असे आदरें,
कोठेंसा तरि विष्णुसूक्त अवघे शोधूनि पाहा बरें ॥
त्यामध्येंच तृतीयवर्गींहि "भवामित्रो" असे तो पहा,
त्याची ही तिसरी ऋचा मग "नमुस्तोतार" नामें पहा॥१

हा श्लोक ऋग्वेद अष्टक२, अध्याय२, वर्ग२६ची जी तिसरी ऋचा ( पहा, वेदार्थयत्न अंक ३९, पान ४९० ) तदर्थक आहे.

१७.जोंधळ्याच्या जाती बहुत आहेत.त्यांपैकीं शाळू, अरगडी, हुंडी, मालदांडी, पिवळा, तांबडा, गुड्दी, कावली, काठे, मोतिया, कुचकुची, कोल्ही, दुधमोगरा वगैरे मुख्य आहेत.

१८.लोक जेव्हां देशाभिमानी किंवा धर्माभिमानी असून लढतात.तेव्हां एक मनुष्य असला तरी तो शंभरांशीं लढतो. पूर्वी रामायणांत असें प्रसिद्ध आहे कीं, कबंधें ह्मणजे डोकीं कांपलेलीं धडें हीं आपल्या पूर्वावेशानें लढत. मुसलमान लोकही पूर्वी याप्रमाणेंच धर्माभिमानानें लढत. त्यांचा धर्माभिमान इतका दृढ होता कीं, त्यांच्या मधील एक मुसलमानास मी एकटा व शत्रू शंभर असें कधींच वाटलें नाहीं. धर्माकरितां लढणें व मरणें हेंच आपलें कर्त्तव्यकर्म असें समजून ते लोक समरास प्रवृत्त होत. अद्यापि जे ठिकाठिकाणीं मुसलमानी पीर आहेत त्यांची कथा अशी सांगतात कीं, ते लढत असतां त्यांचीं डोकीं उडालीं तरी ते तसेच लढत लढत चार चार कोस येऊन तेथें पडले ! याप्रमाणें वाई प्रांतीं मौजे केंजळ येथें एक व चांदवड येथें साजापीर असे पीर असून त्यांच्या विलक्षण कथांच्या याप्रमाणें अनेक ठिकाणीं कथा आहेत. पूर्वावेशानें शिरच्छेद झाल्या नंतर कबंधाकडून अघटित कृत्य घडल्याचें एक अलीकडील उदाहरण आहे:— परशुरामभाऊ पटवर्धन यांचे कारकीर्दींत मिरजेस एका रामोशी दरोडखोरास शिरच्छेदाची शिक्षा झाली. तेव्हां जलाद ( शिरच्छेद करणारा मांग ) हातांत तरवार घेऊन त्याजवळ गेला आणि त्याणें शिरच्छेद करण्यापूर्वी त्याचे कानांत असलेली मोत्यांची भिकबाळी त्याजवळ मागितली. परंतु रामोश्यानें ती त्यास देण्याचें नाकारून भिकबाळी तोडून

घेऊन तोंडांत टाकिली आणि गिळून जाऊन मांगास एका वारानेंच शिरच्छेद कर असें सांगितलें. त्या रामोशानें जटा वाढविल्या असून या शेवच्यावेळीं तो आपल्या जटा हातांत धरून मांगास वार करण्यास सांगत होता. इतक्यांत जलादानें एका वारासरसें त्याचें मस्तक उडविलें. परंतु रामोशानें मेल्यावरही शिरच्छेद करणारास शिक्षा करण्याचा निश्चय केला असल्यामुळें धडा पासून शिर तुटल्याबरोबर तेंच शिर गरगर फिरवून त्या मांगास मारिलें व धड खालीं पडलें; आणि त्या टोल्यासरसा मांगही घायतळ येऊन खालीं पडला व गत प्राण झाला! परंतु हल्लीं त्यांचा अभिमान अगदीं जाऊन संकटकाळीं त पळूं लागले परंतु हल्लीं इंग्रजलोकांत मात्र हा अभिमान असून त्यांची राज्य-प्रसाराची लालसा व स्वोत्कर्षाभिमान हीं फार वाढलीं ह्मणून पुणें, कानपूर, लखनौ व काबूल वगैरे ठिकाणीं दोन दोनशें माणसांनीं दहा दहा हजार माणसांशीं टेंकीनें लढून आपलें रक्षण केलें व राज्याचे पाये मजबूत केले!

१९. नारायणराव वैद्य वाईकर हे नागपुरास भोंसले यांजकडे पेशव्यांचे वकील होते. त्यांचे दातृत्व इतकें होतें कीं, त्यांणीं सत्रा वेळ तर सर्वस्वदान केलें. तरी त्यांचा पुनः संसार जमून ते लाखों रुपयांचे धनी बनले. एके चंद्रग्रहणांत यांचे घरीं भोंसले सेनासाहेब सुभा यांजकडून एक लक्ष रुपयांचा भरणा झाला असतां रात्रीं ग्रहणांत त्यांणीं तो सर्व वांटून दिल्यामुळें कांहीं राहिलें नाहीं. हें समजल्यावर भोंसले यांणीं पुनः एक लाख रुपये त्यांजकडे पाठवून दिले! पुढें बाजीरावाचा अम्मल हो-ऊन सर्वत्र राज्याचा बिघाड झाला; कोणी कोणास धनी नाहीं; पत्रव्यव-हार बंद झाले; जिकडे तिकडे दंगे उभे झाले; तेव्हां अर्थात् या वकी-लाशींही कोणी पत्रव्यवहार करीना. ह्मणून ते नागपुराहून निघून काशीस गेले, ते तिकडेच वारले. परंतु पुढें त्यांचे घरास अगदीं गरीबी आली!

२०. सदाशीव नाईक वाबळे यांचे महादजी शिंदे यांजवर पन्नास ल-क्ष रुपये कर्ज येणें होतें. ह्मणून त्यांणीं पैठणास शिंदे आले असतां यांस

तगादा केला; तेव्हां पाटीलबोवा बोलले कीं, तुमच्यानें धर्म तर होत नाहीं मग रुपयांचा तगादा करून रुपये वसूल करून घेऊन काय करणार ? तेव्हां नाईक बोलले कीं, जितके रुपये द्याल तितका मी धर्म करतों! यावरून शिंदे यांणीं एकदम वीस लक्ष रुपये पाठविले आणि नाईक हे बोलल्याप्रमाणें करितात किंवा नाहीं तें पहावें-ह्मणून त्यांणीं तेथेंच मुक्काम केला. दुसरे दिवशीं नाइकांनीं यज्ञमंडप उभारला व कुंडें घालून विष्णुयागास आरंभ केला. आणि पंधरा दिवस होम करून सर्व रुपये ब्राह्मणांस वांटून दिले. त्या यागाची ख्याति पैठण प्रांतीं अद्यापि आहे. या सदाशिव नाइकांचे पुत्र रंगनाथ नाईक. त्यांजवर पुण्यास हुकूमनामे होऊन जप्ती झाली व त्यामुळें त्यांची सर्व दौलत नाहींशी झाली. ही जप्ती पुण्यांत सन १८३६ सालीं वेल साहेब जज्ज असतां झाली ती प्रसिद्ध आहे. यावरून कालचक्र कांहीं विलक्षण आहे !

२१. सन १८५५ सालीं विष्णुबोवा गोखले ब्रह्मचारी हे मुंबईंत उपदेश करूं लागले. त्यांणीं कांहीं ग्रंथ केले आहेत. हे पूर्वीं जकात खात्यांत कारकून होते व पुढें तपस्वी होऊन उपदेशक झाले. हेच प्रथमचे उपदेष्टे. हे चांगले वक्ते होते. याचप्रमाणें प्रथमतः वाईकर महादेव गोविंद शास्त्री कोल्हटकर यांणीं सभेंत उभे राहून भाषण करण्याची रीति प्रकट केली व भाषण संबंधानें त्यांचा जो मोठा लौकिक आहे, तो अद्यापि चालत आहे. असेच सोलापूरकर गणेशबाबाजी माटे वकील यांणीं कथा करून स्वदेशाभिमानाचा व स्वदेशकल्याणाचा उपदेश करण्याची प्रथम रीति चालविली. त्यांचे कथेचाही असाच लौकिक आहे. यांशिवाय गोविंद बाबाजी जोशी वसईकर, नासिकचे श्रीधर गोपाळ पट्टेकर, अण्णा सोवनी पुणेकर, मुन्शी शेख हुसेन वल्लद शेख चांद जुन्नरकर व विष्णुपंत बापट निगडीकर या पांच जणांनीं रस्त्यांत उभे राहून धर्म, व्यवहार व नीति यासंबंधी भाषण करण्याची रीति चालविली. आणि गणेश वासुदेव जोशी व गोपाळराव नरसिंह देशपांडे इंदापूरकर हे लोकस्थिति सुधारण्याविषयीं उत्कंठापूर्वक सार्वजनिक सभेचे पुरस्कर्ते होऊन तेही मोठमोठ्या सभेंत व दरबारांत भाषण करण्याविषयीं कुशल व तत्पर आहेत. या देशांत दैवयोगाने

पार्लमेंट सभा होऊन सरकारी कारभार प्रजेच्या संमत्तानें चालावा असा पुढें कधीं प्रसंग येईल तर अशा लोकांचा अतिशय उपयोग होईल. पण्डित स्वामि दयानंद सरस्वती हेही धर्मसंस्थापक आचार्य बनून सर्व देशभर धर्मोपदेश करीत फिरत आहेत. त्यांणीं ठिकठिकाणीं आर्यसमाज स्थापन केले असून त्यांचे मतें वैदिकधर्मप्रतिपादनानें इतर धर्मीयांचे बखेडे मोडावे ह्मणून त्यांची सक्त मेहनत चालली आहे. त्यांची निस्पृहता, विद्या व वक्तृत्व हीं फार अलौकिक आहेत. असे लोक सार्वजानिक कामें करितात; परंतु त्यांस लोकांकडून अतिस्वल्प साह्य मिळतें. त्यामुळें त्यांचा निर्वाह हा चांगले रीतीनें होत नाहीं, ही गोष्ट मोठी दुःखाची आहे. सार्वजनिक हितकर्त्ते, देशाभिमानी लोक व धर्मोपदेशक यांस युरोपियन व अमेरिकन लोक फार साह्य करितात व लक्षावधी रुपये त्यांस देतात. हें उदाहरण समक्ष असतां आपले लोकांची उदासीनता पराकाष्ठेची आहे. असें कां असावें बरें?

२२. फकिराप्पा लिंगाइत वकील निसबत सदर अदालत व रामचंद्र नरसिंह सोलापुरकर क्लार्क पोस्टआफीस, हे मुंबईस बहुत दिवस राहतात. परंतु ते कोणत्याही प्रकारचें औषध न घेतां, त्यांस व्याधि झाला तर ते देवाची प्रार्थना करून तीर्थ घेतात ह्मणजे झालें व त्याजवर त्यांचा निर्वाह होत आहे! असे कांहीं नैष्टिक व एकविचाराचे लोक या जगावर आहेत ! !

२३. फिरंग्यांनीं १५१९ सालीं गोवें घेतलें त्यावेळेस आलफोन्सो अलबूकर्क हा सरदार दर्यांतून फौज घेऊन आला होता. पुढें गोवें ही राजधानी होऊन त्याखालीं दीव, दमण, कालिकोट वगैरे प्रांत आले. त्यानंतर पेशव्यांनीं १७३७सालीं वसईवर हल्ला केला आणि दोन वर्षांनीं तें शहर घेतलें. पुढें तेथें पेशव्यांनीं सरसुभा नेमिला. नंतर इंग्रजांनीं १७७५ सालीं ठाणें घेतलें व त्याच वेळेस पुढें राघोबादादा सुरतेस पळून येऊन त्यांणीं इंग्रजांची मदत मागितली. त्या संबंधांत जो करार झाला त्यांत त्यांणीं ठाणे इंग्रजांस दिलें. परंतु नाना फडणीसांनीं तो करार रद्द केला तरी ठाणें

इंग्रजांनीं जें आपलेकडे ठेविलें तें पुनः परत दिलें नाहीं. राघोबा-दादांचे तर्फे १७८० त जनरल गादर्द साहेब यांणीं वसई घेतली व तेथच रामचंद्र गणेश ठार झाले. परंतु पुढें नाना फडणिसांनीं तहनामा करून वसई घेतली. वसई हें बेट असून त्यांत आगाशी व माणिकपुरा असे दोन महाल आहेत. वसईजवळच निर्मळ ह्मणून एक यात्रेचें ठिकाण आहे.

२४. इराणांत मुसलमानांनीं गर्दी केली तेव्हां तेथील लोक इ. स ७१७ मध्यें हिंदुस्थानांत आले. ते कांठेवाडांत दिव बेट आहे तेथें व नंतर कोंकणांत संजाणास आले. पुढें उदवाडा ह्मणून एक गांव आहे तेथें त्यांनीं राजाची परवानगी घेऊन अग्नीचें देऊळ बांधिलें व त्यांत आतष बहिरामाची स्थापना केली. त्या काळीं कोंकणांत चांपानेरचे राजाचा अम्मल असून तो मुलूख जाधवांकडे होता. हे लोक पारसी ह्मणून प्रसिद्ध आहेत. त्यांणीं हत्यार धरूं नये असा राजानें करार घेतला होता. पुढें त्यांची वस्ती गुजराथ प्रांतांत नौसरी, खंबायत, भडोच वगैरे ठिकाणीं झाली. पुढें १५०७ सालीं अमदाबादचा बादशाह महंमद बेगडा याणें जेव्हां संजाणावर स्वारी केली तेव्हां तेथील अग्नीस वासंद्यास नेऊन ठेविलें होतें. पुढें १७६५ सालीं नौसरीस अग्निमंदिर बांधून त्यांत तो अग्नि स्थापन केला. नवसरीस मोबेद (पार्शांचेउपाध्याय) लोकांची शाळा आहे.

२५. भडोच हें शहर फार जुनें आहे. इसवी सन ४०० मधील त्याचें वर्णन चिनी लोकांचे बखरींत सांपडतें व ११०० तील आरबांचे बखरींत सांपडतें. हें शहर १५७२ सालीं अकबर बादशाहानें घेतलें. व पुढें तेथील नवाबांनीं दंगा केल्यावरून पुनः औरंगजेबानें १७६० सालीं घेतलें. संभाजीनें प्रथम १६८५ त, या शहराची खंडणी घेतली. त्यानंतर पुढें इंग्रजांचा व नवाबांचा तंटा होऊन जनरल सर डेव्हिड वेडरबर्न यांणीं १७७२ त भडोच आपलेकडे घेतलें; परंतु ते तेथें ठार पडले. पुढें १७८२ त साल्याचे तहनाम्यावरून तें शहर सिंद्यास दिलें होतें. त्यानंतर १८०३ मध्यें

कर्नल उडिंगटन यांणीं पुन: दौलतराव शिंदे याजकडून जें घेतलें तें तेव्हांपासून इंग्रज सरकाराकडेसच आहे. भडोच येथें वलंदेजी लोकांचें कबरस्थान आहे भडोच येथें रूपा मशीद व बाबारिहन याचा दरगा हीं पाहण्याजोगीं आहेत. बाबारिहन हा पीर भडोच येथें मुळीं इ. सन १०७८ साली आला असें म्हणतात. भडोच पासून सहा कोसांवर शुक्लतीर्थ ह्मणून एक गांव आहे त्याजवळ कबीरवड असून तेथें कबीराची समाधि आहे. भडोचेहून पांच कोसांवर रतनपुर ह्मणून एक गांव असून तेथें हकीकाचे दगडांची खाण आहे.

२६. अमदाबाद शहर यास पूर्वी राजनगर, सिंहपूर, श्रीनगर कर्णावती, आशावळ, वगैरे नांवें होतीं असें ह्मणतात. व तें पूर्वी फार भरभराटींत व संपत्तिमान् होतें. परंतु हल्लीं हें शहर दारिद्र्यस्थितींत आलें असून अर्धें नर उजाड झालें आहे. या शहराचा घेर १२ कोस असून त्याचे सभोंवतीं मजबूत कोट आहे. त्या कोटांत दोन अंगास दोन अंतर किल्ले असून त्यास गाइकवाडाची हवेली व भद्र अशीं नांवें आहेत. याचे बाहेर शहर आहे. त्यांत पूर्वी ३६० पुरे होते असें ह्मणतात व त्यांपैकीं ९०।६०तर अ-द्यापि आहेत. येथें १४०० मशीदी होत्या असें पूर्वी (गोष्ट१९४) सांगितलेंच आहे. फिरिस्ता यानें जो हिंदुस्थानाचा इतिहास लिहिला आहे, त्यांत त्याणें ह्या शहराचें फार वर्णन केलें आहे. हें शहर बांधण्यास पट्टनाहून दगड आणिले असें ह्मणतात. याचे सभोंवतें सरखेज, व बटवा सरसपूर वगैरे गांवें आहेत. या शहरेच कोटावर बखेर अशी तारीख आहे;त्याजवरून हिजरी सन८९१ हें साल निघतें, किंवा या शहरांत जो येईल तो निर्भय राहील असाही त्याचा अर्थ निघतो. अर्बी गणितांत आपल्या हिंदु गणिता-प्रमाणेंच दोन रीती आहेत. त्यांत अंकांनीं लिहिणें त्यास रकम ह्मणतात, व अक्षरांनीं संख्या लिहिणें त्यास हिंदीसा ह्मणतात. हिं-दीसा या रीतीची योजना श्लोकांतही करितात, व तेणेंकरून त्यांतून वर्ष व सुभाषित अर्थ अशीं दोन्ही निघतात. पूर्वी मुसलमानलोक

शहरांत राहत व हिंदुलोकांनीं बाहेर वस्ती करावी असा ठराव होता. परंतु आतां सर्व हिंदु शहरांतच आले आहेत. अमदाबादचा राजा बाहादूरशा याणें चितोडगडचा राणा विक्रमादित्य याजवर स्वारी करून त्याजपासून मोठी नजर घेतली. त्यांतच त्याजवळून मुकुट व साठ लाख रुपयांचा कमरबंद घेतला व तो इस्तंबूलचे बादशाहास नजर पाठविला. पुढें अकबरानें अमदाबाद हें शहर इ॰स॰१५७२ सालीं घेऊन तेथें दिल्लीचा सुभा नेमिला. त्यानंतर १७३५ पासून दमाजी गाइकवाड या प्रांतांत हिस्सा घेऊं लागले. पुढें मोंगलाचा हिस्सा जवामर्दखान बाबीकडे होता तो इ. स. १७५३ सालीं पेशव्यांनीं घेतला व त्यामुळें गुजराथेंत दोन अम्मल झाले. पुढें इ. स. १७८० त, जनरल गादर्द साहेब याणें राघोबाचे तर्फे हें शहर घेतलें परंतु तें लागलीच मराठ्यांस परत दिलें. नंतर शेवटीं १८१७ सालीं तें शहर इंग्रजांनीं घेऊन तो जिल्हा केला.

२७. हिंदुलोकांमध्यें अनेक प्रकारचे सण आहेत. जेव्हां सुकाळ असून खाण्यापिण्यास पुष्कळ होतें व कोणतीही फिकीर नव्हती त्याकाळीं असे सण, अनेक यात्रा, जेवणावळी व अनेक उत्सव पुष्कळ असणें हें साहजिक आहे. आतां सणांच्या योजनेचेही निरनिराळे प्रकार व त्याचीं कारणें आहेत तीं खालीं लिहिल्या प्रमाणें:—

( १ ) ऋतूचे आरंभीं कांहीं सण आहेत. जसे–दिवाळी, होळी, संक्रांत व नारळी पौर्णिमा वगैरे.

( २ ) शेतीची मेहनत संपण्याचे आनंदाकरितां कांहीं सण आहेत. जसे–पोळा, चुडीपौर्णिमा, अक्षतृतिया इ॰.

( ३ ) मोठे मनुष्य व वीर पुरुष ( ज्यांस अवतार असें म्हणतात ) यांचे स्मरणार्थ कांहीं दिवस आहेत ते:—इंद्रास राज्याभिषेक झाला त्या बद्दल वर्षप्रतिपदा, रामजयंति, दसरा, परशुरामजयंति, नृसिंहजयंति इ॰.

( ४ ) नवीन पदार्थ पिकला म्हणून त्याचे उत्सवाकरितां सण आहेत ते —नव्याची पौर्णिमा, तुळशीचे लग्न वगैरे.

( ९ ) धर्मसंबंधानें कांहीं कल्पित कथानकांवरून:--गणेश चतुर्थी, अनंतव्रत, वटपौर्णिमा, हरितालिका वगैरे.

२८. बाळाजी विश्वनाथ भट पेशवे यांची बहीण अनूबाई हा कापसीकर घोरपडे यांच्या पदरचे इचलकरंजीकर संस्थानिक जोशी यांस दिली होती.

२९. वैद्यक हें हेतु, लिंग व औषध असें त्रिस्कन्द आहे. हेतु ह्मणजे रोगाचीं कारणें, लिंग म्हणजे रोगपरीक्षा व औषध ह्मणजे ते रोग दूर होण्यास उपाय.

३०. इंग्लिश ईस्टइंडिआ कंपनीनें पुण्यास पहिल्यानें १७७२ सालीं मिस्तर मोस्तीन हा वकील पाठविला व लखनौ येथें १७७३ सालीं रसिडेंट नेमला.

३१. कंपनी सरकारचे गुमास्ते पैसा फार घेऊन शिवाय इकडील राजेरजवाड्यांकडून नजरा फार घेऊं लागले, ह्मणून १७६४ पासून लांच न घेण्याचा करार लिहून घेण्याचें ठरलें व हेंच सनदी नौकर लोकांचें मूळ होय.

३२. औरंगजेब सन १७०७ सालीं अहमदनगरास मेल्यावर नऊ बादशाहा झाले. यांत शेवटचा शाहाअलम हा १७५९ सालीं बादशाहा झाला. हा पूर्वीं ह्मणजे बादशाहा नसतानां बंगाल्यावर सुभेदार होता. तो व त्याचा वजीर सुजाउद्दौला हे दोघेही बक्सार येथें पराभव पावले. पुढें शाहाअलम सानी ह्मणजे दुसरा शाहाअलम हा इ. स. १८०६ सालीं मेला. हा जिवंत असतां कधीं कधीं मराठ्यांचे, कधीं इंग्रजांचे व कधीं लखनौचे वजिराचे ताब्यांत असे व शेवटीं तो शिंद्याकडून निघून इंग्रजांचें पेनूशन घेऊन राहिला होता. यास अंधा बादशाहा ह्मणतात. हा मेला तेव्हां त्याचें वय ८३ वर्षांचें होतें याचें राज्य एकंदर ४५ वर्षें गणितात. यास सत्तीस लाख रुपये नेमणूक पावत असून याचे नांवानें नाणें पडत असे. व हा पदव्या देत असे. लार्ड लेक कमांदरइनूचीफ यास याणें अमीरूल उमरावची पदवी दिली होती. शाहाअलमचा मुलगा अकबरशाहा यासही तीच नेमणूक चालत होती, परंतु पदव्या देण्याची

व शिक्क्यावर नांवें पाडण्याची बंदी केली. प्रथमतः अलमगीर तीस कोट रुपये वसूल घेत होता. तो तीस लाखांवर त्याचा वंश निर्वाह करूं लागला ! हल्लीं या वंशाचे लोक पुष्कळ असून त्यांस शाहाजादे ह्मणतात. व त्यांस दरसाल अवघे दोन हजार रुपये पावतात ! !

३३. हिंदुस्थानांत महादजी शिंदे व पुण्यांत सवाई माधवराव हे मेल्यावर त्यांचे राज्यांत फार धांदल उडाली. तेव्हां इंग्रजांचे सरदार लार्ड लेक यांणीं होळकर व शिंदे यांचा सर्व मुलूख घेतला दक्षिणेंत जसा जनरल वेलस्ली साहेब प्रसिद्ध आहे त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत जनरल लेक साहेब प्रसिद्ध आहे त्याणें दिल्ली, मथुरा, अजमीर, दुवाब व हरिद्वार हीं सर्व खालसा करून राजपुतान्यांतील राजांशीं तह केले, व मराठ्यांचा बळमोड केला या लार्ड लेक साहेबानें त्या वेळीं प्रसिद्ध असलेले दिल्लीचे सावकार सुगुणचंद यांस त्यांच्या योग्य सहाय्याबद्दल जाहागीर दिली त्यांचे सनदेवरील फारसी शिक्का खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:—

समसामुद्दौला, आषजाउल्मुल्ख, खानदौरान, खान जनरल जीराड लेक बहादुर, सीपाह सालार, फत्ते जंग, येके आज साहेबान् कौन्सल, वनीज लष्कर आफताज बादषाह इंग्लिस्तान व कंपनी इंग्रेज बाहादूर मुतालके किषवर हिंदुस्थान. फिदवी षाह आलम पादषाह गाजी.

या सनदेवर तारीख १५ नोवेंबर सन १८०५ ही मिती आहे.

३४. या देशांत पूर्वीपासून ज्या कांहीं गैर चाली चालत आल्या त्या कांहीं भोळेपणानें, कांहीं अज्ञानानें, कांहीं भयानें व कांहीं पाखंडानें वगैरे अनेक कारणांनीं उत्पन्न झाल्या. उंच जातींत ह्मणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांमध्यें नवरा मेला ह्मणजे स्त्रिया सती जात. ही चाल मोठी प्रबळ झाली होती व स्त्रियाही हा मोठा मान समजून अग्नींत उड्या टाकीत ! शाहू महाराज मेले तेव्हां त्यांजबरोबर एक राणी व एक नाटकशाळा अशा दोन स्त्रिया सती गेल्या व रणजितसिंग मेला तेव्हां त्याच्याही सात राण्या सती गेल्या. रजपुतान्यांत हें पाखंड तर फारच माजलें होतें(पहा,गोष्ट२०५पान९९).

ईडर येथील राणी सती जात असतां मोठी तक्रार पडली होती. पोलिटिकल एजंट याणें तिला मनाई केली; परंतु राणीचे भावानें तिला हट्टानें सती जाऊं दिलें. पुढें तो भाऊ बाहेरवट्या ( बंडखोर ) निघाला. अस्तु. याचप्रमाणें बहुत तक्रारी होऊन नंतर ठिकाठिकाणीं इंग्रज सरकारानें नेटिव राजांपासून करारनामे घेतले आणि ही चाल बंद केली असें आहे तथापि जंग बहादूर यांच्या दोन राण्या दोन वर्षांपूर्वीं सती गल्या! असा याचा मधून मधून उगम होतो. यास कांहीं लोभ मान वगैरे अनेक कारणें असतात. ह्मणजे, जी राणी सती जाते तिच्या मुलांस मोठा मान मिळतो. जो भाट आपल्या धन्याच्या चितेत मरतो त्याचें सरकार चालवितात व त्याचा दावा सरकारावर मजबूत होतो अशा अनेक कारणांनीं पूर्वीं लोक मरत होते.

दुसरी चाल दासदासी ( गुलाम ) करण्याची होती (पहा, गोष्ट २०६, पान १००). ती इंग्रज सरकारानें कायदे करून व राजांशीं तहांत ठरवून बंद केली.

तिसरी चाल आत्महत्या करण्याची होती. ती अशी:—एखादी मोठया वृक्षाची ढोल पाहून त्यांत बसत आणि सभोंवतीं लांकडांची रास घालून ती पेटवीत. यास गोरांजनमोक्ष ह्मणत. किंवा जेथें पाण्यांत डोह असेल तेथें उड्या टाकून जीव देत; त्यास जळसमाधि म्हणतात. त्याचप्रमाणें जिवंतपणीं पुरून घेत व त्यास सजीवसमाधि ह्मणत. अशा समाधी आज बहुत आढळतात. अमदाबादेस एक बैरागी भांग खाऊन, मला समाधि द्या असें म्हणत असे; व लोक त्याचे नादीं लागले होते. शेवटीं त्यास कोणीं जिवंतपणींच पुरलें व त्याजवरून सरकारांत काम चाललें होतें परंतु त्याचा पत्ता लागला नाहीं!

चौथी, माणसें बळी देण्याची चाल होती व माणूस मारून काळिका देवीस त्याचें रक्त आर्पण करीत. ही चालही कायद्यानें बंद झाली. आतां रेडेजत्रा, बकऱ्याची जत्रा व बळी हे बहुत ठिकाणीं आहेत ते प्रसिद्ध आहेत. जनावर मारून त्याचें रक्त गांवच्या सीमेंत पाडावें ह्मणजे पीक चांगलें येतें. ही लोकांची समजूत अद्यापि

आहे. गाइकवाड वगैरे अद्यापि दसऱ्याचे दिवशीं रेडे मारतात. कितीएक ठिकाणीं तर रेडे बांधून त्यांचें जिवंतपणींच काळिज काढून देवीस आर्पण करितात. व याप्रमाणें वाईजवळ मौजे खावली येथें दरसाल करीत असतात आणि तें केल्यावांचून तेथील रयतेस चैन पडत नाहीं. असें मोठें अज्ञान माजलें आहे. डोंगरी व मावळी राजे जेथें असतात तेथें या अज्ञानाची प्रवृत्ति फार असते व तेथें ज्ञानाचें वारें अगदीं नसतें

पांचवी चाल; मुलगी झाली ह्मणजे मारून टाकावी. ही चाल कच्छ व हिंदुस्थानांत रजपूत राजे यांणीं फार स्वीकारली होती. परंतु तिजपासूनही इंग्रज सरकारानें त्यांस बहुतकरून मुक्त केलें. ( पहा, गोष्ट २०४ पान ९८ ).

सहावी चाल:—प्रयागास माणसास करवतून त्याणें जो संकल्प केला असेल तो सिद्ध होईल अशी समजूत पडली होती. त्याचप्रमाणें जगन्नाथाचे रथाखालीं पडून कितीएक चिरडून घेत व शूलपाणी वगैरे ठिकाणीं तर उंच कड्यावरून नर्मदेंत उड्या टाकून मरत ! तसेच कितीएक गळ टोंचून टांगून घेत. या सर्व पाखंडाचीही बंदी इंग्रज सरकारांतूनच झाली. सारांश. या देशांत आज दोन हजार वर्षांपासून जो विचार बंद पडून अनेक पाखंडें उभीं राहिलीं होतीं त्यांची तरी समाप्ति झाली.

३९. टालमी ह्मणून एक प्रसिद्ध भूगोलशास्त्राचा तपास करणारा इ. स. १५० मध्यें हिंदुस्थानांत आला होता. त्यावेळेस या देशाचा जो नकाशा केला आहे त्यांत नासिक, पैठण, व चौल वगैरे स्थळें लिहिलीं आहेत. टालमी हा मिश्र देशांत राहत असे. ह्याचप्रमाणें फार पूर्वी ह्युनचांग म्हणून एक चीनचा प्रवासी येथें आला होता. व त्यापुढें आल्बीरुणी मसूदी ह्या नांवाचा आरब विद्वान् हा ११०० इसवींत आला होता. त्यांचेही या देशाच्या संबंधाचे लेख इतिहास पाहण्यास फार उपयोगीं आहेत.

१६. ईश्वरी सृष्टींत ह्या सर्वशक्तिमंताची योजना फार अचिंत्य व चमत्कारिक दृष्टीस पडते व याविषयीं जों जों विचार करावा तों तों मन व्यामोहित होतें. पहा—बाळाचे पोषणाकरितां त्याचे जन्माबरोबरच आईस दूध उत्पन्न होतें! प्रतिवर्षास पावसानें पाणी शुद्ध होतें व जेथें पाणी असतें तेथें त्यास साफ करण्यास वाळू असते. ही योजना विलक्षण केली आहे. पाण्यामध्यें मळ खालीं किंवा बाजूस टाकण्याची शक्ति तरी किती अप्रतिम आहे! असेच आंब्याचें फळ प्रथम अगदीं आंबट असतें परंतु पांच सात दिवसांत तीच सर्व साखर होते! ही ईश्वरी रसायनक्रिया ईश्वरच जाणे!!

२७. पूर्वीं गायन व नृत्य या कलेंत शिव, नारद, तुंबर, जांबुवंत, बृहन्नटा ( अर्जुन ) व सरस्वती हे प्रसिद्ध होते. पुढें मुसलमानांचे कारकीर्दींत बिजूबावरा, तानसेन, मसीदखान, गुलामरजा, जामी, मीर खुसरू, हाफीज वगैरे मोठाले वस्ताद झाले. आतां पुरुषांचा गळा मोठेपणीं फुटतो, परंतु बायकांचा फुटत नाहीं हें त्यांस एक ईश्वरी देणें आहे. आणि वस्तुतः पाहिलें असतां गायन व नृत्य ह्या कला त्यांजकरितांच आहेत व ह्मणूनच नाटकशाळा यांणीं ते कलाभाग उचलले आहेत. परंतु दुष्टाश्रयत्वामुळें गतीं बायकांनीं त्या कलांचा अगदीं त्यागच केला. कारण, त्यांस असें वाटतें कीं, त्या कलांचा अंगिकार केला असतां उपमानप्रमाणानें किंवा साहचर्यदोषानें आपली गणती नाटकशाळांतच होईल! तरी, हल्लीं कन्याशाळा चालू होऊन तेथें गाणें शिकविण्याचा क्रम सुरू झाला आहे असें मुंबई येथील अलेक्झांड्रा गर्ल्स स्कूलमध्यें अभ्यास करून तयार झालेल्या मुलींच्या शिक्षणक्रमावरून दिसतें.

२८. ब्राह्मणांत जशा अनेक शाखा आहेत तसे जैनांमध्येंही ८४ गच्छ आहेत. जैन ( श्रावक ) लोकांमध्यें वर्षास आपलें पाप गुरूजवळ उच्चारून पश्चाताप करावा अशी चाल आहे त्यास पचखाण ह्मणतात. अशीच चाल रोमन क्याथलिक मताचे जे ख्रिश्चियन आहेत त्यांजमध्येंही असून ते त्यास " कन्फेशन " ह्मणतात. त्याचप्रमाणें सर्व उपाध्ये व धर्मगुरु अविवाहित व ब्रम्ह-

चारी असावे) असाही त्या दोन्ही धर्मांचा नियम आहे!

३९. ज्या प्रांतास हल्लीं बुंदेलखंड म्हणतात त्यांत पूर्वी क्षत्रिय राजे होते त्यांचीं नांवें:—भीमनाग, स्कंदनाग, बृहस्पतिनाग, गणपतिनाग, व्याघ्रनाग, वसुनाग, देवनाग वगैरे. यांणीं इ. स. २०० वर्षपर्यंत राज्य केलें. पुढें भोजराजाकडे हा प्रांत झाला. नंतर उदयादित्य, सूर्यसेन, कीर्तिवर्मा, जयवर्म, मदनवर्म, असे राजे झाले. त्यांणीं तारागड व ग्वाल्हेरचे किल्ले बांधिले. या प्रांतीं गोंड, चांडेल, बुंदेले व रजपूत हे लोक राहात असून त्यांत झांशी, चंदेरी, काल्पी हीं शहरें आहेत या प्रांतावर शहाबुद्दीन मुसलमान याणें इसवी सन १२०० त स्वारी करून प्रथम इंद्रप्रस्थ घेतलें आणि नंतर कनोज, काल्पी, काशी, ग्वाल्हेर हीं घेतलीं. ह्याप्रमाणें सर्व बुंदेलखंड मुसलमानांचे ताब्यांत आलें. तें त्यांजकडे ५०० वर्षे राहिलें. पुढें इ. स. १७३४ सालीं, महंमदखान बंगष याणें छत्रसाल राजावर हल्ला केला म्हणून त्याणें बाजीराव पेशवे यांचा आश्रय मागितला. तेव्हां बाजीरावानें त्यांस साह्यकरून महंमदखानाचा पराभव केला. त्या वेळीं छत्रसाल राजानें कृतज्ञतापूर्वक जो एक तृतीयांश मुलूख मराठ्यांस दिला त्यांत झांशी, जालवण, ललितपूर, सागर, काल्पी, सिरोंज वगैरे ३१ लाखांचा प्रांत पेशव्यांस मिळाला. हा प्रांत मिळाल्यावर मराठ्यांस हिंदुस्थान घेण्यास सुलभ पडलें. माळव्याचा सुभेदार राजा गिरधर हा धारेजवळ लढाईत मेला. म्हणून पुढें त्या जागीं राजा जयसिंग जयपूरवाले यांस सुभेदार नेमिलें. तेव्हां त्यांणीं सर्व माळवा मराठ्यांचे स्वाधीन केला तेव्हांपासून होळकर वगैरे बुंदेलखंडांत राहून, पुढें जेव्हां हिंदुस्थानांत स्वाऱ्या करूं लागले, त्या वेळीं चमेल[चंबळ]नदी ही पेशव्यांच्या राज्याची मर्यादा झाली होती; व मल्हारराव होळकर व पिलाजी जाधव हे वीर दिल्लीपर्यंत चौथाई व सरदेशमुखी घेत गेले होते. पुढें बादशहानें दिल्लीहून निजाम उल्मुल्ख यास माळव्याचे बंदोबस्तास पाठविलें. परंतु मराठ्यांनीं भोपाळाजवळ त्याचा पराभव केला त्या वेळेस त्या उभयतांमध्यें तहनामा होऊन त्यांत चंबळ

नदीपर्यंत मराठ्यांची हद्द आहे असें लिहून घेतलें. पुढें बाजीराव मेले. तेव्हां बाळाजी पंडित यांचे तर्फे नारोशंकर राजेबहादर हे इ. स. १७४२ सालीं बुंदेलखंडांत आले आणि उर्चाच्या राजापासून आणखी मुलूख घेऊन झांशीचा किल्ला दुरुस्त केला व शहर वसविलें. तसाच यांणीं पन्हा येथील हिऱ्याच्या खाणींत निम्मे हिस्सा घेतला. पुढें नारोशंकर परत आले आणि महादाजी गोविंद हे तेथें गेले त्यानंतर बाबूराव यांस नेमिलें हे तेही परत येऊन पुनः नारोशंकर १७६१ सालीं गेले. याच सालीं जालवणचे सुभेदार गोविंदपंत बुंदेले हे पाणपतांत मारले गेले. आणि समशेरबहादूर यास बुंदेल खंडांत पुण्याहून पाठविलें. पुढें त्यांचे मागून विश्वासराव लक्ष्मण व नंतर १७७० सालीं रघुनाथराव हरी त्यांणीं २४ वर्षे पर्यंत स्वतंत्रपणें कारभार केला याचे दरम्यान रघुनाथराव यांचें प्रकरण झालें तें साळप्याचा तहनामा होऊन संपलें. नंतर १७९०पासून १८०२पर्यंत समशेरबहादुराचा मुलगा अलीबहादर हा बुंदेलखंडांत होता. त्याचे वेळेस राजा हिम्मत बहादर म्हणून एक गोसावी असून त्याजवळ लखनौच्या वजिराचे तर्फे फौज होती त्याणें अलीबहादर यास आपलेकडे मिळवून चाळीस हजार फौजेनिशीं ते उभयतां बुंदेलखंडांत शिरले. तेव्हां ज्या लढाया झाल्या त्यांत अर्जुनसिंग बांदेवाले व वीरसिंगदेव बिजावरवाले हे मेले. त्याचप्रमाणें कोटोचे राजे देवपात हेही पडले. अलीबहादराकडून १० हजार फौज रेव्यावर गेली परंतु बगेले यांणीं यशवंतराव नाईक निसबत अलीबहादर याचा पराभव केला. तरी अलीबहादरानें हिंमतबहादर यांचे मसलतीनें रेव्याचे राजापासून बारा लक्ष रुपये घेतले. पुढें अलीबहादूर हा १८०२ मध्यें मेला. याणें बुंदेलखंडांत बारा वर्षे राज्य केलें. त्यास दोन मुलगे होते. एक समशेरबहादूर व दुसरा जुलफिकारअली. हे उभयतां सापत्न बंधू होते समशेरबहादूर हा पुण्यास होता म्हणून बुंदेलखंडांत जुलफिकारअली यासच त्याचा मामा, गनीबहादूर म्हणून होता, त्याणें गादीवर बसविलें. त्याची फौज कालिंजर शहरावर गेली तेव्हां त्यांत मुख्य सरदार कुवर दुर्गागीर, अहंमदबेग, बनीरबेग, बळवंतराव नाईक, कुवर कंचनगीर, सबसु-

खराय, व कर्नल मिसल्बेग( डच )असे होते शेवटीं पन्याचे व बांद्याचे राजे जेर होऊन अलीबहादराकडून दोन रुपये रोजप्रमाणें नेमणूक घेऊन राहिले. त्या वेळीं मुलखांत जिकडे तिकडे दंगे फिसाद व लढाया चालल्या असून सर्वच शिपाइगिरी करूं लागल्यामुळें शेतीभाती बंद पडली; गांव व महाल सरदारांस वांटून दिले होते ते कोठें जिनसवारानें, कोठें दरबंदीनें व कोठें तनख्यानें वसूल घेत; इकडे पुण्यांत होळकर व शिंदे यांणीं लढून पुणें घेतलें व बाजीराव पळाले; तेव्हां वसईस इंग्रजांचा तहनामा झाला व ही संधि पाहून इंग्रजसरकारानें बाजीरावापासून बुंदेलखंड आपलेकडे 'पुरवणी तहनाम्यांत लिहून घेतलें. परंतु इकडे समशेरबहादूर हा पुण्यास होताच. तो बुंदेलखंड आपलें आहे असें समजून हिंदुस्थानांत गेला आणि त्याणें गनीबहादूर यास कैद करून अजयगडांत ठेविलें. इतक्यांतच राजा हिंमतबहादूर यास समशेरबहादुराचें भय वाटून त्याणेंही इंग्रजांशीं तह केला. आणि इंग्रजसरकार व हिंमतबहादूर यांचे फौजेनें काल्पी घेतली. अंबाजी इंगळे यांणीं आपलीं पलटणें व कर्नल शेफर्ड यास बरतर्फ केलें म्हणून तेही,याप्रमाणें येऊन कर्नल पावल साहेबास मिळाले त्या वेळीं सर्व फौजेचा कारभार कमांडरइन्चीफ लार्ड लेक साहेबाकडे होता. शेवटीं त्यांणीं समशेरबहादुरास चार लाख रुपये पेन्शन देण्याचें ठरवून सर्व महाल सरकारांत घेतले. पुढें किरकोळ राजे रजवाडे यांचाही पराभव होऊन सर्व प्रांत इ. स. १८०३ मध्यें कंपनी सरकाराकडे आला. नंतर त्या प्रांताचा कारभार पाहण्यास कमिशन नेमलें. त्यांत ब्रूक साहेब व कप्तान वेली हे होते. त्यांणीं जड्ज व कलेक्टर नेमून कलकत्ता सरकारचे हुकुमाप्रमाणें कारभार करावा असें ठरविलें इकडे नारोशंकर वगैरेंचेही सर्व महाल मुलूख कंपनी सरकारांत आले व किरकोळ सरदार राजे वगैरे होते त्यांस त्यांची योग्यता पाहून जाहागिरी पेन्शनें वगैरे दिलीं.

४०. मच्छलीबंदरचा नबाब अनवरुद्दीनखान हा निजाम उल्मुल्क याचे पोटांत होता. परंतु त्याचे अमलांत धांदल होऊन त्याणें त्याणें महाल बळकाविले. या धांदलीचा बंदोबस्त अनवरुद्दीन याचे

पुढें दस्तुमखान याणें केला. त्यांत त्याणें जमीनदार वगैरे फार मारले. त्याच पुढें हुसेनखान हा नबाब झाला. तेव्हांच इ. स. १७६५ त इंग्रज कंपनीनें दिल्लीदरबारकडून राजमहेंद्री, वेलूर, कोंडापिली व गंठूर हे चार परगणे त्याजपासून देण्याची सनद आणिली तरी कांहीं दिवस त्यांची वहिवाट नबाबाकडेसच ठेविली होती. पुढें कंपनीनें इ. सन १७७९ मध्यें ते महाल आपल्या ताब्यांत घेतले व त्यास १॥ लाख रुपयांची नेमणूक करून दिली पुढें हुसेनखान मेल्यावर चौकशी होऊन त्याचे वंशजांस पन्नास हजार रुपये देण्याचें ठरविलें व तीच नेमणूक हल्लीं चालू आहे. येणेंप्रमाणें त्या प्रांतांत इंग्रजी अम्मल सुरू झाला.

४१. गोविंदराव जालवणवाले हे इ. स. १८४० सालीं मेले तेव्हां अर्थात् त्यांचा मुलूख सरकारांत आला. १८५३ त गंगाधरराव झांशीवाले मेले तेव्हां झांशीसंस्थान सरकारांत आलें. त्याशिवाय कांहीं जहागिरी १८५७ सालीं सरकारांत जप्त झाल्या. या सर्वांचा कारभार हल्लीं बुंदेलखंडांत गव्हरनर जनरलचा एजंट असतो त्याजकडे आहे. या प्रांतांत यमुना वगैरे मोठाल्या नद्या आहेत.

४२. या देशांत देवाकरितां व तपस्वी लोकांकरितां भुयारें करण्याची चाल फार होती. अमदाबादेस जीं भुयारें आहेत त्यांत तर मोठमोठीं देवळें आहेत. तेथें भमरियो कुवो म्हणून एक विहीर असून तींत एक भुयार काढलें आहे. याशिवाय तेथील लोकांचे घरांतही पुष्कळ भुयारें असून त्यांतील कित्येक हल्लीं बुजून गेलीं आहेत. तेथील नदीचे कांठीं पांचपिंपळीजवळ असेंच एक भुयार आहे. व नदीच्या पलीकडे काशिमरीबोवांच्या मठांत एक मोठें भुयार आहे. याचप्रमाणें प्रभासाजवळ गोरखमढी आहे तेथेंही एक भुयार आहे. अशीं ठिकठिकाणीं अनेक भुयारें आहेत. पूर्वी राजेलोक हीं भुयारें घरांत करीत होते. बडोद्याजवळ पावागड येथें पूर्वीच्या क्षत्रिय राजांचे जे महाल आहेत ते डोंगरांत कोरून त्यांस मजले केले आहेत. त्यांत माणसें व खुद्द राणी चंपावतें

राहत होती असें म्हणतात. परंतु हल्लीं पाहिलें असतां ते महाल अस्वलांस देखील राहण्यास योग्य नाहींत असें दिसतें ! मग त्या अंधार कोठड्यांतून राजे कसे रहात होते याची कल्पना होत नाहीं. याशिवाय काठेवाड प्रांतांत जसदन येथें असलेलें भुयार तर प्रख्यातच आहे. भरतपुराजवळ डीग म्हणून शहर आहे तेथील राजांनीं 'भुवनें' म्हणून जमिनींत अशाच इमारती केल्या आहेत त्या पाहण्यासारख्या आहेत.या भुयारांतील इमारतींत थंडींच दिवसांत व उन्हाळ्यांत राहणें सुखकर असतें व तेवढ्याकारितांच त्या केल्या असाव्या असा तर्क आहे.

४३. मूर्त्ती नाहींत अशीं देवळें पुष्कळ आहेत. कडीजवळ बेचराजी मातेचें मोठें देऊळ आहे; परंतु त्यांत मूर्त्ति नाहीं. अमदाबादेंतील गोमतीपुरास नरसिंहाचें देऊळ आहे त्यांतही मूर्त्ति नाहीं. अंबाजी म्हणून अमदाबादेहून ५० कोसांवर एक प्रख्यात ठिकाण आहे, त्या देवळांतही मूर्त्ति नाहीं; परंतु भक्तांकारितां एका कोनाड्यास दागिने वगैरे घालून मूर्तीचा देखावा करितात. याचप्रमाणें मद्रास इलाख्यांत पुष्कळ शून्य मंदिरें असून तीं महादेवाचीं देवळें होत असें ह्मणतात. परंतु त्यांत लोक आकाशलिंगाची म्हणजे रिकाम्या जाग्याचीच पूजा करितात. चिदंबराचें देऊळही याप्रमाणेंच मूर्त्तिरहित आहे.

४४. जगामध्यें पुरुष व स्त्रिया सारख्याच असून त्यांच्या आयुष्याचें प्रमाण सरासरी ३३ वर्षांचें आहे असा शोधक लोकांनीं अजमास काढिला आहे. याशिवाय आणखी असाही शोध काढला आहे कीं, जगांतील एकंदर वस्तीचा एक चतुर्थांश लोक १७ वर्षांच्या वयांतच मरतात. प्रत्येक हजारांत एकच मनुष्य शंभर वर्षें वांचतो व शेकडा ६ मनुष्यें देखील ६५ वर्षांच्या उमरीस येण्याची मुष्कील पडते. पांचशें मनुष्यांत एकच मनुष्य ८० वर्षांपर्यंत वांचला तर वांचतो. पृथ्वीवर शतकोट वस्ती आहे. त्यांतील प्रत्येक वर्षी ३,३३,३३,३३३ लोक मरतात ह्मणजे प्रत्येक दिवशीं ९१,८२४ किंवा प्रत्येक तासास ३,७३७ अथवा प्रत्येक

मिनिटास ६० लोक मरण पावतात. शिवाय असाही शोध काढला आहे कीं, अविवाहितांपेक्षां विवाहित मनुष्य जास्ती वांचतो. याचप्रमाणें श्रीमंतीनें राहणाराही जास्त वांचतो उंच मनुष्य ठेंगण्यापेक्षां जास्त टिकाव धरतो. स्त्रियांस पुरुषांपेक्षां पन्नास वर्षांपर्यंत आयुष्याचें मान अधिक असून पुढें कमी होत जातें. जे वसन्त ऋतूंत जन्मतात ते बळकट असतात. त्याचप्रमाणें जन्म व मृत्यु हीं रात्रीपेक्षां दिवसास अधिक होतात. एका हजारांत ७५ लोकांचीं लग्नें झालीं असतात. तरी, एकंदर पुरुषांत हत्यारें घेण्याजोगे लोक एक चतुर्थांशच मिळतील.

४५. कच्छप्रांतीं सारस्वत, राजगिरे व औदीच्य ब्राह्मण आहेत ते अर्बस्तानांत, जंगबार [ झांझिबार ] व मोझांबिक या बंदरीं जाऊन भिक्षावृत्ति करितात. तसेच ते विधवेचा पुनर्विवाह करितात व क्षत्रिय व कुळंबी यांचे घरीं जेवितात. कच्छचे वाणी तर व्यापाराकरितां आफ्रिकाखंडांत व अर्बस्तानांत बहुत जातात. परंतु त्यांजमध्यें दक्षिणी लोकांप्रमाणें परदेशगमन वर्ज व निषिद्ध नाहीं व येणेंकरून ते दक्षिणी लोकांपेक्षां सुखी आहेत हे ध्यानांत ठेविलें पाहिजे.

४६. पुराणांत साधारण पांच प्रकार असतात:—

सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वंतराणि च ॥
वंशानुचरितं चैव पुराणं पंचलक्षणं ॥

पुराणांचे सात्विक, राजस व तामस असे तीन वर्ग आहेत ते असे:—

॥ ( १ ) वैष्णवं ( २ ) नारदीयं च तथा ( ३ ) भागवतं शुभं ॥
॥ ( ४ ) गारुडं च तथा ( ५ ) पाद्मं ( ६ ) वाराहं शुभदर्शनम्॥
॥ सात्विकानि पुराणानि विज्ञेयानि शुभानि वै ॥
॥ ( १ ) ब्रम्हाण्डं ( २ ) ब्रम्हवैवर्त्तं ( ३ ) मार्कण्डेयं तथैव च ॥
॥ ( ४ ) भविष्यं ( ५ ) वामनं ( ६ ) ब्राह्मं राजसानि निबोधत॥

॥ (१) मात्स्यं (२) कौर्मं तथा (३) लैंगं (४) शैवं (५) स्कान्दं तथैव च ॥
॥ (६) आग्नेयं च षडेतानि तामसानि निबोधत. ॥

यास दुसरी कसोटी दिली आहे ती अशी:—

सात्विकेषु पुराणेषु माहात्म्यमधिकं हरे: ॥
राजसेषु च माहात्म्य-मधिकं ब्राह्मणो विदु: ॥
तद्वदग्नेश्च माहात्म्यं तामसेषु शिवस्य च ॥

अन्यत्र तर सर्वपुराणांस पांचवा वेद असेंच ह्मटलें आहे:—

ऋग्यजु: सामाथर्वाख्या वेदाश्चत्वार उत्धृता: ॥
इतिहासपुराणं च पंचमो वेद उच्यते ॥ १ ॥

पुनरपि—

पुराणं सर्वशास्त्राणां प्रथमं ब्रह्मणा स्मृतं ॥
अनन्तरं च वक्रेभ्यो वेदास्तस्य विनिर्गता: ॥
पुराणमेकमेवासीत्तदा कल्पान्तरे ऽनघ ॥
त्रिवर्गसाधनं पुण्यं शतकोटि प्रविस्तरम् ॥

हीं पुराणें अठरा असून त्यांचीं नांवें वर व मागें-गोष्ट ४९, पृष्ठ २४ मध्यें-दिलीं आहेत. त्यांचें येथें संक्षेपानें वर्णन देतों:—

(१). **ब्राह्मपुराण**—यास आदिसौरपुराणही ह्मणतात. यांत सूर्याची आराधना, उत्कल देशांतील तीर्थें, जगन्नाथपुरी, वगैरेचीं वर्णनें केलीं आहेत. हें पुराण पूर्वीं ब्रह्मदेवांनीं दक्षप्रजापतीस सांगितलें व तेंच लोमहर्षण नामक सूतांनीं ऋषींस कथन केलें आहे. यास एक उत्तरखंड ह्मणून जोडलें असून त्यांत बल्लास नामक नदीचें माहात्म्य आहे. हें पुराण उत्तरखण्ड सुद्धां ११००० आहे.

(२). **पद्मपुराण**—हें ५५००० असून त्यांत १ सृष्टिखंड, २ भूमिखंड, ३ स्वर्गखंड, ४ पाताळखंड व ५ उत्तरखंड असे भाग आहेत. हें पुराण उग्रश्रवा ह्मणून वरील लोमहर्षण सूतांचा हो-ता त्याणें सांगितलें आहे.

( ३ ). **वायुपुराण**—हें सूतांनीं सांगितलें असून त्याचे प्रक्रया, उपोद्घात, अनुषंग व उपसंहार असे चार पाद आहेत. त्यांत कल्प, मन्वंतरें, श्राद्धें, यात्रा वगैरे सांगितलीं असून ग्रंथसंख्या २४००० आहे. यांत श्वेतकल्पाच्या कथा असून त्यांत असें लिहिलें आहे:—

श्वेतकल्पप्रसंगेन धर्मान्वायुरिहाब्रवीत् ॥
यत्रैतद्वायवीयं स्या-द्रुद्रमाहात्म्यसंयुतं ॥
चतुर्विंशत्सहस्राणि पुराणं तदिहोच्यते ॥
शिवभक्तिसमेतोगा-च्चैवं तच्चापराख्यया ॥

( ४ ). **विष्णुपुराण**—हें २३ हजार असून तें पराशरांनीं मैत्रेयास सांगितलें. त्यांत वराहकल्पांतील कथा आहेत असें खालीं लिहिलेले श्लोकावरून दिसतें:—

वराहकल्पवृत्तान्त-मधिकृत्य पराशरः ॥
यत्प्राह धर्मानखिलाँ-स्तदुक्तं वैष्णवं विदुः ॥

( ५ ). **भागवतपुराण**—यांत सारस्वत कल्पांतील कथा असून तें अर्जुनाचा नातु परीक्षिति राजा यास श्रीशुकदेवांनीं सांगितलें व तेंच पुनरपि सूतांनीं ऋषींस सांगितलें असा ओघ लिहिला आहे. त्यांत १२ स्कंद असून त्याची श्लोकसंख्या १८००० आहे. त्याविषयीं असें ह्मटलें आहे:—

यत्राधिकृत्य गायत्रीं वर्ण्यते धर्मविस्तरः ॥
वृत्रासुरवधोपेतं तद्भागवतमुच्यते ॥ १ ॥
सारस्वतस्य कल्पस्य मध्ये ये स्युर्नरामराः ॥
तद्वृत्तान्तोद्भवं लोके तद्भागवतमुच्यते ॥ २ ॥
ग्रंथोऽष्टदशसाहस्रो द्वादशस्कन्द सम्मितः ॥
हयग्रीवो ब्रह्मविद्या यत्र वृत्रवधस्तथा ॥
गायत्र्या च समारम्भ-स्तद्वै भागवतं विदुः ॥
स्कन्दान्द्वादश एवात्र कृष्णेन विहिताःशुभाः ॥
द्वात्रिंशत्त्रिशतं पूर्ण-मध्यायाः परिकीर्त्तिताः ॥

( ६ ) **नारदपुराण**—यांत बृहत्कल्पांतील कथा नारदांनीं सनत्कुमारास सांगितल्या असून त्यांची संख्या २५००० आहे:—

यत्राह नारदो धर्मान्बृहत्कल्पाश्रयानिह ॥
पंचविंशत्सहस्राणि नारदीयं तदुच्यते ॥

इतर पुराणांत जशा अनेक कथा आहेत तशा वामन, ध्रुव, प्रल्हाद वगैरेंच्या कथा या पुराणांत आहेत, व यास बृहन्नारदीय पुराण असेंही ह्मणतात.

( ७ ). **मार्कंडेयपुराण**—हें नऊ हजार असून त्यांत सप्तशती ह्मणून एक १३ अध्यायांचें देवीमाहात्म्य मध्येंच घेतलें आहे.

( ८ ). **अग्निपुराण**—हा १६००० चा ग्रंथ असून त्यांत ईशानकल्पांतील कथा आहेत. त्यांत अग्नीनें वसिष्ठास सांगितलेल्या ज्या कथा व्यासास मिळाल्या त्याच सूतांनीं पुन: सांगितल्या आहेत:—

यत्तदीशानकं कल्प—वृत्तान्तमधिकृत्य च ॥
वसिष्ठायाग्निना प्रोक्त—माग्नेयं तत्प्रचक्षते ॥
तच्चषोडशसाहस्रं सर्वक्रतुफलप्रदं ॥

यांत तांत्रिक कर्मे पुष्कळ असून बीजें, दीक्षा, गुरूचें माहात्म्य, गयामाहात्म्य, कांहीं इतर पुराणांतील अध्याय कांहीं स्मृतींतील अध्याय कांहीं वैद्यक ग्रंथांतील श्लोक, कांहीं व्याकरण शास्त्रांतील माहिती, राजनीति व धनुर्वेदांतील कांहीं अध्याय वगैरे अनेक प्रकारच्या प्रतिपादनांनीं तें भरलें आहे.

( ९ ). **भविष्यपुराण**—याची संख्या १४००० असून त्यांत अघोरकल्पांतील कथा आहेत. याचे पोटीं एक भविष्योत्तर पुराण ह्मणून आहे तें याच पुराणाचें परिशिष्ट असेल असें वाटतें. हें सुमंतूनें शतानिकास सांगितलें असून त्यांत उत्पत्तिसंस्कार, संध्या, व्रतें, वर्णाश्रमधर्म वगैरेंचें प्रतिपादन आहे. त्याविषयीं असें ह्मटलें आहे:—

तत्राधिकृत्य माहात्म्य—मादित्यस्य चतुर्मुखः ॥

परंतु व्यास बहुत झाले असे लेख असून तें खरेंही असेल. कारण, पुराणांतून उलट पालट अशीं जीं पुष्कळ क्षेपक वचनें आढळतात, त्यांजवरून दुसरे व्यास होऊन त्यांणींच ती अदलाबदल केली असेल. तरी पुराणाचे लेख २४०० वर्षांपलीकडील असावे असें अनुमान होतें.

५०. जीं पुराणें व ज्या स्मृती तामस असतील त्या टाकाव्या असें वैष्णवांचें मत आहे यास प्रमाणः—

किमत्र बहुनोक्तेन पुराणेषु स्मृतीष्वपि ॥
तामसा नरकायैव वर्जयेत्तान्विचक्षणः ॥

५१. पुराणें झालीं त्याकाळीं शिव, विष्णु, ब्रह्मा इत्यादि देवांचे कैवारी बहुत होऊन ते दुसऱ्याची निंदा करीत. त्याचे दाखले पुढील श्लोकांत आढळतीलः—

येऽन्यं देवं परत्वेन वदन्त्यज्ञानमोहिताः ॥
नारायणाज्जगन्नाथा—त्ते वै पाषण्डिनः स्मृताः ॥ १ ॥
यस्तु नारायणं देवं ब्रह्मरुद्रादि दैवतैः ॥
सममन्यैर्निरीक्षेत स पाषण्डिभवेत्सदा ॥ २ ॥
किमत्र बहुनोक्तेन ब्राह्मणा येऽप्यवैष्णवाः ॥
न स्प्रष्टव्या न वक्तव्या न द्रष्टव्याः कदा च न ॥—

पद्मपुराणे, उत्तरखंडे, पाषाण्डाध्याये.

एको नारायणो आसी—न्न ब्रह्मा न च शंकरः ॥
* * * सर्वं विष्णुमयं जगत् ॥

पुनरपि शैव ह्मणतातः—

सर्वव्यापी स भगवां—स्तस्मात्सर्वगतः शिवः ॥

इ० इ० इ०

५२. पद्मपुराणांतील उत्तरखंडांत चार संप्रदायांविषयीं लेख आहे. त्याजवरून तें खण्ड ते चारी सांप्रदाय सुरू झाल्यावर लिहिलें असावें, असें वाटतें. परंतु तें लिहितांना तें संप्रदायचतुष्टय पुढें होईल असें लिहिलें आहेः—

संप्रदायविहीना ये मंत्रास्ते निष्फला मताः ॥

अतः कलौ भविष्यंति चत्वारः संप्रदायिनः ॥
श्रीमाध्वी रुद्रसनका वैष्णवाः क्षितिपावनाः ॥
चत्वारस्ते कलौ देवी संप्रदायप्रवर्त्तकाः ॥

५३. तुळशीदास हा साधु व कवि चित्रकोटाजवळ राजापूर ह्मणून गांव आहे तेथील राहणारा असून त्यानें संवत १६०१ सालीं हिंदुस्थानी भाषेत रामायण रचिलें ह्मणून त्यास 'कलिवाल्मिक' ह्मणतात. याणें तुळसीविनयपत्रिका ह्मणून एक ग्रंथ, जाहांगीर बादशहाचे कारकीर्दीत ह्मणजे संवत १६८० किंवा इ. सन १६२४ सालीं केला असें त्याचे ग्रंथांतच लिहिलें आहे:—

संवत सोलहसयअसीगंगाके तीर ॥
सावण शुक्ला सत्तमी तुलसी त्यजो शरीर ॥

हा सरवरिया ब्राह्मण असून त्याचा गुरु जगन्नाथदास ह्मणून होता हे गुरुशिष्य काशीस राहत असत. तुळसीदासानें तुळसीसतसई ह्मणून सातशें दोहोऱ्यांचा एक ग्रंथ केला असून शिवाय रामगुणावलि व गीतावलि या नांवाचे याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

५४. श्रीरामानुजस्वामी यांस शेषाचा अवतार ह्मणतात. यांचा इतिहास दिव्यचारित्र ह्मणून एक कानडी भाषेत ग्रंथ असून त्यांत असें लिहिलें आहे कीं;—रामानुज, हे श्रीकेशवाचार्य व भूमिदेवी यांचे पुत्र असून पिडंबर येथें यांचा जन्म झाला. यांणीं कांचीक्षेत्रीं अभ्यास करून श्रीरंग ह्मणजे त्रिचनापल्लीस येऊन तेथें ग्रंथ केले आणि ते आपलें वैष्णवमत शिकवूं लागले. पुढें चोल देशाचा राजा शैव होता त्याणें त्यांस धरण्याचा बेत केला. परंतु ते पळून ह्मैसूरच्या राजाश्रयास गेले. तेव्हां ह्मैसूरचा राजा जैन धर्मी होता, परंतु त्यास त्यांणीं उपदेश करून श्रीवैष्णव केलें आणि त्याचें नांव वितलदेव होतें तें बदलून विष्णुवर्धन असें ठेविलें. नंतर रामानुजांनीं मेलकोटा येथें एक मठ बांधिला. पुढें चोळदेशचा राजा मेला तेव्हां ते पुनः श्रीरंगास आले. रामानुजांचा मंत्रोपदेश "श्रीरामायनमः" हा षडाक्षरी असून तुळसी, गोपिचंदन, शालिग्राम

नारायण, विष्णु, राम, श्रीरंग, व्यंकटेश, लक्ष्मी, जगन्नाथ इत्यादि वैष्णव देव पुज्य मानतात. रामानुजानें अनेक ग्रंथ केले· त्यांत श्रीभाष्य, गीताभाष्य, वेदान्तसंग्रह, वेदान्तप्रदीप, वेदान्त-सार वगैरे प्रसिद्ध आहेत. याचे मतें नारदपंचरात्र आणि विष्णु-नारदीय–गरुड-पद्म–वराह व भागवत हीं सहा पुराणें मात्र प्रमाण व सात्विक ग्रंथ आहेत. याचे मतास विशिष्टाद्वैतमत ह्मणतात. याचे शिष्य बहुत झाले. त्यांत देवनंद, हरीनंद, राघवानंद व चौथा रामानंद (इ. सन १४००)हे मुख्य झाले. यांजमध्येंही वडगळ व तेंगल असे दोन पक्ष असून त्यांचे मठ व आखाडे आहेत व त्यांत महंत असतात. रामानंदाचे १२ शिष्य होते त्यांचीं नांवें:—

१ आसानंद, २ कबीरमोमण, ३ रोहिदास चांभार, ४ पिपा-रजपुत, ५ सुरसुरानंद, ६ सुखानंद, ७ भावानंद, ८ धना-भाट, ९ सेनान्हावी, १० महानंद, ११ परमानंद, व १२ श्रिया-नंद; हे सर्व भिक्षुक होते.या सर्वांचे मोठमोठाले चमत्कार वर्णिले आहेत: पिपानें समुद्रांत जाऊन श्रीकृष्णापासून मुद्रा आणिल्या अशी ख्याति आहे ( पहा–मुख्य भाग, गोष्ट १७, पृष्ठ ९ ). त्या मुद्रा लो-क अद्यापि तापवून घेतात. त्याचा इतिहास भक्तमाला ह्मणून नाभाजीनें एक ग्रंथ लिहिला आहे त्यांत पहावा. हा नाभाजी उर्फ नारायणदास डोम जातीचा होता.

५५. सूरदास ह्मणून अकबर बादशहाचे कारकीर्दीत एक हिंदु-स्थानी अंधळा कवि होऊन गेला. त्यानें ‘ विनय ’ वगैरे बहुत ग्रंथ केले आहेत. सूरदासाप्रमाणेंच वृंद व ब्यहारी असे दोन हिंदु-स्थानी कवी होऊन गेले. त्यांणीं सतसय्या केल्या आहेत. त्यांस अनुक्रमें वृंदसतसई व ब्याहारीसतसई ह्मणतात.

५६. श्रीजयदेवस्वामी हे उत्कलदेशांत विक्रमाचे पूर्वीं झाले. यांची स्त्री पद्मावती नामक होती. तिची कथा अशी आहे कीं, ही कोणी ब्राह्मणाची कन्या असून तो ब्राह्मण तिला जगन्नाथास अर्पण करण्याकरितां घेऊन जात असतां त्यास वाटेंत जयदेव भेटला. तो अगदीं गरीब होता. त्यास पद्मावतीच्या बापानें ह्मटलें कीं, मी ही कन्या

तुला देतों. तेव्हां जयदेव हा ब्रह्मचारी असून त्याचा लग्न करण्याचा बेतही नव्हता. परंतु पद्मावतीचा पिता आपली मुलगी त्याचे पुढें टाकून गेला. तेव्हां जयदेवानें तिला विचारलें कीं, तूं पुढें काय करणार ? ती ह्मणाली, ज्याअर्थी मला माझ्या बापानें आपले हवालीं केली आहे त्याअर्थी आपण माझा अंगिकार केला तर बरें आहे; नाहीं तर मी जीव देईन ! तेव्हां तो तिच्याशीं लग्न करून गृहस्थ झाला * आणि नंतर त्यानें 'गीतगोविंद' नांवांचें काव्य केलें व त्याचप्रमाणें नीलाचल ( तत्कालीनउत्कलदेशाचा राजा ) याणेंही एक अष्टपदी ग्रंथ केला, आणि त्या दोन्ही ग्रंथकारांनीं आपलीं पुस्तकें जगन्नाथाचे देवळांत नेऊन देवापुढें ठेविलीं. तेव्हां राजाचा ग्रंथ देवळाबाहेर उडून गेला व जयदेवाचा ग्रन्थ देवाचे पायावर पडला अशी त्याचे ग्रंथाची ख्याति आहे. शिवाय जयदेवानें आपली स्त्री पद्मावती मेलेली असतां उठविली असेंही लोक म्हणतात. जयदेवाची कविता फारच शृंगारिक असल्यामुळें कित्येकांस ती अयोग्य वाटते!!

९७. कबीराचा काल मगर येथें संवत १५०५, भाद्रपद शुद्ध ११ रोजीं झाला. त्याविषयीं असें म्हटलें आहे:—

सम्वत्पंद्रहसंय औार पांचमो मगर कियै गवन ॥
अगहनसुदी एकादसी मिले पवनसोपवन ॥

नानक याणें कबीरपंथ धरूनच आपला सांप्रदाय चालविला होता. यावरून कबीर हा नानकाचे पूर्वी झाला होता असें दिसतें. शिवाय अबूफजल याणें असें लिहिलें आहे कीं, कबीर हा सुलतान सिकंदर याचे वेळेस होता. हा मेला तेव्हां याचे देहाचीं फुलें व तुळशी झाल्या. त्याचे दोन भाग करून एक भाग काशीचा राजा वीरसिंह याणें घेतला व त्याणें तीं तुळशी फुलें पुरून टाकिलीं. त्या ठिकाणास कबीरचौथरा म्हणतात. आणि राहिलेला दुसरा भाग मगरचा नवाब बिजलीखान याणें घेऊन पुरला व त्याजवर एक कबर बांधिली. मगर हें गांव गोरखपुराजवळ आहे.

---

* जयदेवाच्या या लग्नाविषयीं 'हिंदुस्थानाच्याअर्वाचीन कोशांत' वेगळीच आख्यायिका लिहिली आहे. (त्या कोशांतील 'जयदेव' शब्द पहा)

कबीराचें पुढील वचन चमत्कारिक आहे:--

सबसे हिलिये सबसे मिलिये सबका लिजिये नाउ ॥
हांजिहांजि सबसेकीजिये वसे आपने गाउ ॥

कबीरपंथी परस्परांस भेटले असतां 'बंदगीसाहेब' 'सत्साहेब' 'गुरूकी दया' असें बोलतात. कबीरानें केलेले ग्रंथ खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत:—

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सुखनिधान. | १ | झुलणा. |
| १ | गोरखनाथकीगोष्टी. | १ | कहार. |
| १ | कबीरपंजी. | १ | हिंडोला. |
| १ | बालखकीरामायणी. | १ | बारामास. |
| १ | रामानंदकीगोष्ट. | १ | चंचरस. |
| १ | आनंदरामसागर. | १ | छतिसा. |
| १ | शब्दावलि. | १ | अलेफनामा. |
| १ | मंगल. | १ | रामेणी. |
| १ | वसंत. | १ | साकी. |
| १ | होळी. | १ | बीजक. |
| १ | रेखता. | १ | आगमवाणी. |

या ग्रंथांतील कांहीं ग्रंथ स्वतः कबीराचे असून कांहीं त्याच्या शिष्याचे आहेत. बीजक हा ग्रंथ भागूदासानें केला आहे. परंतु तो आपला ह्मणत नसून, कबीरानें सांगितला असें ह्मणतो. व ह्मणून ती वाणी कबीराचीच आहे असें ह्मणतात. कबीरपंथी हे जाती, कर्म व मूर्ती मानीत नाहींत. तरी ते दयाधर्म मानतात. कबीरानें मुसलमान व हिंदु यांमधलि द्वेष काढून दोघांची समजूत पाडण्याचा प्रयत्न केला. याचे मुख्य शिष्य श्रुतगोपाळदास, भागूदास, नारायणदास, चूडामणदास, धर्मदास, जगोदास, जीवनदास, कमाल, साहेबदास वगैरे असून शिवाय या सर्व भरतखंडभर कबीराचे मेळे व मठ आहेत.

९८. निंबार्क ह्मणून वृंदावनांत एक आचार्य झाला. याचें पूर्वींचे नांव भास्कराचार्य होतें. एकदां त्यास भेटण्याकरितां

एक जैन साधु आला असतां त्याशीं बोलतां बोलतांच संध्याकाळ होत आला. इतक्यांत त्यास आचार्यांनी कांहीं अन्न दिलें. तेव्हां तो ह्मणाला कीं, सूर्यास्त झाल्यावर आह्मी कांहीं खात नाहींत तों आचार्यांनीं सूर्यास अस्त न पावण्यास आज्ञा केली, आणि जतीस सांगितलें कीं, आपण या निंबाचे झाडाखालीं बसून हें अन्न स्वस्थ भक्षण करावें; सूर्य कांहीं मावळणार नाहीं. या विलक्षण सामर्थ्यावरून त्याचें नांव निंबार्क झालें असें ह्मणतात. निंबार्काचे शिष्य मथुरा व जयपूर प्रांतीं पुष्कळ आहेत. निंबार्कास होऊन १४०० वर्षें झालीं असें ह्मणतात.

५९ बंगाल्यांतील वैष्णवपंथ उभा करणारे अद्वैतानंद, नित्यानंद व चैतन्य असे त्रिवर्ग होते. त्या पंथाचा चैतन्यचरित्र ह्मणून एक ग्रंथ असून त्यांत आदिलीला, मध्यलीला, आणि अंत्यलीला असे तीन भाग आहेत. त्या ग्रंथावरून असें समजतें कीं, ते तिघेही ब्राह्मण असून ते नदियाशांतिपुरास राहत होते. चैतन्याच्या बापाचें नांव जगन्नाथमिश्र व आईचें नांव सची असें होतें. चैतन्य हा कृष्णाचा अवतार असें म्हणतात. यास वल्लभाचार्याची मुलगी दिली होती. परंतु हा २४ वें वर्षींच त्यागी व विरागी होऊन धर्मोपदेश करूं लागला. याणें मथुरा वृंदावन व कटक येथें आपलें वसतिस्थान केलें होतें. हा बारा वर्षें धर्म सांगून शेवटीं इ. सन १५२७ त जो नाहींसा झाला तो पुनः कोठेंही आढळला नाहीं. त्याचे शिष्य असें ह्मणतात कीं, तो गोलोकास गेला. बंगाल्यांतील वैष्णव हे, अद्वैतानंदप्रभु, नित्यानंदप्रभु आणि चैतन्यप्रभु असे तीन प्रभु आहेत असें म्हणतात. या तिन्ही प्रभूंचीं देवळें वृंदावनांत असून तेथें बंगाली लोक दर्शनास येतात. या तीन प्रभूंचे सहा गोसावी व अष्ट कवी शिष्य होते. त्यांणीं भक्तिमार्ग स्थापन करून राधाकृष्णाचें भजन करण्याचा उपदेश केला. चैतन्याचे शिष्यांनीं बहुत ग्रंथ लिहिले; त्यांत विदग्धमाधव, ललितमाधव, उज्वलनीलमणि. अष्टरास, लीलाखंड, गोविंदबिरूदावलि, पद्मावली, मथुरामाहात्म्य, लघुभागवत, वज्रविलास, हरिभक्तिविलास, रासामृतसिंधु, भागवतामृत,

सिद्धांतसार, भागवतसंदर्भ, भक्तिसिद्धांत, गोपालचंपु, उपदेशामृत, मनशिक्षा, गणलेशरसायनमल्लिका, चैतन्यचंद्रोदय, स्तवमाला, स्तवामृतलहरी, श्रीस्मरणदर्पण, गोपिप्रेमामृत, कृष्णकर्णामृत, चैतन्यचरितामृत, चैतन्यमंगल, प्रेमभक्तिचंद्रिका, पाषांडदलन, वैष्णववर्धन, दानकेलिकौमुदी इत्यादि प्रस्थानिक ग्रंथ आहेत. चैतन्याचे अनुयायी हे राधाकृष्ण नांवाच्या मुद्रा आणि तुळसीमाळा हीं धारण करितात.

६०. राधावल्लभी हा एक पंथ आहे. याचा मूळ ग्रंथ राधासुधानिधि नामक असून या पंथाचा एक मठ मथुरेस इ. सन १५८५ त स्थापन झाला. त्या पंथाचे लोक आपल्या मतप्रतिपादनास ब्रह्मवैवर्त्त पुराणाचा आधार घेतात. भारत भागवतांत राधा कोठें आढळत नाहीं. परंतु ब्रह्मवैवर्त्त पुराणांत असें लिहिलें आहे कीं, गोलोक म्हणून एक स्वर्ग असून त्यांत इच्छा शक्ति ही राधारूप घेऊन कृष्णाजवळ रहाते. तिच्यापाशीं गोपी बहुत असून कृष्णाजवळही बहुत गोप होते. पुढें एके दिवशीं कृष्णाचें व राधेचें भांडण झालें म्हणून सुदामा नामक गोपानें तिला शाप दिला कीं, तूं मृत्युलोकीं जन्म घेशील. तेव्हां तिनेंही त्यास शाप दिला कीं, तूं मृत्युलोकीं शंखचूड नामक दैत्य होशील. त्याप्रमाणें राधा ही वैश्य जातींतील वृषभानु व कलावती यांचे घरीं अवतरली. आणि तिचें व कृष्णाचें लग्न झालें. पुढें तिचा व कृष्णाचा वियोग झाला आणि ती गोलोकीं गेली. नंतर कृष्णावतार संपल्यावर कृष्णही तिकडे गेले. राधावल्लभी या पंथाचे शिष्य बरेच असून हे विशेषकरून सखीभाव म्हणजे राधेचें रूप नटतात.

६१. जोगी हे बहुत दिवसांपासून हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहेत. ते आपले मूळ शिवापासून गणितात. त्यांचे आचार्य झाले ते:—

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आदिनाथ. | १ | चौरंगीनाथ. |
| १ | मच्छेंद्रनाथ. | १ | मीननाथ. |
| १ | गोरखनाथ. | १ | नित्यनाथ. |
| १ | आनंदनाथ. | १ | निरंजननाथ. |
| १ | भैरवनाथ. | १ | बुद्धनाथ. |

या सर्वांविषयीं नाथचरित्र म्हणून मराठींत एक ओंवीबद्ध ग्रंथ छापून प्रसिद्ध झाला आहे. या नाथांचीं संस्थानें ठिकठिकाणीं आहेत. पैठणास शिवदीननाथाचें एक मंदीर आहे. नाथपंथी हे जोतपूरच्या राजाचे गुरु आहेत.

६२. मलूकदासी हा पंथ अकबर बादशहाचे वेळेस उत्पन्न झाला. हा रामानंदी पंथाची एक शाखा आहे. त्याची परंपरा अशी आहे:—

प्रथम मलूकदास, त्यामागून रामस्नेही, त्यानंतर कृष्णस्नेही, नंतर ठाकुरदास,त्यावर गोपाळदास,पुढें कुंजबिहारी, आणि त्यानंतर रामसाडू, शिवप्रसाददास, व गंगाप्रसाददास वगैरे. मलूकदासाचे मठ प्रयाग, वृंदावन, काशी, अयोध्या, लखनौ वगैरे ठिकाणीं असून जगन्नाथास त्याचा मुख्य मठ आहे. व तेथेंच तो निवर्तला.

६३. कबीर याचे, मागें कमाल, नंतर जमाल, त्यानंतर विमाल, त्यामागून बुद्दण व त्याचा शिष्य दादू हा होता. त्या दादूनें आपला स्वतंत्र पंथ केला. त्याचा जन्म अमदाबादेंत झाला. नंतर तो अजमिरास गेला. हा अकबराचे कारकीर्दींत होता. परंतु पुढें तो कोठें गेला याचा ठिकाण नाहीं. त्याचे चेले म्हणतात कीं, तो स्वर्गास गेला. याचे शिष्यांत विरक्त, नागे आणि विस्तारधारी, असे तीन प्रकार आहेत. हे जयपुरास अजमीर येथें पुष्कळ आहेत. दादू याचा धर्म कबीरासारखाच आहे. याचा मुख्य शिष्य निश्चलदास हा असून त्याणें विचारसागर नांवाचा ग्रंथ केला आहे.

६४. वल्लभाचार्य म्हणून लक्ष्मणभट्ट तैलंग ब्राह्मण याचे पुत्र असून ते गोकुळांत राहत होते. पुढें ते विजयनगर, उज्जनी, अमदाबाद व कांठेवाड वगैरे बहुत ठिकाणीं फिरले व त्या त्या ठिकाणीं त्यांच्या बैठकी म्हणजे स्थानें आहेत. नंतर ते वृंदावनांत आले. तेथें त्यांस देवाचा प्रसाद झाला. त्यांणीं बाळकृष्णाचें भजन करावें असें लोकांस सांगून शुद्धाद्वैत संप्रदाय चालविला. ते गंगेत प्रवेश करून स्वर्गास गेले असें ह्मणतात. यांचे संप्रदायांत वैराग्य आण-

ण्दाची मुळींच जरूर नसून शृंगारिक व संसारिक रीतीनें भक्ति करण्याचें त्यांणीं प्रतिपादन केलें आहे. मठांत राहणें व भिकारपणाचें मागणें हें त्यांणीं सर्वथैव वर्ज केलें आहे. ते तप्तमुद्रा घेत नसून तिलक नैवेद्य व पूजन वगैरेही सर्व सुंदर व सुखकर असाव, असें त्यांचें मत आहे. त्यांच्या पंथांत समर्पण म्हणून एक विधि आहे. तो जे करितात त्यांस मर्यादित ह्मणतात. ते आपसांत 'जयगोपाळ' किंवा 'जयश्रीकृष्ण' असें ह्मणतात. वल्लभी मतांचे ग्रंथ आहेत ते:—भागवतावरील सुबोधिनीटीका, अणुभाष्य, सिद्धांतरहस्य, भागवत,लीलारहस्य, विष्णुपद, ब्रिजविलास, व अष्टगणवार्ता वगैरे. वल्लभाची वंशावळ याप्रमाणें आहे:वल्लभाचार्याचा पुत्र विठ्ठलनाथ.त्यास गिरधर, रायगोविंद, रायबाळकृष्ण, गोकुळनाथ, रघनाथ, यदुनाथ व घनःश्याम असे सात पुत्र होते. त्यांचा वंशविस्तार पुढें पुष्कळच झाला आहे. वल्लभाचे शिष्य वाणी, मारवाडी, लवाणे व भाटे यांजमध्यें पुष्कळ आहेत. यांचें मुख्य पीठ उदेपूर प्रांतांत नाथद्वार येथें आहे. वल्लभास महाप्रभूजी आचार्य असें म्हणतात.

६५.मिराबाई ही मेरत्याच्या(जोधपूरप्रांत)राजाची मुलगी असून ती उदेपूरच्या राजास दिली होती.तिची सासू देवीउपासक असून तिचें वसुनेचें बनेना सबब तिजला राजवाड्यांतून काढून दिलें होतें. एकवेळ तर तिला रानानें ( नवऱ्यानें ) विष दिलें होतें, परंतु त्यापासून तिचें कांहीं झालें नाहीं ! पुढें ती श्रीकृष्णाची भक्ति करून द्वारकेस व वृंदावनास यात्रा करी. नवऱ्यानें तिला नेमणूक करून दिली होती. पुढें उदेपुराहून तिला बोलावणें आलें. त्या वेळीं ती श्रीद्वारकेस देवाजवळ निरोप घेण्यास ह्मणून गेली, व तेथें स्वरचित पदें म्हणूं लागली. तों द्वारकाधिशाचे मूर्तीचे दोन भाग होऊन मिराबाई त्यांत शिरली व ती मूर्ति पूर्ववत् जडून गेली! त्यानंतर उदेपुरास व द्वारकेस तिची मूर्ति बसविली आहे.

६६ भाकितें सांगणारे देव व देवऋषी पुष्कळ प्रसिद्ध आहेत ; मंत्र व अनुष्ठानें करणारे ढोंगीही पुष्कळ आहेत ; व भूत प्रेतांची बाधा काढणारे पंचाक्षरी, भगत व जाणते ही मंडळीही बहुत आहे.

शिवाय किमया करणारे असतात ते तांबें कथील यांचें सोनें रुपें करतों असें म्हणून फसवितात. त्याचप्रमाणें भूमींत पुरलेलें द्रव्य काढून देणारेही पुष्कळ आहेत. अमदाबादेंत जार्डन साहेबांच्या विधवा मडमेस एक बाई तिचे विहिरींतून द्रव्याच्या घागरी काढतें असें म्हणून तिजकडून हजार रुपये खाऊन गेली. पुढें तीस दीड वर्षांची शिक्षा ही झाली. असेच मुहूर्त, शकुन व ग्रहबाधा सांगणारेही भोळ्या लोकांस भुरळ घालतात. कितीएक तर गुरुमंत्र देऊन लोकांपासून द्रव्य काढतात; कितीएक मांत्रिक असतात ते दृष्टीचा, उतरणीचा, मूठ मारण्याचा, घुसळणीचा, गुराचे दूध उडविण्याचा वगैरेंचे अंगारे देऊन व मंत्र जपून लोकांस भ्रम घालून पैसा घेतात. संतती देणारे फकीर, पीर व वीर प्रसन्न करणारे अवलिया व ताईत, पेट्या देणारे जोगी हे तर सर्वत्र प्रसिद्धच आहेत, आणि शिंक पाहणें व पाल किंवा दिवा पडला तर त्यावरून भविष्य काढणें वगैरे प्रकारची भुरळ घालणारी मंडळीहि दुनयेंत ठिकठिकाणीं बहुत असून त्यांचेपासून फारच सावध राहिलें पाहिजे. कोणी बाण व शालिग्राम गिळून व कोणी कांच खाऊन सिद्धाई दाखवितात, व कोणी रफाई साहेबाचे चेले म्हणवितात. परंतु या सर्व गोष्टींस अनुभव, तर्क, पंचेंद्रियें आणि विचार हीं साक्षी देत नाहींत. शिवाय हीं कामेंही गुप्त चालवितात व त्यास रात्र व भोळीं माणसें असलीं म्हणजे तर फसविण्यास चांगलेंच फावतें. ह्याप्रमाणेंच कितीएक गोष्टींविषयीं पाहिलें असतां फक्त त्यांच्या नांवांच्या शब्दावरून अर्थाचे अनर्थ झालेले दृष्टीस पडतात. शाबरीविद्या व तसेंच इंद्रजाल म्हणून जादूचे व अनेक चमत्कारांचे ग्रंथ असून त्याविषयींच्या बहुत आख्या सर्व लोकांत पसरल्या आहेत. शाबरी विद्येवरूनच गुजराथेंत असणाऱ्या साबरमती नामक नदीचे नांवांत साबर हीं अक्षरें असल्यामुळें लोकांनीं असें ठरविलें कीं, शाबरी मंत्रानें ही नदी उत्पन्न झाली! व असा भ्रम बहुतांस आहे!! परंतु वस्तुतः पाहिलें असतां पर्जन्यादि कारणांनीं नद्या उत्पन्न होतात. याचप्रमाणें याही दोन नद्या मिळून एक साबरमती नदी झाली आहे.

त्यांत एकीचें नांव सावर व दुसरीचें नांव मती. हीं दोन्ही नांवें मुळा–मुठा नदीच्या नांवाप्रमाणें एकत्र होऊन चालतात. याच-प्रमाणें तित्तिर म्हणून एक वैशंपायनाच्या शिष्याचें नांव होतें तो जी शाखा पढला तीस तैत्तिरीय शाखा असें म्हणतात. तित्तिर हें एका पक्ष्याचेंही नांव आहे. त्याजवरून तित्तिर पक्ष्यांनीं ती शाखा गिळि-ली, वगैरे बाष्कळ गोष्टी प्रसिद्ध झाल्या! रोम म्हणून पूर्वीं एक मोठी बादशाही तक्ताची जागा होती. परंतु रोम या शब्दाचा अर्थ केश असाही होतो व इतक्यावरूनच गाईचे केश पडून त्याचीं माणसें होऊन त्यांणीं शहर वसविलें आणि त्याचें नांव रोम ठेविलें, अशी कल्पना केली! नाग म्हणून एक जात असून त्यांचीं नागपूर वगैरे शहरें होतीं. परंतु नाग शब्दाचा अर्थ सर्पही होतो, व इतक्या वरूनच नागकन्या ह्मणजे सापाच्या कन्या आणि त्यांशीं मनुष्यांचीं लग्नें झालीं वगैरे कथा उत्पन्न झाल्या! मावळांत ताप आला म्हणजे कागदाचा ताव जाळतात आणि म्हणतात कीं ताव जाळून टाकला म्हणजे ताप जाईल! ही फक्त नांवांवरून भ्रांति झाली. अशा अनेकार्थीं नांवांवरून अनेक भ्रांती उत्पन्न होऊन अर्थाचे अनर्थ झाले आहेत.

६७. साताऱ्यास शाहूराजा राज्य करीत असे म्हणून त्यास शाहू नगर असेंही ह्मणतात. परंतु शिवाजीचें सिंहासन राजगड येथें असून तेथून तो राज्यकारभार करीत असे. शिवाजी हा संकटकाळीं कोंकणांत रायगडास जाऊन राहत असे. व तेव्हांपासून ती जागा लपण्याची झाली आहे. नानाफडणीसही संकटकाळीं पुण्याहून पळाले ते रायगडींच आले. व त्याचप्रमाणें होळकरीचे वेळेस बा-जीराव पळाले तेही रायगडावरच लपून बसले होते.

६८. पूर्वापार अघाटत कल्पना लोक करीत आले आहेत. पांडवांस सूर्यानें स्थाली म्हणजे तपेली दिली होती व तींतून प्रार्थिला जिन्नस निघून मोठाल्या मेजवान्या होत! परिसाच्या गोष्टी तर पुष्कळ प्रसिद्ध आहेत. बदरीनारायणाची मूर्ति परिसाची आहे व तिला पूर्वीं, पंढरीच्या विठोबाप्रमाणें सर्व भक्तमंडळी शिवून नमस्कार

करीत असे. परंतु एका काळीं एका सोनाराचे हातांतील लोखंडाची अंगठी, तो नारायणाचें दर्शन करून बाहेर आला असतां सोन्याची झाली व लोखंडाचें सोनें होणें हा पूर्वप्रसिद्ध आख्येप्रमाणें परिसाचा गुण होय असें समजून आपली आंगठी नारायणाचे पायाशीं घांसली गेल्यामुळें हें सोनें झालें असा त्या सोनारानें तर्क बांधिला. पुढें त्यास हें अदृष्टपूर्व सुवर्णोत्पादक रसायन प्राप्त करून घेण्याची इच्छा उत्पन्न होऊन दुसऱ्या वेळेच्या दर्शनास त्याणें संधि राखून नारायणाच्या एका पायाची करंगळी कांपून घेतली ! त्या बरोबर देवाच्या पायांतून रक्ताचा स्राव चालला व हें दुष्टकृत्य उघाडीस आलें आणि तेव्हांपासून त्या देवास पुजाऱ्याशिवाय इतरांनीं शिवण्याची बंदी झाली. अशी गोष्ट भोळ्या लोकांत प्रसिद्ध आहे.

६९. अकबर बादशाहा राज्यावर स्थापन झाल्यावर २४ वर्षांनीं ह्मणजे इ० स० १५८० त, त्याचे धर्मसंबंधी विचार फिरले. त्याचा इतिहास अबदुल कादर मलुकशा बीदोणी याणें 'मन्त खातुत्त वारिख' ( संक्षिप्त इतिहास ) या ग्रंथांत लिहिला आहे. त्याजवरून असें दिसतें कीं, अबू फाजिल व फैजी वगैरे जे बादशहाचे कृपेंत होते त्याचा हा ग्रंथकार सोबती होता. याणें भारत, रामायण व राजतरंगिणी इत्यादि ग्रंथांचे फारशी भाषेंत तरजुमे करण्याला बहुत मदत केली. अकबर बादशहा हा अग्र्याजवळ फत्तेपूर सिकरी येथें एक मोठासा महाल बांधून राहिला होता. त्या ठिकाणीं नित्य विद्वान् लोकांची सभा होत असे. या बादशहानें मुसलमान पंडित, ब्राह्मण पंडित, पाद्री व नौसरी येथून दस्तुरजी नांवाचे पार्शी गृहस्थ असे जवळ ठेविले असून ते सर्व तेथें जमत व बादशहाचे समक्ष व्याख्यानें देऊन त्यांचीं संभाषणें चालत. कधीं कधीं हीं भाषणें चाललीं असतां उजाडेही ! असें होतां होतां बादशहाची मुसलमानी धर्मावरील श्रद्धा उडत चालली, व तो ह्मणूं लागला कीं, ईश्वरदत्त पुस्तकें, साधु व करामती ह्या तिन्ही गोष्टी सर्व धर्मांमध्यें असून, वेगळाले पंथही सर्व धर्मांमध्यें आहेत. त्याशिवाय, सुन्नी व सिया वगैरे लोकांचे तंटे याजसमोर इतके चालत कीं, ते परस्परास नास्तिक ह्मणत व वाईट

बोलत. तों तों त्यास त्या उभय मतवाल्यांचा पोकळपणा व धर्मा-विषयीं दुराग्रह व्यक्त होऊं लागला. बादशहा ह्मणे कीं, अधर्म व पाप हें सर्व धर्माध्यक्ष समजतात, मग इतका आग्रह लोक कशाकरितां धरतात? असें त्यास वाटून आपण नवा धर्म स्वीकार करावा असें त्याचे मनांत आलें. पुढें तो पुराणिकांकडून पुराण श्रवण करूं लागला. त्याच्या हिंदुबायका होमहवनें करीत, त्यांत बादशहाही सामील होऊं लागला. पुनर्जन्म, व हिंदुशास्त्रांतील सूर्य व अग्नि हीं दैवतें त्यास खरीं वाटूं लागलीं. तेव्हां त्याच्या तर्फेचे लोकही त्यास पुष्टीकरण करूं लागले. तरी कितीएक मुसलमान आग्रही होते ते रुसून गेले व कितीएकांनीं तद्विषयक लहान लहान पुस्तकें लिहिलीं. परंतु कित्येकांनीं बादशहाच्या मताचेच पुष्टीकरणार्थ कांहीं ग्रंथ लिहिले. त्यांत सुफी महजब जाणणारे ताजुद्दिन साहेबही अनुकूल होऊन राजाबिरबल व अबू फाजिल, फेजी, खानखानम, वगैरे मुख्य प्रधानही बादशाहाचाच पक्ष योग्य आहे असें बोलूं लागले. राजा हाच किबला व काबा आहे व त्याचा हुकूम तोच ईश्वराचा हुकूम असेंही ते ह्मणूं लागले. या बादशाहाचे पदरीं राजाबिरबल हा विलक्षण हजरजबाबी मनुष्य होता. त्यास बादशाहानें मलिकुषोरा असा किताब दिला असून त्याजकडे नागरकोटचा किल्ला व शिवाय महाल जाहगिरीही होत्या. त्यास काबूलचे स्वारीवर पाठविले असतां त्यांत तो पडला. बादशहानें नौरोज जलाली ह्मणून एक नवीनच सण केला. त्याचा सात दिवस उत्साह असे. दस्तुरजी या पार्शी पंडितांनीं तर. सूर्य व अग्नि हेच देव असून त्यांत सूर्य तर अगदीं निरुपद्रवी व अतिशय उपयोगी अशी ईश्वराचे दयेची प्रतिमा आहे, यास्तव त्याचेंच भजन बादशाहाचे मनांत उतरून दिलें. व त्याजवरून बादशहा हा प्रातःकाळीं व सायंकाळीं सूर्याची स्तुति करूं लागला. तो रक्षाबंधन व कधीं कधीं तिलकही करी. शेवटीं मुसलमानी धर्माची निंदा दरबारांत फार होऊं लागली. बादशहाचे मतास जो विरुद्ध असें दाखवी त्याजवर त्याची अवकृपा होऊं लागली. तथापि मुसलमानी धर्मही कधीं कधीं

बादशाहा मानीत असे. त्याणें अजमीर येथें ख्वाजे बंदनावज याची यात्रा केली; व त्या वेळेस तो पांच कोस पायांनीं चालला. त्याणें आपले वाड्याजवळ ख्वाजेचिस्ती याची मशीद बांधली. ती तर अत्युत्तम असून अद्यापि आहे. पुढें त्याणें, हिंसा करूंनये असा हुकूम करून गोवध बंद केला. व त्याचप्रमाणें सती जाण्याची बंदी केली. चवदा वर्षांनंतर मुलीचें लग्न व्हावें, पुरुषानें एका स्त्रीशीं मात्र लग्न करावें, असें फरमान पाठविलें. तेव्हां ब्राह्मण लोक त्यास अवतारी पुरुष व गोब्राह्मणप्रतिपालक असें म्हणूं लागले. त्याचे मतास पुष्टि आणण्याकरितां ब्राह्मणांनीं 'अल्लोपनिषद्' रचिलें. तो असें ह्मणूं लागला कीं, मुसलमानी धर्माचें आयुष्य काय तें हजार वर्षें आहे. व तीं वर्षें भरलीं यास्तव त्याणें हिजरी शक बंद करून तारिखइलाही ह्मणून एक नवाच शक सुरू केला. त्याचप्रमाणें त्याणें 'लाइल्लाइल्लिल्ला महंमद् रसूल अल्ला' असे शब्द होते, ते बदलून 'वल्अकबर खलीफ दुल्ला' असें जोडलें. त्याणें आपल्या या नवीन धर्माचें नांव 'दिनइलाही' असें ठेविलें. लोकांस सलामाचे ठिकाणीं 'अल्लाह अकबर' व त्याचा जाब 'जिल्जलालहू' असें ह्मणण्यास सांगितलें. त्याणें आपले वाड्यांत मुसलमानांचे अपवित्र पशू जीं डुकरें व कुत्रीं तीं ठेविलीं व आपला मुलगा सेलीम ( पुढें जहांगीर ) याचें लग्न राजा भगवानदास याचे कन्येशीं हिंदूरीतीनें लाविलें, त्या मुलीस दोन कोट रुपये स्त्रीधन दिलें. त्या लग्नाची वरात वगैरे बादशहा व राजा यांणीं स्वतः फिरून मिरविली. व त्यावेळीं त्याचे बायकांनीं कपाळीं कुंकू लावून त्याणें तिलक केला होता. याप्रमाणें बहुतांनीं नवीन धर्म कबूल केला. बादशाहाचे घरीं संक्रांतीचे दिवशीं मोठा उत्साह होऊं लागला. त्याणें आपल्या तसबिरा काढून लोकांस वांटल्या. त्याणें आपले वाड्याजवळ जोगी यांचा आखाडा ठेविला होता. शेख कमाल बीयाबानी यास खेचरी विद्या ह्मणजे आकाशांत चालण्याचें सामर्थ्य आहे अशी प्रसिद्धि होती, ह्मणून त्यास अकबरानें बोलावून आणून ती विद्या मला

शिकवि असें सांगितलें. परंतु ती तो सांगेना ह्मणून त्याचे हातपाय बांधून त्यास नदींत टाकण्यास सांगितलें. आणि खेचरविद्या असली तर तो आकाशांत जाईल व नसली तर अशा खोट्या पाखांड्याला शिक्षा होईल असें ठरविलें. तेव्हां तो फकीर कबूल होऊन ही गप्प शिष्यांनीं उठविली व ती खोटी आहे असें सांगूं लागला. मुसलमानांचे कुराणांत असें लिहिलें आहे कीं, जितकीं मुलें जन्मतात तीं सर्व मुसलमानी धर्मावर जन्मतात ; परंतु पुढें आईबापांचे संगतीनें अन्य धर्मांत जातात. यास्तव बादशहानें कित्येक लहान मुलें जमा करून चार पांच वर्षें त्यांस एका जागीं ठेवून त्यांजवळ कोणीं बोलूं नये असें सांगितलें. पुढें तीं मुलें मोठीं झालीं तेव्हां तीं सर्व मुकीं झालीं. ह्मणून त्या जागेचें नांव गुंगामहाल असें ठेविलें. व कुराणांतील वाक्य अगदीं अप्रमाण असें प्रसिद्ध केलें. त्याणें सर्वांचे धर्माप्रमाणें ज्यांणीं त्यांणीं आपलीं देवळें वगैरे बांधावीं ह्मणून परवानगी दिली. त्याचप्रमाणें सुंता करणें ती बारा वर्षांनंतर मुलाची खुषी असल्यास करावी असेही हुकूम दिले. त्याणें हिंदु व मुसलमान यांस निष्पक्षपातानें सारखें मानून उभयतांसही मोठ्या पदवीवर चढविलें याजमुळें या बादशाहाची कीर्त्ति फार वाढली. हिंदूंमध्यें कज्जा पडला तर तो ब्राह्मणांनीं तोडावा व मुसलमानांमध्यें तंटा पडला तर काजीनें फैसल करावा असा त्यानें ठराव केला होता. धर्मसंबंधी इतका विचार चालला होता तरी राज्यकारणावर बादशाहाची नजर चांगली असे. त्याणें काबूल गुजराथ वगैरे प्रांत काबीज केले व लोकांच्या सौख्याकरितां अनेक प्रकारच्या तजविजी करून रयत आबाद केली अशी त्याची आख्या आहे.

७०. शहाजी महाराज भोसले हे विजापूरचे बादशहाजवळ चाकरीस होते. त्यांचा धाकटा मुलगा व्यंकोजी होता. शहाजी १६६४ सालीं मेल्यावर तंजावरची जहागीर व्यंकोजीकडे आली व शिवाजी हा दक्षिणप्रांतीं राहिला. पुढें इ. स. १६८३ त विजापूर बुडालें. तेव्हां तंजावरचें संस्थान कर्नाटकच्या नबाबाच्या ताब्यांत आलें. व्यंकोजीचा पुत्र शहाजी, त्याचा पुत्र शरफोजी, त्याचा

पुत्र तुकोजी व त्याचा पुत्र बाबासाहेब. पुढें १८९१. याचा व त्याचे भावाचा तंटा लागला ह्मणून त्याणें इ० स० १७४९ सालीं इंग्रजांची मदत मागितली. परंतु तें काम सिद्धीस गेलें नाहीं. त्यावेळीं इंग्रजांस देवीकोटचा किल्ला मात्र मिळाला. पुढें कर्नाटकचे नबाबाचा व तुळजाजी महाराज यांचा तंटा लागला त्या वेळेस इंग्रजांनीं आपली फौज नबाबाचे मदतीस दिली. तुळजाजी हा सदरील बाबासाहेबांचा मुलीकडून पणतू होता. त्या मोहिमेंत सन १७७१ सालीं आठ लाख रुपये खंडणी, बत्तीस लाख रुपये खर्चाबद्दल व सोळा लाख रुपयांचा मुलूख अशी मिळकत तुळजाजी-कडून नबाबास मिळाली. तरी पुढें दोन वर्षांनीं नबाबानें तुळजाजीस अगदींच पदभ्रष्ट केलें; ह्मणून शेवटीं सन १७७६ सालीं त्याचा पक्ष कंपनी सरकारानें घेऊन त्यास राज्यावर कायम केलें तेव्हां त्याणेंही कृतज्ञता बुद्धीनें कंपनी सरकारची फौज चाकरीस ठेवून त्याज बद्दलचे खर्चास नागोर वगैरे चार लाख होनांच्या वसूलाचे महाल कंपनीस दिले पुढें इसवी सन १७८७ सालीं हैदर नाईकावर मोहीम करण्याचें ठरून त्या कामीं कंपनी सरकारास नबाब व अमर-सिंग महाराज ( तुळजाजीचा मुलगा ) हे अनुकूळ होऊन त्यांणीं कंपनी सरकारास फौज वाढविण्याकरितां पुष्कळ पैसा दिला. नबा-बानें तंजावरची सर्व खंडणी कंपनी सरकारास लावून दिली व कंपनी सरकारही तंजावरचे कर्जास जामीन झालें. पुढें इ० सन १७९२ सालीं तुळजाजीचा दत्तक मुलगा सरफूजी याशीं कंपनी सरकारचा तह होऊन त्यांत असें ठरलें कीं. सरफूजीनें दरसाल अकरा लाख होन कंपनी सरकारास द्यावे. आणि ते न दिल्यास सर्व मुलूख कंपनी सरकारानें सरफूजी पासून घेऊन राजकुळांतील नायकांच्या खर्चाची व कर्जाची मात्र वारासार करावी. पुढें इ० स० १७९८ सालीं तुळजाजीचा औरस मुलगा अमीरसिंग यास इंग्रजांनीं पदच्युत करून त्यास पंचवीस हजार होन पेन्शन करून दिलें. आणि त्या जागीं सरफूजीस गादीवर बसवून इंग्रजी कायद्याप्रमाणें दिवाणी व वसूली काम चालावें व त्याचप्रमाणें सरफूजीनें खाजगी खर्चास एक लाख होन

... ठरलें. पुढें सरफूजी हा तारीख ७ मार्च सन १८३२ रोजीं वारला. तेव्हां कंपनी सरकारानें त्याचा मुलगा शिवाजी महाराज छत्रपती यास गादीवर बसविलें. परंतु पुढें तोही निपुत्रिकच वारला. त्यास एक कन्या होती. परंतु आजपर्यंत तंजावरचा मुलूख बहुधा खालसा होत होतच आला असल्यामुळें या वेळीं इंग्रज सरकारानें सर्वच संस्थान खालसा करून त्याचे मुलीस पेन्शन करून दिलें. त्या मुलीस इंग्रज सरकारांत 'प्रिन्सेस ऑफ तंजोर' असें ह्मणतात व तें पेन्शन तिला चालू आहे. तिच्या नवऱ्याचें नांव प्रिन्स कान्सर्ट राजा सखाराम चव्हाण असें आहे.

७१. विलायतेंत इ. सन १८०१ पासून परवांच्या पार्लमेंट सभेच्या निवडणुकीपर्यंत पुढें लिहिल्याप्रमाणें प्रधान नेमले गेले:—

| प्रधानाचें नांव | तारीख, | माहे, | सन. |
|---|---|---|---|
| एच्. अडिंगटन्........ .... | १७ | मार्च | १८०१. |
| वुइल्यम् पिट्............... | १२ | मे | १८०४. |
| लॉर्ड ग्रयॉन्व्हिल्............ | ११ | फेब्रुवारी | १८०६. |
| ड्यूक आफ् पोर्टलंड........ | १३ | मार्च | १८०७. |
| एस्. पर्सीव्हल्............ | १८ | जून | १८१०. |
| अर्ल आफ् लिव्हरपूल........ | ८ | जून | १८१२. |
| जी. क्यानिंग्............ .... | ११ | एप्रिल | १८२७. |
| व्हायूकौंट् गॉडरिच........ | १४ | आगस्ट | १८२७. |
| ड्यूक ऑफवेलिंग्टन्........ | २५ | जानेवारी | १८२८. |
| अर्लग्रे.......................... | २२ | नोवेंबर | १८३०. |
| व्हायूकौंट् मेल्बोर्न्......... .. | ११ | जुलै | १८३४. |
| ड्यूक आफ् वेलिंग्टन्........ | १६ | नोवेंबर | १८३५. |
| सर आर. पील्.................. | ३ | सप्टेंबर | १८४१. |
| लॉर्ड् जे. रसेल................ | ५ | डिसेंबर | १८४५. |
| सर आर. पील् ............ | २० | डिसेंबर | १८४५. |
| लॉर्ड जे. रसेल............ | २६ | जून | १८४६. |
| अर्ल आफ् डार्बी............ | २२ | फेब्रुवारी | १८५२. |

| | | | |
|---|---|---|---|
| अर्ल आफ् अबरडीन........ | १९ | डिसेंबर | १८५२. |
| व्हायकौंट् पामर्स्टन........ | ५ | फेब्रुवारी | १८५५. |
| अर्ल आफ् डार्बी........... | २१ | फेब्रुवारी | १८५८. |
| व्हायकौन्ट पामर्स्टन्.... ... | १८ | जून | १८५९. |
| अर्ल रसेल्..................... | २२ | आक्टोबर | १८६५. |
| अर्ल ऑफ् डार्बी.............. | २७ | जून | १८६६. |
| बी. डिझराइली............ | २७ | फेब्रुवारी | १८६८. |
| डब्ल्यु.ई. ग्ल्याडस्टन.... | ४ | डिसेंबर | १८६८. |
| मार्किस बी० डिझराइली ( अर्ल् बीकन्सफील्ड ) ......... | | ........ | १८७४. |
| डब्ल्यु. ई. ग्ल्याड्स्टन.... | | एप्रिल | १८८०. |